

प्रस्तावना.

कोल्हापूर व कर्नाटक प्रांतांतील राज्यें व संस्थानें यांचा इतिहास या पुस्तकाचे दोन भाग पहिला व दोवसरा, वरेच दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाले आहेत.नु- कताच पूर्वार्धाचा दुसरा एक भाग ज्यांत विजापूरच्या आदिलशाही घराण्याचा इतिहास आहे तो प्रसिद्ध केला आहे. इतीं हा उत्तरार्धाचा पहिला भाग वाचकांपुढें ठेवीत आहे. यांत कोल्हापूर राज्याचा निम्मा इतिहास आला आहे. बाकीं निम्मा इतिहास व कोल्हापूरच्या जाहागीर घराण्यांचा इतिहास दुसऱ्या एका भागांत येईल.

पूर्वारंभीं मेजर ग्रेहानम यांच्या रिपोर्टाच्या रोखतीं जो थोडासा कोल्हापूर घराण्याचा इतिहास दिला आहे त्याचें भाषांतर करून छापावें असा संकल्प करून त्याचें भाषांतर तयार केलें. परंतु त्यानें समाधान न झाल्यामुळें तसेंच वेगळें आणि जुने कागदपत्र व बखरी मिळविण्यास यत्न करूं लागलों. परंतु त्यांतूनें कांहीं फारशी माहिती मिळेना. फार तर बुवासाहेब महाराजांच्या वेळचीं कांहीं माहिती सांगणारे मात्र अढळले. अस्सल मराठी तह नाम्यांच्या सुद्धां नकला मिळेनात. करवीर सरकारच्या दप्तरचे कागदपत्र पहाण्यास मिळाल्यावांचिनाय कोल्हापूर घराण्याचा खरा इतिहास रचतां येणार नाहीं, अशी खात्री होऊन, ते पहाण्यास परवानगी मिळावी एतद्विषयीं वरीच खटपट केली. परंतु ती सफल होण्याची आशा दिसेना. तेव्हां कोल्हापूरचा इतिहास रचण्याचें काम तसेंच ठेवून प्रथम पटवर्धन आदीकरून कर्नाटकांतील संस्थानांचा इतिहास प्रथम हातीं घेतला. कारण, पटवर्धनवगैरे कर्नाटकांतील सरदारांच्या घराण्यांच्या माहिती संबंधीं वाके, बखरी व कागदपत्र निकडून बरेच मिळाले, म्हणून तोच इतिहास प्रथम पुरा केला. पैठणीं येथें रीजन्सीची स्थापना झाल्यावर रावबहादूर येसवंत मोरेश्वर केळकर हे येथें जजंग दिवाणाच्या कामावर असतां करवीर सरकारचे जुनें कागदपत्र पहाण्याची व नकला घेण्याची परवानगी सुमारें चारवर्षांपूर्वी मिळाली. अ-

या कामीं पाहून कागदपत्रांच्या नकला घेण्याचें काम चालविलें.

वस हें

नकला घेण्यास फारकून देवावा लागला. त्याचा खर्च कैलासवासी श्रीमंत आबासाहेब कागलकर यांनीं दिला. कोल्हापूर दप्तरीं फार महत्त्वाचे व उपयोगी असे अनेक कागद आढळले. त्यांपैकीं कित्येकांच्या नकला पुस्तकाच्या शेवटीं दिल्या आहेत. कोल्हापूरचे पहिले शिवाजी महाराज यांची बखर व त्याच कारकीर्दीची रोजनिशी असे दोन महत्त्वाचे कागद सांपडले. त्यांचा उपयोग फार झाला. कागदपत्र शिवाजी महाराजांच्या अखेरपर्यंत मात्र साधिले. पुढील पहाण्यास अद्याप वेळ मिळाला नाहीं. असो, सदरहू कागदपत्रांवरून जरी ग्रंथाचा इतिहास रचिला आहे तरी अगदीं पुरा झाला असें वाटेना म्हणून बरेच दिवस ज्यांस त्यांस वाचण्यास देऊन ज्या कित्येक गोष्टींविषयीं कागदपत्रांवरून समाधान झालें नाहीं, त्याविषयीं माहिती मिळवीत होतों. परंतु तसें करण्यापेक्षां तयार झालेला इतिहास छापून प्रसिद्ध केल्यानें अनेकांच्या पहाण्यांत येऊन आपोआप अधिक माहिती मिळेल व अनेक दोष कळतील असें वाटल्यावरून हाल्लीं हा भाग शिलाछापानें छापून प्रसिद्ध केला आहे. तरी ज्यांच्या हातीं पुस्तक जाईल ते यांतील दोषं कळवितील व जीं ठिकाणें संदिग्ध आहेत त्याविषयी माहिती देतील अशी आशा आहे.

राजाराम कालेज कोल्हापूर
नाताख १४ एप्रिल १८८६.

बाळाजी प्रभाकर मोडक.

-ना-३८८
22

कोल्हापूर

प्रांताचा

अर्वाचीन इतिहास.

कोल्हापूर प्रांत मराठ्यांचे स्वाधीन झाल्यापासून कोल्हापूरच्या संभाजी महाराजाच्या अखेरी पर्यंत

सन १६५९-१७६०पर्यंत.

सतराव्या शतकांत ज्यावेळीं महाराष्ट्रदेशांत **शिवाजी** मराठी राज्याचास्थापक हळुहळू प्रबळ होत चालला, त्यावेळीं ह्या प्रांत विजापूरकरांचे ताब्यांत होता. विजापूरकरांचे पदरचा **रुस्तुमजमान** या सरदाराचे जहागिरींतील हा एक सुभा असून साक्षात् त्याच्या अमलाखाली होता. परंतु पन्हाळा किल्ला फार बळकट व प्रसंगीं शत्रु आल्यास टिकाव धरण्याजोगा असल्या मुळें, विजापूरकर पन्हाळा व कोल्हापूर यांवर एक स्वतंत्र कामगार नेमीत असत.

जरी हा प्रांत मुसलमानांचे हातीं होता, तरी चोहोंकडे सर्व कामगार मुसलमान नव्हते. कारण निवडक फौजेंत अधिक विश्वसनीय म्हणून स्वजातीय मुसलमानच अवश्य ठेवावे लागत. मुख्य कामगार ही स्वजातीय असणें जरूर होतें. म्हणून लांबलांबच्या ठाण्यांवर सर्वदां मुसलमान नेमण्यास सवड होत नसे. या मुळें या प्रांतांतील बहुतेक किल्ल्यांवर जे किल्लेदार असत ते बहुधा हिंदूच असत. ह्या प्रांत पुणें व खानदेश ह्या प्रांतांसारिखा सह्याद्री नजीक असून येथें किल्लेही अनेक होते. त्यांत **पन्हाळा, पावनगड, विशाळगड** वगैरे कित्येक मजबुती विषयीं फार प्रख्यात होते. ह्या कारणां शिवाजीचे मनांत हा प्रांत हस्तगत करण्याचें फार दिवस होतें. शिवाजीचा शेवट पर्यंत बाणाच होता कीं, जें काम

युक्ती प्रयुक्तीनें होईल तेथें लढाई करावयाची नाहीं.

अफझुलखानाचें पारिपत्य सन १६५९चे अक्टोबर महिन्यांत केल्यावर **शिवाजी** नें पन्हाळ्याचे किल्लेदाराशीं बोलणें लाविलें. तो हिंदू होता. हिंदू कामगारांना मुसलमान कोणत्या प्रकारें वागवीत असत हें प्रसिद्ध आहे. यामुळें तो किल्लेदार वश झाला, आणि किल्ला घेण्याची सर्व मसलत ठरली. इतक्यांत शिवाजीस शंका आली कीं, विजापूर सरकारानें आपणास हस्तगत करण्याकरितां कांहीं युक्ति योजिली असेल, तर सर्व फसेल. याकरितां **अण्णाजीदत्तो** यास मावळे लोकांची लहानशी टोळी देऊन पुढें पाठविलें, आणि आपण घोडेस्वार व पायदळ घेऊन प्रसंग येईल त्या प्रमाणें करण्याच्या बेतानें किल्ल्याच्या आसपास लपून राहिला.

अण्णाजीदत्तोनें सर्वबेत सिद्धीस नेला. पन्हाळा व पावनगड हस्तगत झाले; त्यासरसे शिवाजीनें **वसंत** गडावर एकाएकीं छापा घालून तो किल्ला घेतला, व कृष्णानदीचे दोंही बाजूंचें भांतांन रवंडणी चालू करून गडावर ठाणीं हीं बसविलीं. या प्रमाणें वत्तीस शिराळ्या पर्यंत ठाणीं वसवून परत पन्हाळ्यास आला. परत येतांच सह्याद्रीवरील व खालील सर्व आसपासचे किल्ले घेण्याच्या इराद्यानें मावळे लोकांच्या टोळ्या चोहोंकडे पाठविल्या; बहुतेक किल्ले लढाई न करितां लोकांनीं त्याच्या स्वाधीन केले. परंतु **रांगणा** व **रवळणा** हे दोन किल्ले युद्ध करून घ्यावे लागले. रवळणा किल्ला हस्तगत होण्यास बरेच प्रयास पडले; म्हणून त्या वेळीं त्यास शिवाजीनें **विशाळगड** हें नांव दिलें. हा सर्व मुलूख शिवाजीनें दोन महिन्यानच म्हणजे सन १६५९च्या डिसेंबर महिन्याचे आंतच काबीज केला.

शिवाजीनें कोल्हापूरप्रांत व त्यांतील किल्ले वगैरे सर्व घेतले, तरी हें वर्तमान विजापुरीं पादशाहास कळे पर्यंत कांहीं

मजमान सुभेदार यानें शिवाजीस बिलकुल अडथळा केला नाहीं या वरून तो शिवाजी स भ्याला तरी असावा, किंवा इंग्रजलोक संशय घेतात तसें शिवाजीनें त्यास लांच देऊन त्याचें तोंड तरी बंद केलें असावें. शेवटीं पादशाहानें जेव्हां त्यास कोल्हापूरचे बंदोबस्तास जाण्यास आज्ञा केली, त्यावेळीं तीन हजार स्वार व थोडेसें पायदळ घेऊन शिवाजीवर चालून आला. पन्हाळ्या जवळ येतांच शिवाजीनें आपले स्वार जमा करून त्याचा अगदीं पराभव केला; व त्यास कृष्णेच्या पलीकडे हांकून लाविलें, पुढें आपलें सर्व पायदळ विशाळगड येथें जमवून शिवाजी लुटीत व खंडणी घेत विजापुरा जवळ गेला; आणि तेथून अज्ञात्वरेनें माघारा विशाळगडास आला कीं, त्याच्या मागें पाठलाग करण्यास कोणास पाठविण्यास पादशाहाला अवकाश मिळाला नाहीं.

ही शिवाजीची त्वरा, जिकडे जाईल तिकडे त्याचा जय, त्याच्या युक्त्या, व त्याच्या माबल्याची दिवसानुदिवस वृद्धि हें सर्व पाहून विजापूरकरांस मोठें संकट पडलें. शहरो शहरीं व गांवोगांवीं शिवाजीचें भय इतकें लोकांस वाटत असे कीं, कित्येक भुरटे मराठे ही लहानसहान गांवीं जाऊन त्याच्या नांवावर खंडणी घेत व लूट आणीत असत. लहानसहान मुसलमान सरदार शिवाजीवर चालून जाण्यास फार भीत असत. पादशाहाच्या दरबारी लोकांत जी बेमनस्यें होतीं तीं मोडून सर्वांचें ऐक्य झालें, आणि शिवाजीचा मोड करण्यास काय युक्ति योजावी, याचा सर्व विचार करूं लागले. शेवटीं कर्नाटकांत **कर्नोळास** एक शूर **जोहार** नामें शिद्दी विख्यात पुरुष होता. त्याजवर अफझुल खानाचे दुप्पट फौज देऊन शिवाजीचें पारिपत्य करण्यास त्यास नेमिलें; त्यास **सल्लाबतखान** हा किताब ही दिला. आपले पित्याचे मृत्यूचा सूड घेण्याच्या इच्छेनें **फेझिल महमदखान**, अफझुल खानाचा पुत्र यानें ही जोहार

शिद्दी चरोबर लढाईस जाण्याचें आपण होऊन पत्करिलें. मो-
बिमेचा बेत असा ठरला कीं, घांटावरील पन्हाळावगैरे किल्ल्याव-
र शिद्दी **जोहारानें** चालून जावें. **फत्तेरखान** यानें, त्याच
वेळीं शिवाजीच्चे कोकणांतील मुलुखावर हल्ला करावा. वादीचे
देशामुखांस, शिद्दी जोहारास लागेल ती कुमक करण्याविषयीं
ही आज्ञा झाली.

शिवाजी सुटीत व खंडणी घेत जरी अगदीं विजापुरा
पर्यंत गेला, तरी विजापूर सरकारास वाटतही नव्हती, इतका
त्यांचा बंदोबस्त व राज्य व्यवस्था ढिली होती. परंतु शिवा-
जीचे डेर चोहोंकडे असत, त्यांनीं विजापूर दरबारची तयारी
लागलीच शिवाजीस कळविली. हें शिवाजीस कळतांच त्या-
नें घांटा खालील व वरील सर्व मुलखाच्या बंदोबस्ता करितां
जिकडे तिकडे योग्य लोक नेमिले. पन्हाळगड, असा मज-
बूत केला कीं, तो कोणाचेही हस्तगत होऊं नयें व नेथेंच स्वतः
आपण कडेकोट बंदोबस्तानें राहिला.

विजापूरकरांचें लष्कर येत असतांना वाटेनें त्यास कां-
हीं उपद्रव न करितां तसेंच येऊं दिलें. परंतु किल्ल्याजवळ ये-
ऊन छावणी देतांच **नेताजीपालकर** याजबरोबर स्वार
देऊन समोंवतालचा मुलूख लुटून ओस पाडून त्याच्या एवढ्या
मोठ्या सैन्यास धान्यादि मिळेनासें केलें. रात्रीं किल्ल्यांतून मा-
वळेलोक वगैरे पाठवून फौजेवर एकाएकीं वरचेवर छापे घालवी.
या प्रमाणें त्यांस जेर केलें. तथापि जोहाराचें सैन्य फार होतें,
त्यानें किल्ल्यास असा वेढा दिलाकीं, आंतून बाहेर व बाहेरून
आंत अगदीं कोणाचा शिरकाव होऊं नये, आणि फौजेंत असा
हुकूम फर्माविलाकीं, कोणीही मराठा सांपडला कीं, त्यास जि-
वंत सोडूं नयें. रात्रीं निराळे व दिवसास निराळे असे अधिका-
री व फौज नेमून त्यांस सर्वकाळ जागृत व हुषार ठेवण्याची त-
जवीज केली, व आपणही फार सावधगिरीनें राहून स्वतः स-

र्व फौजेवर देखरेख ठेवूं लागला. असा बंदोबस्त असल्यामुळें शिवाजीचें कांहीं चालेना; म्हणून त्यानें भ्रम घेऊन उलूपणानें गडबड न करितां उगाच तसाच कांहीं दिवस राहिला. अशा बंदोबस्तानें वेढा घातला असतां चार महिनें लोटले. शिवाजीचे एकाही हेराचा भांत पत्ता लागेना. यामुळें बाहेर काय चाललें आहे हें भांत कळेना. कोकणांत व सातारा पुण्याकडे काय वर्तमान झालें हें ही समजेना. या बहल तिकडे आपले बेत कसकसे सिद्धीस जातात याची वार्तमी लागेना. आपला पुढारी सन्निध असतां मराठ्यांचे हातून जसें कार्य होतें, व त्यांस जशी हुषारी असतें तशी त्याच्या पश्चात् त्यांस नसते. त्या बहल शिवाजीस मोठी काळजी पडली. परंतु पन्हाळगडांतून बाहेर जाण्यास इलाज नव्हता. युद्ध करून अशा मोठ्या सैन्याचा वेढा उठविण्यास लागावें, तर विनाकारण फार माणसांना हानी होणार. या करितां कांहीं युक्ती प्रयुक्तीनें बाहेर निघण्याचा निश्चय त्यानें केला.

सिद्दीलोक बचनाचें प्रामाणिक या विषयीं अद्यापि मराठे लोकांत प्रख्याति आहे. शिवाजीनें जोहारास असा निरोप पाठविला, की जर माझे जिवास भय नसेल, तर मी तहाचें बोलण्यें करावयास येतों. त्याचें अभय वचन मिळाल्यावर, थोडेसे लोक बरोबर घेऊन संध्याकाळचा थोडा दिवस उरला होता त्या वेळीं, किल्ल्यावरून येऊन शिवाजीनें, जोहार शिद्दीची त्याचे छावणींत भेट घेतली. दोघांचें तहाचे कलमाविषयीं बोलणें झालें. बहुतेक मोठीं कलमें बोलून, युक्तीनें कांहीं हलकीं कलमें राहिलीं तीं न संपतां, भाज संध्याकाळ झाला उद्यां बोलूं असें सांगून परत किल्ल्यावर गेला.

हें पाहून घेरा घालणारे लोकांस वाटलें, कीं आतां शिवाजी युद्ध करीत नाहीं. किल्ला हस्तगत झालाच, आणि इतःपर आरडी डोळ्यांत तेल घालून सावधगिरी राखण्याचें का-

रण नाहीं, हा त्यांचा बेसावधपणा पाहून **बाजी फसलकर** वर्षोडेसे मावळे लोक घेऊन रात्रीच्या अंधारांत कोणास कळूं न देतां किल्ल्या खालीं उतरून शिवाजी रांगण्याकडे गेला, शिवाजी बराच दूर गेल्यावर हिंदू **जोहारास** हें वर्तमान कळलें. तेव्हां त्यानें आपले स्वार व पायदळ त्याचे मागें त्याचा पाठलाग करावयास पाठविलें. त्यांनीं रांगण्याचे आलीकडे सुमारें तीन कोसांवर एके रिंवडींत शिवाजीस चढतांना पाहिलें; तेव्हां त्यानें ही त्यांस पाहिलें. त्यांच्याशीं लढाई करून आपला जीव धोक्यांत घालण्यापेक्षां, आपला बचाव युक्तीनें केल्यास मराठ्यांचें बहुत हित होईल हें जाणून बाजी फसलकर व दुसरे बरोबरचे मावळे लोक यांस त्याच रिंवडींत ठेवून मी किल्ल्यावर जाऊन तोफांचे पांच बार करी पर्यंत तुम्हीं येत आहेत यांशीं लढत असावें असें सांगून आपण पुढें गेला.

तो **परभू** त्यांच्यांतीं दोन प्रहर लढला व त्यानें मुसलमानांस कित्येक वेळ मागें ही हटविलें. परंतु मागून दुसरी मोठी फौज आली, तेव्हां मोठें तुंबळ युद्ध झालें. त्यांत मावळे लोक अर्धे पडले, बाजी फसलकर ही घायाळ झाला; परंतु इतक्यांत किल्ल्यावरून तोफांचे पांच बार ऐकून, मी आपलें काम फत्ते केलें असें म्हणून त्यानें प्राण सोडिला. पण हा या वेळीं शिवाजी यांत सांपडला नाहीं, म्हणून केवढा बचाव झाला! या करितां कित्येक त्यास कपटी म्हणोत, परंतु तो मोठा धूर्त व दूरदृष्टी होता यांत संशय नाहीं.

हें वर्तमान विजापुरीं पादशाहास कळलें तेव्हां जोहाराविषयीं त्यांच्या मनांत वांकडें आलें. त्यास वाटलें कीं, त्यानें लांच घेऊन शिवाजीस सोडिलें. मग सन १६६१ मध्यें पादशाहा स्वतः सैन्य घेऊन आला आणि **रांगणा** व **विशाळगड** या दोहों किल्ल्यांवरील **पन्हाळा** वगैरे किल्ले व सभोंवतालचा **शिवाजी** चा मुलूख त्यानें घेतला.

पुढें पर्जन्यकाळ आला म्हणून कृष्णेच्या काठीं चिमलगें यादरीं फौजेसहीत तळ देऊन राहिला. **शिवाजी** या पादशाहाचें समोर कधीं लढावयास आला नाहीं. परंतु त्यानें सह्याद्री पर्वतावरील **सांगणा** व **विशाळगड** हे दोन किल्ले त्याचे हातीं लागूं दिले नाहींत. हे किल्ले कोल्हापूर प्रांताचे पश्चिमेकडील बाजूस उत्तर व दक्षिणटोंकास आहेत.

पुढें शिवाजी दुसरीकडे प्रांत घेण्यांत वगैरे गुंतला असल्यामुळें पन्हाळावगैरे किल्ले विजापूरकरांचे हातीं बरेच वर्षें राहिले सन १६७२ मालीं विजापूरचा सुलतान **अल्ली आदिलशाहा** मरण पावल्यावर त्याच्या मागें विजापूरच्या राज्यव्यवस्थेत गोंधळ झाला. सन १६७३ सालीं मार्च महिन्यांत विशाळगडावर मोठी फौज जमा करून पन्हाळ्यावर शिवाजीनें छापा घालला, आणि तो व दुसरे किल्ले त्यानें घेतले. पुढें **हुबळी** लुटली वगैरे जें वर्तमान झालें तें सांगण्याचें येथें प्रयोजन नाहीं.

पन्हाळा वगैरे किल्ले व त्या सभोंवतालचा कोल्हापूर प्रांतातील मुलूख, तसच **चदन, वदन, पाडवगड, नादगिरी** व **ताटांग** हे किल्ले शिवाजीचे हस्तगत झाले, [illegible] व शिवाजीचें सामर्थ्य पुनः अधिकाधिक वाढत चाललें. हें पाहून विजापूरचा सुलतान **सिकंदर** बादशाहा हा लहान म्हणून तेथचा मुख्य कारभारी **रुवासरखान** यानें मोठी फौज देऊन **अबदुलकरीम** यास पन्हाळा व आसमंतातचा मुलूख घेण्यास पाठविलें. त्यानें पन्हाळा किल्ल्याचे आसमंतातचा मुलूख घेतला आणि पन्हाळ्यास वेढा घालण्याची तयारी केली.

यावेळीं मराठ्यांनीं **पन्हाळ्याचा** वेढा उठविण्यास प्रयत्न न करितां, **त्रिचनापल्लीचा** वेढा उठविण्यास जी **क्लाईव्ह** साहेबानें, कित्येक वर्षे पुढें युक्ति योजिली, तीच युक्

कि या प्रसंगीं प्रतापराव गुजर यांणें योजिली. पन्हाळ्यास कांहीं कुमक न पाठवितां **शिवाजी** नें प्रतापरावास विजापूरच्या भोंवतालचा मुलूख लुटण्यास पाठविलें. त्याणें तिकडे चोंहोंकडे लुटालूट चालविली, रवंडणी घेऊं लागला, आणि त्याणें विजापूरकरांस इतकें जेर केलें, कीं **रवबासरवानास**, पन्हाळ्यास वेढा घातला होता तो उठवून सर्व फौजे सह अबदुल्करीमास परत बालाविणें भाग पडलें. हें प्रतापरावास कळतांच त्याणें त्या फौंजेची मिरज व विजापूर या मध्यें वाटच बंद केली. त्यांस कोणीं कडून दाणापाणी मिळेनासें केलें. मुसलमानाच्या फौजेवर जिकडून तिकडून छापे घालून त्यांस अगदीं दमविलें. तेव्हां **अबदुल्करीमानें** प्रतापरावाशीं आर्जवाचें बोलणें लावून कांहीं दिवस लढाई तहकूब ठेवण्यास त्यास सांगितलें. ती लढाई तहकूब ठेवून त्या फौजेस विजापुरीं प्रतापरावानें जाऊं दिलें. हें ऐकून शिवाजीस फार राग आला आणि प्रतापरावाची फार निर्भत्सना करून त्यास एक तत्सदर्थीत पत्र लिहिलें.

आपणास ज्या कामाकरितां (पन्हाळ्याचा वेढा उठविण्यास) पाठविलें तें काम फत्ते झालें असें समजून प्रतापरावानें आपलें सैन्य वऱ्हाडांतील **पैनघाटचे** मुलुखांत चालविलें. प्रतापराव दूर गेलासें पाहून अबदुल्करीम पुनः सन १६७४ च्या फेब्रुवारी महिन्यांत सैन्य घेऊन पन्हाळा घेण्याकरितां आला. परंतु प्रतापरावास हें वर्तमान लागलेंच कळलें, आणि तो आपले घोडेस्वार घेऊन आला. याचवेळीं त्याचे हातीं शिवाजीचें पत्र आलें. तेणें करून अतीत्वेष येऊन त्याणें अविचारानें विजापूरचें सैन्यावर उडी घातली. त्यांत तो पडला आणि त्याचे सैन्याची दुर्दशा झाली.

मराठे पळत पळत पन्हाळ्याजवळ आले, आणि तेथें त्यांस आश्रय मिळाला. इतक्यांत **हसाजी मोहिते** नामें

सरदार पांचहजार स्वारांनिशीं आला. विजापूरकरांचे लोक मराठ्यांच्या पाठीस लागले आहेत. त्यांमध्यें कांहीं बंदोबस्त नाहीं, असें पाहून त्यांणें मुसलमानांवर हल्ला करून त्यांचा मोडकेला आणि त्यांस पळविलें. अबदुलकरीम राहिलेली फौज घेऊन मोठ्यालज्जेनें माघारा विजापुरीं गेला. हसाजी मोहिते याच्या सैन्यांतील दोन सरदार मोठ्या शौर्यानें लढले. एक संताजीघोरपडे, ज्यांचे वंशज हल्लीं कापशीस आहेत; व दुसरा धनाजीजाधव, त्यांचे वंशज ही कोल्हापूरकरांचे मानकरी आहेत.

या पुढें विजापूरचे दरबारीं फारसा एकोपा नव्हता. शिवाय हा मात घेण्यास फार प्रयत्न करून तें शेवटीं दमले. शिवाजीच्या पराक्रमाविषयीं व मुत्सद्दीपणाविषयीं त्याची खात्री झाली. विजापूरकरांनीं पन्हाळा व कोल्हापूरप्रांत घेण्यास या पुढें कधीं प्रयत्न केला नाहीं व त्यांच्या हातीं ही लागला नाहीं. अबदूलकरीमाबरोबर कोल्हापूरप्रांतावर जी विजापूरची फौज आली होती, ती शेवटची होय.

महाप्रतापी शिवाजीमहाराज सन १६८०सालीं निवर्तले. तेव्हां त्यांस दोन पुत्र होते. शिवाजीची ज्येष्ठ पत्नी सईबाई इचा पुत्र संभाजी हा वयानें ज्येष्ठ होता; आणि शिवाजीची कनिष्ठ पत्नी सोयराबाई इचापुत्र राजाराम हा वयानें कनिष्ठ होता. संभाजी यावेळीं पन्हाळ्यावर होता व राजाराम रायगडीं होता. दलेल खानाकडून आल्यावर शिवाजीनें संभाजीस त्याच्या दुर्वर्तनामुळें पन्हाळ्यावर बंदोबस्तानें ठेविलें होतें. आपल्या मागें राज्यरक्षण कसें होईल ही काळजी शिवाजीस अंतकाळींच पडली होती. राज्य दोघां पुत्रांस वांटून द्यावें तर कलह वाढून राज्यवृद्धि होणार नाहीं. वडील पुत्र क्रूरव्यसनी असून राज्यकरण्यास योग्य नाहीं. कनिष्ठ पुत्र गुणेकरून युक्त, परंतु वयानें लहान आहे. यामुळें पुढील विचार यथा-

स्थित दिसत नाहीं; असें बोलून पुढील व्यवस्था शिवाजीनें कांहीं निश्चयात्मक ठरविली नव्हती. गजारामाची आई रायगडावरच होती. पेशवे, अमात्य, सचीव, सेनापति वगैरे प्रधान मंडळीस बोलावून कळविलें कीं, महाराजांनी अशी आज्ञा केली कीं, "संभाजीस त्याच्या दुष्ट व उग्र स्वभावामुळें राज्य आवरणार नाहीं. तो सर्वांचा नाश करून आपलाही नाश करून घेईल. औरंगजेब समीप ठेपला आहे, त्याचा पराभव त्याच्यानें होणार नाहीं. यास्तव संभाजीस पन्हाळ्यावर बंदोबस्तांत ठेवून राजाराम यास घेऊन राज्य रक्षण करावें, व मोंगलांचें निवारण करावें, आणि नंतर राज्य संभाजीचे स्वाधीन करावें." ही मसलत सिद्धीस नेण्यास तें सर्व तयार झालें, व त्या प्रमाणें रायगडीं बंदोबस्त केला. पन्हाळ्याचा हवालदार बहिरजी नाईक इंगळे होता व सोमजी नाईक बंकी व हिरोजी फरजंद हे दोघे सरदार त्याचें हातारवाले होते, जनार्दनपंत सुमंत करविरीं होते. त्या सर्वांस संभाजीस कैद करून बहुत सावधपणें असावें, अशी पत्रें जासुदाबरोबर पाठविलीं, तीं पत्रें संभाजीस मिळालीं व त्यासही सर्व मसलत समजली, तेव्हां त्याणें हवालदार व सबनीस यांस बोलावून त्याच्या देखत जासुदास दबावून विचारिलें. त्या समयीं जासुदानें झालेला मजकूर सविस्तर सांगितला. सोयराबाई साहेब व अष्टप्रधान यांणीं राज्य कारण करून राजारामास गादीवर देण्याचा विचार केला आहे; व आम्हांस कैद करण्याचा त्यांचा बेत आहे, यास्तव याचा पक्केपणीं विचार केला पाहिजे. तेव्हां त्याणें किल्ल्यावरील गडकऱ्यांस वश्य करून सोमाजी नाईक बंकी व सूर्याजी कंक मावळा या दोन सरदारांस कैद करून अभयदानें मारून टाकिलें, आणि किल्ल्याचा पक्का बंदोबस्त केला. हिरोजी फरजंद हवालदार मात्र चिपळुणाकडे पळून गेला. नंतर जनार्दनपंत फौजेसह करविरीं होता, त्याच्या फौजेंतील कांहीं लोक संभाजीनें फितूर केले, आणि त्यास व पन्हाळ्यावरील निवडक

मावळे लोकांस बरोबर घेऊन कोल्हापुरी जनार्दन पंतावर छापा घालून त्यास धरून पन्हाळ्यास नेलें. पुढें पांच सहा महिन्यांनं संभाजी रायगडीं गेला व त्याणें आपल्यास राज्याभिषेक करविला, आणि आपला सावत्र भाऊ राजाराम यास बंदींत टाकिलें, आणि त्याची आई सोयराबाई इजला ठार मारविलें.

संभाजी पुनः सन १६८१ त पन्हाळ्यास येऊन राहिला, आणि तो पुढें मरणकाल पर्यंत याच घांटी पन्हाळ्यापासून संगमेश्वरापर्यंत कोठेंतरी रहात असे.

संभाजी स्वभावतः मोठा शूर, पण अधीर, उद्धट, अव्यवस्थित व व्यसनी होता, या मुळें शिवाजीनें मोठ्या प्रयासानें मजबूत पायावर बांधलेली मराठी राज्याची इमारत दासव्हावयाचीच, परंतु औरंगजेबाचे हातून मोठ्या चुका झाल्या त्या मुळें, व मोंगल लोकांस ऐषआराम व डामडौल याची आवड लागली होती व त्या कारणानें त्यांचें शौर्य-ह्रास पावत चाललें होतें त्यामुळें मराठे शाई या प्रसंगीं निभावली. आतां कोल्हापूर परगणा मोंगलांच्या हातीं कसागेला हें सांगण्या पूर्वी त्याचे माजी अधिकारी विजापूरकर या विषयीं व औरंगजेबानें दक्षिणेंत सैन्य आणिलें होतें, त्या विषयीं चार शब्द सांगणें अवश्य आहे.

दक्षिणेंत विजापूर, गोवळकोंडें गेरे जीं मुसलमानांचीं स्वतंत्र राज्यें होतीं, त्यांशीं सख्य करून, त्यांचा व आपला साधारण शत्रु जे मराठे लोक प्रबळ होत होते, त्यांचा मोड करण्याचें टाकून मराठ्यांबरोबर या राज्यांचाही नाश करण्याचें वेडें कृत्य औरंगजेबानें आरंभिलें. या वेळीं विजापुरीं जो अवरंगजेबाचा वकील होता, त्यानें तेथील कारभारी मंडळींत वैमनस्यें पाडून एकाचा बेत दुसऱ्याच्या मनास येऊं नये असें करून सोडिलें. शिवाजीच्या अंतकाळीं जो विजापूरकरांचा व मराठ्यांचा थोडासा स्नेह झाला होता, तो नाहींसा करून शिवाजीनें कृष्णेच्या कांठचा मुलूख घेतला होता, तो परत घेण्यास विजापूरकरांस

शिकविलें. त्या समाणें त्यांनीं फौज पाठवून तो मुलूख घेतला; तेणें करून त्यांच्या स्नेहांत अंतर पडलें, ही वकीलांची खटपट जर सिद्धीस न जाती तर हैदराबादचा (गोवळकोंडें) कारभारी मद्दाणापंत याचा बेत होतांकीं, विजापूरकर व आपण एक व्हावें व मराठ्यांचा स्नेह संपादावा, आणि औरंगजेबाचें कांहीं चालूं देऊं नये. आणखी एक गोष्ट अशी झाली, कीं विजापूर येथील मसाउदखान कारभारी यानें किती एक स्वार दूर केले, तेही मराठ्यांकडे चाकरीस राहिले. गोवळकोंड्याचे दरबारीं ऐक्य होतें असें नाहीं. तेथें मद्दाणापंत हा हिंदु कारभारी होता. म्हणून तेथील मुसलमान सरदार, मानकरी वगैरे त्याचा हेवा करीत. हें वैर दृढकरण्यास मोंगलाचे वकील हजर होतेच. बरें औरंगजेबानें दक्षिणेंतील हा मुलूख घेण्या करितां जी फौज आणिली तींत म्हणजे मोठे शूर योद्धे होते किंवा तींत फार व्यवस्था होती असें नाहीं. केवळ मराठे, विजापूरकर व गोवळकोंडेकर यांची अव्यवस्था व आंतल्या आंत फुटाफूट व मराठ्यांच्या संभाजीची अव्यवस्थित वागणूक या मुळें मोंगलांचा जय झाला. या प्रसंगीं जर शिवाजी असता किंवा संभाजी पाचीं पहिले बाजीराव सारखा मसलती व शूर कारभारी असता तर औरंगजेबास बऱ्हाणपूर वलांडूं दिलें नसतें.

औरंगजेबाचे फौजेंत उत्तरे कडील पंजाबी वगैरे लोक शरीरानें बळकट व धिप्पाड, आणि भांगांत लोखंडी जडाचिलखतें घातलेले असे होते, त्यांचे घोडे ही उंच व धष्टपुष्ट असे होते, तसेंच पायदळांत चापाचे व नेमाचे बंदुकवाले व कित्येक नीट कमाण वाले होते, फौजेंत लढाऊ मोठ्या पुष्कळ नौका होत्या, व गोलंदाजांत फिरंगी होते, व लढाऊ हत्तीही पुष्कळ होते. अशा या प्रचंड फौजे पुढें दक्षिणेंतील मराठे केवळ सुकुमार दिसत.. हे लोक गिड्डे, व यांच्या आं-

गाचा बांधा अगदीं लहान व सडपातळ, पण चिवट; त्यांचा पोषाख गांडिंत लंगोटी, डोकीस मुंडासें, व आंगावर कांबळें; ज्यांचीं शस्त्रें भाला व तरवार, ज्यांची रहाण्याची रीत म्हटली म्हणजे राना वनांतून, गिरिगुहांतून, आज गुजराथेंत तर उद्यां कर्नाटकांत असें हिंडणें, ज्यांचे घोडे आंगानें लहान सडपातळ व मस्त, ज्यांचा जन्म पन्हाळ्यावांतर लुटीच्या अथवा लढण्याच्या वेळे शिवाय एके जागीं पन्नास देरवील असावयाचे नाहींत, ज्यांचें भक्ष्य केवळ जोंधळे, बाजरी वगैरेची भाकरी व चटणी, व वाटेनें तर कित्येक दिवस फक्त हुरड्याच्या कणसांवर काळ काढीत, अशा लोकांनी मोंगलाच्या फौजेशीं टिकाव धरिला हें पाहून चित्तास आश्चर्य वाटल्यावाचून रहात नाहीं. परंतु जेव्हां मोंगल दरबाराचें वैभव, त्या दरबाराचा थाटमाट, राज्याचा अवाढव्य पसारा व अंदाधुंदी, वाटेंतील त्यांचा लवाजमा व खर्च, दरबारांतील वैमनस्यें, औरंगजेबाचा बेभरंवशी स्वभाव व जनानखाना, इत्यादि गोष्टी मनांत आणिल्या, म्हणजे औरंगजेबाचा दक्षिणेंत कांहीं काळ तरी कसा जय झाला याचाच अचंबा वाटतो. असो शेवटीं मोठ्या प्रयासानें व मसलतीनें विजापूर व गोवळकोंडें हीं दोन्हीं राज्यें औरंगजेबानें रसातळास मिळविलीं. परंतु कोल्हापूर परगणा मराठ्यांच्या स्वाधीन होता, तो त्याच्या हातीं लागला नाहीं. या वेळीं दक्षिणभांत बहुतेक निष्कंटक झाल्यामुळें आपली सर्व फौज मराठ्यांचें पारिपत्य करण्यास औरंगजेबास पाठविता आली. तथापि एवढ्या मोठ्या जिंकलेल्या मुलखांत चांगला बंदोबस्त ठेवून नव्या प्रांतावर हल्ला करावा हें शहाणपणाचें कृत्य न घडल्या कारणानें, मराठ्यांचा उपद्रव चालूच होता. आज मराठ्यांनीं बऱ्हाणपूर जाळिलें तर उद्यां रवानदेवा लुटला, परवां गुजराथेंत खंडणी घेतली इत्यादि वर्तमानें औरंगजेबाचे जासूद त्यास लष्करांत वरचेवर पोंचवीत. कोल्हापूर परगण्याची व्यवस्था-

म्हणजे कित्येक किल्ल्यांवर एक किल्लेदार असून त्याचें ताब्यांत त्या जवळपासचा मुलूख असे. त्या प्रमाणें **पन्हाळा, वि-शाळगड** वगैरे किल्ल्यांवर किल्लेदार होते. ही व्यवस्था **दा-जी पंडितानें** वेळेपर्यंत कायम होती. किल्लेदारांशिवाय प्र-त्येक गडावर एकेक मामलेदार होता. प्रत्येक किल्लेदारापाशीं त्याच्या ताब्यांतील मुलखाच्या संरक्षणापुरती फौज असे. जरी यांस मोंगलाकडून एक सारखा उपद्रव पोंचत होता, तथापि त्यांणीं कोल्हापूर परगणा औरंगजेबाच्या हातीं लवकर लागूं दि-लाच नाहीं, परंतु मराठे करतात काय? त्यांच्या राजापासून त्यां-स कोणत्याच प्रकारें उत्तेजन मिळेना. राज्यव्यवस्थेंत फारसें चि-त्त न घालितां संभाजी **विशाळगड, पन्हाळा** आणि **संं-गमेश्वर** या स्थळीं **कलूषा** समागमें काळ चैनीनें घाल-वी. बरें आपण नाहींतर नाहीं, पण आपल्या वडिलांच्या वेळचे हुषार व विश्वासू नोकर त्यांजकडे तरी कारभार सोंपवा-वयाचा होता, परंतु तसेंही त्याणें केलें नाहीं. उलटें बहुतेक जुन्या कामगारांस दूर करून कलूषाकडे सर्वकारभार दिला होता. सैन्यांतील अव्यवस्था, **संभाजी** चा अस्ताव्यस्त खर्च, रयतेव-रील नवीन कर व इतर जुलूम, याणें मराठे देखील कंटाळले होते. या प्रसंगीं संभाजी ज्या शूर मराठ्यांस रजा देई ते निरुपायास्तव जे किल्ले हातीं लागतील ते हस्तगत करून जिकडे तिकडे बंडें करून लुटालूट चालवीत. येणें करून बराच उपयोग झाला, कारण त्यांच्या पारिपत्यास **औरंगजेबास** फौज बरचेवर पा-ठवावी लागे.

कोल्हापूर परगणा घ्यावयास तकरीबरखान नामें सरदा-रास तेथील फौजदारी द्यावयाच्या करारानें औरंगजेबानें पाठविलें. कोल्हापूर संबंधें, सहज हस्तगत होण्याजोगा जो मुलूख होता

※ मल्हार रामराव कृत संभाजीच्या बखरींत इलाचीबेग या सरदारानें धरिलें असें आहे.

नो मोंगलांच्या स्वाधीन झाला. परंतु पन्हाळा आदिकरून ज्या बळकट जागा होत्या त्या मराठ्यांच्याच हातीं होत्या.

तकरीबखवान कोल्हापुरीं मराठ्यांविषयीं चोहोंकडून बातम्या कादीत असतां त्यास समजलें कीं, संभाजी असावधपणें संगमेश्वरीं राहिला आहे; तेव्हां त्यास वाटलें कीं, राजासच धरून कैद केल्यास मराठे आपोआप (बिगरणें) येऊन सर्व प्रांत स्वाधीन करतील. अशा बेतानें त्यानें संगमेश्वरीं गुप्तपणें स्वारी करून संभाजीस कैद करून कोल्हापुरीं आणिलें. नंतर त्यास औरंगजेबाकडे नेल्यावर, मराठ्यांत दहशत पडावी म्हणून क्रूरपणें त्यास जिवें मारिलें. परंतु याचा परिणाम उलट झाला. अगोदरच मराठे यांचें मोंगलांशीं हाडवैर होतें, तें या क्रूरकृत्यानें दसपट वाढलें.

संभाजीस मोंगलांनीं मारिलें, तेव्हां त्यास एक पुत्र शिवाजी नांवाचा होता. परंतु तो वयानें अगदीं लहान होता, सबब त्याची आई येसूबाई इच्या विचारें सर्वकारभाऱ्यांनीं राजाराम यास गादीवर बसवून राज्यकारभार चालविण्याचें ठरविलें. शिवाजी, येसूबाई, राजाराम वगैरे सर्व रायगडीं आहेत असें कळतांच रायगडास वेढा घालण्यास जुल्फिकारखानास बरोबर औरंगजेबानें फौज रवाना केली. तेव्हां राजारामानें विचार केला, कीं आपणजर येथें कोंडून राहिलों, तर बाहेरील व्यवस्था रहाणार नाहीं. यास्तव रायगडचा बंदोबस्त करून शिवाजी व येसूबाई यांस तेथें ठेवून आपण पन्हाळा व विशाळगड किल्ल्यांकडे जाण्यास निघाला. राजारामाची पहिली पत्नी वारल्यावर त्याचीं आणखी दोन लग्नें झालीं होतीं. एका पत्नीचें नांव ताराबाई, ती मोहित्यांची कन्या, व दुसरी राजसबाई कागलकर घाटगे यांची कन्या होती. या उभयतां पत्नीसहवर्तमान मुख्य कारभाऱ्यांस घेऊन राजाराम महाराज पन्हाळ्यास येऊन पोंचले. हें वर्तमान पादशाहास समजतांच त्यांजवर पन्हाळ्याकडे मोंगली फौज रवाना झाली.

तेव्हां तेथून निघून विशाळगड, रांगण्याकडे राजाराम महाराज गेले. तेव्हां पन्हाळ्यास वेढा घालून किल्ला मोंगलांनी हस्तगत केला. नंतर विशाळगड, रांगण्याकडे मोंगली फौज धांवली. सर्व मांतांत पादशाहाची फौज फिरूं लागली, आणि सर्व राज्य मोंगलांनीं व्यापिलें. जिकडे जावें तिकडे उचांड मागें आहेच. दमरवाऊन लोक ठेवणें, फौज बंदी करणें व एकादीमसलत बलावणें यास अवकाश सांपडेनासा झाला. यास्तव येथून जमाव फोडून चंदीस (जिंजीस) जावें, असा राजाराम महाराजांनीं निश्चय केला. आपले कबिले (स्त्रिया) विशाळगडीं ठेवून व रामचंद्र निळकंठ (बावडेकर) यांस हुकमनपन्हा हा किताब देऊन त्यांजकडे इकडील मांताचा व घांदमाध्याचा बंदोबस्त सोंपवून, राजाराम महाराज कांहीं मुत्सद्दी सरदारांस घेऊन जंगम, सिंगाईत, कापडी यांच्या वेषानें चंदीस गेले.

इकडे रायगडास मोंगल व हबशी यांनीं वेढा दिला असतां किल्लेकरी यांनीं किल्ला दहा महिनें भांडविला, परंतु बाहेरून कुमक येण्याची बंद झाली, तेव्हां येसूबाईनें तह करून मोंगलांचे हवालीं किल्ला केला. तेव्हां खान शिवाजीस घेऊन औरंगजेबाकडे गेला. नंतर मोंगलांची फौज पन्हाळ मांतीं आली. रामचंद्रपंत विशाळगड व रांगणा बळावून व जागजागीं फौजा ठेवून मांतांत स्वाऱ्या करूं लागले. मोंगलांनीं पन्हाळा घेतला व तेथें एक सरदार ठेवून रांगणा व दुसरे कोकण बांधारीचे किल्ले सोईसोईनें घेण्याचा तजवीज केली.

राजाराम महाराज चंदीस जाऊन पोंचल्यावर तें फौजबंद झाले. जिकडे जे गेले त्यांस सरदाऱ्या व किताब दिले. शिवाजी महाराजांची सर्व शिस्त सुरू करून पूर्व मर्यादे प्रमाणें व महारांजांनीं धारे करून दिले होते त्याप्रमाणें सर्व

राज्य चालवूं लागले ज्यांनीं त्या मांतांत जाऊन पाळेगारीनें मुलूख मारून चौथ, सरदेशमुखी, घांसदाणा वगैरे अंमल बसवून राहतों असें म्हस्लें त्यांस किताब व त्या मांतांच्या सनदा देऊन रवाना केलें. नंतर प्रकार रामचंद्र पंतानें इकडेहा मुरू केला. त्यामुळें शेलांच्या घाडी प्रमाणें मोंगलांच्या मुलुखांत मराठ्यांच्या टोळ्या फिरूं लागल्या, व पादशाहाच्या फौजेच्या पाठीस सर्वत्र मराठे लागले. त्यांत धनाजीजाधव व संताजी घोरपडे यांनीं तर मोंगलांस भारी भारी करून सोडिलें.

विशाळगडीं राजाराममहाराजांच्या तिन्ही स्त्रिया होत्या. राजाराम चंदीस निघाले त्यावेळीं ताराबाई दोन महिन्याची गरोदर होती. ती विशाळगडींच बाके १६१३ सालीं प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. त्याचें नांव शिवाजी असें ठेविलें. नंतर ताराबाई, राजसबाई आणि अंबिकाबाई या तिघांस रामचंद्रपंतानें कारकून हुजरे वगैरे देऊन गुप्तपणें घोंटारवाडीं पाठविलें व तेथून जहाजांतून चंदीस पोंचतें केलें.

रामचंद्रपंतांनीं पन्हाळा व पावनगड येथील हवलदार वगैरे मंडळींशी सधान करून दोन्ही किल्ले घेतले. पुढें जुल्फिकारखान याचा वेढा चंदीस पुष्कळ महिने पर्यंत असतां त्याच्याशीं अंतस्थ मसलत करून राजाराममहाराज कुटुंब मुद्धा निसटून विशाळगडीं आले, व तेथून पन्हाळ्यास गेले. त्या स्थळाहून औरंगजेबाच्या लावणीवर गुप्त छापा घालून शिवाजीस (शाहूस) सोडवून आणावा, असा निश्चय ठरला, परंतु तो फसला. पुढें ते सिंहगडा गेल्यावर नवज्वर होऊन मृत्यु पावले.

राजाराममहाराजांचा काल झाला त्या हिवरीं ताराबाई व राजसबाई पन्हाळ्यास होत्या. *अंबिकाबाई विशाळगडीं होती.

---

* विशाळगडच्या बरवरेंत अहिल्याबाई असें नांव आहे तें. परंतु तो भ्रम दोष असावा.

लिला हें वर्तमान कळल्यावर ती सती गेली. यावेळीं विशाळगडीं घडलेली चमत्कारीक गोष्ट मल्हारराम राव यांणीं आपल्या बखरींत अशी लिहिली आहे, व तिकडील लोक ही अद्याप सांगतात. "[हें वर्तमान] विशाळगडीं कळलें, त्या समयीं चार सहा घटका दिवस होता. अंबिका बाई साहेबांस समजल्या नंतर त्या वाड्यांतून निघून मदरेस आल्या. हवालदार इत्यादिकांनीं मुजरा करून ते अमी झाले. तेव्हां बाई बोलल्या कीं, "हा मृत्यु लोक आहे. अमी का होतां? आम्हीं सहगमन करणार! माघित्य करावें!!" यावरून सरनोबत बोलिल्या कीं, "महाराज अस्तां वाड्या बाहेर निघतां येत नव्हतें. मनुष्य दृष्टीस पडत नव्हतें. हल्लीं या मिषें लोक पहावेत अशी इच्छा झाली." हें ऐकून ज्याचें दैवीं माझें सतीचें जाणें पहाणें असेल ते पहातील." अशीं बाईचे मुखांतून अक्षरें निघतांच यांचे डोळे अंध झाले, त्या कार्णीं सरनोबत घाबरा होऊन [त्याणें] पायावर डोई ठेविली. "महाराज! मी चुकलों! मजवर कृपा करावी" असें म्हटल्यावरून हसून बोलल्यावरी "सती जाण्याचें पहावें" म्हणतांच दिसूं लागलें. हा चमत्कार सर्वांनीं पाहून विनंति केली कीं, "महाराजांचा काल सिंधुगडीं झाला, आज तिसरा दिवस. तेव्हां सहगमन कशास करावें?" तेव्हां उत्तर केलें "आपल्यास कळला नाहीं दिवस मुख्य. तुम्हीं कोणी संशय न धरितां साहित्य लवकर करा. अनमान करालं तरी तुम्हांस महाराजांच्या पायांची शपथ." तेव्हां हवालदार यांनीं विनंति केली, "दिवस थोडा राहिला, मलकापुराहून साहित्य येणें, [त्यास] वेळ होईल. गलबताचें दिवस, किल्ल्याचें काम, येविशीं आज्ञा व्हावी." "स्वार पाठवून जलदीनें सामान आणवावें, तो सहगमन केल्यावाचून सूर्य अस्तास जाणार नाहीं." तेव्हां एकमेकांकडे पाहूं लागले. "तुम्हीं खोटें मानू नका." [असें सांगून] मदतची सावली पडली होती, त्या सावली जवळ किंचित् मा-

नाचा दीग करवून त्यावर पळसाचें पान गोविलें; [आणि] "त्यास भोंवांडून मावली जाणार नाहीं" असें म्हटल्यावरून हवालदारां नीं विनंति केली कीं, " आजेप्रमाणें स्वार रवाना करितों. अस्तमान झाल्यासं दरवाजे लावीन. साहेबीं रागें भरूंनये " " नाहीं " असें उत्तर केल्यावर, स्वारामागें स्वार ठेवून स्वारांचा डाक लाविली. पळसाचें पानावरून मावली गेली नाहीं. अकावा आहे तसाच होता. मन्नकापुराहून साहित्य येऊन महाराजांच्या पागोट्याबरोबर बाईनीं सहगमन केलें. स्नानविधि सर्वत्र करीत नों पर्यंत अकावा दिसतच होता. सर्वत्र सदरेस आल्यानंतर चारतास रात्र झाली. अंधःकार दिसूं लागला. हें पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. "सतीचा प्रताप" असें सर्वत्र म्हणूं लागले. सतीचा मजकूर पन्हाळ्यास पंताकडे लिहून पाठविला. हें ऐकून त्यांनीं ही आश्चर्य मानिलें. पंतांनीं विशाळगडीं दान धर्म बहुत करविला. पुढें सती गेल्या ठिकाणीं बुवासाहेब महाराजांनीं वृंदावन बांधून रवर्चीची नेमणूक केली. ती सन १८४४ इसवी पर्यंत चालत होती. हाल्लीं चालत नाहीं.

राजाराम महाराज वारल्याचें वर्तमान पादशाहाच्या लष्करांत पोंचलें आणि भक्ताजी गायकवाड हुजूर येसूबाई व शाहू महाराज यांजकडे जाऊन त्याणें त्यांस वर्तमान कळविलें. तेव्हां त्यांस बहुत शोक झाला व महाराजांस वाटलें कीं, थोरले महाराज व संभाजी महाराज आज मेले व गज्यही बुडालें. काका साहेब आम्हांस सोडून नेलेस अशी रवाबी होती. आतां ईश्वरानें आम्हांस निराश्रित केलें. असा बहुत शोक त्यांनीं केला. त्या संतापानें त्यांस ज्वर आला. हें वर्तमान पादशाहास कळतांच रवाम्यारी शाहू महाराजांच्या समाचारास आली, व आंगावरून हात फिरवून पादशाहा बोलिले कीं " तुमारा चिच्चा (काका) मरगया, इसवास्ते तुमारी तबियत बिगडगई, अजार हुवा; तुम चिंता मत करो, दरबनमे सबचोर, तुमसाहू

तुमाराराज्य तुमकूं देउंगा. तुम हमारे बेटीके बेटे हो, कुच फिकीर मत करो" असें समाधान करून "राजाराम ही बहुत अच्छा था" असें बोलून "अपने बेटेकूंज-ल्दी अच्छा करना" असें बेगमेम सांगून स्वारी गेली.

महाराजांनीं भक्तांजी हुजरे यास्त मांगितलें, कीं "उभयतां आईसाहेबांच्या पायांवर डोई ठेविली आहे आणि उभयतां दंडवत आशीर्वाद मांगावा." तसेंच रामचंद्रपंतास, "निरोप पाठविला कीं "काकांच्या ठिकाणीं तुम्हीं असून काका साहेबांच्या मागें आम्हांस नेण्याचा उद्योग करीत असमान्य. श्री उच्छेनें घडेल तो सुदीन. तत्रापि राज्य रक्षण करावें, श्रीकृपें सुदीन प्राप्त होईल." हा निरोप पोंचल्यावर रामचंद्रपंतास बहुत संतोष झाला, व नेत्रांतून उदक आलें.

रामचंद्रपंत अमात्य सिंहगडाहून पुण्यास गेले. नेर्याल बंदोबस्त करून **संताजी घोरपडे, धनसिंगराव जाधव, दाभाडे, भोंसले** आदिकरून सरदारांस मोंगलांवर पाठवून व पूर्वी प्रमाणें सर्व शिस्त बसवून पन्हाळ्यास आले. राजसबाई व ताराबाई या उभयतांस भेटून न्यांस बहुत रीतीनें समाधानाच्या गोष्टी सांगून न्यांचें समाधान केलें. राजसबाईचा पुत्र संभाजी तीन वर्षांचा होता. ताराबाईचा पुत्र शिवाजी १० वर्षांचा होता. कांहीं दिवसांनीं ताराबाईनीं पंतांस सांगितलें, कीं आपला मुलगा वडील्य आहे, त्यास मुंज करून त्यास राज्याभिषेक करावा. तेव्हां पंतांनीं विनंति केली कीं **शाहू महाराज** वीस वर्षांचे असून मोंगलाच्या लष्करांत आहेत. त्यांची मुंज अद्याप झाली नाहीं. ते नवकरच येतील, असें बाळजोगीराव* मंगमेश्वरकर यांच्या सांगण्यांत आहे. यास्तव ते आल्यावर त्यांची वयांची एकदांच मुंज करूं व ते

---

* हे **भोंदजोगीराव** असावे असें त्या घराण्याचे माहितगार सांगतात.

लक्काकडे होतील, व ते उभयतां युवराज पद करतील. हं योरणें ताराबाईस न रुचून त्या म्हणाल्या कीं " ते धनी आणि हे चोर " असा अर्थ नाही. शिवाजी महाराजांची मला मुंज अवश्यमेव कर्तव्य आहे, असा आग्रह धरिला. तेव्हां परशुराम त्रिंबक व नागेशपंत कर यांनीं अनेक प्रकारें सांगून पंताचा रुकार घेतला. नंतर मुंजीचा निश्चय करून समारंभ आरंभपन्याबद्दल सन १७०१ साली शिवाजी महाराजांस राज्याभिषेक झाला. तेव्हां परशुराम त्रिंबक यांस सप्तनिधि पद दिलें, आणि नारोशंकर यांस सचीव पद दिलें. रामचंद्र पंत यांजकडे कुल भरवन्यार होता, परंतु ते ताराबाईच्या आग्रहा स्वभावामुळें पूर्वी प्रमाणें झटून काम न करितां जितक्यास तितकें करूं लागले. शिवाजी महाराजांचें लग्न बुंदकर घाटगे यांच्या कन्येशी झालें. तिचें नांव भवानी बाई ठेविलें. राजस बाईस ताराबाईनें बंदींत टाकिलें.

या प्रमाणें चालले असतां राजू महाराज म्हणून एक तोतया उत्पन्न झाला. तो तोतया आहे अशी चौकशी अंती खात्री झाल्यावर न्यास धरून मारून टाकिलें.

औरंगजेबाच्या वार्धक्यामुळें मोंगलाच्या राज्यांत पुनः अव्यवस्था शिरली, आणि मराठ्यांचा उपद्रव दिवसें दिवस वाढत चालला. ताराबाई, रामचंद्रपंत अमात्य व परशुरामपंत प्रतिनिधि यांच्या सहाय्यानें एकामागून एक असे किल्ले व मुलूख मोंगलापासून घेत गेल्या. शंकराजी नारायण सचीव हे ही पराक्रमी सिंहगड, राजगड वगैरे राखून होते. मोंगलाच्या खुद्द मुलखांत सुद्धां मराठ्यांचा उपद्रव सुरू होताच. या संधीस औरंगजेब ही नगरास सन १७०७ साली (शके १६२८) मरण पावला. तेव्हां त्याच्या मुलांत भांडणें लागून मोंगलांची फौज हिंदुस्थानांत जाण्यास निघाली. हें पाहून मराठे सर्व प्रांतांत पादक्रांता यत्ना उठवून आपला अंमल बसवूं लागले. तेव्हां मराठ्यांमध्यें दुफळी होऊन ते निर्बल व्हावे, आणि त्यांच्या मध्यें आपसांत लढा-

ई जुंपून मोंगलाच्या मुलखास उपद्रव होऊं नये अशा हेतूनें अर्जामशाहानें शाहू कडून करार करून घेऊन शाहूस मुक्त केलें.* शाहू महाराज भरतपूर, जयपूर, जोधपूर उदेपूर व उज्जनी यां करून नर्मदेच्या आलीकडे आले, व नंतर गोदावरी उतरून दक्षिणेंत आले. स्वदेशीं पोंचतांच शाहू महाराजांनीं बरेच सरदार वश्य केले. नंतर ताराबाईसाहेब व त्यांचे पुत्र शिवाजी राजे यांस व प्रधान व अमात्य रामचंद्रपंत वगैरे मुत्सद्दी, सचीव, चिटणीस, यांस पत्रें पाठविलीं, कीं आम्हीं पादशाहापासून या मुलखीं येऊन पावलों. निकड लवकरच येत आहों.

हें पत्रपावतांच ताराबाईस वाटलें, कीं संभाजी राजे वडील; त्यांचे हे पुत्र, राज्याचे अधिकारी आले. आतां आपणास त्यांच्या आज्ञेंत वागलें पाहिजे. आजपर्यंत आपल्या पुत्रास सिंहासनीं बसवून राज्य चालविलें, तसें पुढें करितां येणार नाहीं. या करितां तिणें दुर्बुद्धि मनांत आणून अमा संकल्प केला कीं, ज्या पेक्षां आपले भ्रतार यांनीं अम साहस करून राज्य रक्षिलें, त्या पेक्षां आपले पुत्र व आपण राज्यकरावें, आणि पूर्वी एकवेळ तोतया शाहू आला होता त्यास धरून मारिलें, तसें यावर ही फौज पाठवून पारिपत्य करून मारावें. अमा हेतु मनांत आणून रामचंद्रपंत अमात्य, परशुराम त्रिंबक, शंकराजी नारायण सचीव,

---

* त्याजबरोबर ५०००० फौज देऊन मांडलिकां सुभ्यांत सरदेशा मुरबी, सनदांचा पंचोत्रा वगैरे सहा अमल देऊन रवाना केलें. त्या वेळीं ताराबाई कडील वकिलांनीं पादशाहास अर्ज केला कीं, एक महाराज देवीं अंमल करीत आहेत. शाहू महाराज देवीं गेल्यावर नो अंमल घेतील. नंतर शिवाजी व संभाजी यांणीं काय करावें? त्यास पादशाहानीं उत्तर दिलें कीं, शाहू न शिवाजी आणि संभाजी यांनीं लढाई करावी. ज्यास जय येईल त्याजकडे अंमल चालेल. (शिवाळगड बखर).

नीळकंठ मोरेश्वर प्रधान, धनाजीराव जाधव, सेनापति वगैरे सरदार व मुत्सद्दी यांस बोलावून तिणें आपला मनोदय त्यांस कळवून बोलली कीं, तुम्हीं सर्वांवर इतराजी करून संभाजी राजे यांनीं अपराध नसतां शिक्षा केल्या, आणि सर्व राज्य व दौलत गमाविली. त्या नंतर राजाराम माहेव यांणीं पुढें चंदीस जाऊन तुम्हां सर्वांस वाढवून तुमच्या सहाय्यानें राज्य सोडविलें. यास्तव त्यांचे पुत्र शिवाजी गजे यांस अंतर न देतां फौज घेऊन जाऊन मस्तुतचे शाहु गजे खरे किंवा खोटे असोत, त्यांचीं लढून त्यांस धरावें, अथा त्यांजकडून शपथा घेतल्या. पत्राचें उत्तर न देतां याप्रमाणें ताराबाईनें मसलत केल्याचें शाहू महाराजांस कळलें तेव्हां ते गंगातीरींच मुक्काम करून राहिले. त्यांस वरचेवर कांहीं फौज व कोणी कोणी सरदार मिळत असत. ताराबाईनें सर्व फौज तयार करण्याचें काम चालविलें. तेव्हां अष्टप्रधान व सरदार यांनीं कारकून पाठवून शोध केला; तेव्हां शाहू महाराज खरे असें ठरलें; त्यांज बरोबरची सबनीस वगैरे मंडळी व केसकर आले तेही खरे. हें समजल्यावर सर्वांस बहुत विचार पडला. फौजेची तयारी झाल्यावर ताराबाईनें दूध भाताचें ताट भरून ठेवून सर्वांनीं क्रिया द्यावी, आणि फौज घेऊन पुढें जावें, असें सांगितलें, तेव्हां रामचंद्र पंत अमात्य व परशुराम त्रिंबक प्रतिनिधि आणि सेनापति यांणीं क्रिया दिली.

किल्ले देऊं नयेत, कोणी जाऊन भेटूं नयें, व खर्चास मुलखांतील वसूल देऊं नये, अशीं पत्रें ताराबाईनें सुभे व किल्ले यांस पाठाविलीं, तसेंच किल्ल्यांवर दारूगोळा वगैरे सामान चढवून आपले विश्वासू लोक व कारकून वगैरे रवाना केले. नंतर असा विचार ठराविला कीं, अमात्य यांणीं जंवळ राहून सर्व मसलत व राज्यकारण संभाळावें. सेनापति व प्रतिनिधि यांनीं फौज घेऊन लढाईस जावें. सचीव व प्रधान यांनीं किल्ले व मुलुखे संभाळून लोक कुमकेस पाठवीत असावें. या प्रमाणें ठ-

सून मंत्रिप्रधि व सेनापति हे ४० हजार फौज घेऊन मोकाव ल्यास गेले. सेनापतीनी बरोबर खंडोबल्लाळ चिटनवीस यांस घेतले. नागबाई नें दुर्बुद्धि धरून आपि सर्व प्रधान, सरदार किल्ले कोट यांस अनुकूल करून मसलत आरंभिली, आणि आपणाची लढाई देणार, असें वर्तमान शाहूस कळले. असो, थोरले शिवाजी महाराजांच्या पुण्यप्रतापें करून हे दिवस पाहिले. आपण राज्याचे अधिकारी आहों, यास्तव आपणास रक्षणें असल्यास श्रीभवानी व सांब रक्षील, असें म्हणून कुच करून पुढें निघाले. या वेळीं यांजपाशीं २५००० फौज होती. उभय फौजा समीप येऊन लढाईचा निश्चय झाला.

शाहू महाराज तर्फाचे खरे अधिकारी असतां त्यांशीं लढाई करण्या विषयीं आपलें इमान आईसाहेबांनीं घेतलें आहे, तेव्हां याचा विचार कसा करावा अशा गूढांत सेनापति पडले. प्रथमतः चिटणिसा यास पाठवून पहिले पणीं बोध करावा, आणि आपलें सर्व वर्तमान शाहूमहाराजांस विदीत करावें, असें त्यांनीं मनांत आणिलें. प्रतिनिधि यांचा निःसीम लढाईचा इरादा होता. यास्तव चिटणिस दुसरा वेष धारण करून गुप्त रूपें गेले, महाराजांस भेटून इकडील सर्व वर्तमान सांगितलें व तिकडील ऐकून घेतलें. महाराज खरे अशी खात्री झाल्यावर सेनापति व त्यांच्या विचारांत असलेले दुसरे सरदार यांचा मजकूर समजावून सेनापतीस रवणेचें पत्र घेऊन आले. महाराज तर खरे; त्यांशीं लढण्याविषयीं तर शपथ घेतली आहे. तेव्हां कपट युद्ध करावें असें ठरवून सेनापति व प्रतिनिधि लढाईस गेले व लढाईस आरंभ झाला. प्रतिनिधि व आईसाहेबांच्या लष्करांचे सरदार बहुत लढले. महाराजांकडील परसोजी भोंसले व चिमणाजी दामोदर यांणीं घोडे चालवून लढाई केली. महाराज बख्तर बंदोबस्त करून व धनुष्यबाण हाती घेऊन व ढाल तरवार बांधून युद्धास उभे होते. लढाई-

न हत्ती चालवून महाराजांनीं तिरंदाजी केली व फौजेंत मिसळले. दहा हजार निवडक फौज घेऊन महाराजांनीं हल्ला केला. सेनापति आपल्या घोड्याजवळ महाराजांचा हत्ती येई पर्यंत उभे राहिले. निम्मी फौज स्तब्ध राहिल्यामुळें प्रतिनिधि मोड होऊन पळून सातान्यास गेले व सातार किल्ल्याचा बंदोबस्त करून राहिले आणि आईसाहेबांस सर्व वर्तमान लिहून पाठविलें. सेनापतीच्या घोड्याजवळ महाराजांचा हत्ती आला, तेव्हां ते बऱ्याच्या विचारांतील सर्व सरदार घोड्यावरून उतरून महाराजांस मुजरे व नजराणे करून भेटले. दुसऱ्या दिवशीं फौज व सरदार यांच्या भेटी झाल्या. सर्वांच्या नजरा होऊन सर्वांस यथायोग्य चाहरी बहाल्ले घातले. नंतर सेनापतीस सेनापति पदाची वस्त्रें पदकी समाणें व बहुमान, हत्ती, घोडे, जवाहीर वगैरे दिलें. खंडो बल्लाळ चिटणीस यांस चिटणीशीचीं वस्त्रें, कलमदान, शिरपेंच, कंठी, चौकडा वगैरे दिलें.

नंतर कुच करून महाराज पुण्यास गेले. नंतर चंदन, वंदन किल्ले घेऊन सातान्यास प्रतिनिधीकडे पत्र पाठविलें. प्रतिनिधीनी लढाई देण्याची तयारी केली. किल्ल्यावर भेद करून किल्ला हस्तगत केला व प्रतिनिधीस कैद केलें. नंतर शके १६२१ सालीं व्रतबंध पूर्वक राज्याभिषेक करून घेऊन सिंहासनारूढ झाले.

इतकें झालें तरी ताराबाई आपला पुत्र शिवाजी हाच मराठ्यांचा खरा राजा असें म्हणत असे. या मुळें मराठ्यांमध्यें दोन फळ्या झाल्या व आपसांत कलह लागून मोंगलांच्या मुलखांतील उपद्रव कमी झाला, आणि त्यांचे इष्ट हेतु सिद्धीस गेले. ताराबाईनीं आरंभींच बहुतेक वजनदार सरदारांकडून शपथा घेऊन आपणास अनुकूल करून घेतलें होतें. तथापि त्यांतील बरेच शाहूस मिळाले. तरी ताराबाईचें पारडें अजून बरेंच जड होतें.

ताराबाई मोठी महत्त्वाकांक्षी, राजकारस्थानी, मसलती व चतुर होती. संधी सांपडेल तेथें आपलें घोडें दवकण्याम कधीं चुकत नसे. त्वरा मराठ्यांच्या राजा कोण याचा निर्णय होण्याची अनायासें अवश्यकताच आली. दे द्रावाद्च्या लढाईत झुल्फिकार खानास शाहूनें चांगली कुमक केली, या मुळें शाहूवर त्याची मर्जी बसून त्याणें शाहुस दक्षिणेच्या सरदेश मुखीची सनद देण्याविषयीं दिल्लीस लिहून पादशाहाची मंजुरी आणविली. सनद देण्याच्या वेळीं ताराबाईच्या वकिलांनीं पादशाहाच्या दर्जारास असें कळविलें कीं, ताराबाईचा पुत्र हा मराठ्यांचा मुख्य धनी आहे, यास्तव सरदेशमुखीची सनद त्याच्या नांवें द्यावी. तेव्हां त्यानें असें ठरविलेकीं लढाई अंतीं जो मुख्यठरेल त्याच्या नांवें सनद देण्यांत येईल. या मुळें शाहू व ताराबाई यांच्यामध्यें निकराची लढाई होण्याची आयतीच वेळ आली.

त्या वेळीं पर्जन्यकाल होता. उष्ण प्रदेशांत पर्जन्यकाळीं लढाई करण्याची सोय नसते. मराठ्यांमध्यें अशी चाल असेकीं चातुर्मास हातांत तरवार धरावयाची नाहीं. या करितां उभयपक्षांनीं चार महिनें लढाईची तयारी करण्यांत घालविले. शाहू महाराजांनीं चंदन, वंदन किल्लाचर व ताराबाईनें कोल्हापूर यांनीं फौज जमा केली. इसग दोनांच्च फौजसह शाहू महाराज कोल्हापुराकडे कुच करिते झाले. मार्गी वसंतगड घेऊन पन्हाळा व विशाळगड हे दोन बलकट किल्ले घेण्यासाठीं पन्हाळ्याकडे आले. पन्हाळ्यास मोर्चे लाविले. इतक्यांत ताराबाई पन्हाळ्याहून शिवाजी व संभाजी यांसह रांगण्यास गेली. शाहूनें पन्हाळगड व पावनगड घेतले. पन्हाळ्यावर ताणें करून कोल्हापूर प्रांतांत भ्रमन्ति बसविला. नंतर रांगण्यास कुच केले. रांगण्याची बलकट किल्ल्यांत गणना असून त्या वेळचा तेथील किल्लेदार ही शूर होता. शाहू रांगण्यावर येतांच्च ताराबाईची तेथें राहाण्या-

ची छाती होईना. ताराबाई नुसती चुष्करांत असती तरी तिच्या लोकांस दुप्पट वीरश्री आली असती. या वेळीं तर शाहूच्या हातीं किल्ला जाण्याचा फारच कमी संभव होता. किल्ला पाहाडी असून बळकट होता. किल्लेदार शूर असून किल्ल्यावर तयारी मजबूत होती. किल्ल्यास वेढा दिला, तरी पुष्कळ दिवस टिकाव धरण्याजोगी मुबलक सामुग्री होती. तथापि तेथून जाण्याचा निश्चय करून शिवाजी व संभाजी यांस घेऊन रामचंद्रपंत अमात्य मुद्दाम ताराबाई माळवणास गेली. महाराजांनीं गंगाण्यास मोर्चे लाविले. ताराबाईनीं रवेम सावंत भाणि कान्होजी भांग्रे यांशीं राजकारण करून त्यांनीं आपले लोक कुमकेस पाठवावे असें केलें. दोहीं कडील फौज कुमकेस आणून गंगाण्याचे मोर्चे मारावे असा इरादा धरिला. तिकडून कुमक आली नाहीं तरी किल्लेकऱ्यांनीं पुष्कळ दिवस टिकाव धरिला. गंगाणा चिकट जागा असल्यानें लवकर हस्तगत होईना. तेव्हां हल्ला करून किला घ्यावा, असें मनांत आणून शाहू महाराजांनीं हल्याबरोबर जातीनें घोडा चालविला आणि किल्ल्यावर चढूं लागले, तों डोंगरांत घोड्याचा पाय घसरला, त्या वेळीं वगैरे गबर गंडे हल्लाळ चिटणीस व नारवमिरा होते. चिटणीस यांणीं झाडास पाय देऊन घोडा आंदून धरिला आणि नारवमिरा यांणें जलदी करून महाराजास घोड्यावरून उतरून घेतलें, यावरून उभयतांवर चढून संतोषी होऊन चिटणीस यांस पन्हाळ्यांतलें नाडगौंडीचें वतन पांचहजार रुपयांचें इनाम करून दिलें आणि नारवमिरा यास गांव इनाम दिला. हल्ला नहकूब करून मोर्चे कायम ठेविले. पुढें पर्जन्यकाल आल्यामुळें करवीरांतीं पन्हाळा येथें छावणीस आले. विशाळगड तालुका खेळणा हल्लाळ यांचे बंधु निळो हल्लाळ यांजकडे होता, त्यांस पत्रें गेलीं, तेव्हां ते येऊन भेटले. यामुळें त्यांजकडेच सुभा सांगून तालुका ठेविला.

पर्जन्यकाल गेल्यावर रागणा घेण्यास कुच करण्याचा विचार निघाला. परंतु इतक्यांत कांहीं कारणानें चौथ सरदेशमुखी वगैरे गाहू कडे चालविण्याचे झुल्फिकारखानानें कबूल केल्यावरून अर्थात गाहूचें वर्चस्व उरलें. म्हणून ताराबाईस जिंकण्याची अवश्यकता राहिली नाहीं. तेव्हां रांगणा घेण्याचें काम तितकेंच टाकून व सांताचा बंदोबस्त करून कोल्हापुराहून सन १७०९चे अखेरीस (शके १६३२) साताऱ्यास गाहूची स्वारी निघाली. मार्गीं वारणेच्या तिरीं वडगांव येथें सेनापति मृत्यु पावले.

गाहू साताऱ्यास गेल्यावर नागवाई आणखी जमाव करून व वाडीकर सावंत यांची कुमक घेऊन मालवणाहून रांगण्यास आली. पन्हाळ्यास पूर्वी हवालदार होता त्यासच गाहूनें कायम केलें होतें. त्याशीं भेदकरून ताराबाईनें पन्हाळा घेतला, आणि रांगण्याहून पन्हाळ्यास आली. येथें आल्यावर सारें मराठी राज्य हस्तगत करण्याचा नाद टाकून कोल्हापूरच आपलें संस्थान करून राहण्याचा तिनें निश्चय केला.

सन १७१२ (शके १६३३) सालीं ताराबाईचे पुत्र शिवाजी राजे काळ्या फोड्या येऊन मरण पावले. यावेळीं शिवाजीची पत्नी भवानीबाई तीन महिन्याची गरोदर होती. रामचंद्रपंतानें ताराबाईस कारभारांतून काढून तीव तिची सून भवानीबाई या उभयतांस अटकेंत ठेविलें आणि राजारामांची कनिष्ठ पत्नी राजसबाई इचा पुत्र संभाजी यास गादीवर बसवून सोय्या दक्षतेनें राज्यकारभार चालवूं लागला. भवानीबाई गरोदर होती ती प्रसूत होऊन तिला शके १६३४ सालीं पुत्र झाला. त्याचें नांव रामराजा असें ठेविलें. याचा घात करावा अशी राजसबाईची बुद्धि दिसल्यावरून पुत्र झाला असें बाल्यावस्थेंत उठवून रामचंद्रपंताचा पुत्र भगवंतराव याच्या अनुमतें बावडयास वाड्यांत दाई व माणसें देऊन त्या पुत्रास छ-

पडून ठेविलें.

शाहू महाराजांस बहुतेक सरदार मिळाले आणि मराठ्यांचा बहुतेक मुलूख त्यांच्या अमलाखालीं गेला, पन्हाळा, रांगणा, मालवण वगैरे थोडासा मुलूखमात्र संभाजीकडे राहिला. संभाजीराजे आपले बंधु आहेत, त्यांचाही इतमाम चालला पाहिजे, यास्तव शाहूमहाराजांनीं संभाजीस सांगून पाठविलें कीं, तुम्ही विचारानें चालल्यास आणखी मुलूख खर्चास नेमून देण्यांत येईल, परंतु तें संभाजीस पसंत न पडून आपणास राज्याचा अर्धा वांटा द्यावा असा त्यानें आग्रह धरिला. तेव्हां महाराजांनीं सांगून पाठविलें कीं, राज्यांत वाटणी देण्याची चाल नाहीं. खर्चा पुरती माफक नेमणूक द्यावी. तें कांहीं न ऐकतां मोठें राज्यकारण करून पराक्रम दाखवावा आणि अर्धा वांटा घ्यावा, असा संभाजीनें निश्चय केला. या वेळीं संभाजीचें सामर्थ्य कितपत होतें तें पाहूं.

रामचंद्र पंत अमात्य प्रथमपासून कोल्हापूर करांचे पक्षाचा होता. शंकराजी नारायण सचीव यास ताराबाईचा पक्ष स्वीकारल्याबद्दल पश्चात्ताप होऊन त्याणें जलसमाधि घेतली. त्याचा पुत्र शाहूस मिळाला. परशुरामपंत प्रतिनिधि यास बंदीतून सोडून त्याचा मुलगा कृष्णाराव यास शाहूनें प्रतिनिधिपद आणि विशाळगड तालुका दिला; तरी तो विशाळगडी जातांच त्यानें संभाजीचा पक्ष स्वीकारला व पुढें त्याच्याच मुलास कोल्हापूरकरांनीं प्रतिनिधि केलें. हैबतराव निंबाळकरा पासून पराभव पावल्यावर चंद्रसेन जाधव व सरजेराव घाटगे हे उभयतां कोल्हापुरीं आले. त्यांतील सरजेराव घाटगे यांचें वतन (विजापूरकरां पासून मिळालेलें) कागल मांतीं होतें, त्याजबद्दल त्यास संभाजीनें नवी सनद दिली, व ते तेव्हां पासून घाटगे कोल्हापूरकरांचा पक्ष न सोडितां मोठ्या शौर्यानें व एक निष्ठेनें त्यांचें हित करण्यास झटले. या खेरीज जेवढें

मराठ्यांचें, पुरव्यत्वें शाहूचे अनिष्ट चिंतक, तेवढे यांजकडे होते. कारण जर कदाचित् संभाजी व शाहू एक होऊन कलह मिटला, तर मराठे सर्वांस भारी होतील. या करितां मोंगलांचा दक्षिणेंतील सुभेदार व निजाम उलमुल्ख हे नेहमी संभाजीस शाहूशीं लढण्यास शिकवीत. सैन्य व द्रव्य यांची ही समयीं मदत करीत. कानोजी आंग्रे हा संभाजीकडेच होता.

मोंगलांचा सुभेदार **चेयाकुलीचरखान**, सरंजराव घाटगे यांच्या मध्यस्थीनें संभाजीस दरएक मदत देऊन शाहूचे मुलखावर उपद्रव करवी. मराठ्यांत वैमनस्यें पडून आपणास जो त्यांपासून उपद्रव होत आहे तो कमी व्हावा एतदर्थ निजामतर सदैव युक्ति योजीत असे. परंतु बाजीराव बल्लाळ या समयास शाहूचा मुख्य प्रधान झाला होता. त्याचें शहाणपण व शौर्य या पुढें कोणाचें कांहीं चालेना. निजाम, मोंगलांचा वजीर, आणि संभाजी या त्रिवर्गाची खोड मोडण्यास तो खंबीर होता.

अशी स्थिति असतां संभाजीनें एक राजकारण सिद्ध केलें. **जाधवराव सेनापति** महाराजांशी विरुद्ध होऊन मोंगलांईत (हैदराबादेस) गेले होते. त्यांस आपलेसे करून घेऊन त्यांच्या मार्फत नबाबाशीं (निजामाशीं) बोलणें लाविलें. नबाबास ही गोष्ट इष्टच होती. अनायासें घरकुट होऊन राजकारण आलें आहे, तें उभें करून मसलत करावी, असा संकल्प करून त्याणें असें ठरविलें, कीं संभाजी राजे यांनीं जा मराठी फौज व सरदार जमतील तिनके अनुकूल करून घेऊन इकडे यावें. फौजेस खर्च पाहिजे तो राज्याचा वांटा संभाजीस मिळे पर्यंत नबाबानीं दरमहा द्यावा. संभाजीनीं किल्ले, कोट, नाणीं आणि सरदार व मुत्सद्दी यांची राजकारणें व भेद होतील तिनके करून निघून यावें. या प्रमाणें ठरवून कां-

हीं फौज जमवून भगवंतराव पंत अमात्य यां सुद्धां निघून संभाजीराजे नवाबाकडे गेले. नवाब पुढें सामोरे येऊन भेटी झाल्या.

त्या प्रमाणें संभाजीराजे नवाबाकडे गेले. नंतर हैदराबादची चौथाई मराठे घेत त्या पैकीं निम्मा हिस्सा आपला आहे, तो आपणास द्यावा; असें संभाजीनें मागणें केलें. त्यावरून त्यानें गाफूर व संभाजी यांजमधील कज्जा मोडे पर्यंत वसूल जप्त ठेवण्याच्या इराद्यानें गाफूर कडील सरदेशमुखीचा ऐवज वसूल करणाऱ्या कारकुनांस दूर केलें आणि हा घरगुती तंटा मिटून मराठ्यांचा खरा राजा कोण याचा निकाल होई पर्यंत वसूल मिळणार नाहीं, असें नवाबानें साफ सांगितलें तेव्हां तोफखाना, जंगी सामान, गारदी वगैरे मानबर तयारी करून जाधवराव वगैरे सरदार व मनसबदार व संभाजीराजे फौजे सुद्धां कुच करून पुढें चालून गेले.

संभाजीराजे यांस विपरीत बुद्धि होऊन, ज्या यवनांचा नाशाकरून वडिलांनीं राज्य सोडविलें, त्याच यवनांचा आश्रय करून राज्याम अपाय करूं इच्छितात, हें वर्तमान ऐकून महाराजांस फार वाईट वाटलें. नवाबाचें निवारण करणें प्राप्त आहे. या करितां महाराजांनीं प्रधान व इतर सरदार यांस फौजेच्या तयारी-निशीं येण्यास पत्रें पाठविलीं. संभाजीस बुद्धीवर आणण्याकरितां महाराजांनीं न्यास पत्र पाठविलें कीं, "हें राज्य श्रीचें आहे. साध्य करण्यास महत् प्रयास लागले. यवन लोकांचा आश्रय करून तुम्हांस कधीं यश येणार नाहीं. तुम्हांस राज्य लोभ फार होता, तर आम्हांस सांगून पाठवावयाचें होतें. आम्हांपाशीं दिगंत प्रतापी असे अनेक सेवक लोक आहेत, त्यापैकीं एकास तुमच्या बरोबर देऊन एकादें राज्य साधून दिलें असतें, किंवा पूर्वी महाराजांनीं साध्य केलें त्यांतून तुम्हीं साध्य करून पराक्रम दाखवावयाचा होता, अथवा आम्हीं यवनांनीं चेत-

लेलें राज्य सोडवितों तसें तुम्हीं ही सोडवून द्यावयाचें होतें. आम्ही सोडविल्या पेकीं निम्मा भाग मागतां ही. कोणची बुद्धि ? "

" औरंगजेब या बलाढ्य शत्रूनें दोनलक्ष फौज व दोन लक्ष पायदळ घेऊन येऊन संभाजी महाराजाच्या भव्यस्थे मुलें राज्य हरण केलें, त्या समयीं राजाराम महाराजांनीं चंदीकडे जाऊन फौज व सुमे जमवून दवलत जमाविली. तेथून रामचंद्रपंत शत्रूशीं लढाया देऊन त्यांचा (मोंगलांचा) फौज बुडवून न अमल बसवीन चालले. तेथें प्रसंग आला नेझां देशीं येऊन जाननें लढाया देऊन त्यांचीं मोठीं स्थलें लुटलीं. राजाराम साहेब शिवाजीचे पुत्र, या करितां आपणासच राज्याभिषेक करवून सिंहासनारूढ होणें त्यांच्या हातीं होतें. परंतु तसें न करितां आपल्या ठायीं त्यांणीं कमें लक्ष ठेविलें हें तुम्हांस माहीत असून हा विचार केला हें फार वाईट केलें. या उपरीतरी यवनाचा आश्रय न करितां हरप्रकारें निघून यावें. तुम्हांस देववत पाहिजे तो आम्ही नवीन सिद्ध करून देऊं, किंवा खर्चास अधिक नेमणूक करून देऊं. राज्यांत वाटा देणें हें पुनर्गणानंतरही घडत्ये नाहीं, करितां ना बुद्धि धरूं नका. "

" सेनापति सेवकलोक असून लुटारू केली व हरामखोरी करून महाराष्ट्रराज्य व धर्म बोडून यवनास शरण गेले. तेही गमदेवराव जाधव यांच्या कुलांतील असून त्यांनीं धर्म सोडिला व निमकहराम होऊन या मसनदीस मिळाले त्यांची अनुकूलता करून सेवकलोकांस व यवनांस शरण गेलां हें फार वोर केलें " असें पत्र आलें. परंतु संभाजीस हीगोष्ट अगदीं रुचली नाहीं, व केल्या मनसुब्याच्या अभिमानास पडले. निजामची अनिनिधीच्या विद्यमानें बोलणें करून पाडगाहाचीं लढ झाला असतां, मराठ्यांचें गुह्यछिद्र हातीं येऊन विघाड करणें शोर आहे, हा विचार न करितां वरचि-

हिल्या प्रमाणें संभाजी सह पुढें चालून आले.

ल्या समयीं महाराजांनीं पंतप्रधान, प्रतिनिधि, सेनापति, सर लष्कर इत्यादि सरदारांस फौजेची तयारी करून निघून येण्यास पत्रें पाठविलीं, व आपण जातीनें लढाईस जाण्याचा इरादा धरिला. तेव्हां अष्टप्रधान व सरदार यांनी विनंति केली, कीं आम्ही सारे सेवक असतां महाराजांनीं स्वतः निघावें अशीं काहीं मातवर मसलत नाहीं. स्वामीं पादशाहा दिल्लीकडून चालून आले असतां ही स्वारीस निघणें नलगे, अशी आमची उमेद आहे. मग या मसलतीचा हिशेब काय आहे? पादशाहीतील एक सुभेदार नबाब चालून आले व त्यांत संभाजी राजे जाऊन मिळाले म्हणजे मोठी गोष्ट सिद्ध केली असें नाहीं. एका सेवकास आज्ञा केली असतां तो कार्य करून येईल. ही सर्वांची उमेद पाहून महाराजांस बहुत संतोष झाला, आणि सर्वांनीं तयारी करून निघावें अशी त्यांणीं आज्ञा केली. मोंगलांवरी लढाई, म्हणून तोफखाना तयार करून दारूगोळ्यासह बरोबर घेतला; पायदळ, स्वार, बाजारबुणगे घेऊन प्रधान व सरदार निघाले. सर्वांनीं एक मतानें चालून बाजीराव प्रधान यांच्या मसलतीनें चालावें असें महाराजांनीं सांगितलें.

बाजीराव प्रधान व सरदार मोंगलांच्या मोकाबिल्यास पुढें गेले. त्यांनीं असा विचार केला, कीं तूर्तच लढाई देऊन माणूस व दारूगोळा खराब करूं नये. भोंवतें हिंडून गोवमाऱ्या देऊन त्यांचा मुलूख मारून धुंदी करावी. घेरून, धरून, जेर करून व जागां जागां घालवून लढाई द्यावी. असा विचार करून भोंवताली मुलूख मारून जाळून फन्ना करूं लागले. रसद, दाणा, गल्ला येणाऱ्या वाटा रोखून धरून मारूं लागले. मोंगलांच्या लष्करांत महागाई पडली. मोठी मजल करणें राहिलें. मोठी मजल केली असतां भोंवत्या सऱ्या फौजेच्या टोळ्या पसरून बुणगे

व कही कवाड मारू लागले. कोणत्या समयीं कोणी कडून येतील याचा नियम लागेना. अशा रीतीनें मोंगलांस ब्राह्मणवानें जेर केलें, तेव्हां निजाम, जाधवराव व संभाजीराजे यांस बोलणें कीं, सगळी फौज लढाई न देतां मोड झाल्या नंतर याचा हिशोब न धरितां फिरून पडून लाऊन लढाई देतें, मुलूख मारून न्यायाची रसद बंद करावी. व आम्हांस घाबरें करावें. राजे तुम्ही मराठे असून न्यांच्या लढाईच्या शिस्ती तुम्हांस माहीत. तुम्ही उभयतां त्या प्रमाणें आपल्या फौजेच्या टोळ्या करून न्यांच्या मुलखांत बसावें. मुलूख मारावा, लढाई देऊन नाहीं म्हणावें, आणि न्यांच्या प्रमाणें धुंदी करावी. असें समजून तुमच्या भरंवशावर ही मसलत केली, आणि शाहूची बिघाड केला. परंतु आपण तुम्ही न्याचें नेमनाचें नवाबाची हिम्मत नाही. न्यानें विचार केला कीं, राजारामाचे बेरे राजारामासारखे शूर व मसलती असतील असें समजून यांच्या भरंवशावर इतकी मोठी मसलत आरंभिली. आणि शाहूची बिघाड केला. हें फार वाईट केलें यापर पुढें जाणें ठीक नाहीं म्हणून कुच करून मागें सरले नंतर बाजीराव व न्यांची फौज आघाडी पिछाडी मारूं लागले नेहमीं एक दिवस मोठी मजल करावी, असा विचार करून मागें पुढें फौज व तोफा घेऊन नवाब निघाले. नेहमीं वर मोंगल फौजेच्या टोळ्या करून न्यांस घेरून बसले. मंधी साधून आघाडी मारून हत्ती घोडे पाडाव केले. नंतर जवळ

पति सोन्याचे भंवारीनिसार होऊन आले, समागमें सरकारकून व सरदार व मानीमानी स्वासे दहा पांच हजार पर्यंत होते. वेर गिरीतून मुजरे घेत स्वारी जहाली. ० श्रीमन्महाराज उभयतां बापाचे स्वारी वर्ग उभे राहून मध्यें लोक फरक करून जनवा टाकिल्या मानीमानी लोकांनिशीं शाहू महाराज चोल्यावर्गा स्वार होऊन आले. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपतींची स्वारी हत्तीवरी होती ते घोड्यावरी स्वार होऊन जनवा बिछावन्या होत्या तेथें येऊन उभयतां महाराज घोड्यावरून उतरले, परस्पर सन्मुख येऊन गोत्यना होऊन शाहू महाराज यांचे पायांवरी डोई श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांणीं ठेविली. महाराजांनीं परस्परें उभयतां बंधूनीं आलिंगनें केलीं. त्यावेळेस सोहोळा व रूपये व सोन्याचीं फुलें रु० फुलें उडविलीं. परस्पर मत्के झाले ते समयीं तोफेची सरबत्ती व नानाप्रकारचीं वाद्यें व शाहाजानें वाजवून आनंद झाला. फाल्गुन शुद्ध १ मंदवासरीं दोन प्रहरा या प्रमाणें भेटीचा समारंभ झाला. तदनंतर शाहू महाराज यांणीं श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांचा हात धरून उभयतां बंधू एक अंबारी मध्यें हत्तीवरी स्वार झाले खवासखान्यांनि छत्र मोरचलें घेऊन संभूसिंग जाधवराव वगैरे संपूर्ण फौजेच्या कोरेगिरी मध्यें जोहार घेत कऱ्हाडपर्यंत गेले. कऱ्हाडा नजीक कृष्णातिरीं मुक्काम झाला. दक्षण तिरीं श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपतींचा मुक्काम; उत्तर भागीं श्रीमन्महाराज राजश्री शाहू राजांचा मुक्काम होता, त्या डेरिया पर्यंत उभयतां महाराज गेले. त्या वेळेस शाहू महाराज यांणीं ज्या हत्तीवरी स्वारी होती त्या हत्तीस व दुसऱ्या हत्तीस व दोन रंगविलेले घोडे एक रुप्याचे जिनाचा व एक जरिबादलीं जिनास व दुसऱ्या बादलीं व नउजवाहीर व हार तरवार या प्रमाणें दिले. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति नदी जा-

कीकडे आपले डंगीयांचे मुक्कामास आले. कऱ्हाडाहून उंबरजं-
स उभयतां बंधू महाराजांची सडी स्वारी जहाली. त्यांणीं श्री-
मन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपतीस हजार रुपये मत-
का करून बाहली-दुस्त व जडजवाहीर व हत्ती व रंगविलें घो-
डे बाहली जिनाचे दिले. शाहू महाराजांच्या आग्रहानें उभय-
तां ऐक्यता असून सातारियासी शिमगी पौर्णिमा व्हावी म्हणो-
न ममता युक्त बोलून श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाग-
ज छत्रपति यांसी घेऊन सातारियासी गेले. त्या समयीं संपूर्ण
शहरचे लोक बाहेर येऊन उभयतां बंधूंचा समारंभ पाहून स-
ुके व रेवरात बहुत जहाली. आणि सातान्यास पंगाव्याचे वा-
ड्यांत मुक्काम जहाला. दोन महिने मुक्काम होता. संपूर्ण स-
रकारकून व नामी नामी सरदार यांणीं श्रीमन्महाराज राजश्री
संभाजी महाराज यांसी मेजवानी केली. नऊ हत्ती व चाळी-
स घोडे व जडजवाहीर व दुस्त असे बहुमान आले. शाहू-
महाराज यांणीं रवानगी समयीं हत्ती व रंगविलेले घोडे सा-
मानसुद्धां व ढाल तरवार व जडावाचा रवंजीर व दुस्त बाहली
दिली व गोरव दोन लक्ष रुपये दिले आणि रवानगी केली. व-
रोवर सरकारकून व फत्तेसिंग भोसले फौजेनिशीं देऊन श्रीम-
न्महाराज यांची स्वारी किल्ले पन्हाळीयास्मा पावती केली. शा-
हू महाराज चार कोस घालवीत येऊन माघारे सातारियासी
गेले; त्या वेळेस नहनामा झाला त्याची यादी रवानी दिली
आहे."

"नहनामा चिरंजीव राजश्री संभाजी राजे यां-
सी प्रति राजश्री शाहू राजे यांणीं लिहून दिल्हा
सुरुसन इहिदे सलासीन मय्याव अलफ. फ. १२८०
छ १६ साबान, विरोधिकृत संवत्सरे (शके १६०३ इ०
स० १७३० सारीरव १५ माहे मे) चैत्र वद्य ३ बितपशनि:

पास पाणी नाही असा जागा पाहून चोहो कडून खणत करून पि-
च्छाडी मारिली. पुढें चालणें अघघड पाहून नवाबांनीं चोंहोबा-
जूनीं मगदऱ्यांवर तोफांची मारगिरी केली. तेव्हां मराठे चौंडू क-
रून जाव जाऊन उभे राहिले. मारगिरी बंद होऊन पुढें नवाब
निघाले की, पुनः येऊन घेरूं लागले. या प्रमाणें नवाब अगदीं
जरीस आले. पुढें चालणें होईना. मुक्काम करावा तर पाणी
नाही. या मुळें नवाबांनीं वकिलाबराबर सांगून पाठविलें, कीं
लढाई तहकूब करावी, पाण्याजवळ आम्हांस मुक्काम करूं द्या-
वा, पाहिजेतर मराठी फौज भोंवती ठेवावी, आणि तहाचें बो-
लणें करावें. तेव्हां दोन मानवर भसाम्या आम्हांकडे पाठवून
द्याव्या, म्हणजे तुम्हांस पाणी व वाट देऊन मुक्काम करविनों
आणि आम्ही ही करितों असें उत्तर पाठविलें. त्या प्रमाणें
नवाबानें भसाम्या पाठविल्या. नंतर मुक्कामास पाणी जागा ने-
मून दिली, आणि नवाब जाऊन उतरल्यावर त्यांस घेरून मागें
पुढें आपली फौज उतरविली. तहाच्या तीन शर्ती मधानांनीं
सांगून पाठविल्या, त्या अशा:— (१) संभाजी राजे महाराजांचे
बंधु आपणाकडे आहेत त्यांस आम्हांकडे पाठवावें.
त्याज विषयीं महाराजांकडे विनंति करून वाजवी असेल तें क-
रून देऊं. (२) स्वराज्याचा अंमल तुमचे तालुकेदार कोतें कोडें
सुरळीत देत नाहींत. त्यास राहिलेल्या गंवजाचा फडशा क-
रून द्यावा आणि पुढें सुरळीत चालावें. (३) आमचा अंमल
नीट चालण्या करितां आम्हीं मुलुख व घाणी मागूं तीं दरबस्त
द्यावीं. गंवडल्या दोन शर्ती नवाबांनीं मान्य केल्या आणि सां-
गून पाठविल्यें कीं, संभाजीराजास आपल्या स्वाधीन करणें आ-
मच्या इजतीस न्यायरूप नाहीं. आम्हीं त्यांस कांहीं रोख बरोब-
र देऊन सरंजामासुद्धां पन्हाळ्यास पोंचवून देतों. त्यांस वा-
टेंत कांहीं उपद्रव न करितां तेथें गेल्यावर घरगुती मजकूर लु-

मचा पाहिजे तसा समजून घ्यावा. ही गोष्ट बाजीरावानें मान्य करून तहनामा ठरला.

संभाजी राजे पन्हाळ्यास येऊन पोंचल्यावर त्यांस फार वाईट वाटून केल्या गोष्टीचा फार पश्चात्ताप झाला. आपण बाळाच्या आश्रयास गेलों, निमकहराम जाधवराव याच्या संगतीस लागलों, त्यांणीं जानीस* बुद्धि लावण्याचें योजिलें. इतकी गोष्ट दैवानुरूप झाली. या उपर महाराजांच्या विरुद्ध कोणत्याही विचार न करितां महाराजांची आज्ञा मान्य करून राहावें हा उत्तम पक्ष आहे असा संभाजीनें निश्चय केला.

उदाजीचव्हाण हा मोठा पुंड होता. तो अथणी प्रांतांत असे. शिरवळच्या ठाण्यांत राहून चव्हाण चौथाई या नांवाची पट्टी आपसांत घेऊन पुंडपणा करी. हा आपणास संभाजीचा आश्रित आहें असें म्हणवी. परंतु तो त्यांसही फारसा मोजीत नसे. बाजीराव फौज घेऊन उत्तरेस गेल्या ही संधी साधून हा चव्हाण वारणेच्या तिरीं येऊन मुलूख लुटूं लागला. म्हणून त्याचा पुंडपणा मोडण्याकरितां त्याजवर श्रीपतराव प्रतिनिधि यास फौज व सामान देऊन शाहू महाराजांनीं रवाना केलें. प्रतिनिधि चालून येतांच संभाजी राजे भाणरवी वीरश्रीत येऊन सामान व फौज घेऊन चव्हाणाच्या कुमकेस गेले. तेव्हां जी लढाई झाली तींत चव्हाण व राजे यांचा घोडा होऊन सगळे उभयतां पडून गेले. कबिले व बुणगें लुटलें गेलें. डेरे होते त्यांत ताराबाईसाहेब व राजसबाईसाहेब व संभाजी महाराजां-

---

* जाधवरावाच्या नारकशाळेच्या पोटीं पुत्र झाला होता. त्यास गजेंद्रगडीं नाटांत घेऊन गोत्र पतकरून मगठे यांच्या मोघरिका कराव्या या विषयीं संभाजीनीं त्याणें बोलणें लाविलें. तेव्हां ती गोष्ट साफ चढावयाची नाही असें संभाजीनें सांगितलें.

चे सर्व कबिले सांपडले. संभाजी महाराजांच्या पाठीस लागून मनिनि घेतलें. न्यांस पन्हाळ्यावर ठांकून दिलें. व सरकारी रवाजमा ठेवून बंदोबस्त राखिला. याप्रमाणें जय संपादून त्या सर्वांस मी महाराजांच्या भेटीस घेऊन गेलें. महाराजांस हें वर्तमान कळतांच पुढें सामोरे जाऊन या योगें नरी उभयतां मातोश्रींच्या व इतरांच्या भेटी झाल्या असें म्हणून त्यांचा बहुत सत्कार केला. वस्त्रें व अलंकार देऊन मजवानी केली, आणि जावयाची मर्जी असल्यासजा चे असें सांगितलें. तेव्हां ताराबाई बोलली, कीं कांहीं ही केलेंलें राहावयाचें. त्यास ते व तुम्ही मला सारखेच आहां. तुम्हांपासून कांहि राहातें. त्या वरून रुचाजिमा व खर्च नेमून देऊन मानाप्रमाणें किल्ल्यावरील वाडा नीट करून तेथें लागवाईस ठेविलें. वरकड सर्वांचा बहुमान करून कारकून व चाकरीचे लोक, सणगें व रदचास देऊन व शिवाय कांहीं पागा व फौज बरोबर देऊन न्यांस संभाजी कडे पावती करून दिली. (शके १६५०).

या प्रमाणें चोहों कडून अपेक्षा येऊं लागतें तेव्हां अर्धे राज्य मिळविण्याचा नाद सोडून गांठू महाराजांची मरव्य करून असावें हा उत्तम पक्ष आहे असें आणखी संभाजीची स्वारी झाली जिजाबाईसाहेब यांणीं ही बहुत प्रकारें सांगितलें, कीं महाराजांकडे वकील पाठवून तह करावा, व त्यांजीं सलोखा असावें. त्या वरून संभाजी राजे यांनीं बाबाजी प्रभु पारसनवीस व चिटको प्रभु चिटणीस यांस महाराजांकडे वकिलास पाठवून कळविलें कीं, " आम्हांस खर्चास भुलरव नेमून पन्हाळ्यावरोरे मांत व त्यांनीं स्थलें व किल्ले निर्वेध चालवावे, आणि स्वारी शिकारी करण्यास कांहीं खंडणीचा मांत नेमून द्यावा. या उपर महाराजांविरुद्ध कांहीं एक न करितां महाराज आज्ञा करतील त्या प्रमाणें चालूं. " तेव्हां महाराजांनीं सांगून पाठविलें, कीं तुम्ही बहुत आहां. तुमची आमची भेट व्हावी, म्हणजे तुमचा सर्व मजकूर

गेकून तुमच्या मनोदयानुरूप करून दिले जाईल. परंतु मफाईमें-
ट झाल्याधांच्नून कांही होणार नाहीं. आम्हीं त्या मोगलगत
येतों. तुम्हीं तिकडून यावें. तुम्हास बोलणेप्रमाण व विश्वास आ-
णण्यास पुढें मानवर सरदार रवाना करितों. हें मंभाजीने मा-
न्य केलें. त्या समाणें गाहू महाराजांची स्वारी मालाच्याहून नि-
घून उंबरजेस मुक्कामास आली. या भेटीची हकीकत कोल्हा-
पूर दप्तरीं खालीं लिहिल्याप्रमाणें आढळते.

" नहू मालाच्या त्या समयीं प्रथमस्वारी साधारण नाम संव-
त्सरीं (शके १६५३) सन इहिदे मलासीन (फसली ११४०) माघ
मासीं (इ. स. १७३०) मालाच्याहून श्रीमन्महाराज गाहू गजे यां-
जकडून श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्रपति यांसी
न्यावयास आले, व नांवनिशी श्रीपतराव प्रतिनिधि व नारोराम
मंत्री व आवाजी पुरंधरे पेशव्यांचे मुतालीक व कृष्णाजी दाभाडे
व निंबाळकर व पांढरे व कित्येक नामीनामी सरदार किल्ले पन्हा-
ळ्याचे मुक्कामीं फौजे मुद्दां आले. श्रीमन्महाराज राजश्री स-
भाजी महाराज छत्रपति साहेबांस सर्वांनीं नजरा व वस्त्रे व जड-
जडाव जवाहीर वस्त्रीं घोडे नजर करून मल्के करून जोहार केले. त्या
उपरी पल्लकी समाणें चाढवा न्यांसी देऊन विदे होऊन ने किल्ल्या-
खालीं उतरले. उपरांतिक महाराज स्वामींची स्वारी किल्ले खालीं
होऊन देवाले नावली येथें मुक्काम जहाला. तेथून कूच दरकूच
जाऊन वाडावरी मुक्काम केला. गाहू राजे उंबरजे वरी होते. श्री-
पतराव व नागेराम मंत्री वाठाराहून पुढें उंबरजेस गेले आणि गा-
हू राजे यांसी कऱ्हाडापुढें जखीण वाडीचे नजीक माळावरी घेऊ-
न आले. त्याजवरांवरी संपूर्ण सरकारकून व नामीनामी सर-
दार वगैरे फौज लक्ष पावेतों, जखीण वाडीकून खवलाची कों-
गिरी वाठारा पावेतों मधलां खोंदी मैल्यें मिळून दोन लक्ष पर्यंत
जथ जाहला. श्रीमन्महाराज राजश्री संभाजी महाराज छत्र-

कलम १. इन्नारवा वारूण मद्रास तहत संगम दक्षिण तीर कुल दुतर्फा मुक्कूरव दरोबस्त देरवील गाणी व किल्ले तुम्हांस दिले असत.

कलम २. तुंगभद्रेपासून तहत गमेश्वर देरवील संस्थानें निम्मे आम्हांकडे ठेवुन निम्मे तुम्हांकडे करार करून दिलीं असत.

कलम ३. किल्ले कोपळ तुम्हांकडे दिल्हा त्याचा मोबदला तुम्हीं रत्नागिरी आम्हांकडे दिला.

कलम ४. वडगांवचें गाणें किल्ल्यापाडून टाकावें.

कलम ५. तुम्हांशीं जे वैर करितील त्यांचें पारिपत्य आम्हीं करावें. आम्हांशीं वैर करितील त्यांचें पारिपत्य तुम्हीं करावें. तुम्हीं आम्हीं एक विचारें राज्याभिवृद्धि करावी.

कलम ६. वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून दक्षिणतीर तहत निवृत्ती संगम तुंगभद्रा पावेतों दरोबस्त देरवील गड्ढाणीं तुम्हांकडे दिलीं असत.

कलम ७. कोकणघांत मालवी पट्टिकडे तहत पंचमहाल आकोलें पावेतों दरोबस्त तुम्हांकडे दिलें असत.

कलम ८. इकडील चाकर तुम्हीं ठेवूं नयें, तुम्हांकडील चाकर आम्हीं ठेवूं नये.

कलम ९. मिरजयांत विजापूर मांतीचीं ठाणीं देरवील अथणी तासगांव वगैरे तुम्हीं आमचे स्वाधीन करावीं.

येकूण नऊ कलमें करार करून तहनामा लिहून दिल्हा असे. सदरहू प्रमाणें आम्हीं चालू, याम अंतराय होणार नाहीं. मोर्तब.

---

* हा तहनामा अस्सल मनीमरून घेतला आहे. या पूर्वी इ. स. १७२५ सा-

या प्रमाणें तहनामा ठरून सुमारें चारहजार घोरपडेचा व २८ लक्ष रुपये वसुलाचा मुलूख संभाजीस देऊन त्याणें राज्य स्वतंत्रपणें चालवावें असें ठरलें, आणि या बद्दल आज्ञापत्रें* दोघांस गेलें. यांच्या सीमा उत्तरेस वारणा, दक्षिणेस तुंगभद्रा व पूर्वेस कृष्णा अशा होत्या.

कोल्हापूरचें राज्य स्वतंत्र झाल्यावर संभाजी महाराजांनीं अष्टप्रधान नेमिले व त्यांस सरंजाम दिले. भगवंतराव प्रतिनिधि, रामचंद्र निळकंठ यांस वाघड्याची जहागीर देऊन प्रतिनिधि पद दिलें. रायचंद्र निळकंठ यांस वाघड्याची जहागीर देऊन पंत अमात्य हा किताब दिला. प्रसिद्ध संताजी घोरपडे यांचे पुतणें त्रिंबकजीराव यांस कापशीची जहागीर देऊन सेनापति पदाची वस्त्रें दिलीं. याच प्रमाणें मंत्रि, सुमंत व न्यायाधीश नेमिले. यांच्या मार्फत मुलुखाचा कारभार चालून असे. रंगड्यापाड्यांनी दिवाणी फौजदारी काम पंचांच्या मार्फत चाले. अष्टप्रधानां शिवाय आणखी शेंकडों सरदारांस क्रमाक्रमानें सरंजाम देण्यांत आले. या सर्वांनीं नियमित फौज ठेवून आपल्या तनख्याचा बंदोबस्त करावा आणि कारण पडेल तेव्हां स्वारीशिकारीस महाराजांकडे फौज घेऊन यावें, असा नियम ठरविला. आणि यारले शिवाजीमहाराज यांच्या कानूजाल्याप्रमाणें वर्तनाट चा-

---

* शाहू व संभाजी या उभयतां मध्यें तह साम्बा अशून त्याची ही अस्सल मूळ दस्तरीं आहे. त्या तहाची मजकूर पुरवणींत दिली आहे. (नं. १० पहा). वारणेच्या पलिकडील मुलुखावर प्रतिनिधींचा अमल असल्यानें अस्सल वजाचणी झाली नाहीं. परंतु दप्तरीं इतिहास लिहिला आहे त्यांत चर्चा संगती जुळत नाहीं.

* नं. ५ पहा.

नू केली.

या प्रमाणें अष्टप्रधान व सरदार यांच्या नेमणुका होऊन त्यांचा भंभुत्व मोडांत बसला, नेव्हां कोल्हापूरच्या राज्यास वरें-च तेज व वजन आलें. कोल्हापूरचा मुलूख एकीकडे असल्यानें मुलखांतील सर्व लोकांची जूट व एक वाक्यता रहाण्यास फार अ-नुकूल झालें. कोल्हापूरचे सरदार सर्वदां हद्दीवरील तंट्यांत गुं-तत असल्यानें पश्चिमेकडील इतर संस्थानिकांच्या तंट्यांत व मस-लतींत शिरण्यास त्यांस फावत नसे व इच्छाही होत नसे.

शाक कर्ते शिवाजी महाराज यांच्या अस्सल वंशांतील को-ल्हापूरचे राजे असल्यानें त्यांसविषयीं लोकांत अत्यंत पूज्य बुद्धि असे. कारभारही अष्टप्रधान चांगल्या रीतीनें चालवीत. संभाजी कोणत्याही लुटीच्या किंवा दुसऱ्या स्वारीस जाण्यास सर्व-काल तत्पर असे. परंतु आपला बहुतेक रिकामा वेळ नाच-तमाशांत घालवी. व बराच पैसा व्यसनांत व ऐष आरामांत उधळी-तंअसे, असाही संभाजी राजावर कित्येक ठिकाणीं दोष दिलेला आ-ढळतो.

मुलुखाची रचना ही राज्याचें स्वातंत्र्य रहाण्यास फार उप-योगी पडली. पश्चिमेस सह्याद्रिपर्वत असून जागजागीं हद्दीव-र बिकट व घोर अरण्यें होतीं. त्यांतून फौजबंगेरे आणण्यास अत्यंत मुष्कील पडे. घांट माथा बिकट व दुर्धर नटा प्रमाणें होता, आणि ठिकठिकाणीं पन्हाळा, विशाळगड, चावडा, रांगणा, भुदरगड, सॉमानगड असे पहाडी किल्ले असून न यांची गणना हिंदुस्थानांतील बळकट किल्ल्यांत होत असे, आणि त्यांची मराठ्यांनीं वरचेवर सुधारणाही केली होती. सर्व किल्ल्यांत गोडपाण्याचे झरे असून पाण्याचा मोठा साठा होण्या-

---

* पुरवणी नंबर १.

जोगे तलाव होते; तसेंच धान्यांचीं मोठमोठीं कोठारें भरलेलीं ठेवीत असत; सर्वांवर थोडी बहुत फौज असे; आणि ती फौज किल्ल्याच्या दुर्धरते-मुळें राबूच्या वन्याच मोठ्या फौजेस सहसा दाद देत नसे; किल्ला हस्तगत करण्यास लांच लुचपतीचा लोभ दाखवून एकादी मसलत करावी लागे; किंवा धान्याचा दुष्काळ पडेपर्यंत वेढा देऊन बसावें लागत असे.

प्रत्येक किल्ल्यावर रक्षणाकरितां गडकरी नेमिलेले असत. ते भिन्न भिन्न जातीचे होते; या मुळें कटकरून कांहीं बखेडा करण्यास जागा नसे. किल्ल्यानजीक गडकऱ्यांस वंशपरंपरा चालणाऱ्या जमिनी दिलेल्या होत्या. त्या जमिनीपासून महाराजांस कांहीं स्वामित्व पोंचे. गडकऱ्यांचे गडास आपणास पोटास घालणाऱ्या आई प्रमाणें ममजत.

जासुदाचें काम करण्यास महार, मांग, रामोशी वगैरे प्रत्येक गांवीं असत; आणि शिवाय दोन सनदी नांवाचे मराठे शिपाई गांवो गांव होतेच. यांस नोकरीकरितां जमिनी दिलेल्या असत. लहानपणापासून त्यास नरवार मारण्यास व बंदूक उडविण्यास शिकवीत. यामुळें हे देशावर गल्लीम आला असतां त्याच्या निवारणार्थ सरकारची सूचना येतांच मोठ्या खुषीनें व आनंदानें एकत्र जमत. या प्रमाणें मराठेशाहीच्या बहुतेक आरंभापासून थोड्या दिवसांची सूचनात मिळतांच १००० पर्यंत फौज जमविता येत असे.

इ. स. १७३४ (शके १६५६ फ. ११४४) साली संभाजी महाराज व जिजाबाई राणीसाहेब या उभयतांची स्वारी जेजूरीस गेली होती. तेथून मनापगडावर गेली व तेथें सपराब मुक्काम झाला. तेथून महाबळेश्वरीं गेली व तेथें सात दिवस राहिली. नंतर स्वारी सातान्यास गेली. त्यावेळीं शाहू महाराज सर्व सरदार मानकऱ्यां सहवर्तमान वेद नदीपर्यंत सोमोरे आले होते. भेटी

होऊन स्वारी गढहरांत गेली व पंतप्रधान यांच्या वाड्यांत उतरली. सातार्‍यास दोन महिने मुक्काम झाला. नंतर श्रीशिरवळास जाऊन. परत येतांयास निघाली. शाहू महाराज कृष्णातीर नजीक वो-गांव पर्यंत पोंचवावयास आले होते. याच प्रमाणें सन १७४० (शके १६६२ फ. ११५०) साली संभाजी व जिजाबाई यांची स्वारी पुनरपि मातार्‍यास गेली होती.

शाहू महाराज सन १७४९ इसवी साली निवर्तल्यावर बाळाजी बाजीराव पेशवे यांणीं मराठी राज्याचा सर्व अधिकार बळकाविला. त्यावेळीं संभाजी महाराजास पूर्ववत् प्रमाणें सर्व चालवूं असा करारनामा* लिहून दिला.

सन १७५४ साली बाळाजी बाजीराव आणि सदाशिवराव भाऊ सावनूरकर, नबाब यांच्या मांतांत लढाईस गेले. त्यावेळीं उभयतां करवीरां संभाजी महाराजांच्या भेटीस आले होते. त्या प्रसंगीं बाळाजी बाजिराव पंडित प्रधान यांणीं संभाजी महाराजांस विनंति करून सदाशिव चिमणाजीस प्रधानपदाचीं वस्त्रें देवविलीं. आणि पारगड, भीवगड, सामानगड, वल्लभगड आणि कलानिधि हे किल्ले देवविले. तसेंच कर्नाटकांतील चौथाईचा जो ऐवज महाराज सरकारांत दरसाल यावयाचा तो प्रधान यांणीं संस्थानिकाकडून वसूल करून करवीर सरकारांत दरसालु देत जावा असाही करार ठरवून घेतला. आणि महाराजांची सदर करारप्रमाणें ऐवज आगर्‍याकडे देणे विषयीं ताकीद पत्रें घेऊन पुढें सावनुरास गेले. सावनूरकरांची लढाई करून अरबेर सह्याद्रीवर परत जातेवेळीं ही प्रधान करविरीं उतरले होते. आणि पुण्यास बरोबर संभाजी महाराजांची पत्नी जिजाबाई यांची ही स्वारी गेली होती. या प्रसंगीं करवीर करांस आपल्या

---

* नं ६ पहा.

कबज्यांत आणणे विषयीं पेशवे यांचा यत्न बराच सफल झाला, हें पुरवणींत या भेटीची हकीकत व ताकीद पत्रें दिलीं आहेत त्यावरून समजेल. *

स्वतंत्र झाल्यापासून ३० वर्षे राज्य करून शके १६८२ राज्याभिषेक शक ८७ मार्गशीर्ष शुद्ध १२ रोजीं (इ. स. १७६० तारीख २० माहे डिसेंबर) ठाणें वडगांव येथें मरण पावले. प्रेत करविरीं आणून पंचगंगा तिरीं सार्थक केलें. पुढें त्या ठिकाणीं त्यांचें देवालय बांधण्यांत आलें. †

---

* नंबर ७, ८, ९, पहा.

† संभाजी महाराजाच्या कारकीर्दीची मिळावी तशी हकीकत कोल्हापूर दप्तरीं अद्याप आढळांत आली नाहीं. या मुळें माहिती जोरक दिलेली आहे.

प्रकरण २.

शिवाजी महाराज.

सन १६६२– १८१२.

संभाजी महाराज यांचीं एकंदर ७ लग्नें झालीं होतीं. सात राण्यांचीं नांवें येणें प्रमाणें होतीं.

(१) आनंदीबाई, बुंदकर घाटगे यांची कन्या.

(२) उमाबाई, रवानवेलकर यांची कन्या.

(३) सकवार बाईसाहेब.

(४) जिजाबाई, तोरगलकर शिंदे यांची कन्या.

(५) सुंदराबाई, तुरंबेकर घाटगे यांची कन्या.

(६) दुर्गाबाई, मोहिते यांची कन्या.

(७) कुसाबाई, मानगावकर घाटगे यांची कन्या.

इतक्या राण्या असून संभाजीस पुत्रसंतति नव्हती, आणि संभाजी महाराज हे खुद्द शिवाजी महाराजांचे धोरटले वंशज होत, संभाजी महाराज वारले त्यावेळीं कुसाबाई राणीसाहेब गरोदर होती. कुसाबाई प्रसूत झाली; परंतु पुत्र झाला नाहीं, तर मालोजीचा कनिष्ठ पुत्र फरजी यांच्या वंशांतील शाहाजीराजे इंदापूर परगण्यांत खानवट गांवीं होते; त्यांचा ज्येष्ठ पुत्र माणकोजी यास दत्तक घ्यावा अशी संभाजी महाराजांनीं अंतकाळीं आज्ञा केली होती

---

* कुसाबाईच्या बाल्यतपणास जिजाबाई राणीनीं आनूबाईसाहेब इचलकरंजीकर यांस पुण्याहून बोलाविलें होतें. परंतु आनूबाईस करविरीं येण्यास पेशव्यांनीं निरोप दिल्हा नाहीं. त्या वरून आनूबाईस जिजाबाईनीं पाठविलेलें पत्र दिलें आहे, त्या वरून आनूबाईस न पाठविण्याचें कारण, व करवीर राज्याविषयीं पेशव्यांचे मनोगत स्पष्ट कळतात. नं. ११ पहा.

म्हणून संभाजीची पत्नी जिजाबाईसाहेब (वाडा चार*) यांणीं अष्टप्रधान, कामगार, सरकारी कारकून व सरंजामी यांस बोलावून आणून कळविलें कीं, महाराजांनीं कैलासवास केला, पुत्र संतान तर नाहीं, यास्तव कैलासवासी महाराजांच्या आज्ञेनुरूप शारफजी† च्या वंशांतील शाहाजीराजे रवानवटकर यांचा पुत्र माणकोजी यास दत्तक घेऊन गादीस मालक करावा, असा मनोदय आहे. तर तुमचे सर्वांचे विचारास कसें येतें तें सांगावें. त्या वरून या गोष्टीस सर्वांची संमति पडली. तेव्हां आईसाहेबांनीं रवानवटास कारकून व वकील यांजबरोबर पत्रें रवाना केलीं. कारकून व वकील यांनीं रवानवटकर यांस भेटून पत्रें दिलीं, व मजकूर कळविला, आणि आपला वडील पुत्र द्यावा अशी विनंति केली. तेव्हां रवानवटकर यांणीं उत्तर दिलें कीं, असें करण्यास आम्हांकडून हरकत नाहीं; परंतु पंतप्रधान पेशवे यांची या गोष्टीस सल्ला पाहिजे; सबब त्यांचें पत्र आम्हांस आणावें, म्हणजे चिरंजिवास हवाली करितों. कारण आईसाहेब आहेत तों पर्यंत राज्य चालवावें, आणि त्यांच्या पश्चात् सातारा व कोल्हापूर

---

* महाराजांस जितक्या बायका असत त्यांस रहाण्यास निरनिराळे महाल किंवा वाडे असत, व त्या वाड्यांस व त्यांत रहाणाऱ्या राण्यांस ही वाडा एक, वाडा दोन, अशीं नांवें देत.

† माणकोजी विषयीं एका बखरकारानें अशी गोष्ट लिहिली आहे:—माणकोजीला हान असतां त्यास सोप्यांत निजविलें होतें. नवऱ्यीं माणसें कामानिमित्य घरांत गेलीं. तों एकाएकीं एक मोठा नाग येऊन मुलाचे मस्तकावर फडा धरून झुलत बसला. इतक्यांत बाहेर माणसें येऊन पहातात तों सर्प येऊन बसला आहे. गडबडा होतांच सर्प निघून गेला. हें ऐकण्यांत आल्यावरून हा मोठा देवत्वाला होईल म्हणून तोच दत्तक घ्यावा, अशी शंभू महाराजांनीं आज्ञा केली होती.

ह्मीं दोन्ही राज्यें एकत्र करावीं असें प्रधानांचे मनांत आहे. हें ओ-
कून गेलेला मंडळी निरोप व पत्र घेऊन परत पन्हाळ्यास आ-
ली, व आईसाहेबांस सर्व मजकूर निवेदन केला. दुसऱ्या दिवशीं
पुनः अष्टप्रधान वगैरे मंडळीस जमाकरून सर्वांस पत्र दाखवून ति-
कडील मजकूर कळविला, आणि पुढें कसा विचार करावा तें वि-
चारिलें. तेव्हां सर्वांनीं कळविलें कीं, गोविंदराव पारसन-
वीस हे पूर्वापार विश्वासू सेवक व माहितगार आहेत; त्यांस आ-
णून या विषयीं मसलत विचारावी. तेव्हां आईसाहेबांनीं पा-
रसनवीस यांस बोलावून आणून सांगितलें कीं, "तुम्ही पुरात-
न विश्वासूक आणि राजाराम महाराजांपासूनचे माहितगार आ-
हां; तेव्हां प्रस्तुत प्रसंगीं कसें करावें? आणि कोणत्या प्रकारें इ-
च्छिलेली गोष्ट सिद्धीस न्यावी तें सांगावें." त्यावरून त्यांनीं सां-
गितलें कीं, बायकांकडे लळा लावून मुलास आणावा. मुलगा ये-
थें आल्यावर प्रधानांचा रुकार घेतां येईल.

त्या प्रमाणें शाहूजी रवानदार कर यांचे शालक नव-
लोजीराव महाडीक तारळ्यास राहात होते, त्यांस आईसाहे-
बांनीं पत्र देऊन बाबूराव कारकून यास तारळ्यास पाठविलें.
ते महाडीक यांस भेटून त्यांचें पत्र त्यांची भगिनी बयासाहेब
रवानदार कर यांस घेऊन आले. त्यांत त्यांनीं लिहिलें होतें कीं,
कोल्हापुराहून मुलास आणण्यास जी मंडळी येईल त्यांच्या स्वा-
धीन मुलाला बिनदिक्कत करावें, मनांत कांहीं अंदेशा आणूं नये. न-
तर तें पत्र व राजवाड्यांतील कांहीं रशी व दुसऱ्या कांहीं बायका
यांस बरोबर देऊन बाबूरावास रवानदारास पाठविलें. ते तेथें जा-
ऊन बिऱ्हाड परभारें घेऊन बाहेर उतरले. नंतर युक्तीनें बया-
साहेबांची भेट घेऊन पत्र दिलें, व अंतस्थ मजकूर निवेदन के-
ला. तेव्हां ती गोष्ट त्यांच्या विचारास येऊन, त्यांणीं त्यांस पर-
भारेंच राहून कांहीं विचारित्यास बयासाहेब यांचे माहेराहून (तार-

व्याह्नवर) आलों आहों असें बाल्यात्कारें सांगावें, आणि बरोबरच्या बायकांस व दासीस आमच्याकडे जाड्यात भेटण्यास बरचंवर पाठवीत जावें, म्हणजे तुमच्या अंतर्यामचें गुज कारण सिद्धास जाण्याचा समय लवकरच येईल, असें सांगितलें. त्या प्रमाणें बायका व दासी दररोज बयासाहेबांकडे भेटीस जाऊं लागल्या. तेथें चार सहा घटका राहून मुलास घ्यावें, रवेळवावें, त्यास खाऊ द्यावा, अज्ञाभकारें वागू लागल्या मुळें मुलास या बायकांची ममता थोड्याच दिवसांत लागली. कधीं कधीं मुलास बिऱ्हाडीं आणावें, नो राही पर्यंत त्यास ठेवून मग पोहोंचता करावा. असें करितां करितां चार सहा महिनें गेल्यावर मुलास पूर्ण ममता लागून मूल गमतें दिवस इकडेच राहूं लागलें. नंतर आईसाहेबांकडे पन्हाळ्यास पत्र पाठवून वर्तमान कळविलें. तेव्हां त्यांनीं तीन तीन कोसांवर बायका व स्वार यांचे दपे ठेवून मुलास घेऊन येण्याविषयीं उत्तर पाठविलें. मग निकडे नेलेल्या बायकांत मुलाच्या ममतेच्या ज्या बायका होत्या, त्या पैकीं एकेक बायका दरदप्यावर ठेवून तेथून मुलास घेऊन बाबूराव निघाले, आणि कूच दरकूच करून चवथ्या दिवशीं सुरवरूप पन्हाळ्यावर मुलास घेऊन आले. मूल पहातांच आईसाहेबांस फार आनंद झाला, व लागलीच आनंदानें सारखर वाटली. बाबुगवांनीं कामगिरी बजाविली म्हणून त्यांजवर बहाल मर्जी होऊन त्यास "चिरंजीव" असें म्हणूं लागल्या, व त्यांणीं ही द्रविड ब्राह्मण असतां भोंसल्ले उपनांव धारण केलें. त्यांस या कामगारीबद्दल चुणाकी येथें ३० बिघे आणि कोडोली येथें ३० बिघे जमीन इनाम दिली. दुसऱ्या बरोबरच्या लोकांसही बक्षिसें दिलीं. मुलापाशीं नेहमीं रहाण्यास माणसें व हुजरे नेमिले. जानुबाई निर्माण झाल्या दाई ठेविली, व मुलाजवळ रवेळण्यास व रवेळविण्यास गुजाजी गाईकवाड, रत्नाकरपंत आप्पा, गोंदजी चव्हाण,

आणि सोनजी मडके म्हाडूळकर यांस नेमिलें. विद्याभ्यासासा-
ठीं द्यावयाची व पंतोजी ठेवून वेळा नेमून दिल्या, या शिवाय मागी-
ल्या दौलतीची माहितगारी व राजनीति समजून देण्यास रंवडे-
राव गोविंद पारसनवीस यास सांगितलें.

या प्रमाणें बंदोबस्त करून दत्तक घेण्यास पंत प्रधानांचा
सल्ला पाहिजे, म्हणून अष्टप्रधानांस आणून विचारिलें. त्यांनीं
असें ठरलें कीं, ही गोष्ट दुसऱ्याच्या हातून निभावयाची नाहीं.
स्वासा स्वारी गेली तरच सर्व जाबसाल उलगडतील. यास्तव पु-
ण्यास जाऊन प्रधानाकडून दत्तकाविषयीं वेगेरे जाबसाल ठरवून घ्या-
वे असें ठरलें. परंतु बाल्यात्कारें स्वारी महायासेस निघाली असें
प्रसिद्ध केलें. नंतर कामगार नेमून दौलतीचा बंदोबस्त केला आ-
णि चार महिन्याची बेजमी घेऊन ५००० फौज, सरदार, मानकरी
वगेरे सह - अक्षतृतीयेच्या सुमुहूर्तावर स्वासा स्वारी निघाली,
जेजुरीस जाऊन दाखल झाल्यावर तेथील कामदारांनीं स्वारी आ-
ल्याचें वर्तमान प्रधानांस कळविलें. त्या वरून प्रधानांची स्वारी
जेजुरीस जाऊन आईसाहेबांस भेटली, आणि कोणत्या उद्देशानें
येणें झालें तें विचारिलें. तेव्हां आईसाहेबांनीं सांगितलें कीं,
करवीर गादीस मालक करून देण्याचा आपला संकल्प दिसत ना-
हीं, म्हणून महायासेस जाऊन देह अर्पण करावा असा हेतु
आहे, परतु पूर्वी कैलासवासी शाहू महाराज यांणीं आम्हां-
कडील पारसनवीस यांचे विद्यमानें चाही करून दिली आहे.
त्यात दत्तक देऊन गादीस मालक करून द्यावा, आणि पन्हाळा
व सातारा हीं राज्यें एक करूं नये, असें चिटणीसांचे विद्य-
मानें ठरलें आणि या विषयीं प्रधानांस आज्ञा झाली आहे,
असें पारसनवीस यांनीं सांगितलें हा मजकूर सखारामबापू-
नीं श्रुत करावा तो आपणास कळविला आहे. या उपर मर्जी अ-
सेल तसें करावें. तेव्हा प्रधानांनीं उत्तर दिलें कीं, सातारा

व पन्हाळा हीं दोन पृथक् राज्यें नसून एकच आहेत. द्वैतभाव नाहीं. असें म्हणतांच आईसाहेब क्रोधाविष्ट होऊन निष्ठुरतेनें बोलिल्या कीं, राज्य तुम्हीं स्वाधीन करून द्यावें. आपण पुत्रवत् च असून आपणास महाराजांनीं राज्याचे अधिकारी करून ठेविलें आहेत. तर राज्य आपल्या स्वाधीन करून द्यावें. आणि खर्ची-ची वगैरे बेजमी करून आमची मदायाचेची रवानगी करून द्या-वी. हा आग्रह पाहून प्रधान निरोप घेऊन आपले डेऱ्यास गेले. दत्तक न देतां राणीसाहेबांस यासच चालविण्याचें अपे-क्ष आपले माथीं घेण्याची पेडाव्यांची छाती होईना. तेव्हां त्यांनीं विचारकरून असें ठरविलें कीं, सन १७४९-च्या यादींत या विषयीं शाहू महाराजांची स्पष्ट आज्ञा आहे, आणि राज्य-ही वीस पंचवीस लक्षाचें आहे. यास्तव दत्तक द्यावा आणि आ-ईसाहेबांची मर्जी राखून पन्हाळ्यास परत रवानगी करून द्यावी. या प्रमाणें मनांत संकल्प करून प्रधान पुनः भेटीस गेले. आ-णि आपले मनोगत काय आहेत, म्हणून आईसाहेबांस विचारिलें. तेव्हां गादीस मालक करून द्यावा आणि पदरच्या लहान मोठ्या माणसांचें रक्षण व्हावें, अशी इच्छा आहे, म्हणून आईसाहेबांनीं सांगितलें. स्वारी पुण्यास यावी म्हणजे तेथें मनोदयानुरूप बं-दोबस्त करून देतों अशी प्रधानांनीं विनंति केली. तेव्हां रा-णीसाहेबांनीं यासच जाणें रहित केलें, आणि सदर मतलबा-चें पत्र प्रधान यांचें लिहून घेऊन बेलभँडारानिशीं शपथ घे-तली. यासर्व स्नेह भावाच्या बोलण्याची खूण राहण्याकरितां प्रधानांच्या हातांतील हिऱ्याची आंगठी घेऊन पुण्यास जाण्याचें ठरविलें. नंतर श्रीदेवास अभिषेक करून वस्त्रें व अलं-कार दिले; तसेंच ब्राह्मणांकडून संतर्पण करविलें, व जेजूरी-स एकंदर आठ दिवस मुक्काम करून स्वारीचा कुच पुण्यास झा-ला. समागमें पंतप्रधानांची स्वारी होती. वाटेंत एक मु-

झाम करून दुसऱ्यादिवशीं स्वारी पुण्यास दाखल झाली. तेथें प्रधानांनीं त्यांस रहाण्याकरितां एक वाडा मोकळा करून दि-ला. दरोबरच्या सरदार मानकरी लोकांकरितांही जाग्याची नजीक करून घोडाजिमा व फौज या करितां बाहेर डेरे दिले. दररोज खर्चास दीड हजार रुपये पोंचते होत होते, व प्रधान नित्य भेटीस जात असत.

पुणें येथें दत्तकप्रकरणीं कागदपत्र वगैरे पुरे झाल्यावर कोल्हापूर करांचे दोस्त निजामअल्ली असफजाहा भागानगरकर यांची संमति येई पर्यंत दोन महिने मुक्काम झाला. तदनंतर शाहाजी भोंसले यांस कुटुंब सहित खानवटाहून आणवून प्रधानांनीं कळविलें कीं, तुम्ही शारफजी-च्या वंशांतील आहां. यास्तव तुमचे पुत्रास दत्तक द्यावा अशी उभयतां कैलासवासी महाराजांची आज्ञा आहे. करितां तुम्हीं आईसाहेबां-समागमें पन्हाळ्यासजाऊन पुत्र दत्तक घ्यावा, आणि आतेंत घालावें; तुमचा बंदोबस्त करून देतील, असें सांगून खानवट करांस वस्त्रें भूषणें देऊन निरोप दिला. नंतर आईसाहेबांस व अष्टप्रधानांस पंतप्रधानांनीं मेजवानी वगैरे करून सन्मान केला व बरोबर खर्चास दोन लक्ष रुपये आणि दोनलक्ष रुपये किंमतीचा पोषाख व जडजवाहीर वगैरे देऊन स्वारीची रवानगी केली.† राणीसाहेबांची स्वारी पुण्याहून रवानगट करांस घेऊन निघाली, ती श्रावणमासीं पन्हाळ्यास येऊन दाखल झाली. नंतर शके १६८४ आश्विन शुद्ध ५ सोमवारीं (सन १७६२ अक्टोबर) दत्तविधानाचा मुहूर्त योजून यथाविधि दत्तविधान व नामकरण करून शिवाजी छत्रपति हें नामाभिधान ठेविलें. पुढें शुद्ध १० स वि-

---

* निजामाची हैदराबाद यास पूर्वी भागानगर असें नांव होतें.

† पेशव्यांची ताकीदपत्रें नं ११।१२ पहा.

जयादशमीचे मुहूर्तावर यथाशास्त्र अभिषेकादि होऊन सिंहासनारूढ झाले या प्रसंगी मनस्वी खर्च करून समारंभ मोठ्या थाटानें केला. सिंहासनारूढ झाल्यावर भट्टप्रधानास विडे देऊन आणि सरदार मानकरी लोकांस वगैरे यथायोग्य वस्त्रें देऊन सर्वांस आनंदी केलें. या प्रमाणें समारंभ आटपल्यावर पंतप्रधान, निजाम अल्ली, हैदरअल्ली, मुरापूरकर वगैरे यांस योग्यतेनुरूप पत्रें व आज्ञापत्रें देऊन कारकून वगैरे हुजरे यांजबरोबर पाठविलीं. महाराजांसही पत्रोत्तरी विनंति पत्रें व जडजवाहीर आणि पोषाख आले हैदरअल्लीखान यांजकडून पोषाख, जवाहीर, घोडे, व झाडराव व वाळसुदर या नांवाचे हत्ती आले होते. या समारंभास अजमासें चार लक्ष रुपये खर्च झाला. हे ही राज्य पेंगाऱ्यांच्या दांडेत न पडता कायम राहून समाधान झाल्यावरून लोकांस आनंद झाला. महाराज सिंहासनाधीश्वर होईपर्यंत आईसाहेबांच्या नांवें शिक्का मोर्तब व कागदपत्र होत होते, ते बंद करून महाराजांच्या नांवें सर्व राज्यकारभार सुरू केला. यावेळी जीं विनंतिपत्रें आलीं त्या पैकीं कित्येकांचे उतारे पुढें दिले आहेत त्यावरून कोल्हापूरकरांस इतरांची पत्रें येण्याचा व जाण्याचा संप्रदाय त्यावेळीं कसा होता हें दिसून येईल. *

समारंभ आटोपल्यावर सर्व माजीं आईसाहेबांची स्वारी छत्रपति यांस घेऊन नृसिंहवाडीस जाण्याकरितां करविरीं आली. त्या समयीं भगवंतराव रामचंद्रपंत अमात्य यास दौलतीचें काम पाहून व्यवस्था ठेवावी अशी आज्ञा केली. तेव्हां त्यांणीं "स्त्री बुद्धि अगाध चित्त, सबब हें काम आमच्या हातून व्हावयाचें नाहीं" असें अमर्यादेचें उत्तर दिलें. तें ऐकतांच आईसाहेब क्रोधायमान झाल्या व बोलल्याकीं, "आपण

---

* पुरवणी पहा. पत्रें नंबर १३।१४।१५ पहा.

काम न करावे तर मोठीही अडचण पडेल असें समजूनये, तें काम यःकश्चित् कुणाचिणी करून चालविता येईल " नंतर **येसाजीराव** शिंदे सुभेदार हे भाईसाहेबांचे साहेराकडील असें कावजे होते, ते फार शहाणे व कर्ते होते म्हणून त्यांस कारभाराचें काम करण्यास सांगून गंगू, रगू, भागू, नागू, आणि बिंगू अशा पांच शहाण्या कुणाबिणी पसत करून शिरोळ, भावठें, वडगाव वगैरे ठिकाणीं कामें सांगून रवाना केल्या, त्याच कांहीं दिवस काम चालवीत होत्या. नंतर स्वारी वाडीस गेली आणि चार पांच दिवस राहून देवदर्शन घेऊन पन्हाळ्यास आली. चारणेच्या नव्या प्रमाणें हुकेरी तालुक्या पैकीं कांहीं ठाणीं **चिकोडी, वागेवाडी, वंदमुरी** व कांहीं किरकोळ ठाणीं येण्याचीं राहिलीं होतीं, तीं देण्याविषयीं **माधवराव बल्लाळ** प्रधान यांचें पत्र **बसव प्रभु देसाई** मात हुकेरी यांस चद्र ६ शाबानचें (सन १७६२, ६३) आलें. आणि त्या प्रमाणें ठाणीं सरकारात आलीं (चाके १६८३ सन इ[illegible] अलफ).

याच सालीं भाईसाहेबांची स्वारी [illegible] वाडीकडे असता **गोपीनारायण** [illegible] कर्नाटकांतील कामगार यांणीं **रघुनाथराव पंडित** यास फौज सुद्धां आणून कसबा **वडगांव** ठाणें घेतलें, तेव्हां **भगवंत आप्पाजीचे** विद्यमानें सातलक्ष रुपये देण्याचा करार करून ठाणें परत घेतलें, पैकीं जामदारखान्यांतून रोख दोन लक्ष रुपये दिले, आणि **चिकोडी** व **मनोळी** हे दोन तालुके गोपीनारायण आणि भगवंत आप्पाजी या उभयतांकडे लावून देऊन त्यांची पाचलक्ष रुपये बाकी बद्दल निशा दिली.

रघुनाथराव परत पुण्यास गेल्यावर **गोपाळराव गोविंद पटवर्धन** यांजकडील **मिरजेचें** ठाणें घेण्याची मसलत करून पुण्याहून फौजेसह निघाले. हें वर्तमान गोपा-

व गोविंद यास समजल्यावर मिरजेच्या ठाण्यांतील खजिना वगैरे दौलत शिरोळास ठेवण्याविषयीं श्रीमन्महाराज जिजाबाई साहेब यांची परवानगी मागितली. तेव्हां आईसाहेबांनीं शिरोळचे मामलेदार नरसोचिंवक भुयेकर यांस आज्ञा केली की, मशारनिल्हे पटवर्धन यांचा खजिनावगैरे शिरोळास ठेवून घ्यावा, आणि त्यांज कडील पत्रें येतील त्या प्रमाणें खजिन्यापैकीं ऐवज हुजूर परवानगीची गरज न धरितां देत जावा. रघुनाथराव पंडित फौजेसह मिरजेस आले व ठाण्यास वेढा दिला. तेव्हां मिरजेचा बंदोबस्त करून आपला जमाव घेऊन पटवर्धन मोंगलांचे प्रांतांत गेले. तेथें फौजेच्या खर्चाची अडचण पडली. त्यासमयीं पत्र देऊन शिरोळचे मामलेदार यांजकडे कारकून पाठविले. त्या प्रमाणें खजिन्यापैकीं ऐवज मामलेदारांनीं कारकुनाच्या स्वाधीन केला. तो ऐवज कारकुन यांणीं कापसाच्या गठ्ठ्यांतून मोंगलाईत नेला. पुढें पटवर्धन मोंगलाईतून परत आल्यावर मामलेदार यांणीं सर्व खजिना स्वाधीन करून पावती हुजूर पाठाविली.

शिवाजी महाराजांस सव्वा वर्ष लागलें, तेव्हां सन १७६३ साली शालिवाहन शके १६८५ चैत्र शुद्ध १२चे मुहूर्तावर माहाराजाचा मोठ्या थाटानें व्रतबंध केला. त्याच वेळीं खानवटकरांस पांच हजाराचा सरंजाम देऊन करवीरीं ठेवून घेतलें.

जिजाबाई राणीसाहेबांच्या क्षीरभारांत स्वाभाविकच अव्यवस्था उत्पन्न होत जाऊन प्रांतांत बंदोबस्त कमी झाला. यामुळें लोकांस लूट करण्यास अगदीं मोकळीक मिळाली. जिकडे तिकडे लुटारू लोक आणि कोल्हापूर करांच्या स्वारांच्या टोळ्या लूट करण्यास फिरूं लागल्या. तेव्हां पेशव्यांचे मुलुखांत कृष्णेच्या पलीकडे त्यांचा उपद्रव सुरू झाला. त्या त्वषानेंच र-

घुनाथरावानें वडगावच्या गण्यावर हल्ला करून तें ठाणें घेतलें होतें पश्चिम किनाऱ्यावर ही चांचे लोकांची जहाजें बंदरोबंदरीं फिरूं लागलीं व त्यां पासून व्यापारीलोकांच्या नारवांस अत्यंत उपद्रव होऊं लागला.

निजामाचीं कोल्हापूरकरांचें आंतून मरव्य होतें. सरभोंवार विशाळगडकर, वावडेकर, कागलकर व कापनीकर यांच्या जहागिरीचे मुलूख असून ते फौज बंद होते, घांतांत येण्याच्या वाटा व घांट यांवर त्यांचे पहारे असत, व कोणी घांतावर हल्ला केल्यास त्याचें निवारण हेच करीत असत, यास्तव राणीसाहेबांस पन्हाळ्यावर मोठ्या डौलानें व मिजाशीनें राहाण्यास सांपडे. स्वार, पायदळ, गडकरी, हुजरे वगैरे लवाजिमाही मोठा बाळगिला होता, व त्यांचा खर्चही मनस्वी होता. शिरस्त्याप्रमाणें जो घांताचा वसूल येई तो खर्चास पुरत नसे, परंतु नजर नजराणे व घांतांत जी लूट चालली होती तिचा कांहीं हिस्सा सरकारांत येण्याचा मामूल होता, त्यामुळेंच खर्चास तूट पडत नव्हती.

पश्चिम किनाऱ्यावर चांचे लोकांचीं आरमारें मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्या नजीक असत, मालवण वगैरे बंदरीं हे शूर लोक फारच बळावले होते. ते आपल्या जहाजांवरून क्वचित् दुसऱ्या बंदरीं माल नेत. परंतु व्यापाऱ्यांचीं नारवें लुटून तो माल विकणें हाच त्यांचा मुख्य धंदा होता. ज्या समयास ईस्ट इंडिया कंपनीचीं जहाजें पश्चिम किनाऱ्यावर फिरूं लागलीं होतीं, व कंपनीचा माल मुंबईहून बंदरोबंदरीं जात असे. त्यांचीं जहाजेंही यांच्या सपाट्यांत सांपडून लुटलीं जाऊं लागलीं, चोचटीं हा उपद्रव इतका वाढला कीं, सन १७६५ सालीं कंपनीनें मुंबईहून आरमारावरून फौज पाठविली आणि मालवणचा किल्ला सिंधुदुर्ग व नजीकचे सर्जेकोट, पद्मगड

वगैरे तान्यांत घेतले नंतर जिजाबाई राणीसाहेबांनी नुकसानी बद्दल व शिबंदी खर्चा बद्दल सात लक्ष रुपये देण्याचा ठराव करून कंपनीशीं सन १७६६ सालीं तहनामा केला, आणि मालवणचा किल्ला परत तान्यांत घेतला. त्यावेळीं मुंबईचे गव्हरनर चार्ल्स क्रामलीन हे होते. कंपनीच्या तर्फे दामसमाष्टिन आणि राणीसाहेबाच्या तर्फे यशवंतराव सुभेदार या हरदु जणांच्या विद्यमानें जंजिरे फोर्ट आगष्टाच्या मकाणांत तहनामा तारीख १२ जानेवारी सन १७६६ साल्यांत ठरला तो बिलपशील कलमवार येणें प्रमाणें :-

कें १६८७ व. व. प २०

तहनामा भवाली पन्हासरकार कंपनी इंग्रज व मस्मत पन्हा जिजाऊ राणीसाहेब

कलम १ सरकार कंपनी व मस्मत पन्हा जिजाऊ राणीसाहेब व त्यांचा वंश परंपरा यांशी कायम सलाह व निखालस दोस्ती चालावी, याजकरितां राणीमहाराज तर्फेचा एकमातबर भला अदमी कबिल्या सुद्धां आपल्या खर्चानिशीं मुंबईस धेवावा.

२ महाराज जिजाबाई राणी यांणीं करार केला आहे कीं, रुपये सुमारें ७,५०,००० सातलक्ष पन्नास हजार द्यावे. जंजिरे फोर्ट आगष्ट याजवर फौज आली व किल्ल्यांतील फौज वगैरे जी लढीं खर्च सुटावयाकरितां महाराजांच्यांनीं सरकार कंपनीशीं करार केले रुपये सातलक्ष पन्नास हजार, पैकीं बारावी तारीख जानेवारी सन १७६६ पासून दोन वर्षांत रुपये तीन लक्ष साठ हजार द्यावे. बाकी रुपये तीनलक्ष [illegible] हजार, या तारखे पासून तीन वर्षांनीं फेडावे. दरवर्षांस [illegible] या प्रमाणें तीन वर्षांत तीनलक्ष द्यावे. बाकी नलद [illegible] शेवटचे वर्षीं वा

रून द्यावे. हें चालावें याजकरितां महाराज तर्फेचे चवघे मात-
बर नामांकित द्रव्यवंत सावकार ज्या प्रमाणें मुंबईतील जनरल
कौन्सिल रबुष होऊन ठरविनील त्या प्रमाणें मातबर जामीन द्यावे.
जंजिरादिल्याच्या पूर्वी रुपये २,६९,००० येणें ते हुकेरी, पीर खाना
व अबरंग शाई व अर्काटी व शाहाजानी या जातींचे रुपये घेऊन द-
रशेंकडा रुपये ६ सहा प्रमाणें बहा सरकार कंपनी भरून घेईल

३. आनराबल कंपनीस महाराज यांहीं वरल्या कलमीं क-
रार केला आहे त्या प्रमाणें चालवून, प्रथम करारापेकीं रुपये ती-
न लक्ष साठ हजार दिल्यावर जंजिरे सिंधूदुर्ग व राजकोट व सर्जा-
कोट देखील पद्मदुर्ग किल्ले स्वाधीन झाल्यास त्या खालीं मुलूख
व जमीन पेशजी पासून असेल त्याखीं व सरकार कंपनीखीं मा-
गें पुढें हर गोष्टीचा इलाखा नाहीं. ९ त्याखीं कंपनी सरकार को-
णत्याही तऱ्हेचा हक्क सांगणार नाहीं).

४. आनराबल सरकार कंपनी कडून सामान, तोफा व
गाड्या व गरनाळा व गोळे, व गरनाळाचे गोळे, व दारूवगैरे
सामान व सरंजाम येथें आणले आहेन, ते सरकार कंपनी जाते
समयीं घेऊन जाईल आणि जंजिरे फोर्ट आगष्ट व राजकोट व
सर्जाकोट व पद्मदुर्ग येथें तुमच्या तोफा व गाड्यांपेकीं शिल्लक
ज्या राहिल्या असतील, त्या महाराज यांच्या स्वाधीन सरकार कं-
पनी करील.

५. महाराज जिजाबाई राणीसाहेब यांहीं आपल्या मुलुखां-
न राजकोटास सरकार कंपनीस फनोगीस (फ्याक्टरीस) व वखारी-
स जागा द्यावी. अगर आनराबल कंपनीच्या चित्तास येईल तेथें.
फतोरी व वखार उठिमास करून फनोरीवर कंपनीचें निशाण
उडवूं द्यावें. आणि कंपनी तर्फेचीं थोर जहाजें व तगंडी व गल्ब-
तें, चाकर माणसें रखवालीस जीं लागतील तीं सुरक्षप ठेवावीं.
महाराज तर्फेचे व्यापारी व रयत सरकार मजकुरचें देणें अगर

कर्जदार होतील, तर त्यांचा ऐवज सुद्धां दस्त करून पैका घ्या-
वयास महाराजांकडून अटक नसावी.

६. सरकार कंपनी कडील व महाराजांकडील रयत वगैरे व्यापारी लोक एकमेकांशीं उदीम व्यवसाय करतील त्यांस उ-
भयपक्षांची अटक नसावी.

७. सरकार कंपनीची व गोरे इंग्रज व्यापारी यांचीं तरांडीं थोरलीं व लहान (बिलबिला) ज्यांवर इंग्रजी निशाण अथवा सरकारचा कौल असेल) अगर जीं इंग्रजी वखारी समागमें जात येत असतील, त्यांस महाराजतर्फेनें हस्तें परहस्तें, कळतां नकळतां, कोणे गोष्टीविषयीं मुजाईम वजलेल नव्हावें, त्याच्या वमोजीब सरकार कंपनी महाराज यांचे कौल व शिक्क्यानिशीं पाहून चालवावें.

८. महाराज जिजाबाई गणीसाहेब यांणीं करार केला आहे कीं, आपल्या मुलुखांत विलायती जिनसा, मखलाद व शिसें व लोखंड व तिखें व तांबें वगैरे विलायती जिनस इंग्रजांनीं जा-
तीनें आणून विकावे, व महाराज यांणीं आपल्या मुलुखांतून जा-
ऊं देऊन इंग्रजाखेरीज दुसरे दोषीकरांस आणूं न द्यावे.

९. महाराज गणीसाहेब यांच्या मुलुखांतून व्यापारी वखाजारी हर जिनस मालवण नजीक राजकोटास फत्तोरी अमेल नेतां व हर जागा अमेल नेतां, बैल, गढे व गाड्या जिनस भरून नेतांना, व आणतांना त्यांस मालाची जकात राजापूर वगैरेच्या शिरस्त्या प्रमाणें व्यापारी यांजकडून जकात महाराज यांणीं घ्यावी, अधिक घेऊं नये. इंग्रजांच्या फत्तोरींतील जिनस माचकार नेतांना त्यांही कलमीं लिहिल्या प्रमाणें जकात द्यावी. इंग्रजांच्या फत्तोरींत हर जिनस हरजातीचा आल्यास जकात नाही.

१०. महाराज यांणीं आमच्या सरकारचा चाकर इंग्रज

व गुलाम वगैरे यांस आपल्याकडे चाकरीस न ठेवावें, व कोणी इंग्रज व गोरा पछून जातीचा नर जागजागच्या अम्मलदारांस ताकीद देऊन दस्तकरून फेतोरीस सरदार असेल त्याच्या स्वाधीन करावा. त्यास सजा न देतां क्षमा करनील. त्याच रीतीनें महाराज तर्फेचे लोक व गुलाम सरकार कंपनी देतील.

११ कदाचिन् समयानुसार इंग्रजांची व व्यापारी यांचा व इंग्रजांच्या निशाणा खाली रहाणारे असतील त्यांची तरांडी व गलबतें उभय पक्षाकडून दीकस्त होऊन माल मालियत सुद्धां किनारीं किंवा हरजागीं लागली, तर त्यास हरबाब मदत करून तरांडी जिनस सुद्धां ज्यांची त्यांस देऊन मजुरांचा खर्च होईलतो ज्याचा माल असेल त्याजकडून देववावा.

१२ जंजिरे कोर्ट अगष्ट येथील रयत व लोक कित्येक जंजिरा घेतल्यापासून इंग्रजांच्या निशाणाखाली राहिले, व कित्येक एक चाकरीस व व्यापाराकरितां आले, त्यांस महाराज यांणीं आम्हांस कळता न कळतां हर एक गोष्टी विषयीं उपसर्ग न देतां त्यांची जमीन व घरें व वतन बाब पूर्वी पासून ज्या प्रमाणें त्यांचे चालविलें त्याच प्रमोजिब किल्ला स्वाधीन झाल्यास ज्यांचें त्यांस देऊन चालवावें.

१३. सरकार कंपनी यांहीं किल्ला घेतल्या समयीं बंदिवान धरिले आहेत ते राणी महाराज यांच्या स्वाधीन किल्ला करिते समयीं मुंबईस बंदिवान जे असतील ते स्वाधीन करतील.

१४. राणीमहाराज यांहीं करार केला आहे कीं, एकाद्या समयीं आनराबल कंपनीस हरजागा कोणी मुजाईम होऊं लागल्यास आपल्या फौजे निशीं सरकार कंपनीस मदत करावी. फौजेस सरकाराकडून अडिश्री माच दिली जाईल. त्याच प्रमाणें महाराज यांस अगत्य झाल्यास सरकार कंपनी अनुकूल असेल त्या प्रमाणें साहित्य करील.

राणोजी घाटगे सर्जेराव यांजकडे कागल तालुका होता. तें महाराजांचा हुकूम न मानितां गैर वहिवाट करूं लागले. यास्तव प्रधानास करवीर करांनीं कळविलें; तेव्हां प्रधानांनीं विठ्ठलराव यास पाठवून तालुका घेऊन महाराज सरकारांत दिला; आणि घाटगे यांजकडे सरदेशमुखी व नाडगौंडी वतनाचे साडेसहागांव मात्र चालवावे असें ठरविलें. परंतु इतकें झालें तरी घाटगे यांची वागणूक सुरळीत होईना, सबब तेंही त्याजकडे चालविलें नाहींत. तेव्हां सर्जेराव घाटगे यांनीं प्रधानाकडे अर्ज केला त्यावरून घाटगे यांजकडे साडेसहा गांव व नाडगौंडी चालवावी म्हणून आईसाहेब यांस व रघोनारायण यांस अशीं दोनपत्रें प्रधानांचीं आलीं*, तरी घाटगे यांचें वर्तन न सुधारल्यामुळें चालविलें नाहींत.

कृष्णराव पंडित प्रतिनिधि विशाळगडकर हे सन १७६९ सालीं वारले. त्यांस संतति नव्हती, सबब प्रतिनिधींची पत्नी सखूबाई इच्या मांडीवर आबाजीराव यास देऊन दत्त विधान पद्धति अन्वयें करविलें. आणि आबाजीरावांकडून इमान पत्र लिहून घेऊन त्यांस प्रतिनिधि पदाची वस्त्रें दिलीं. याच समयीं त्रिंबकराव माणकेश्वर यांनीं पंडित प्रतिनिधि यांसीं दरम्यान होऊन महाराज सरकारांत इमान पत्र लिहून दिलें*.

करवीर शहरीं पंचगंगेच्या तिरीं कैलासवासी शंभू छत्रपतीचें देवालय बांधण्याचें काम चाललें होतें, तें शके १६८९ मालीं समाप्त झालें, देवालयास खर्च ३०००० रुपये झाला. तेथें श्रींची स्थापना करून तेथील पूजा अर्चा वगैरे खर्चाबद्दल परगणें कागल तर्फ रूकडी येथील सरनायकीचें वतन श्रीकडे

* यागोष्टीवरून प्रधानाचा अंमल सर्वत्र कसा बसला होता हें स्पष्ट होतें पान

* इमान पत्रें पुढें दिलीं आहेत नीं पहा नं. १७।१८

नूतन करून देऊन तें चालविण्यास राणोजीराव घोरपडे सेनापति यांस आज्ञा पत्र शके १६९० साली दिलें.

हैद्राबादकर, निजाम यांणीं कोल्हापूरकरांचें सरव्य कायम राहिल्या मुळें मागील बाकीचा उलगडा होतांच प्रधानांनी चिकोडी व मनोली हे दोन तालुके पटवर्धनांस दिले होते. ते तालुके परत देण्याविषयीं बोलणें चालविलें होतें. इलक्यांत हैदर रवानावर मोहीम करण्याचें ठरून प्रधानांची स्वारी फौजेसहित म्हैसुराकडे गेली. लढाई होऊन हैदरखान जेरीस आला, व त्याजकडून खंडणी घेऊन पेशवे पुण्यास येण्यास निघाले. वाटेंत तुरकिरे मुक्कामी असतां चिकोडी मनोली संबंधीं करारमदाराच्या यादि होऊन ते तालुके देण्याचा ठराव झाला. त्या यादी घेऊन येण्याकरितां शके १६९४ राज्याभिषेक शके ९९ साली पंडित प्रधान यांजकडे पुणें मुक्कामी शिवाजी भोंसले, महादेव शास्त्री, अंताजी रामराव व व्यंकोजी नेवरे (हुजरे) यांस रवाना केलें. त्यांचें पत्र आलें कीं, पंडित प्रधान यांची प्रकृति दुरवण्यानें फार हैराण आहे. त्यावरून प्रधान यांकडे समाचारास रामचंद्र बावाजी पारसनवीस यांस पाठविलें.

माधवरावांस अंतकाळच्या समयीं पश्चात्ताप होऊन त्यांनीं विठ्ठलशास्त्री व पंडित यांस विचारिलें कीं, पेशव्यांचे राज्यांत धर्मोत्कर्ष होत आहे, दौलतींतील सर्व लोक सुखी आहेत, प्रजापालन चांगलें होत आहे, असें असता पेशव्यांचे वंशास क्षय लागला व पानपतीं फौज गार होऊन दौलत बुडाली याचें कारण काय? तेव्हां काशीकर शास्त्री यांणीं स्पष्ट उत्तर केलें कीं, स्वामीद्रोहापेक्षां थोर पातक नाहीं, धन्यास, प्रधान मनिबंधांनी घेवून राज्याचा उपभोग करूं इच्छितात, याच कारणानें वंशक्षय व अपकीर्ति होत चालली आहे. हें ऐकून माधवरावांनीं आपले कनिष्ठ बंधु नारायणराव यांस बोलावून सांगितलें कीं, साताऱ-

कर महाराजांकडे पांच लक्षांचा नवीन तालुका सातान्या जवळ नेमून देऊन त्यांस सुप्रसन्न ठेवावें. येणें करून संतोष न झाल्यास आणखी दोन लक्षांचा मांत जास्ती देऊन मर्जी सुप्रसन्न करून घ्या- वी; आणि महाराज जिजाबाई राणीसाहेब यांच्या तहनाम्या- च्या यादि ठरवून ठेविल्या आहेत त्या प्रमाणें पुऱ्या करून त्यांज- कडून आलेल्या मंडळीस निरोप द्यावा. त्या अन्वयें माधवरावां- चा येऊर मुक्कामीं काल झाल्यावर जेव्हां नारायणराव पेशवे गादीवर बसले, तेव्हां त्यांणीं कोल्हापूरकरांचे तहनाम्याच्या करार मदाराच्या यादि पुऱ्याकरून श्रीमन्महाराज मातोश्री जिजाबाई साहेब यांचे शोधेसी प्रविष्ट होण्या करितां जिवाजी भोंसले व- गैरे गेलेल्या मंडळीसमागमें पाठवून दिल्या, आणि चिकोडी व मनोळी हे दोन तालुके व दुसरे किल्येक इमान गांव शेषोंना- रायण वगैरे यांणीं गफलतीनें घेतले होते तेही सर्व परत दि- लें **

सन १७७२ सालीं फेब्रुवारी महिन्यांत (शके १६९४) रा- ज्याभिषेक शक ९१ माघ वद्य ११ रोजीं) जिजाबाईसाहेब पल्ला- ज्यावर कैलासवासी झाल्या. तेव्हां शिवाजी महाराजांचें व- य १५ वर्षांचें होतें. मातोश्रीचें उत्तरकार्य यथा पद्धति प्रमा- णें करून दान धर्म केला. मातोश्री दुर्गाआईसाहेब हया- त होत्या त्यांच्या आज्ञेंत महाराज चालूं लागले; आणि जिजाबा- ई साहेबांच्या माहेर घरचे लेंकावळे प्रयागंतराव ऊर्फ येसा- जी शिंदे सुभेदार हे जिजाबाई हयात असतां कारभार क- रीत होते, त्यांसच दौलतीचा कारंभार सांगून दुर्गाआईसा- हेबांचे विचारें कारभार चालवूं लागले.

महाराज जिजाबाई राणीसाहेबांनीं एक दर चार वर्षें रा-

** याविषयीं तपशील उतारा नं. १९ यांत पहा.

ज्य कारभार पाहिला. त्यांच्या कारकीर्दीत लहान थोर बऱ्याच घडामोडी झाल्या. जरीत्यांची कारकीर्द उत्तमशी झाली नाही तरी त्यांनीं मोठ्या दक्षतेनें व शहाणपणानें कामकरून कोल्हापूरचा बदनक्षा होऊं दिला नाहीं. येसाजीशिंदे कारभाराचें काम साक्षात् पहात असून थोडेसे नांवा लौकिकास येत चालले होते. या राणीसाहेबांच्या कारकीर्दीत कालिमा येण्यासारखी एक गोष्ट† घडत होती ती ही कीं, मनुष्यें बळी देण्याची चाल या वेळीं फार वाढली. बळी देण्याकरितां निराश्रित माणसांस पकडून आणण्यास्तव टोळ्या आसपास रात्रीं फिरत असत, आणि जे सांपडतील त्यांस राजवाड्याजवळ ५,०।६० हातावर बळी देत असत. ज्या देवतेस हे बळी देत त्या देवीचें देऊळ पन्हाळ्यावरील आंत त्या गडांत आहे. दोन बुरूज अगदीं जवळ जवळ असून त्या दोहों मध्यें हें देऊळ आहे. त्या सभोंवार किर्र झाडी व बुरूज इतके भव्य व उंच होते कीं, त्या देवळांत सूर्यकरणांचा अगदीं प्रवेश होत नसे; त्या मुळें त्या ठिकाणीं गडद अंधेर असून जागा स्वाभाविकच अत्यंत भयंकर होती, या मुळें या क्रूर कृत्यास ती जागा अगदीं योग्य होती असें म्हणण्यास चिंता नाहीं. अद्यापपर्यंत सुद्धा तो काळरूपी बुरूज पहाण्यास सांपडतो.

सन १७७४त रघुनाथरावानें नारायणराव पेशव्यास मारेकऱ्यां कडून मारविलें व आपण पेशव्यांचे गादीवर बसले, तेव्हां पटवर्धनास उपद्रव देण्यासाठीं ते फौजेसहित मिरजे नजीक श्रीकृष्णातिरास येऊन उतरले.* त्यावेळीं त्यांच्या फौजेच्या लोकांकडून गाणें शिरोळ येथें व गाणे तर्फेचे गांववगैरा कांहीकबाडाचा उपसर्ग झाला. त्याच्या बंदोबस्ताविषयीं प्रधान वगैरेंचे कामगार भाऊजी महादेव यांस दुर्गाबाईसाहेबांकडून आज्ञापत्रें पाठविलीं.

---

† ही गोष्ट मेजर ग्रेहाम यांच्या बुकांतूनन घेतली आहे. कारण इंग्रजी कथादी लेखणांस येतात. याजकरितां दुसऱ्यांचा आधार निरुपयोगी नाहीं.

* पत्रें नं. २०, २१ पहा.

त्यांणीं आपलेकडील मनुष्यांस ताकिदी देऊन उपद्रव बंद केला.

सन १७७५ सालीं **सुबराव** पंत अमात्य यांजकडील साळवणचें ठाणें घेण्याची मसलत करून **येसाजी** शिंदे सुभेदार महाराजांस बरोबर घेऊन निघाले आणि साळवणा नजीक जाऊन ठाण्यास मोर्चे बंदी केली व वाह दिला.

याच साली कार्तिकमासीं **कोन्हेरराव** चिंबक पटवर्धन हे फौज घेऊन करविरास येण्यास निघाले, मार्गांतील गांवें व रवेडी लुटून व जाळून उध्वस्त करूं लागले. हें वर्तमान येसाजी शिंद्यास कळतांच ते फौज घेऊन त्यांजवर चालून गेले, दोहों फौजेंच्या गांठी **भोजे** जवळ पडल्या आणि लढाई जुंपली, पटवर्धनांची फौज शिकस्त होऊन पळून गेली, आणि सुभेदारांनीं पटवर्धनांच्या दोन पंचरशी तोफा पाडाव करून आणिल्या.

तेथून सुभेदार उचूराकडे वळले आणि त्या ठाण्यास त्यांणीं वेढा दिला, तो गांव इचलकंजी करांचा होता, त्यांनीं लागलेंच प्रधानाकडे कळविलें, तेव्हां वेढा उठवावा असें सुभेदारांस प्रधानांचें पत्र आल्यावरून वेढा उठवून परत करविरास गेले, याचवेळीं प्रधानांनीं **पांडुरंगराव** गोविंद पटवर्धन मिरजकर यांसही पत्र लिहिलें होतें कीं, जर पत्र लिहिल्यामाणें सुभेदार मोर्चे उठवून न गेले नाहींत, तर फौजे सुद्धां जाऊन इचलकरंजीकरांस कुमक करावी.

त्याच सालीं माघमासीं **भवानराव** प्रतिनिधि कन्हाडकर व **भगवंतराव** विंचूरकर यांणीं दुर्बुद्धि मनांत आणून कसबें वडगांवावर स्वारी केली; सर्व सुभेदारही वडगांवीं गेले. तेथें मोठा लढाई होऊन दोहोंकडील वरींच मनुष्यें मेलीं व जखमी झालीं. करवीरकरांच्या लोकांनीं धैर्य सोडलें, तेव्हां त्यांचा मोड झाला, आणि त्यांचे दोन हत्ती व जरिपटका असे स्वाधीं पाडाव करून न नेले

पुढीलमाशीं म्हणजे फाल्गून महिन्यांत पेशव्यांकडील रामचंद्र गणेश्या तेरे हे कवठें येथें आल्याचें समजलें. नेव्हां सुभेदार तयारीनें तिकडे देन्यांस मागें हटविण्यास गेले. उभयतां मध्यें जी लढाई झाली तींतही बरींच माणसें मेलीं व जखमी झालीं आणि सुभेदार शिकस्त होऊन करविरास परत आले.

या प्रमाणें जिकडे तिकडे नाट लागूं लागला. तत्रापि धैर्य न सोडितां सुभेदार पुनः कही तयारी करूं लागले. परंतु पडताकाळ केव्हां येतो याची शत्रु वाटच पहात असतात. करवीरकरांचा असा दोन विकाणीं मोड होऊन जेर झाल्याचें कळतांच कोन्हेर रावांनीं पुनः कंबर बांधिली आणि फौजे सुद्धां करवीरीं येऊन शहरास वेढा देऊन ७ दिवस बसले. तेव्हां शहरांतील लोकांची फार धांदल उडाली. आता कोन्हेरराव शहर लुटून आपली सर्व चीजबस्त नेतो अशी सर्वांस धास्ती पडली. तेव्हां त्यांनीं युक्ति काढिली कीं, पटवर्धन ब्राम्हण आहेत, यास्तव श्री स्वामी जगद्गुरूचें मठास उपद्रव करणार नाहींत, असें मनांत आणून शहरवासी लोकांनीं आपली जिनगी, दागदागीनें, भांडीं वगैरे सर्व स्वामीचे मठांत नेऊन ठेविलीं. याची बातमी कोन्हेररावास लागतांच श्रीजगद्गुरूचे मठास उपसर्ग करूंनये हें कांहीं मनांत न आणितां सर्वांनीं नेथें ठेविलेली माल मत्ता घ्यावी या लोभानें त्यांणीं मठावर गर्दी केली, आणि सर्व चीजबस्त मठांतील लुटून मठास अग्नी लावून दिला व स्वारी सातवे दिवशीं लढाई न करितां निघून गेली. पटवर्धन ब्राम्हण असतां असें अमर्याद कृत्य केलें हें पाहून श्रीनरसिंह भारथीस्वामी क्रोधायमान झाले व उपोषणें करूं लागले. आणि त्या संतापानें तेथून निघून ते कसबें वाळवें नजीक कृष्णा पैलतिरीं शिरगांवास गेले. हा गांव ओरात यांजकडून ब्राम्हणांस अग्रहार आहे. तेथें श्री सिद्धेश्वराचे देवालयासमोर एक समाधि बांधविली आणि पटवर्धनांचें गांवाकडे मुख करून त्या स्थळीं समाधिस्त बसले आणि

समाधि बुजविली. पुढें कांहीं दिवसांनीं मस्तकांतून एक व दोहों बाजूस दोन असे तीन अश्वत्थ वृक्ष उगवले, अशी दंतकथा आहे. त्या समाधीची पूजा अर्चा होत असून वैशाख शुद्ध नवमीस उत्साह होतो. हें वर्तमान मधानांस कळल्यावर त्यांणीं ही कोल्हेरराचांचा फार निषेध केला, व समाधीच्या खर्चाकडे पोरवरणी दोन गांव इनाम करून दिला. हल्लीं समाधी नजीक ब्राम्हणवगैरेंचीं घरें झालीं असून लहानसा गांव ही वसला आहे.

इसवी सन १७७४।७५ साली रामचंद्र गणेश पेंढाऱ्यांची फौज घेऊन कर्नाटकांत गेला आणि त्यांणें तिकडे दंगा आरंभिला.

म्हैसुरास हैदरखानानें राज्य स्थापून कर्नाटकांत फार पुंडावा माजविला. त्याचा बेत सर्व कर्नाटक प्रांत सरकरून घेण्याचा होता. त्यानें हळुहळू नरगुंदकर, सावनूरकर यांजकडून खंडणी घेऊन थेट धारवाडा पर्यंत आपला पगडा बसवीत आणिला होता. यास्तवत्यांचे बंदोबस्ताकरितां रामचंद्रगणेश याजबरोबर मोठी फौज देऊन त्यास पेशव्यांनीं कर्नाटकांत पाठविलें. पेशव्यांस कर्नाटक व पुणें यांच्या दरम्यान एक बाजू उपस्थित करण्यास्तव हैदरानें कोल्हापूरकरांची दोस्ती केली. तसेंच रघुनाथरावास पेशव्यांचे गादीवर स्थापण्यास सहाय्य करण्याचें अभिवचन दिलें. पेशव्यांचें लक्ष आपणाकडे वळूं नये म्हणून हे दोन बाजू उभारिले. तरी पेशव्यांची त्यावेळीं तयारी चांगली होती.

पेशव्यांची फौज कर्नाटकांत येऊन पोंचली तेव्हां त्या फौजेशीं सामा करण्याची त्यांणें तयारी चालविली आणि करवीरकरांस* पत्रें पाठविलीं कीं, आम्ही येई पर्यंत धारवाडचे लगत मो-

---

* पत्रें नं. २२,२३ पहा.

ठी फौज ठेवून प्रधानाचे फौजेस तंबी देण्याची तजवीज करावी; खर्चास ऐवज पाहिजे असल्यास बंकापुरास स्वार पाठवावे. त्या प्रमाणें स्वार पाठवून एक लाखाचा ऐवज रवाना करण्याविषयीं महाराज दुर्गाभाईसाहेबांस रवानाचें पत्र* आलें. परंतु कांहीं कारणानें फौज जाण्याची राहिली.

शके १६९७ सालीं प्रधानां कडील रामचंद्रगणेशा परांजपे फौजे सुद्धां कर्नाटकांत जात असतां मौजे कवठें येथें येऊन उतरले. त्या समयीं महाराज सरकारची फौज घेऊन यशवंत राव शिंदे सेनासाहेब सुभेदार त्यांवर गेले. हरदु फौजांची लढाई झाली. त्यांत महाराज सरकारचे फौजेचा मोड झाला. तेव्हां सुभेदारांस महाराज सरकारचे पागेचाले स्वार व एकांडे स्वार बचाव करून घेऊन आले.

शके १६९८ सालीं माघमासीं महादजी शिंदे जोतीबाचे डोंगरावरील श्रीकेदारलिंगाचे दर्शनास आले होते. तेथें त्यांचे मनांत विकल्प आल्यामुळें म्हणा, अगर पेशव्यांकडून लिहून आल्यामुळें म्हणा, कसेंही असो; शिंद्यानीं फौजेसुद्धां येऊन करवीरास वेढा घातला; आणि माघमासापासून चैत्र मासापर्यंत तीन महिने वेढा देऊन बसले. त्या समयीं श्रीमन्महाराज मातोश्री दुर्गाआईसाहेब व शिवाजी महाराज यांच्या स्वाऱ्या करवीरीं होत्या. शहरास वेढा देऊन आसपास मुलूख उध्वस्त करण्याचा सपाटा सुरू केला. तेव्हां दौलतरास कुमकेविषयीं पत्रें गेलीं.† परंतु कुमक आली नाहीं व महाराज वगैरे शहरांत कोंडले गेल्यामुळें कांहीं इलाज चालेना. तेव्हां तहकरण्याकरितां सरवाराम भगवंत व

---

* पत्र नं. २५, २५पहा.

† पत्र नं. २६, २७पहा.

बाळागव गोविंद आणि राणे खान नि शिंदे यांच्या विद्यमानें बो-
लणें चालवून शिवंदीचे खर्चाबद्दल आणि पेशव्यांचे गुलरखांत कर-
वीर करांच्या स्वाऱ्यांपासून जें नुकसान झालें त्याजबद्दल १५लक्ष रु-
पये देण्याचें ठरवून कांहीं ऐवजाबद्दल चिकोडी व मनोळी
हे दोन तालुके लावून घेतले, आणि बाकी ऐवजा बद्दल सदवा-
जी भोंसले हवालदार यांची खात्री घेतली, या शिवाय पुढील
कलमें हरदू तर्फे कबूल होऊन शके १६९१ चैत्रमासीं तहनामा उर-
ला आणि लढाई न करितां वेढा उठवून शिंदे परतं गेले.

तहनामा.

९१) महाराज सरकारांनीं खालीं लिहिल्या प्रमाणें देवस्थानांस, ब्राह्मणांस वैभवे राजमंडळ पैकीं इनाम गांव करून द्यावे.

३०००	क्षेत्र करवीर
२०००	श्रीमहालक्ष्मीस गांव १
५००	समस्त ब्राह्मण क्षेत्रस्थांस गांव १.
५००	शंकराचार्य स्वामीस गांव १.
३०००	
३५००	श्री जोतिलिंगास गांव १.
३५००	श्री मनसूर साहेबांस गांव १
१०००००	... ... कलम

तुम्हीं गांव द्यावे म्हणून लिहिलें त्यास सरकारांतून पेशजी गांव दिले आहेत ते सरकारांत घेऊन हाल्लीं तुम्हीं लिहिल्या प्रमाणें गांव देवविले जातील, येणें प्रमाणें करार.

* मेजर ग्रेहाम यांचें म्हणणें कीं, पेशव्यांनीं चिकोडी व मनोळी हे प्रांत तालुक्यांत घेण्यासाठीं जिवाजी गोपाळा बरोबर फौज पाठविली, तिचा मोड सुभेदारांनीं केला; यास्तव मुद्दाम पेशव्यांनीं महादजीस करवीरास पाठविलें, परंतु यास दप्तरीं आधार मिळत नाहीं.

१२) राज्याची अभिवृद्धि व आमचें कल्याण तेंच स्वामीनीं करावें. फैल फितूर करूं नये. तीर्थस्वरूप रांजश्री दादा वगैरे राज्यांतील व हैदरनाईक वगैरे परराज्यांतील कोणी फितूर व लबाड, स्वामीकडे येतील त्यांस जागा देऊं नये. येणें प्रमाणें निरवालस ता असावी ... ... कलम

राज्याचें कल्याण व राज्याची अभिवृद्धि होईल तेंच करूं. तुम्हीं करारा प्रमाणें निभावणी करावी म्हणजे तुम्हांसी दुसरा अर्थ घडणार नाहीं. तुमच्या लक्षा प्रमाणें राजश्री रघुनाथ पंडित यांजकडे संधान करणार नाहीं. हैदरनाईक यांजकडे सूत्र लावून फितुर होणार नाहीं. राज्यांतील व परराज्यांतील यांजकडे सूत्र लावून राज्याचें अकल्याण करणार नाहीं. राज्याची अभिवृद्धि व तुमचें कल्याण तेंच घडेल. तुम्हांकडून हरएक विशीं फितूर होऊं नये. येणें प्रमाणें करार. ... ..

१३) जिवाजी गोपाळ, विरूपाक्ष शामजी, रामचंद्रगणेश व कोन्हेर चिंबक यांचे लढाईंत वगैरे आम्हांकडील लहान मोठे धरून नेऊन बंदींत घातले आहेत, त्यांस सोडून द्यावें. ... ... कलम.

जिवाजी गोपाळ, विरूपाक्ष शामजी, रामचंद्र गणेश व कोन्हेर चिंबक यांचे लढाईंत तुम्हांकडील सांपडले असतील, त्यांचे रवत पत्र सुद्धां तुमचे रिवसमतगार देवणें त्यां देरवत पलकलगाडून विश्वासगडास पाठवून देऊं. तेथून राजश्री प्रतिनिधि यांस तुम्हांकडे पाठवितील, ते तुम्हीं कृष्णा पार घेऊन जावे. येणें प्रमाणें करार. ... ...

(४) घाटगे कागलकर हे पु- रातन सेवक राजमंडळचे, यांज- कडे पहिल्या पासून कागल भा- हे. आलीकडे घोषो नारायण या- चे कारकीर्दीस महाराजांनीं सर- कारांत घेतलें होतें. फिरून आ- म्हीं घेऊन घाटगे यांजकडे दि- लें आहे. त्या प्रमाणें चालवावें, अलीच सनद द्यावी; व घाटगे यांचीं वतनें आहेत त्या प्रमाणें चालवावीं. आम्हांकडे आले हो ते म्हणून आकस करूं नये. ... ... कलम.	कागलकर पुरातन सरकार- चे सेवक यांणीं सेवा चाकरी पूर्व- वत् प्रमाणें करावी. चाकरी पूर्व- वत् प्रमाणें केल्यास कैलासवासी आई साहेबांचे वेळेस चालत आ- लें त्या प्रमाणें कागल वगैरे पूर्व- वत् चालविलें जाईल. °येणेंप्र- माणें करार ... ...

शालिवाहन शके १७०० राज्याभिषेक शक १०५ सालीं (सन १७७७) महादजी शिंदे गेल्यावर परशुराम रामचंद्र पट- वर्धन यांणीं फौज घेऊन येऊन महाराजसरकारच्या अकीवाट डा- ण्यास वेढा घातला. डाण्यांत जे सनदी वगैरे लोक होते त्यांत दो- घे भाऊ मोठे शूर शिपाई होते. ते मोठ्या धैर्यानें व पराकाष्टेनें लढले; त्यांणीं पटवर्धन यांची फौज जेरीस आणिली, व डाण्यांत शिरकाव होऊं दिला नाहीं. परंतु आंतील लोकांस करविराहून कुमक येईना. डाण्यांत दाण्यांचा तोटा पडला, आणि इतक्यांत दोघां शूर भावांपैकीं एक अकस्मात् गोळी लागून पडला. दुसरा मो- ठ्या पराकाष्टेनें लढला. परंतु त्यासही गोळी लागून तो पडला. तेव्हां पटवर्धनांनीं डाणें जबरीनें ताब्यांत घेतलें. या प्रमाणें तोर- गल, कडकोळ, चिकोडी, मनोळी कडेही परशुरामपंताचा उपद्रव चालू होता.*

* पत्रें नं. २८, २९ पहा.

यशवंतराव शिंदे सेनासाहेब सुभेदार हे हलक्या कुळांतील असून करवीरचा राज्यकारभार पहात होते, व दरबारी प्रमुख होते. यामुळें **प्रतिनिधि** व **अमात्य** यांचें काहींच चालत नव्हतें, व दरबारचे कोणतेंच मसलतींत या उभयतांपैकीं कोणाचाच विचार मनांत निल्हे शिंदे घेत नसत. यामुळें ते स्वाभाविकच सुभेदाराचा द्वेष करीत असत, व त्याचा पाय दरबारातून कसा काढावा या विचारांत होत. त्यांच्यामंडळांत कोणी **बिताराम यादव हवलदार** म्हणून होता; त्याणें सुभेदारास मारेकरी घालून मारवावें अशी दुष्ट बुद्धि मनांत आणून सर्व सिद्धता केली. त्यास ही दुष्ट बुद्धि होण्यास कांहीं विशेष कारण घडलें असावें, परंतु तें कायद्दालें असावें याचा थाग कागदोपत्रीं लागला नाहीं. त्याणें ही मसलत **आबाजीराव** कृष्ण पंडित प्रतिनिधि, व **सुबराव** कृष्ण पंडित अमात्य यांस सांगतांच ते लागलेच सामील झालें. तशीच **नेरलीकर** वगैरे ही मंडळी अनुकूल झाली. सर्वांचा एक विचार झाल्यावर **यादव** हवलदार याणें मारेकरी यांस सिद्ध केलें, आणि किल्ले पन्हाळ मुक्कामीं श्रीमन्महाराज सरकारचे वाड्यांतील **श्री अंबाबाईचे** देवघराच्या दरवाजाच्या पडद्यानजीक दोघे मारेकरी नागव्या तरवारी घेऊन प्रातःकाळीं उभेकेले. **सुभेदार** नित्यपाठाप्रमाणें स्नान पूजा वगैरे आटपून आपल्या वाड्यांतून **श्री देवीच्या** दर्शनास सरकार वाड्यांत आले. देवीचें दर्शन घेऊन **महाराज** सरकारच्या दर्शनास जाण्याकरितां देवघराचा पडदा वर करून जांऊ लागले तेव्हां त्यांणीं पडद्या समीप नागव्या तरवारी घेऊन दोघ मारेकरी उभे आहेत असें पाहिलें. त्यांस पहातांच शिंदेसेनासाहेब देवघरांतून परतले आणि आपल्या वाड्यांत गेले, आणि जातांना वाड्याच्या दरवाजावरील लोकांस सदर मारेकऱ्यांस पकडण्यासाठीं पाठविलें. पकडून आणिलेल्या मारेकऱ्यांच्या जबान्या घेतल्या, तेव्हां मारेकऱ्यांनीं सदर मसलतींत सामील असलेल्यांचीं नांवें लिहून दिलीं. तेव्हां त्यांतील **अमात्य** व **प्रतिनिधि** खेरीज करून **नेरलीकर** व **यादव** हवल-

दार वगैरे लोकांस धरून आणून किल्ले मजकुरीं कैद केलें, आणि चौकशी झाल्यावर सदर गुन्हेगारांचे डोळे काढिले. यादव यांचें कुटुंब करविरीं होतें त्यासह हवलदारास हद्दपार केलें. नंतर करविरीं येऊन पंडित अमात्य व पंडित प्रतिनिधि यांस सरकारवाड्यांत बोलावून आणून सुभेदारांनीं त्यांस जवाब्या दारवविल्या, आणि म्हणाले कीं, तुम्हीं महाराज सरकारचे कदीम विश्वासू नोकर असून अशा अनुचित कर्मास कसा रुकार दिला? तेव्हां ते कांहींएक उत्तर न देतां अधोमुखीं बसले. त्या समयीं सेनासाहेबांस फार संताप होऊन ते बहुत क्रोधायमान झाले, उभयतांच्या जाप्त्यास अटकाव करून सरंजाम जप्त करावे असें ठरविलें. तेव्हां गुजाजी राव गायकवाड सरखवास आणि रंगडेराव गोविंद पारसनवीस या उभयतांनीं रदबदली करून व पराकाष्ठेची मेहनत घेऊन सरंजाम जप्त न व्हावा, व अटकाव ही न व्हावा, असा सेनासाहेबांचा रुकार घेतला, आणि उभयतांकडून महाराज सरकारांत इमानपत्रें लिहून घ्यावीं असें ठरविलें. नंतर इतःपर अशा अनुचित कर्मास प्रवृत्त न होतां राज्याच्या कल्याणाविषयीं मनो भावें झटूं अशाविषयीं उभयतांकडून इमान पुरःसर विनंति पत्रें लिहून घेऊन [illegible] त्यांस आपापल्या किल्ल्यास जाण्यास शिंदे यांणीं निरोप दिला. मार्गी कांहीं अपाय होईल असा त्यांचे मनांत भंदेशा आल्यावरून पारसनवीस यांस अणस्कुरा घांटापर्यंत पोंचविण्यास देऊन स्वस्थळास सुरक्षित पोहोंचवून दिलें. पुढें कांहीं दिवसांनीं नेरळीकरांचे डोळे काढले बद्दल कृपाळू होऊन, त्यांस महाराजांनीं मौजे निडसोशी आंत हुकेरी हा गांव इनाम करून दिला.

शके १६९१ चैत्रमासीं सन १७७७।७८ सालीं कोल्हापूरकरांनीं महादजीशीं नह केल्याचें वर्तमान हैदर रवानानें ऐकिलें, तेव्हां त्यांची दोस्ती दृढतर करण्याकरितां व त्यांजमध्यें आपणा विषयीं अधिक भरंवसा उत्पन्न करण्याकरितां रवान महाराजांचे भेटीस कोल्हापुरास आले. कोल्हापूरकरांच्या कुमकेस आपली फौज देऊन खर्चास एक लु

क्ष रुपये दिले. नंतर हैदरखाना चरोवर तहनामा व्हावा एतद्विषयीं उभयपक्षीं वकिलांकडून बोलणीं होऊन शके १७०० चंद्र ४ माहेजमादिलाखर सन तिस्सा मयांव अल्फ सन १७७७।७८ साली महाराज सरकारांतून नवाब हैदर अलीखान बहादूर यांस तहनामा लिहून दिला.*

शके १७०७ राज्याभिषेक शक १०५ या साली (सन १७७९) आषाढ वद्य १० ते २३ जमादिलाखर रोजीं श्रीमन्महाराज मातोश्री दुर्गाबाई साहेब पन्हाळे मुक्कामीं कैलासवासी झाल्या. त्यावेळीं शिवाजी महाराजांचें वय २१ वर्षांचें होतें. हा वेळ पावेतों दुर्गाबाई साहेबच मुख्यत्वें कारभार करीत होत्या. या पुढें महाराज स्वतः सर्व कारभार पाहूं लागले.

वाघापूरकर घोरपडे यांणीं पटवर्धनांचे कुमकीवरून महाराज सरकारा विरुद्ध बंड केलें. तेव्हां **सुभेदार** यांणीं फौज सुद्धां जाऊन वाघापूरच्या ठाण्यास वेढा घालून मोर्चेबंदी केली. घोरपडे यांणीं **परशुराम** भाऊची फौज कुमकेस आणून लढाई दिली. त्यांत महाराज सरकारच्या फौजेचा अगदीं मोड झाला. सुभेदार शिकस्त झाल्यावर परत आले.

या प्रमाणें करवीरच्या फौजेचा मोड होतांच **भाऊनीं** महाराज सरकारच्या शिरोळच्या ठाण्यास वेढा घातला. ठाण्यांत जमाव कमी होता, व करवीराहून कुमक वेळेवर आली नाहीं, यामुळें ठाणें जेरीस आलें. तेव्हां परशुराम भाऊनें नबरीनें ठाणें लाच्यांत घेतलें. तेथें यवनी अमलांतील घुमट चिरेबंदी होता तो पाडून दगड नेऊन भिलवडी नजीक **श्रीकृष्णाबाईचा** घाट बांधिला.

सन १७८० (शके १७०२) राज्याभिषेक शक १०७ साली किल्ले सुदरगड येथें मोठें बड झालें. त्याचें कारण असें कीं, सुदरगड तनख्या-

---

* हा तहनामा मिळाला नाहीं.

चे गांवगन्ना जमिनींत कांहीं कसर आल्याचें समजलें यास्तव गांवग न्नाचा फिरून मोजणी करण्या करितां हुजुरून **चिमणाजी** जोती का-रकून यास रवाना केलें त्यांणीं जाऊन किल्ले मजकूरचे तनरव्यांतील मो-जणी करून अव्वल डोंगर, कणगर, व गुरें चारमाळ व पढ देखील एकंदर मोजून जमीन दुप्पट केली. तेव्हां गडकरी बे दील होऊन हुजूर जाहीर न करितां सरकार कामगारांची अमर्यादा करावी असा त्यांणीं निश्चय केला. गडकऱ्यांत प्रमुख **कुसाजी** नलगे यांणें रवडलें करून न मामलेदारास किल्ल्यारवाली घालविलें. त्या समयीं मामलेदार मौ-जे शेणगांवीं जाऊन राहिले, आणि तेथून गडकरी यांणीं रवडलें उ-त्पन्न केल्याचा मजकूर लिहून हुजूर विनंति पत्र पाठविलें. पत्र पाव-तांच मामलेदाराच्या कुमकेस दोन हजार लोक रवाना झाले. कुमक येतांच गडकऱ्यां बरोबर लढाई सुरू झाली. गडावर लढाई चालू अस-तां गडकरी यांणीं **शेणगांवीं** येऊन तेथील घरें जाळिलीं. कांहीं दि-वस लढाई चालल्यावर गडावरील लोकांस दम निघेना. तेव्हां त्यांणीं **नेरलीकर** यांजकडे कुमकेस लोक व खर्चास ऐवज मागितला. नेरलीकर यांणीं त्वरेनेच ५०० लोक कुमकेस पाठविले, व खर्चास पुरवठा ही केला. तेव्हां **नलगे** वगैरे गडकरी यांणीं सतत एक व-र्ष पर्यंत रवडलें चालविलें, व हुजूरच्या फौजेचा गडावर कदाव चालूं दिला नाहीं. पुढें नेरलीकरांकडून खर्चाचा पुरवठा होईना, गडावर धान्याचा तर अगदीं तूट पडली, दारूगोळा हि सरला, तेव्हां निरुपाय होऊन नेरलीकर **देसाई** यांच्याच विद्यमानें **परशुरामभाऊ** प-टवर्धन यांणीं बोलणें लाविलें. तेव्हां अखेर पर्यंत लढाई करितां गडकरी व नेरलीकर यांणीं जो खर्च केला, तो सर्व घेऊन भाऊंच्या स्वाधीन किल्ला करावा, आणि त्यांच्या आश्रयानें गडकरी यांणीं रहावें, असें ठ-रलें. त्या प्रमाणें खर्चाचा ऐवज घेऊन पटवर्धना कडील कारकून **आ-बाजीगोपाळ** याच्या हवालीं किल्ला केला; गडावर भाऊंचे लोक च-ढले, आणि नेरलीकरांचे लोक परत गेले.

भुदरगडावरील **कुस्राजी नलगे** वगैरे गडकरी यांणीं बद-
मामली करून मोजणीचे कारणावरून खटले केले, (शके १७०३ राजश्र
क १०८) व मामलेदार यांस हांकून दिलें, हुजूरच्या लोकांशीं नेटानें कि-
त्येक महिनें टक्कर मारिली, हें वर्तमान **वाडीकर सावंतभोंसले**
यांस समजलें. तेव्हां ही संधि साधून वाडीकर भोंसले यांणीं बाबाजी
भोगटा नामे सरदार यास जमावीनिशीं ज्येष्टमासीं घांटावर पाठविलें,
आणि **रांगणे** किल्ल्या नजीक **चिक्कवाडी** येथें मेढा घालून रागणें
किल्ल्यासही वेढा घातला. तेव्हां **अंताजी जनार्दन** वाकनीस **गों**
दजीबावा वरघटे यां समागमें किल्ल्याचे कुमकेस महाराज सरका-
रांतून फौज रवाना झाली. तसेंच **विन्नाळगडकर** आणि **बावडे-**
कर यांस ही कुमकेस जाण्यास आज्ञा झाली. ते तयारी करून अ-
श्वीनमासीं जाऊन पोंचले. सावंता बरोबर सुमारें तीन महिनें लढून
माघ शु० १५ चे सुमारास किल्ले मजकूर येथील चिक्कवाडीचा मेढा म-
हाराज सरकारच्या फौजेनें घेतला. तेव्हां सावंत किल्ला सोडून निघून
गेले. नंतर **यशवंतराव** शिंदे हा किल्लेमजकुरास जाऊन किल्ल्याचा
बंदोबस्त करून परत आले.

यावेळीं कुमके बद्दल व सावंतांस चार गोष्टी सांगण्या बद्दल
महाराज सरकारांतून कंपनीच्या कामगारांसही पत्रें गेलीं होतीं, त्यां-
चीं उत्तरें पुरवणींत दिलीं आहेत

कर्नाटक भांतीं हैदर रवानावर पेशव्यांनीं स्वारी केली होती, आ-
णि बारा भाईंशीं खटली चालविली होती. त्यांत हैदरखानाकडून कु-
मक पाठविण्या विषयीं करवीरकर महाराजांस वरचेवर पत्रें येतच
असत. हैदर व करवीरकर आंतून **रघुनाथराव**ास ही सामील
असून त्यांच्याशीं ही पत्रव्यवहार चालत्या होता. त्यां पैकीं कांहीं
परिशिष्टांत दिली आहेत त्यावरून त्या वेळचा झोंक लक्षांत येईल[*].

---

[*] पत्रें नंबर

करवीर महाराजाचा, नबाब हैदरअल्लीखान बहादूर यांच्या-
शीं तहनामा झाल्याचें आणि रघुनाथरावांस अंतस्थ करवीरकरांचें
सहाय्य असल्याचें वर्तमान पंतप्रधानांस समजलें. तेव्हां त्यांणीं वि-
चार करून ठरविलें कीं, करवीरकरांचे चिकोडी व मनोळी हे दो-
न तालुके सोडून देऊन त्यांस खूष रारवावें, आणि त्यांजकडून रवानव
दादा यांस कुमक मिळूंनये असें करावें, असें ठरवून साके १७०२ रा-
ज्याभिषेक शक १०७ या सालीं महाराज सरकाराचीं यशवंतराव
शिंदे सेनासाहेब सुभा सरसुभेदार यांच्या विद्यमानें तहनामा केला.
त्यांत एकंदर कलमें ३० होतीं. पैकीं मुख्य खालीं दिलीं आहेत.

(१) प्रांत हुकेरी तालुका व मनोळी तालुका व फुटगांव, आं-
त कागल व रायबाग व कटकोळ तालुक्यासुद्धां पेशवाजी चालले प्र
माणें स्वामीकडे चालवावें. मध्यें सांगणाराचें गोष्टीवरून विपर्यास
पडला पुढें (तसें) होणार नाहीं. या प्रमाणें करार करून शफत
पूर्वक विनंति पत्रें यावीं.

प्रांत हुकेरीतालुका व मनोळी तालुका याच्या सनदा स्वा-
मींनी दिल्या, त्या हल्लीं स्वामीस नजर केल्या. हल्लीं हुकेरी प्रांत व म-
नोळी प्रांत नजर केले असत; येणें प्रमाणें करार.

(२) भगवंत पंत व डोबोपंत यांणीं हुजूरची आज्ञापत्रें
नेलीं; व प्रधानपंताकडील उभयतांकडे आहे तीं, व रामचंद्र महा-
देव व बाबाजी केशव यांजकडे गोपाळभट यांचे विद्यमानें हुजूर-
चीं आज्ञापत्रें व सावकारी पत्रें व मनोळीच्या सनदा व दरम्यानगि-
रीचीं पत्रें व सनदा आहेत, तीं व आप्पाजी रामजी व महादेव भट्या-
चे विद्यमानें सावकारी पत्रें व हुजूरचीं आज्ञापत्रें आहेत, व प्रधानपंता-
कडील करारांचीं पत्रें आहेत, तीं हुजूर यावीत.

आजपर्यंत करार मदारांचीं मागील पत्रें व यादी वगैरे का-
गदपत्र ज्या ज्याकडे असतील, ते शोध करवून पाठवून देऊं. शोध न
लागल्यास तीं पत्रें रद्द असत. येणें प्रमाणें करार.

(३) तीन सालांत राजश्री परशुराम रामचंद्र यांणीं गांव व ठाणीं जीं घेतलीं आहेत, तीं व ज्यांकडे दिलीं आहेत तीं झाडिनिशीं सरकारात यावीं. हल्लीं झाडिनिशी करारा प्रमाणें सरकारांत सोडून देऊं येणें प्रमाणें करार.

(४) करवीर करांवर **महादजी** शिंदे आले, त्या समयीं करार वदाच्या आदि व सरकारचीं पत्रे व कागदकतबे व अकरा लक्षांचा कतबा व राजश्री **सुबराव** पंडित अमात्य व राजश्री **आबाजी** राव पंडित प्रतिनिधि यांचे कागद कतबे देविले ते झाडून माघारे द्यावे. **महादजीशिंदे** यांजवळ कागदपत्र व यादी आहेत, त्या तिकडून आपून देऊं. न आल्यास रद्द असत. येणेंप्रमाणें करार.

(५) जरी पटका व दोन हत्ती हुजूरचे नेले आहेत ते हुजूर यावे. स्वामीकडील जरी पटके व दोन हत्ती व तोफा चार **रामचंद्र** गणेश याजकडे आहेत त्या देऊं. स्वामीनीं **कोन्हेरराव** त्रिंबक याजबाबत तोफा नेल्या आहेत त्या द्यावयाची आज्ञा करावी.

(६) **हणमंत** शिवराम व भिकाजी नरसिंह व **घनःशाम** यशवंत, **अंताजी** जनार्दन व **व्यंकाजी** सुर्वे वगैरे, व त्यांजबरोबर कारकून व मराठे व मनुष्यें तुम्हांकडे असलीस त्यांस हुजूर पाठवावें.

स्वामीकडील जे सांपडले आहेत त्यांस सोडून देऊं. स्वामीकडे आमचे (लोक) सांपडले आहेत त्यांस सोडून द्यावेत, येणें प्रमाणें करार.

(७) आज पावेतों **भगवंत** भाप्पाजी व **द्वोषो**नारायण व **आप्पाजी** रामजी यांणीं गैरवाका हुजूर विनंति करून तुम्हास हुजूरचा गैरवाका समजावून देऊन राज्याची खराबी केली, आणि तुम्हांसीं विपर्यास घातला याजमुळें राज्याची खराबी झाली, याचा दिनाव त्यांणीं भरून द्यावा लागेल.

येविशीं स्वामीनीं त्यांचे हातून सेवा घ्यावी. सेवे अंती जी आज्ञा

करणें ती करावी; येणें प्रमाणें करार.*

इसवी सन १७८३ (शालिवाहन शके १७०५ राजशक ११०) साली चैत्रवद्य ३० रोजीं **यशवंत** राव शिंदे सेनासाहेब सुभा सरसुभेदार यांस महामारीचा उपद्रव होऊन करवीर मुक्कामीं त्यांचा काळझाला. सुभेदार वारल्याचें वर्तमान पन्हाळे मुक्कामीं महाराजांस कळल्यावर बाजीपंतास उत्तरकार्य करण्यास रवाना केलें. बाजीपंत हे सुभेदारांचे विश्वासु कारकून होते. त्यांणीं आज्ञेप्रमाणें उत्तरकार्यआटपून पुढें कामांत वागणें ठीक नाहीं, हें मनांत आणून आपल्या वहिवाटीचा, सर्व दौलतीचा एकंदर हिशोब करावियीं तयार करवून एकलक्ष ब्राह्मण भोजन घालून हिशोब गुजरण्यास पन्हाळ्यास गेले. सर्व हिशोब गुजरून सरकारचे मर्जीस येईल त्याजकडून कारभाराचें काम घ्यावें, आणि आपणास महायात्रेस जाण्यास निरोप द्यावा म्हणून विनंति केली. तेव्हां चातुर्मास झाल्यावर आज्ञा होईल असा हुकूम झाला. **रत्नाकरपंतआपा** हे कारकुनीच्या हुद्यापासून चढून पोतनीस झाले होते, व या वेळीं सर्व फौजेवर मुख्य कामगार होते. त्यांस कारभाऱ्याचे कामावर नेमून ज्येष्ठ शुद्ध ५ चे दिवशीं वस्त्रें दिलीं.

शके मजकुरीं भाद्रपदवद्य षष्ठीस कपिला षष्ठीचा योग आला होता (शके १७०६). यास्तव महाराज सरकारची स्वारी करविरास आली. पर्वकाळीं तीर्थस्नान करून आठमुक्काम झाल्यावर स्वारी पन्हाळ्यास परत गेली.

पुढें अश्वीनमासीं शारदी नवरात्राचा उत्साह आटपल्यावर (शके १७०६) **बाजीपंतास** महायात्रेस जाण्यास निरोप दिला. त्या समयीं महाराजांचीं जनक मातोश्री **बयासाहेब** रवानवटकर यांणीं बाजी पंताबरोबर महायात्रेस जाण्याचा मानस कळवून रवानगी करून धा-

---

* या वेळीं महाराज सरकारांतून कलम बंदीची जी यादी पुण्यास प्रथम पाठविण्यांत आली होती तिची नकल पुढें देण्यांत आली आहे. नं पहा.

वी, असें महाराजांस सांगून पाठविलें. तेव्हां बरोबर घोडीं माणसें वगैरे सरंजाम नेमून व खर्चास २५००० रुपये देऊन रवानगी केली. त्यांजबरोबर **रत्नाकरपंत आप्पा** यांणीं आपल्या मातोश्रीचीही रवानगी करून दिली; व बरोबर आपलेबंधु जोतीपंत यांसही पाठविलें.

याच साली (सन१७८४) बावड्यावरील गडकऱ्यांच्या हद्दीत बावडेकर पंत यांणीं कांहीं धांदल केल्यावरून गडकरी बेदील झाले, व त्यांणीं बंड केलें. **महादाजीरांकर** व **बाजी महादेव** व **चिटको महादेव** शेणवी व **महादाजी बल्लाळ देसाई** जात कऱ्हाडे यांनीं गडकऱ्यांस अनुकूल करून घेऊन **रुबराव कृष्ण** अमात्य यास किल्ल्या खालीं घालवून बदलून बसले. ही बातमी हुजूर येतांच **गुजाजी** गायकवाड सरखवास यांस फौज देऊन बावड्यास रवाना केलें. रवास पावले असतां बोलणें वगैरे कांहींच आलें नाहीं. तेव्हां पंधरा दिवस वाटपाहून रवासास्वारी फौजेसह बावड्यास निघाली. तिसरे दिवशीं किल्ले मजकुरानजीक पोंचून किल्ले लगत रुपणीच्या ओढ्यावर फौजेस रहाण्यास आज्ञा झाली, व सर्व स्वारी पेठेंत विठलाईच्या देवळाजवळ गेली. देवळाजवळ जातांच किल्ल्यावरून गडकऱ्यांनीं तोफा सुरू केल्या. तेव्हां सायंकाळपर्यंत स्वारी राहून परत आली. दुसरे दिवशीं सावंतवाडीस येऊन मल्हारपेठेंत पंधरादिवस मुक्काम केला. तत्रापि बोलणें कांहींच आलें नाहीं. सबब कुच होऊन स्वारी पुनः किल्ले बावड्यास गेली. त्या समयीं किल्ल्यावरून पुनः तोफा सोडल्या. त्या वेळेस **राघोजी भोंसले** हवलदार दिम्मत देवघर यांस विठलाईच्या देवळा नजीक गोळी लागून ठार झाले. त्या दिवशीं महाराज सरकारचा मुक्काम त्याच स्थळीं झाला. दुसरे दिवशीं स्वारी मल्हारपेठेस गेली. नंतर कामगार शेणवई वगैरे यांस अभयपत्रें देऊन आणविलें, आणि समेट करून परत बावडे किल्ल्यास पाठविलें. पेशाजी येसाजी शिंदे सुभेदार यांणीं राशिवडें हा गांव जप्त करून सरकारांत घेत-

ला होता, त्या गांवची सोंडचिठ्ठी **पंडित अमात्य** यांस देऊन राशिवड्यास जाऊन रहाण्यास आज्ञा दिली आणि स्वारी परत करावी आली.

सन १७८५ (शके १७०७ राज्याभिषेक शक ११२) सालीं कार्तिकमासीं श्रीमन्महाराज सकलसौभाग्यादि संपन्न मातोश्री **सई-बाई साहेब** यांहीं पन्हाळे मुक्कामीं कैलास वास केला.

हुजूरच्या घांटारवालीस मांतास बाडीकरांचा उपद्रव सुरू होता. (शके १७०७) मालवण तालुक्यांतील कांहीं गांवाच्या स्वामित्वाबद्दल हरदू सरकारात तंटे चालू होतेच. शिवाय महादजी शिंद्याचा पुतणा जयाजीराव शिंद्याची मुलगी लक्ष्मीबाई इचा विवाह खेमसावंत भोंसले सावंत वाडीकर यांशीं सन १७६३ सालीं झाला असून लक्ष्मीबाईनें महादजीच्या विद्यमानें दिल्लीच्या पादशाहा कडून मोर्चेल धरण्याचा हक्क नवऱ्याकरितां मिळविला होता. छत्रपतिशिवाय इतरांस मोर्चेल धारण करण्याचा हक्क नाहीं. यास्तव ही गोष्ट करवीरकरांस रुचत नव्हती. याकरितां **रत्नाकरपंत** आपांनीं घांटारवाली स्वारी करण्यास आपण स्वतः निघावें अशी महाराजांस विनंति केली. त्या प्रमाणें मार्गशीर्ष अरंवरीस खासास्वारी पन्हाळ्याहून निघून फोंजे सुद्धां वाडीकर सावंत यांचा मुलूख घेण्यास रांगणाकिल्ल्याचे घांदानें खालीं उतरली. वाडीकरांशी लढत मौजे माणगांव पावेतों जाऊन नेरूरच्या मुक्कामास येऊन दाखल झाली. सावंतास महाराजाच्या फौजेनें एकाएकीं गांठल्यामुळें त्यांची फार दुर्दशा उडाली. नेरूराहून **रत्नाकरपंत** पोतनीस कारभारी यांस फौजे सुद्धां मालवणाकडे रवाना केलें. वाडीकरांचा मेढा तिप्पणरवडी येथें होता. आप्पा मालवणाकडे वळल्याची वातमी लागतांच, मावल पुढें येऊन तरीच्या मार्गावर आडवे झाले. आप्पास पुढें जाऊं दिलें नाहीं. तत्काप तिकडील घांतांचा बंदोबस्त करून व वाडीकरांस तर्बाव पोहोंचवून नेरूराहून स्वारी फाल्गुन शुद्ध १३ रोजीं पन्हाळ्यास परत आली. प्रसिद्ध

उदाजिराव चव्हाण यांचे पुत्र प्रीतिराव यांणीं पूर्वी महादजी शिंदे व कोन्हेरराव करवीरावर आले त्या वेळीं मोठी मर्दुमकी केल्यावरून त्यांस हिंम्मतबहादुर हा किताब देऊन जहागीर वजरी पटका शके १७०६ राजशाक ११९ सन १७८४ फाल्गुन शुद्ध ३ रोजीं दिला होती. या स्वारींत ही शौर्य प्रकट केल्यावरून वरुण तर्फेची देसगत आणि कोथळी, रेटरें व शिवरें हे ३ गांव इनाम करून दिले. (शके १७०८ छ १४ रमजान).

मानोजी बयासाहेब वगैरे मंडळी महायात्रेस गेली होती ती यात्रा करून दीड वर्षानें परत आली. करवीरनजीक आल्याचें वर्तमान समजतांच स्वारी सामोरें जाऊन त्यांस घेऊन आले, आणि ब्राह्मण समाराधना त्यांजकडून करविली. पूर्वी रवानवट करास पांचहजारांचा सरंजाम दिला असून हल्लीं अकरावीं चार हजारांचा गांव व हवेली तर्फेची सरदेशमुखी दिली.

बाळाबाई आका यांचा विश्वासराव घाटगे सर्जेराव यांजबरोबर विवाह करून चोळी कांकणाबद्दल मौजे 'नरतवडें' हा गांव इनाम करून दिला. (शके १७०७).

पुढें कार्तिकमासीं (शके १७०७ सौभाग्यवती सईबाई साहेब यांणीं पन्हाळे मुक्कामीं कैलासवास केला. यांच्यावर महाराजांचा लोभ फार होता. यामुळें महाराजांस फार दुःख झालें

सन १७८५ (शके १७०७ राजशाक ११२) सालीं मार्गशीर्ष मासीं यशवंतराव घाटगे संरजाराव यांची ज्येष्ठ बहीण इजशीं महाराजांचें लग्न झालें. त्याच वेळीं बाबामहाराज यांच्या दोन कन्यांचीं लग्नें झालीं. एक विश्राळगडकरांस व दुसरी कडगांवचे देशपांडे यांस दिली.

सन १७८६ (शके १७०८ राजशाक ११३) सालीं कर्नाटक प्रांतांतील बदामीचा किल्ला नबाब हैदरखान याणें घेतला होता. तो घेण्याकरितां पुण्याहून बाळाजी जनार्दन ऊर्फ नानाफडणवीस; हा-

रिपंत फडके व परशुरामरामचंद्रपटवर्धन वगैरे सरदार मोठी फौज व तोफखाना सुद्धां आले. बदामीच्या किल्ल्यास वेढा देऊन मोर्चे बंदी करून दोनतीन महिने बसले. किल्ल्यावर रवानाची मनुष्यें व सरंजाम बहुत होता. सबब किल्ला हातीं लवकर येईना. पुढें संधि साधून हल्ला करून किल्ला घेतला. परशुराम रामचंद्र वगैरे सरदारांस फौजे सुद्धां कर्नाटक प्रांतांत ठेवून **नाना** व **हरिपंततात्या** थोडी फौज घेऊन पुण्यास निघाले. मार्गांत महाराज सरकारच्या सरहद्दीवर आले. बरोबर **हैबतराव शंकर पागे** होते. ते करवीरचे **रंगोबाव गोविंद** पारसनवीस यांचे आजोबा; सबब त्यांची भेट घ्यावी व **महाराज सरकारचें** दर्शन घेऊन महाराज सरकारांत आपली वडिलार्जित चिटणिशीची असामी आहे तिजवर काम करण्यास आपल्या तर्फे कोणास तरी ठेवावें, अशी विनंति करावी, या हेतूनें नानांचा निरोप घेऊन करवीरीं आले. नंतर पारसनवीस यांचे विद्यमानें महाराजांचें दर्शन घेऊन विनंती केली कीं, आजपर्यंत दरबारची चिटणिशीची सेवा वडिलांकडून घेतली, तें काम भातां सेवकांस देण्याची आज्ञा व्हावी. तेव्हां तुमचें काम तुम्हांस देण्याची आज्ञा होईल. परंतु पेशव्यांची पागा तुम्हांकडे आहे; त्यांत एक कर्डा घोडा आहे तो तुम्हीं नजर द्यावा. त्या वरून मद्दारनिल्हेनीं तो घोडा महाराजांस नजर दिला. आणि चिटणिशीचें काम करण्याची आज्ञा घेतली. नंतर रहाण्यास जागा घेऊन घर बांधून आपल्या तर्फेचा कारकून ठेवून निरोप घेऊन गेले. त्यांनीं नजर केलेला घोडा फार देखणा व चांगला होता. महाराजांनीं त्यांचें नांव **बारक्या** म्हणून ठेविलें.

इसवी सन मजकुरीं (१७८६) **रत्नाजीराव** खानवीलकर यांचे कन्येशीं लग्न झालें. (शके १७०८) याचसमयीं वाडीकर सावंताच्या फुशीवरून सामान गडावर बंड झालें. गडकरी यांणीं गैररहावर्तणूक करून मामलेदारास खालीं घालविलें. हें महाराजांस विदीत होतांच त्यांणीं रत्नाकरपंतास फौजेसहीत रवाना केलें. त्यांस गड-

करी यांणीं किल्लयावर घेतलें नाहीं. तेव्हां ते कडुगांवीं राहिले आणि तेथून महाराजांस विनंति पत्र पाठविलें. पत्रपावतांच रवासाऱ्या गडास गेल्या. किल्लयानजीक पोंचल्यावर बरोबरचा फौज रवाली ठेवून पन्नासलोक व दहा हुजरे बरोबर घेऊन सडीस्वारी दरवाज्यांत दाखल झाली. महाराजांस पहातांच गडकरी शरण आले. तेव्हां किल्लयावर हजारो लोक नेऊन किल्लयावरून गडकरीलोकांस रवाली घालविलें आणि पहिला हवलदार सटवाजी भोसले यास काढून हंबीरराव जाधव यास हवलदारी देऊन किल्लयाचा बंदोबस्त केला. नंतर गडकरीलोकांस घेऊन स्वारी पन्हाळ्यास आली. गडकऱ्यांस एकवर्ष पन्हाळ्यास वेविलें होतें. नंतर जामीन घेऊन परत सामान गडास जाण्यास हुकूम दिला.

(इ.स. १७०९ राजशाक ११४ संमान संमानीन सन २४ शाबान इ. सन १७०७ जून) सामान गडच्या खटल्यांत वाडीकरांची सर्व रवाडी बाहेर पडली. तेव्हां वाडीकरांच्या मुलखांत स्वारी करण्याच्या इराद्यानें कार्तिकमाशीं सर्व सरदार व फौज घेऊन महाराजांनी कूच केलें. पाटगांवाकडील प्रथम सोनगड घेतला. नंतर घोडग्याच्या घांटानें रवाली कोकणांत उतरून भरतगड, निवति, वेंगुर्ले, वेताळगड वगैरे किल्ले आणि नदि अलिकडील सुमारें दीड लक्षाचा मुलूख एका महिन्यांत सरकरून मार्गशीर्ष माशीं नेरूर व वाकोली (वालावली) या मुक्कामीं स्वारी आली. या मुलखाच्या सामन्याचें नांव हुरुणी महाल असें ठेवून सदर मामल्याची वहिवाट शिवाजी आबाजी ऊर्फ बापू वांकनीस यास सांगितली. हा भाग महाराज सरकारांत सुमारें सात वर्षे होता. नंतर वाडीकरांनीं महादजी शिंदे यांजकडे बोलणें लावून त्यांच्या विद्यमानें भाग मोकला करून घेतला.

(इ.स. १७०८ तिसासमानीन) यशवंतराव घाटगे सर्जेराव कागलकर यांस चिखली, भडगांव, वाळवें, मलगें खुर्द, मलगें बुद्रुख आणि मौजे कुरणी हे सहागांव इनाम करून दिले. आज्ञापत्र रत्ना-

करपंत आप्पा यांच्या हातचें छ ११ रमजानचें आहे (शके १७१० आषाढ शु० १२ इ. स. १७८८ तारीख १६ जुलै)

इ. स. १७८८।८९ (शके १७१० राजद्राक्ष ११५) साली पौषमासीं माधवराव नारायण पंडित प्रधान यांजकडील कारभारी यांच्या सांगण्यावरून **ररवमाजी भोंसले अन्नूरकर** यांणीं दुर्बुद्धीनें बंड केलें आणि तोरगल करांच्या कनिष्ठ घराण्यांतील नेसरीकर यांस सामील करून घेऊन नेसरी नजीक **तुर्कवाडी** येथें येऊन उतरले (तिस्सा ग्रंमानीन, रबिलाखर) आणि महाराजांच्या प्रांतास गांवगन्ना उपद्रव देऊं लागले. त्यांचें पारिपत्य लवकर न केल्यास ज्यास जाजती होऊन पारिपत्यास श्रम लागतील, असा महाराजांनीं विचार करून **रत्नाकरपंत** यांस समागमें सरदार व फौज देऊन अन्नुरकरांवर रवाना केलें. ते भगोदर **सासानगडास** जाऊन नंतर **भवानगडास** गेले. तेथें दगाकरून बखेडा करण्याचा मानस भोसले यांचा दिसला. तेव्हां आप्पांनीं मवारनिल्हे भोंसले यांस सांगून पाठविलें कीं, तुमची आमची प्रथमतः भेट व्हावी. नंतर जें काय बोलणें तें बोलावें. तेव्हां रत्नाकरपंताच्या मनांत विकल्प आहे कीं काय याची परीक्षा न पाहतांवरून चांगल्यामाणसांची खात्री न मागतां **बहिरव मंगेश शिपूरकर** जात ब्राह्मण याविषयीं निसबत **भिवकराव हेरवाडकर**, यांची खात्री मागितली. सदरगांव बहिरवराव यांजकडे नेसरीकर शिंदे यांजकडून इनाम चालत होता व ते पूर्वी वल्लभगड व सोलापूरचे वाडेवाटीस होते. तेही हल्लीं रत्नाकर आप्पा बरोबर लष्करात होते. त्यांची खात्री दिल्यावरून रवमाजी भोंसले भावार्थानें लष्करानजीक येऊन आप्पांस भेटले, व चार घटका बोलणें होऊन निरोप घेऊन जाण्यास निघाले. आप्पांनीं पूर्व संकेता प्रमाणें माणसें तयार ठेविलीं होतीं. त्यांनीं गर्दी करून मवारनिल्हे भोंसले घोड्यावर बसते समयीं त्यास ठार मारिलें. नंतर त्यांचें दरोबस्त लष्कर लुटून तुर्कवाडीचें ठाणें घेतलें. तेथें तोफावगैरे सा-

मान होतें नें घेऊन नेसरीस आले. भोंसल्यांचें सार्थक करून व पाडाव केलेल्या तोफा सामान गड्डावर देवून आणि किल्ले **वल्लभगड**, गंधर्वगड आणि **भिंवगड** घेऊन राजाज्ञ करविरां आले.

विठ्ठलराव घाटगे व **यद्दावंतराव** घाटगे यांचा कागल मानांतील वतनें व इनामगांव या संबंधीं खटला चालला होता, तो आपसांत तुटेना. तेव्हां उभयतांचें खटले सरकारांत आले. तेव्हां सरकारांतून ठराव होऊन व ठरावाची यादी करून त्यांस दिली, आणि त्याप्रमाणें ते चालूं लागले.

शके १७१० सालीं **रत्नाकरपंत** राजाज्ञ यांचे चिरंजीव नारायणराव यांस बारवा होऊन करविरीं फारच आजारी पडले, याजकरितां रत्नाकरपंत निरोप घेऊन समाचारा करितां पन्हाळ्याहून करविरास निघाले मार्गी मनस्वी पर्जन्य लागला यामुळें चिखल झाला होता, बडणगें नजीक घोड्याचा पाय निसरून आपा पडले; आणि आंगारखाल्यां पाय सांपडून दुखावला, तरी तसेच करविरीं आले. हें वर्तमान महाराजांस समजतांच समाचारासाठीं स्वारी निघून करविरीं आली. कांहीं दिवस उपाय केल्यावर पायाचें दुःखव कमीं झालें; या प्रमाणें पदरच्या कामगारांस वगैरे बरचेवर करविरीं यावें लागतें, व गड्डावर सर्वांस रहाण्याची अडचण, यास्तव करवीरास राजधानी करून रहावें असा निश्चय करून महालक्ष्मीच्या स्वाऱ्याही पन्हाळ्याहून आणविल्या (इ. स १७८८।८९).

आऊबाई अलीकडे आंठवें वर्ष लागलें, यास्तव **यद्दावंतराव** घाटगे सर्जेरावयांस वर योजून माघ शु० ७ चे मुहूर्तास मोठ्या समारंभानें लग्नोत्साह केला. (शके १७११ राज शक ११६ इ. स. १७९० ता. २३ जानेवारी) दानधर्म ब्राम्हण भोजन वगैरे यथास्थित केलें. याचवेळीं सांगलीं कडील व विजापूर करांकडील कागल जाहागिरीबद्दल ज्यास-नदा होत्या त्या नवीन करून दिल्या.

(शके १७१३ राजशक ११८ इ. स. १७९१ नवंबर) सालीं गगन-

बावडखावरील कामदारांकडून कार्तिकमासीं बोलणें आलें कीं, आ-म्हीं बदलून अमात्यास स्वालीं घालविलें, व आज साहावर्षे मवास होऊन राहिलों; ही आमची चूक झाली; किल्ला सरकारांनीं घेऊन सेवक लोकांचा अपराध माफ करावा; कुटुंबाचें संरक्षण करावें, आणि सेवा चाकरी घ्यावी. तेव्हां गुजाजी गायकवाड सरखवास यांच्या विद्यमानें बोलणें ठरविलें, आणि मल्हारनिल्हे सरखवास आणि नारायणराव पाटणकर सरलष्कर या उभयतांस जामीन घेऊन सदरहू अन्वयें बोलण्याचा ठराव झाला, आणि महाराज सरकारची स्वारी बावडे किल्ल्यास जाऊन पोहोंचली. तेव्हां गडकरी आणि हवालदार यांणीं महाराजांस आणि प्रीतिरावचिटणीस व सरलष्कर व रत्नाकरपंडित राजास यांस दिंडीतून किल्ल्यांत घेतलें व बाकीची मंडळी व फौज स्वालीं राहिली. महाराजांची स्वारी करविराहून निघाली तेव्हांच सुबराव पंडित अमात्य यांस सांडणी स्वारावरोबर आज्ञापत्र पाठविलें होतें कीं, "बावडेकर कामदार यांचें बोलणें ठरल्यावरून स्वारी बावड्यास निघाली आहे. तरी तुम्ही राशिवडयाहून निघून जलद बावड्यास यावें." या प्रमाणें पंतअमात्य ही स्वारींत येऊन मिळाले. स्वारी गडावर जाऊन गडकरी व हवलदार यांची स्वाची केल्यावर किल्ला स्वाधीन केला, आणि किल्ल्याचा दरवाजा उघडून तोफा उडविल्या. तेव्हां सरदार व फौज वर आली. त्यांबरोबर अमात्यही परत आले. त्यांस पहातांच महाराजांची मर्जी सुप्रसन्न झाली, आणि अमात्यांस आज्ञा केली कीं, आपला किल्ला आपले स्वाधीन करून घ्यावा, तुमच्या पंचातून श्री अंबाबाईनें आम्हास काढिलें. या प्रमाणें किल्ला अमात्याचे स्वाधीन करून स्वारी स्वालीं पेठेंत आली. तेव्हां अमात्यांनीं येथें तळें व्हावीं अशी विनंति केली; परंतु प्रस्तुतच्या प्रसंगीं येथें रहाणें बरोबर नाहीं, येथें तादास रहावयाचें नाहीं. या वेळीं रत्नाकर पंतांनीं अमात्यांस विचारिलें कीं, महाराज सरकारांनीं कृपाळू होऊन किल्ला

आपले स्वाधीन केला, सबब महाराजांस आपण नजर काय क्रेली हें समजलें नाहीं. त्याजवरून पंडित अमात्यांनीं उत्तर केलें कीं, किल्लावर्सव दौलत महाराजांचीच आहे. मी सेवक आहें; त्या पेक्षां धन्यास मी काय द्यावें? तत्रापि आपण मज्झ केला त्यास आपले कडे पावनगड आहे. त्या तनरव्यांत आमचा सालाबादचा ऐवज येणें तो आपणास माफ करून देतों, तो आपण घ्यावा. असें बोलून किल्ले मजकूरचे तनरव्यांतील बाबतीचे ऐवजाचीं माफी पत्रें राजासांच्या नांवचीं करून दिलीं. त्या प्रमाणें पावनगड राजास यांजकडे होता तों पर्यंत बाबतीचा ऐवज घेत होते. पुढें किल्ले मजकूरच्या तनरव्यांतील बाबतीचा ऐवज महाराज सरकारांत जाऊं लागला.

सन १७८८ पासून पुढें पांच साले कोल्हापुरावर परचक्र आलें नाहीं, व भांतांत स्वस्थता होती. वरचेवर बंडें होत, व सरदार गैरवर्तन करीत. यामुळें कित्येक सरंजाम व इनामगांव जप्त केल्यानें वसूल ही जास्त होऊं लागला. येणें करून तिजोरींत बरीच शिल्लक जमली, तिचा व्यय तुळजापुरास श्रीभवानीचे यात्रेस स्वारी गेली त्यांत झाला. या यात्रेस स्वारीही मोठ्या थाटानें गेली होती, यास्तव त्या स्वारीचें थोडेंसें वर्णन देणें या स्थळीं आवश्यक आहे.

शके १७१३ साल्हीं माघमासीं श्रीभवानीचे दर्शनास तुळजापुरीं हरहमहाराजांची सडी स्वारी निघावी असा निश्चय ठरला. त्या समयीं सरहद्दीवरील पंत प्रधान व पेशव्यांकडील दुसरे सरदार यांस भीचे दर्शनास स्वारी तुळजापुरास जाणार म्हणून आज्ञापत्रें गेलीं नाहींत. कारण ही गोष्ट प्रसिद्ध झाल्यानें कदाचित् स्वारीच्या जाण्यास हरकत येईल, असा अंदेशा आला होता. स्वारी निघण्यापूर्वीच भगवंतराव भोपे तुळजापूरचे पुजारी यांस गिरगांव तर्फ खानापूर हा गांव राजशक ११८ माघ शुद्ध १० रोज गुरुवारची सनद देऊन इनाम दिला; आणि वद्य पक्षीं महाराजांची खासगी स्वारी करवीराहून महालच्या स्वाऱ्यांसहित निघाली. स्वारी समागमें अमात्य, प्रतिनिधि,

हिम्मतबहादर, सरलष्कर, सेनारखासकील, सेनापति, घाटगे सरजाराव वगैरे सरदार होते. शिवाय दोन हजार निवडक स्वार, दररवदार वगैरे मंडळींची घोडीं ५००, पायदळ, खासबारदार, हत्ती वगैरे पथकें आणि गडकरी व सरदारांचे लोक मिळून पांच हजार शिवाय बाजारबुणगें, लहेंगे, उंटे, बैल सरसुद्धां एकंदर अजमासें दोन-हजार सरंजाम घेऊन स्वारी कूच दरकूच निघाली, ती तिसरे दिवशीं पंढरपुरास पोंचली. इनक्या त्वरेनें स्वारीचा कूच झाल्यामुळें घोडीं, बैल वगैरे— लोक थकून गेले, महालच्या भोयांपैकीं पांचचार भस्मा-मीं उरीं फुटून मेले. म्हणून त्यांचे बायकांमुलांस रांडरोटी जमीन दर-एकास पांच विघे प्रमाणें गांवगन्ना इनाम करून दिली. पंढरपुराहून मध्यें एक मुक्काम होऊन पांचवे दिवशीं स्वारी तुळजापुरास दाखल झाली. तेथें स्वारीचे पांच मुक्काम झाले. श्रीचें दर्शन होऊन श्रीस अभिषेक केला, वस्त्रालंकार दिले, महापूजा बांधिली, समाराधना केली, व गोरगरीब लोकांस धर्मादाय वांटला. या प्रमाणें यात्रेचें काम आटपून महावे दिवशीं कूच होऊन स्वारी निघाली. महाराजांची स्वारी श्रीचे दर्शनास दरकूच निघाल्याचें वर्तमान समजतांच पंत प्रधानांचीं पत्रें डाकेतून मामलेदारांस गेलीं कीं, ज्या-मुक्कामीं महाराज सरकारच्या स्वारीचा मुक्काम होईल तेथच्या मामलेदारांनीं महाराजास नजर करून मेजवानीचा सरंजाम हजर करावा, आणि हरएक प्रकारें सरबराई देवावी, लिहून आल्याप्रमाणें स्वारी परत करवीरीं येत असतां प्रधानांकडील कामदारांनीं मरफरा-ईचा बंदोबस्त ठेवून दर्शन घेऊन नजरा केल्या. स्वारी कूच दरकूच दवडीनें पंधरावीस कोसांचे मुक्काम करून पंधरावे दिवशीं करवीरास येऊन दाखल झाली.

स्वारी परत आल्यावर मर्जी बहुत संतोषी होऊन तुळजापूर निवासिनीचे खर्चास फाल्गुन शुद्ध ८ रोजीं मौजे चंदूर नर्फ रुकडी हा गांव इनाम करून दिला.

(इ. स. १७८९) कंपनी सरकारांशीं जे सावंताचे व कोल्हापूरकरांचे तहनामे होते, ते बरोबर रीतीनें अमलांत आणण्याचें सामर्थ्य कंपनीस नव्हतें, किंवा पेशवे सरकाराशीं वेगळे तहनामे झाल्यामुळें त्यांच्या ताब्यांतील संजामा बरोबर त्यांच्या इतल्या शिवाय लढाई करितां येत नसे, या कारणानें सावंताचा पुंडावा पश्चिम किनाऱ्यावर धडाक्यानें अबाधित चाललाच होता. आणि कोल्हापूरकर हीच वेळीं आपल्या पूर्व वहिवाटीस प्रवृत्त झाले होते. यामुळें कंपनीच्या तारवांस फारच उपसर्ग पोंचून तो दुःसह झाला. तेव्हां सन १७८९ साली मुंबई सरकारानें पश्चिम किनाऱ्यावरील चांचे लोकांची खोड मोडण्याचा निश्चय केला. जरी कोल्हापूरचें राज्य अगदीं स्वतंत्र असून पेशव्यांचे ताब्यांतील नव्हतें, तरी मुंबई सरकारास हें राज्य पेशव्याचे ताब्यांतीलच एक सरंजाम असावा, असा अंदेशा येऊन पेशव्यांचे इतल्या शिवाय कोल्हापूरकरांवर कशी स्वारी करावी हा विचार पडला. ही बातमी नाना फडणवीसास समजतांच त्यानें कोल्हापूरकर महाराजांस पत्रें लिहिलीं कीं; या वेळीं इंग्रजांची फौज कोल्हापुरावर येणार यास्तव प्रस्तुत समयीं मुकाट्यानें पेशवे सरकारची ताबेदारी पत्करून प्रधानांचे बाहेदारी खालीं यावें, म्हणजे हें परचक्र टळेल. प्रथमारंभीं महाराज या म्हणण्यास रुकार देण्याच्या विचारांत होते. परंतु त्यांस लागलाच अंदेशा आला कीं, यांत कांहीं तरी पेशवे सरकारचें कृत्रिम असून राजकारण साधण्याचा त्यांचा बेत असावा. इतक्यांत महाराजांस कळलें कीं, इंग्रज टिपूशीं लढाई करण्यास जाणार आहेत. हे समजतांच हा गोष्ट घडणार नाहीं असें नानास साफीचें उत्तर महाराजांनीं पाठविलें. नंतर इंग्रजांची फौज म्हैसुराकडे गेल्याचें कळतांच चांचे लोक फारच चेवले व त्यांचा पुंडावा या समयीं अत्यंत माजला.

तेव्हां इ. स. १७९२ सालीं मुंबई सरकारानें मुंबईहून फौज पश्चिम किनाऱ्यावरील चांचे लोकांचा मोड करण्याकरितां रवाना केली.

फौज समीप येतांच महाराज सरकारांनीं सलुख्याचें बोलणें लाविलें, व माफी मागितली, आणि मागील बाकी वहल्लीं झालेलें नुकसान भरून देण्याचें कबूल केलें; आणि **उईलयम टामस सांडीफर्ड** निसबत मुंबई सरकार आणि **बाळाजीराम** सरलष्कर निसबत महाराज सरकार यांच्या विद्यमानें पुढील सहा कलमी तहनामा ठरविला. त्यांत **मालवण** व **कोल्हापूर** येथें फ्याक्टरी व वखारी घालण्याची परवानगी कंपनीस मिळाली.

करारनामा सुज्जातवंत बुर दस्त गाह अज्जम लेफ्टनंट उइलयम टामससांडिफोर्ड कारपरदाज अजतर्फ हवामत पनाह अज्जम आनराबल मेजर जनरल राबर्ट अबर क्रांबी प्रेसिडेंट गव्हरनर जनरल जंजिरे मुंबई व अज्जम बाळाजीराम सरलष्कर अजतर्फ श्रीमन्महाराज शिवाजी राजे छत्रपति तख्त कोल्हापूर यांदरम्यान हरदू तर्फेनें सरकारचे कुल्ल अखत्यारांनीं यें येकबाउ पन्हा आनराबल कंपनीचें कर्ज श्रीमन्महाराज राजे यांजकडून येणें त्याचे फैसल्यासंबंधें व जंजिरे मुंबई येथील सरकारचे पन्हांतील व्यापारी यांशी इंग्रजी सन १७८५ पासून मालवणच्या आरमारानें नुकसान केलें असे, त्याचे फैसल्यासंबंधें, नपशील नेले बमोजीब करार केला आहे:-

कलम १. जैद दोस्ति आज कदी मूल आयाम पासून आनराबल कंपनी व श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर या दरम्यान चालत आली आहे ते फेर मोहोकम करून तर्फेनें दरम्यान कज्या चालत आहे तो हीं कलमे फैसल झाल्यावर फैसल होईल.

कलम २. श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर, करार करितात कीं, त्याहीं अज्जम मेस्तर ब्रूम यांजशी करार केला होता त्या पैकीं बाकी आनराबल सरकार कंपनीचें कर्ज देणें असेल तें तिहीं दफातीनें द्यावें; पहिले दफातीचा ऐवज तारीख १ माहे जानेवारी सन १७९३ ते दिवशीं अदा करावा; व दिगर दफातीचा ऐवज अदा होय तों पावेतों दरसालच्या जानेवारी महिन्याचे पहिले तारखेस देत जावा. म्हणजे

णजे तारीख १ जानेवारी सन १७९५ ते दिवशीं कुल फैसल होईल.

कलम ३. सदरहू कर्ज राजे कोल्हापूर यांजकडून सरकार कंपनीस देणें त्यास बिसयार सालें गुजरलीं व व्याज चढलें. सबबकीं त्यांचे राज्यावर बहुत कसाला गुजरला, त्यामुळें त्यांच्यानें व्याज द्यावयाची हिंमत राहिली नाहीं या करितां कबूल केलें जात आहे, जे सदरहू करारा प्रमाणें श्रीमन्महाराज इमान राखून ऐवज आदा करितील तरी व्याजाचा दावा करणार नाहीं.

कलम ४. श्रीमन्महाराज राजे कोल्हापूर करार करितात कीं, त्यांचे आरमाराकडून बेपारी यांस नुकसानी इंग्रजी सन १७८५ पासून झाली आहे. त्याची याद दास्तवमा व्याज इंग्रजी ता. २१ जुलई सन १७९२ पावेतों करून हवामत पन्हा मेजर जनराल राबर्ट अंबर क्रांबी प्रेसिडेंट गव्हरनरजनरल जंजिरे मुंबई यांहीं श्रीमन्महाराज राजे यांजकडेस पाठविली आहे त्याचा ऐवज द्यावया करितां करार करितात कीं, वूर्त अज्जम बाठाजीराम सरलष्कर यांबरोबर रुपये २०००० पाठविले आहेत ते द्यावे व दिगर ३५००० रुपये चहूं दफातीनें द्यावे, म्हणून करार केला असे. त्याचा तपशील पहिली दफात तारीख १ मार्च सन १७९३ च दिगर तीन दफातीचा ऐवज दरसाल मार्च महिन्याच्या पहिल्या तारखेस देत जावा, जवलग सदरहू ३५००० रुपयांचा फैसल्हा होय तंव पावेतों द्या ऐवजांत बेपारी यांचें कुल नुकसान फैसल होईल.

कलम ५. सदरहू दफातीचा ऐवज आदा व्हावा त्याचे जामिनी करितां व या पुढें कोठी तरांड्यांस श्रीमन्महाराज राजे यांचे आरमाराकडून इजा न पोहोंचावी या विषयीं सरकार कंपनीची निशा पुरती पाहिजे, म्हणून श्रीमन्महाराज राजे करार करितात कीं, जंजिरे मालवणास इंग्रजाहीं फेतोरी (फ्याक्टरी) घालावी.

त्या फतेारीवर इंग्रजी निशाण उडेल. जंव पावेतों सदरहू दावे फै-सल होत अगर त्या बाद इंग्रज चाहातील की, फटेारी ठेवावी तर त्या वावें इंग्रजाचा अरवत्यार असे. या शिवाय श्रीमन्महाराज राजे कबूल करितात की, इंग्रजांस दरकार पडल्यास कोल्हापुरांत आ-पण जेथें राहातात त्या जागीं फतेारीस जागा द्यावी, व त्या हरहू फतेाऱ्यांत शिपाईलेाक सरकार इंग्रजाकडून राहातील, त्यांस अनु-का अडिश्री श्रीमन्महाराज राजे देतील, जेथपावेतों सदरहू कलम भ-मलांत येत तंव पावेतों.

कलम ६. सदरहू कलमें करारांत आणून त्याजवरी श्री-मन्महाराज राजे कोल्हापूर या तर्फे नि अज्जम बाळाराम यांहीं खुद्द आपली निशाणी व महारांजांकडून या कामाकरितां शिक्का त्यांज-कडेस दिला असे तो शिक्का करून द्यावयासी त्यांस अरवत्यार कुल असे; त्याजकरितां मझारनिल्हे बाळाजीराम यांही या करारावरी नि-शाणी करून महाराजांचा शिक्का केला म्हणजे हा करार श्रीमन्महारा-ज्ञ राजे यांजकडूनच बालाल व मोहकम झाला. व येक बाल प-न्हा सरकार कंपनी तर्फेनें जे वक्ती हा करार दाद बंगाल येथील शहा-मत व अवाली मर्तबत राईट आनराबल अर्ल कार्नवालीस नाइट ऑ-फ दी गारटर बहादूर गव्हरनर जनरल हिंदुस्थान कबूल करून कुल-अरवत्यार पाठवितील तेव्हां सरकार कंपनी तर्फे निशाणी व शि-क्का होईल.

सदरहू कलमें आनराबल मेजर जनराल राबर्ट भाबर कांवी प्रेसिडेंट गव्हरनर जंजिरे मुंबई या तर्फेनें अज्जम लेप्टनेंट कर्नल-यम टामस सांडि फोर्ड कारपरदाज, व श्रीमन्महाराज राजे कोल्हा-पूर यांचे तर्फेनीं अज्जम बाळाजी राम सरलष्कर या दरम्यान जंजि-रे मुंबईचे मुक्कामी करार जाहला आहे, ते इंग्रजी तारीख २५ मा-हे नवंबर सन १७९२ छ १० माहे रबिलाखर सन सलासा तिसैन म-याते व अलफ.

मात्र सुमारास पेशव्यांच्या मध्यस्तीनें दुराणी म्हारुड या नांवाच्या वाडीकरांचा मुलूख जो कोल्हापूरकरांनीं घेतला होता तो वाडीकरांस परत दिला.

बाबूराव केशव यांणीं कोल्हापूर शहरीं कात्यायनी पासून पाणी आणण्या करितां नळाचें काम शके १७११ इ.स. १७८९ साली आरंभिलें होतें तें शके १७१३ इ.स १७९१ सालीं समाप्त होऊन शहरांत पाणी आलें.

शके १७१४ (सन १७९२-९३) सालीं **परशुराम रामचंद्र** पटवर्धन यांच्या दुराचरणा विषयीं प्रधान यांच्या चित्तीं विकल्प येऊन परशुराम पंतास किल्ल्यांत नजरबंदींत बंदोबस्तांत ठेविलें होतें. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांस सोडून दिलें. नंतर इकडील (करवीराकडील) प्रांतांत तंटा बखेडा करावा असें मनांत आणून इकडे येतांना सातार्‍यास जाऊन तेथें मनमानेल तशी धांदल करून व अमर्यादा करून नासगांवीं आले. नंतर करदिरास मोहीम करण्याच्या संकेतानें त्यांचे चिरंजीव **रामचंद्र परशुराम** यांस समागमें १००० दहा हजार फौज देऊन इसवी सन १७९३ (शके १७१५) सालीं रवाना केलें. ते मार्गशीर्ष वद्य ८ ता. ११ दिसंबर रोजीं **अलत्या** नजीक येऊन पोंचले. दुसर्‍या दिवशीं ठाण्यास तोफा लाविल्या. ठाण्यांत **अमृतराव भोपे** व **हणमंत शितारांम** आणि एक हजार आरबलोक होते. या वेळीं महाराजांची स्वारी **पट्टणकोडोली** मुक्कामी होती. **बाळाचार्य** जोशी हे मोठे सिद्धांती ज्योतिषी समीप होते. यास्तव त्यांणीं दिलेल्या मुहूर्तावर लढाई करण्याचा बेत ठरविला. नंतर त्यांस मुहूर्त विचारितां त्यांणीं सांगितलें कीं, आज कोठें तरी युद्धास आरंभ करावा. त्या प्रमाणें रत्नाकरपंतांनीं फौजे निशीं कोडोलीवर जाऊन लढाईस आरंभ करून अस्तमानीं परत येऊन बाळाचार्यास कळविलें. तेव्हां उदईक सूर्योदयाच्या पूर्वी चार घटिकारात्रीस स्वारीस घेऊन जावें; म्हणजे अस्तमानपर्यंत शत्रु हस्तगत

होईल असें त्यांनीं सांगितलें. त्या प्रमाणें तयारी करून स्वारी फौज व तोफखान्या सहित मुहूर्तावर निघून **श्री त्र्यंबुली** जवळ गेली. तों अवत्याहून पत्र आलें कीं, शाहूंनीं गांव घेतला. शुद्ध १० रोजीं भोपे यांस मोर्चांतील गोळी लागून ते स्वामी कार्यावर खर्च झाले, याणें लढत आहे, कुमक जलदी करावी." इतक्यांत दुसरें पत्र आलें कीं, "कुमक येत असल्यास त्यांस अडविण्याकरितां अवत्याच्या खिंडींत चारशें स्वार उभे आहेत." त्या वरून स्वारी रुकडी माणगांवच्या मार्गानें गेली, तों शाहूंनीं ठाण्यास तोफा लावून ठाणें जेरीस आणिलें आहे, व दुकानांतगृह बसले आहेत असें पाहिलें. तेव्हां फौजेच्या चारपांच टोळ्या करून महाराज चालून गेले, व नौबत सुरू केली. असें कळतांच शाहूंनीं तोफा बंद केल्या आणि मागें महाराजांच्या फौजेवर फिरले, आणि **रामचंद्रराव** घोड्यावर बसून फौजे सह ओढ्या नजीक येऊन उभे राहिले. त्यांस पहातांच महाराजांनीं आपल्या फौजेची उठावणी केली, आणि मोठी हात घाईची लढाई जुंपली. तींत पटवर्धनांच्या फौजेनें नामोहोरम होऊन पळ काढिला. **विठ्ठलराव** पटवर्धन व **बाबा** फडणीस पाडाव झाले. पटवर्धनांच्या फौजेच्या पाठीस **रत्नाकर-पंत** लागले. मजलें व शिरगांवच्या खिंडींत **रामचंद्रराव** व त्यांच्या पदरचे **रास्ते** व **शितोळे** हस्तगत झाले, व आप्पांनीं त्यांच्या तोफाही पाडाव करून आणित्या, रामचंद्र पंतास तरवारीच्या जरवमा लागल्या होत्या, सबब त्यांस रत्नाकर पंत यांणीं पालखींतून आणून महाराजांच्या चरणावर घातलें. तेव्हां महाराजांनीं त्यांस सांगितलें कीं, तुम्हीं परत नासगल्वास जावें, रवानगी करून देतों. त्या समयीं मल्हारनिल्हेनीं आम्हीं करविरास येतों अशी विनंति केली. तेव्हां त्यांस घेऊन स्वारी करविरीं आली. महाराजांनीं पररुरामपंत भाऊस आज्ञापत्र पाठविलें कीं, "रामचंद्रपंत लढाईंत हस्तगत झाले आहेत; बरे आहेत; काळजी करूं नयें." करविरीं आल्यावर रामचंद्ररावास जोत्तीराव यांच्या घरीं ठेवून जरवमा वगैरे पर-

हाण्यास **आनंदराव घाटगे** यांस नेमिलें. नंतर आंचार्यांचें दर्शन घेऊन त्यांनी सांगितलेल्या मुहूर्तावर मोहीम फत्ते झाली, या कारणानें मर्जी सुप्रसन्न होऊन पावनगड तनरव्यांतील दोन गांव त्यांस इनाम करून दिले. कांहीं दिवसांनी हिम्मत बहादूर यांच्या बाड्याच्या पश्चिमेस भवानी कोंडी होती तेथें रामचंद्र रावास लाविलें. तेथें एक महिना होते. खास्तास्वारी आठचार रोजांनी समाचारास जात असे. जरवमा होजेस आल्यावर रवानगी करून द्यावी. तिकडे भाऊंस आज्ञापत्र पावतांच ते बहुत रिवभ झाले. पुत्र मेला असता, तर फार उत्तम झालें असतें. शत्रूच्या हातीं सांपडला हें फार वाईट झालें. आपण खुद्द जाऊन मोहीम करावी असा निश्चय करून डेरे बाहेर काढून तयारी करण्यास हुकूम दिला. जरवमा नीट झाल्यावर निरोप द्यावा अशी रामचंद्रपंतांनी विनंति केली. तेव्हां बादलीचा पोषाख, शिरपेंच, मोत्यांची कंठी, हत्ती, घोडे वगैरे देऊन बहुत मान केला. आणि मौजे दानवाड व एक-संबें हे दोनगांव इनाम देऊन सनदा करून दिल्या. त्या समयीं आपली दाढी गेली आहे ती द्यावी म्हणून विनंती केल्यावरून दाढी दिली. त्यावेळीं रामचंद्रपंतांनीं आजपासून राजमंडळावर तरवार धरणार नाहीं, व वडिलांस येऊं देणार नाहीं, अशी क्रिया बेल मंडारा देऊन महाराजांच्या पायांवर मात घेतला. नंतर बरोबरच्या मंडळींस वस्त्रें देऊन मानकरी, स्वार, व लोक पोंचविण्यास देऊन पंतांस तासगांवास रवाना केलें. **रामचंद्रपंत** तासगांवी पोंचल्यावर भाऊंनीं चिरंजिवाची भेट घेतली नाहीं, व तोंड पाहिलें नाहीं. रामचंद्रपंत यांणीं आपणास किती मसतेनें वागविलें व आपणावरील महाराजांनीं फार काळजी घेतली, तें कळवून आपण घेतलेली शपथही कळविली, आणि फार काकुळतीनें लढाईस न जाण्याविषयीं विनंति केली. तेव्हां भाऊंनीं उत्तर केलें कीं, अशी शपथ घेणें शूरास अगदीं अनुचित आहे; आतां पाडाव झालेल्याचें रक्षण केलें हें महाराजांचें कर्तव्यच होतें. यास्तव मुजा-

च्या भाणभोकांकडे लक्ष न देतां स्वारास निघावें असें मनांत आणून मोठ्या आवेशानें तयारी निशीं फौजे सुद्धां निघाले, आणि मौजे उचगांव या नजीक पंचगंगेच्या किनाऱ्यास येऊन उतरले. माघ शु० ७ रोजीं **शिरोळी** नजीक येऊन लढाईस आरंभ केला. करवीरच्या कोटास दररोज तोफा मारूं लागले. तलावेस जे येत त्यांजबरोबर लढाई करीत. या प्रमाणें उभयपक्षांचे लोक भिडून दररोज लढाई होत-होती; असें कांहीं दिवस चाललें; आणि भाऊंचा कडेकोट वेढा बाहेरास बसला. या प्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर भाऊंचा वेढा उठविण्यास महाराजांचा कदाव चालेना. तेव्हां रेंकीस येऊन वेदशास्त्र संपन्न राजश्री बाळजीराव यांच्या विद्यमानें बोलणें होऊन फाल्गून शु० १० रोजीं तह ठरविला कीं; भाऊंस महाराजांनीं १० लक्ष रुपये द्यावे, पैकीं २ लक्ष रुपये रोख द्यावे, तीन लक्षाचा भरणा होऊन उलगडा होईपर्यंत वाकस असाम्या ओलीस द्याव्या. बाकी ७ लक्ष रुपये रहातात त्या ऐवजाचे भरण्यास महाराज सरकारांतून चिकोडी व मनोळी तालुके लावून द्यावे. या प्रमाणें ठराव होऊन **रामचंद्र जोशीराव**, रत्नाकर पंताचे चिरंजीव **नारायणराव**, **रायाजी जाधव** सरनोबत यांचे चिरंजीव **गोपाळराव**, हिंमत बहाद्दर यांचे पुत्र **उदाजीराव**, गुजाजी गायकवाड यांचे पुत्र **दौलतराव**, निंबाजी जाधव यांचे पुत्र **जिवराव** व **शिवरामजाधव** यांस तीन लक्षांचा भरणा होईपर्यंत ओलीस मागितलें. त्या प्रमाणें देण्याचें ठरवून नारायणरावास पंडित असा किताब देऊन पोषाख दिला; आणि सोन्याच्या काठीचा भालदार व चवरी देऊनें हत्ती, घोडे वगैरे लवाजम्या सह सर्वांस रवाना केलें. ते गोटा जवळ येतांच चिरंजीव व कारभारी यांस पुढें सामोरे पाठवून त्यांस घेऊन आले. दुसरे दिवशीं कुच करून फौजेनिशीं शके १७१५ सालीं मिरजेस गेले. तेथें **नारायणरावास** रहाण्यास हरी भास्कर यांचें घर दिलें. चरकडमंडळींस लक्ष्मणपंत यांचें घर दिलें. त्यांच्या समाचारास चिरंजिवा-

पाठवीत, तसेंच भोजनास आमंत्रण सांगणे झाले तरी चिरंजिवास पाठवीत. मंडळी आली म्हणजे आपण दरवाजा पर्यंत सामोरे जात, आणि घेऊन येऊन ओढाशी बसवीत. भाजनोत्तर आपण विडे, गुलाब, अत्तर देऊन दरवाजा पर्यंत जाऊन पोंचवीत. पुढें चिन्हाडा पर्यंत चिरंजिवास पोंचाविणेस पाठवीत व पोंचवून तेही निरोप घेऊन येत. या प्रमाणें ओलीस नेलेल्या लोकांची बरदास्त ठेवीत. यावरून त्यांच्या मनाच्या थोरवीची परीक्षा होते. भाऊंची स्वारी तासगांवास गेली, तेव्हां ओलीच्या मंडळीस तासगांवास नेलें. ऐवजाचा बहुतेक भरणा होऊन कांहीं बाकी होती, इतक्यांत **प्रधानांचें** निजाम अल्लीवर मोहिमेस जाण्याचें ठरलें. व **परशुराम भाऊंस** फौजेसह जलदीनें येण्याविषयीं पत्र आलें. तेव्हां राहिलेले रुपये न मागतां पंडित वगैरे ओलीच्या मंडळीस निरोप द्यावा, असें सर्वांच्या विचारें ठरवून, त्यांस मेजवानी करून वस्त्रें दिलीं, आणि भाद्रपद वद्य ११ रोजीं निरोप दिला. त्यांस पोंचाविण्यास आपले कडील मानकरी वगैरे दिले होते. ओलीची मंडळी साडेसहा महिने तासगांवीं आणि दीड महिना मिरजेस राहून दिवाळीस परत करविरीं आली. ओलीच्या मंडळीस पाठविल्यावर भाऊ रवड्याच्या स्वारीस गेले. सन १७९५ (शके १७१७ राजव्याक १२२). सालीं **बाळाबाई** आकाचा विवाह करण्याचें ठरवून सुलतानराव नाईक निंबाळकर, रवर्डेकर, हैद्राबादचे सरदार यांस वर योजून तयारी करविली; आणि त्यांस करविरीं आणून मोठ्या समारंभानें फाल्गून शुद्ध १२ रविवारीं विवाह केला.

शके १७१८ अर्थात शुद्ध १५ इ. स. १७९६ भुदरगड किल्ला १० वर्षे परशुराम भाऊ पटवर्धन यांजकडे होता, तो परत घेण्याची मसलत **हैबतराव** गायकवाड यांजकडून ठरून आल्या वरून किल्ला घेण्यासाठीं हुजुरून **मानाजी** घोरपडे वाघापूरकर, **उदाजीराव** घाटगे, आप्पाजी नलगे गडकरी किल्ले मजकूर यांस रवानें बारदार वगैरे लोकांची पथकें, गोलंदाज, वरोटे यांस बरोबर देऊन

अश्वीन शुद्ध १५ रोजीं रवाना केलें. ते किल्ल्यानजीक जाऊन दोन दिवस रानांत छपून राहिले. अश्वीन शुद्ध १५ चे दिवशीं किल्ल्यावर कांहीं हालचाल नसून जिकडे तिकडे सामसूम आहे, अशी संधि पाहून तटास शिड्या लावून किल्ल्यावर खासबारदार लोक चढले. ते गेल्यावर गनीम वर चढला अशी गरबड झाली; आणि पटवर्धना कडील **आबाजी गोपाळ** फडके मामलेदार लोकांस जमा करून खासबारदार लोकांच्या तोंडावर गेले, तेव्हां लढाई जुंपली. दोहों कडील लोक मोठ्या नेटानें व निकरानें लढले. लढाईंत मजकूर निळे मामलेदार पडले. कुसाजी नलगे गडकरी दरवाजा उघडून खालीं गेले व घरीं जाऊन आपल्या कुटुंबाचीं सारीं माणसें घेऊन रातोरात निघून गेले. तेव्हां पटवर्धनाचे लोकही पळून गेले आणि किल्ला सर झाला. उजाडल्यावर मजकूर निळे **घोरपडे** व **घाटगे** यांणीं किल्ल्याच्या दरवाजावर आपल्या लोकांच्या चौक्या देवून महाराजांस खालीं हकीकतीचें विनंतिपत्र पाठविलें. **रत्नाकरपंत** यांस किल्ल्याचा बंदोबस्त करण्यास महाराजांनीं पाठविलें, ते जाऊन बंदोबस्त करून आले. किल्ला सर करण्यांत **हैबतराव** गायकवाड यांची मुख्य खटपट होती. यास्तव गुजाजी गायकवाड यांचा सरखवास हा किताब काढून त्यांस विश्वासराव हा किताब दिला. आणि हैबतरावास सरखवाशीचा किताब दिला. **सयाजीराव** जाधव सरनोबत यांस किल्ल्याची हवालदारी दिली. **उदाजीराव** घाटगे यांस मौजे मुधाळगांव सरंजामांत दिला. गोंदजी वरेटे यांस खासबारदाराची हवालदारी दिली व किल्ले मजकूरची सरनोबतीची असामी आणि किल्ले मजकूरच्या तनख्यांतील जमीन दिली. खासबारदार लोकांनीं प्रथम शिड्या लावून किल्ल्यावर हल्ला केला, म्हणून हर असामीस बक्षीसांत व वेतनांत कागल तालुक्यांतील गांवगन्ना जमिनी पांच सात बिघे या प्रमाणें देणग्या दिल्या.

चिकोडीचें ठाणें पटवर्धनाकडे होतें, तें घेण्यासाठीं श-

के मजकुरीं अश्वीन वद्य ५ रोजीं महाराजांची स्वारी निघाली. तेंगणें घेऊन परत करविरीं दिपवाळीस आली, नंतर कार्तिक मासीं स्वारी जाऊन मनोळीचें ठाणें ही घेतलें. मनोळीहून स्वारी कऱ्हाडाकडे वळली. इतक्यांत **भास्करराव भिंबक** मंत्री यांनीं मोजे खोचीच्या पागेंतील भले लोकांचीं खटलें केल्याचें वर्तमान कळलें, तेव्हां स्वारी परत आली. मंत्री यांस तबीब देऊन खंडणी घेतली. तेथून स्वारी करविरास जाण्याची ती न जातां तासगांवास गेली. भाऊ व इतर पटवर्धन मंडळी सुपेयास होती. नाना व भाऊ यांच्यामध्यें वैमनस्य पडलेंच होतें, व पटवर्धनांच्या मुलखास उपसर्ग करण्यास्तव नानांचीही पत्रें आलीं होतीं. ही संधि साधून महाराजांनीं तासगांवावर हल्ला केला. नंतर शहरांत शिरून भाऊंच्या वाड्यांत कडबा भरून वाड्यास अग्नि लावून दिला. सर्व वाडा दग्ध झाल्यावर गांव लुटून कृष्णे पर्यंत गाणीं बसविलीं. नंतर कटकोळास जाऊन तेथें गाणें बसविलें.

इतक्यांत नानाफडणविसाकडून पत्र आलें कीं, **भास्कर सरवदेव** मामलेदार गाणें जमखिंडी यांणीं सरकारचा ऐवज घेऊन मवास गिरीनें जमखिंडीच्या ठाण्यांत बदलून राहिले आहेत, यास्तव त्यांचें पारिपत्य करून हल्लीं कारकून पाठविले आहेत त्यांच्या जिम्मेस गाणें करावें. त्यावरून स्वारी यादवाड्याच्या मार्गे जाऊन यादवाड्याचें गाणें घेऊन जमखिंडीस फौजे सुद्धां दारवठ झाली; आणि जमखिंडीस मोर्चेबंदी केली. **रत्नाकरपंत** आपांचा मोर्चा दरवाजांत होता. गाणें जेरदस्तीस येऊन बोलणें आलें कीं, कौल द्यावा म्हणजे गाणें सोडून निघून जातों. या प्रमाणें फत्ते झाल्यावर खूष होऊन रत्नाकरपंतास 'राजाज्ञ' पद देऊन वस्त्रें दिलीं. नंतर जमखिंडीतील मामलेदार यांस कौल देऊन बाहेर काढिलें, आणि मार्गशीर्ष वद्य ५ रोजीं महाराज सरकारचे लोक ठाण्यांत शिरून बंदोबस्त केला. राजाज्ञ खुद्द जाऊन **भास्कर सरवदेव** यांस त्यांच्या लोकांसुद्धां } शके १७१
} स. १७९

कृष्णापार करून परत जमखिंडीस आले. नंतर नानाकडील कारकुनांच्यां जिम्मेस ठाणें करून स्वारी जमाखिंडीहून करविरास जाण्यास निघाली.

मार्गी रामदुर्गास स्वारीचा मुक्काम असतां हुपरीकर यांची समजी होऊन हुपरीचें ठाणें सरकारांत घेतलें. **नारायणराव** शिंदे नेसरीकर हे रखवमाजी भोंसले व पटवर्धन यांस अनुकूल राहून वाट करीत होते. सबब त्यांस नेसरीहून निघून जाण्याविषयीं आज्ञापत्र गेलें. त्या प्रमाणें ते निघून गेल्यावर त्यांचे धाकटे बंधु जिवणराव यांस सरंजाम देऊन त्यांजकडून चाकरी घेण्याचें ठरविलें.

इ.के मजकुरीं (इ.के १७१९ इ.स. १७९७ जून ६). ज्येष्ठ शुद्ध ११ रोजीं **राजाज्ञ** आणि **हिंम्मत बहादर** फौज घेऊन संवत्सल्यास गेले. ठाण्यास वेढा घालून पंधरा रोजांनीं ठाणें घेतलें. तेथून उभयतांनीं फौजे सुद्धां भिरडीस जाऊन ठाण्यास वेढा दिला. त्या समयीं आंतून बुरजांत बुदले पुरून बुरूज उडविला, तेव्हां बाहेरील लोक फारजरबमी झाले; व कांहीं मयत झाले. नंतर हल्ला करून आषाढमाहीं ठाणें घेऊन करविरास आले.

पटवर्धन पुण्याच्या राजकारणांत गुंतल्यामुळें कर्नाटकांत कोल्हापूरकरांस कोणी शिरजोर राहिला नाहीं, यामुळें यांचा पुंडावा जिकडे तिकडे यथास्थित चालला, व फत्ते होत चालली. यास नानांच्या पक्षाचा पुरा जोर सांपडल्यामुळें यांचें चांगलें पिकलें. सदरहू प्रमाणें इकडील प्रांतीं करवीरकरांचा पुरा अम्मल बसला, आणि भारंभीं नानांनीं सुचविल्या प्रमाणें फौज घेऊन स्वारी अश्वीन मासीं विजया दशमीचे मुहूर्तावर कर्नाटकांत निघाली, (शके १७१९ इ.स. १७९७ सप्टंबर) आणि कर्नाटक प्रांतीं पेशवे होऊन कसबा गोकाक नजीक दाखल झाली. त्या समयीं कसबा मजकूरची खंडणी सव्वालाख रुपये ठरली. पैकीं कांहीं ऐवज **आकाराम** हवालदार याचे मार्फत पावता झाला. बाकीचा ऐवज **रामचंद्र जोशिराव**

यांणीं पटवून घेऊन महाराज सरकारांत आपली निशाखिटी दिली. तेथून न कूच करून स्वारी **किल्लूर** तालुक्यांत गेली, व तिकडे कांहीं दिवस मुक्काम झाला. **हुबळी, वल्लमगड, नवलमाधी** वगैरे शहरें लुटलीं, आणि हुबळी वगैरे परगण्यांतील खंडण्या उरवून घेतल्या. या स्वारींत किल्लूरकर देसाई यांणीं फौजे सुद्धां येऊन बहुत मेहनतीनें सेवाचाकरी करून दारवविली. यास्तव कृपालु होऊन महाराजांनी देसाई यांस **समशेरबहादूर** हा किताब दिला. नंतर **राजाराम, हिंमतबहादूर, अनंतराव प्रतिनिधि,** व **शंकरराव** शिंदे सेना खासकील, **निळकंठराव** शिंदे साहेब सुभा, **विश्वासराव** घाटगे सरजाराव, **बहिरजीराव** घोरपडे, **हिंदुराव** गजेंद्रगडकर, **नारायणराव पादणकर, सरलष्कर,** व **सदवाजी** राव यादव यांस फौजेसहीत कर्नाटक प्रांतीं ठेवून खासास्वारी मनोवीस आली. तेथें आदहा मुक्काम होऊन मजल दरमजल स्वारी करविरास आली.

जेव्हां **नानाफडणवीस** पुण्याहून पळून महाडास आले } सके १७२०
तेव्हां त्यांनीं कोल्हापुरकर व पेशवे यांचा शत्रु निजाम यांशीं कसें } इ. स. १७९८
राजकरण केलें, व कोल्हापुरकरांस ऐवजाचा भरणा करून जास्त फौज देवण्यास लावून त्यांजकडून सर्व कर्नाटक प्रांतीं कसा पुंडावा माजविला, वगैरे वर सविस्तर हकीकत आलीच आहे. याच प्रमाणें पेशव्यांनीं आपला अधिकार बळकावून घेतला आहे तो स्वाधीन करून घ्यावा, व या कृत्यास कोल्हापूरकरांचें साहाय्य घ्यावें, या प्रमाणें सातारकरांस चिडवून त्यांजकडून सातान्यास वेड करविलें. शेवटीं नानांनीं सातारचें राजकारण सिद्ध करून सातारकरांस ऐवज देऊन त्यांजकडून फौज ही ठेवविली. तिकडे ठरल्या प्रमाणें महाराजांचे बंधु **चतुरसिंग** राजे भोंसले सातान्याहून करविरास आले. हीगोष्टीनर महाराजांस अत्यंत इष्ट होतीच. त्यांचीं बोलणीं करारात येऊन चतुरसिंग सातान्यास गेले. नंतर महाराजांचा सदलगे येथें मु-

क्काम असतां शिंग येऊन भेटले. दुसऱ्या दिवशीं महाराज 'शिंगा' यांच्या डेऱ्यास गेले, आणि परस्पर खाशींची बोलणीं झालीं. नंतर महाराजांनीं कूच करून शिरोळच्या मार्गानें कऱ्हाडानजीक 'काले' जवळ जाऊन ज्येष्ठमासीं मुक्काम केला. (इ.सन १७२० इ.स. १७९८ मे व जून). **सातारकर** महाराज ही किल्ल्या खालीं उतरले. **कोल्हापुरकर** महाराजांचा असा बेत होता कीं, चतुरशिंग राजे यांच्या विद्यमानें ठरल्या प्रमाणें सातान्यास जाऊन **महाराज, माईसाहेब** व **शिवर्गा** शिरंजीव यांस पन्हाळ्यास घेऊन जावें, **रायाजीजाधव** यांस फौजे सुद्धां तेथील बंदोबस्तास ठेवावें, आणि मागून राजाल्लांस कर्नाटकांतून आणवून सातान्यास पाठवावें. परंतु **प्रतिनिधि** मधानांस अनुकूल झाल्यामुळें पुढें जाण्यास मार्ग देईनात, सबब कोठेसच मुक्काम करून नित्य कऱ्हाडाजवळ लोकांस खलावेस पाठवीत, या स्थळीं मुक्काम असतां महाराजांनीं चतुरशिंग राजे यांस सांगितलें कीं, आपल्यास पुत्र नाहीं सबब सातारकर महाराजांचे मधले पुत्र **भाऊसाहेब** आम्हांस द्यावे, त्यावरून राजे यांणीं आपले कारभारी यांस युक्तीनें सातान्यास पाठवून सल्ला आणविली, आणि त्या बरोबर महाराजांचा निरोप ही आला कीं, राज्य व मुलें आपलीं आहेत. आपण वडील आज्ञा कराल तसें घडून येईल. परंतु ह्मणीं ठरल्या प्रमाणें अवश्य घडलें पाहिजे. कऱ्हाडा नजीक काले येथें दोन अडीच महिनें मुक्काम झाला. नित्य तलावे होत होते. पुढें तर मार्ग जाण्यास मिळेना. अधिक श्रावणमासीं कऱ्हाडकर व कोल्हापूरकर यांमध्यें मोठी लढाई झाली. कऱ्हाडकरांस पटवर्धनांचें सहाय्य होतें. या लढाईंत **नागोजीराव** घाटगे, **झेंडाजीराव** वगैरे कित्येक सरदारांस जखमा लागल्या. लढाई नुंबळ झाली. **हैबतराव** गायकवाड व **विश्वासराव** गायकवाड यांजकडे सरकारचा महाल, पागा व निशाणें होतीं. त्यांजकडील बारगीर लोकांनीं

बेधडक रावूवर चालून जाऊन मोम्या निकरानें लढाई देऊन अर्थ केली. कांहीं बारगिरांस जखमाही लागल्या. या प्रमाणें कन्हाडकर व त्यांच्या मदतीस आलेले पटवर्धन शिकस्त होऊन मागें हटले. श्रावण शुद्ध द्वितीयेस महाराजांनीं फौजे सुद्धां कुच करून तृतीयेस परगणें शिराळें नजीक ओढयाचे किनारीं मुक्काम केला. हैबतरावांचे वडील गुजाजी राव मृत्यु पावले, सबब हैबतरावांस विश्वासराव हा किताब दिला. (इ. स. १७९८ तारीख १७ आगष्ट). नंतर **नागपंचमीच्या** दिवशीं नाग निघतात तो समारंभ पहाण्यासाठीं सडी स्वारी महालांत बसून ओढयाच्या आलीकडे आली. महाला नजीक **मानसिंगराव** बाबासाहेब घोरपडे खासास्वारी बरोबर होते. **परशुरामरामचंद्र** पटवर्धन* यांणीं मारेकऱ्यां कडून महाराजांस मारवावें या बुद्धीनें मारेकऱ्यांस मोठीं बक्षिसें देण्याची कबुलात करून सिद्ध केलें. सडी स्वारी महालांत नागांचा समारंभ पहाण्यास बसली असतां चार असामी मारेकरी जिवाच्या करारानें स्वारीवर गर्दी करून तरवारीनें महाराजांस मारावें या इराद्यानें नजीक आले. तरवारीचे सब सोडून एकच गर्दी करून ते येऊन महालास भिडले; आणि त्यां पैकीं एक असामी आघाडीस येऊन महालांतील महाराजांच्या पालखीवर तरवारीचा वार टाकिला. त्या वारानें पालखीची पिंजरी तुटून, **घोरपडे** जखम्म होते त्यांच्या मानेवर तरवारीची पुतळी लागून रक्त वाहूं लागलें. मारेकरी याणें महाराजांनंतर दुसरा वार करण्यास हातवर केला असें पाहून **घोरपडे** यांणीं जलदी करून मारेकऱ्यास आंवळून धरिलें. घोरपडे ही बलाढ्य होते. त्यांणीं त्या मारेकऱ्यास खालीं पाडून त्यावर बसले मारेकऱ्याच्या हातांत तरवार होती, तिणें घोरपड्यांच्या पायास जखम लागली. हें सर्व महाराज सरकार स्वतः पहात होते. दोन जख-

---

* भाऊंनीं वरील गोष्ट आपण करविली असें कोल्हापूरच्या फागदोन्हीं भादवतें, पण तेही असंभवनीय वाटतें.

मा लाटून घोरपडे रक्तबंबाळ झाले; जमिनीवर दोघांची कुस्ती होत-होती. घोरपडे ही मोठे जोरदार होते. त्यांनीं त्या मारेकऱ्यास हातूं दिलें नाहीं. इतक्यांत गलबला ऐकून खासबारदार व बंदुकबारदार लोक जमले. त्यांनीं घोरपडयास युक्तीनें बचावून त्या मारेकऱ्यास जरबमी केलें. तद्नांत त्या मारेकऱ्यानें घोरपडयांच्या अंगावर तिसरा वार दाकिला. त्याची जरबम भारी लागून फार रक्त वाहूं लागलें. तेव्हां घोरपडे यांस काढून घेऊन मारेकऱ्यास ठार मारिलें. नंतर मद्दारनिल्हे घोरपडे यांस पालखींतून लष्करांत पाठविलें व जरबमा शिववून रोकावयास लाविलें. घोरपडे ग्रांणीं मारेकऱ्यास जमिनीवर पाडून दुसरे लोक येई पर्यंत हातूं दिलें नाहीं, व आपला बचाव केला, हें मद्दारांजांनीं प्रत्यक्षच पाहिलें होतें. यास्तव मद्दारनिल्हे घोरपडे यांनीं जी योग्य सेवा केली, त्या बद्दल कृपाळू होऊन त्यांस **हसूर** व **हेबाळ** हे दोनगांव इनाम करून दिले.

परगणे मजकुरीं एकदोन मुक्काम करून स्वारी करावीरास येण्यास निघाली. येते समयीं अष्टें व बोरगांवची ठाणीं घेऊन स्वारी परत निघाली आणि सातारचा सर्व मनसबा तसाच राहिला.

श्रीतिराव चव्हाण हिम्मतबहादर यांणीं व त्यांचे चिरंजीव **उदाजीराव** व **नारायणराव** यांणीं जन्मारभ्य सरकारची सेवा चाकरी मोठ्या माहसानें केली, सबब त्यांवर कृपाळू होऊन श्रीतिरावास **उमदेतुल उमराव** हा किताब दिला; आणि त्यांचा हिंमतबहादरचा किताब **उदाजीरावास** देऊन **नारायणरावास** **ममलकत मदार** असा किताब दिला.

तिकडे राजाज्ञ वगैरे फौजेसुद्धां पुढें कर्नाटकांत चालते झाले होते. ते मौजे **शून्यहाळी** (सुदन हल्ली). येथें पोंचले. तेथील बारी काटकांनीं भरून मार्ग बंद केला होता. या करितां काटकांच्या नायकास फितवून चारशें काटक लोक धरून आणिले, आणि त्याच्या वशीं आपल्या समक्ष राजाज्ञ यांणीं त्यांचीं डोकीं मारविलीं. तेथून पुढें.

सावनुरास गेले. तेथें **धोंडोपंत गोरवले** होते. त्यांची यांची लढाई वरचेवर चालली. हरदू फौजांमध्यें इ. स. १७९८ सालीं (शके १७२०). भाद्रपद वद्य ६ अकटंबर तारीख २ रोजीं मोठ्या निकराची लढाई झाली. तींत **राजाज्ञ, सेनारबासकील, हिंमत बहादूर** व **सरलष्कर** हे शिकस्त होऊन मोड झाला. तेव्हां पंडित राजाज्ञ वगैरे चवथे दिवशीं **मनोळीस** आले, आणि फौजेचा जमाव करूं लागले. हें वर्तमान करावरी महाराजांस समजतांच महाराजांनीं त्यांच्या मदतीस निघण्याची तयारी केली. पुण्यास अखेर बाजीराव रघुनाथ हे पेशव्यांच्या गादीवर बसून त्यांच्या हातीं सर्व पेशवाईचें सूत्र आलें; व **नाना** बाल्यात्कारें कारभार करूं लागले. महाराज काळे येथून निघण्याच्या संधीसच बाजीराव व त्यांचे भीतीतले **दवलतराव शिंदे** व **सरवाराम घाटगे सर्जाराव** यांची स्वदस्तुरची पत्रें फौज मदतीस पाठविण्याविषयीं आलीं. त्या प्रमाणें **नारायणराव** घोरपडे सेनापति व **रायाजीराव** जसतनमुलूख यांजबरोबर कांहीं फौज तिकडे रवाना करून, स्वारी राजाज्ञांचे कुमकेस गेली.

मनोळीस जातानां मार्गांत पाच्छापूरच्या बारींत कोण्णूरकर देसाई यांणीं मार्ग बंद करून महाराजांवर गोळी झाडली. यास्तव परत आठकोस येऊन मुक्काम केला, आणि राजाज्ञांस येण्यास पत्र पाठविलें. ते लागलेच १०००० फौज घेऊन आले, आणि महाराजांचें दर्शन घेऊन तिकडील सविस्तर मजकूर कळविला, व निरोप घेऊन आपल्या डेऱ्यास गेले. डेऱ्यास जाऊन भोजन केलें, आणि गोलंदाज यांस आणवून उद्यां दोन प्रहराच्या आंत कोण्णूरचें ठाणें घ्यावयाचें, असें सांगून ठाण्यास तोफा लाविल्या. तेव्हां राजाज्ञाच्या मारानें ठाणें जेरीस येऊन हस्तगत झालें, नंतर देसाई व कादक यांस मारून बंदोबस्त केला. या प्रमाणें तेथील काम आटपून निरोप घेऊन राजाज्ञ पुनः कर्नाटक प्रांतीं गेले. महाराजां-

ची स्वारी तेथून चिकोडीस येऊन राहिली. रत्नाकरपंत फाल्गून मास पर्यंत गोरवल्याशीं लढून विशेष यश न संपादितां माघारे आले.

चिकोडीहून कुच होऊन रामदुर्गाच्या बारीनें जथें वडफळापूरच्या घांटीं स्वारी गेली. तेथें मुक्काम होऊन त्यांच्या खंडणीचा फाल्गुन शुद्ध ७ रोजीं उरक केला. या मुक्कामीं **दौलतराव शिंदे** अलीजा बहादूर यांचें महाराजांस पत्र आलें कीं, "मातोश्री बायांनीं चारचौघां लबाडांच्या सल्लयानें खूळ माजवून दंगा चालविला आहे. हल्लीं कुच करून कराडिराकडे जाणार असें ऐकण्यांत आलें आहे. त्यास तिकडे आश्रय देऊं नये." तेथून स्वारीचा कुच होऊन मौजे **कडंगी** घांट अथणी येथें मुक्काम झाला. तेथें असतां सप्तसागरची खंडणी ठरून कांहीं घोडीं लुटींत आलीं. त्याचा तलास करितां वर्तमान समजलें कीं, **महादजी** शिंदे यांची स्त्री लक्ष्मीबाई व नातकन्याका व तिच्या कन्या आणि यशवंत जिवाजी सरदार, शिपायी कटकट करून फौजे सुद्धां पुण्याहून निघाल्या त्या त्या घांटीं आल्या. त्यांजकडील पठाण लोक जिकडे तिकडे खंडण्या घेत व लुटीत कऱ्हाडच्या मार्गानें नरसिंगपुरास आले. तेथें त्यांनीं **श्रीबाबामहाराजांचा** वाडा वेढून खंडणी करितां दोनदिवस गर्दी केली होती. हें वर्तमान लष्करांतून हुजूर निवेदन होतांच कर्नाटकांतून चुकतेच परत आलेले रत्नाकरपंत राजाज्ञा यांस आज्ञा झाली कीं, तुम्हीं **नरसिंगपुरास** ताबडतोब फौजे सुद्धां जाऊन पगणाच्या पहाऱ्यांतून श्रीबाबामहाराजांस सोडवून आणावें. हुकूम होतांच ते त्याच वेळीं निघाले, आणि मोठ्या मजलीनें वीस पंचवीस कोस एका दिवसांत जाऊन श्रीबाबामहाराज यांस कुटुंब सुद्धां पगण यांच्या पहाऱ्यांतून काढून घेऊन नरसिंगपुराहून कुच करून निघाले, ते वाटेंत मुक्काम न करितां त्याच दिवशीं करविरास आले. आणि त्यांस सरकार वाड्यांत **श्री अंबेच्या** चौकांत ठे-

वून सर्व बंदोबस्त करून रत्नाकरपंत लष्करांत गेले व खासा स्वारी **श्रीबाबा** महाराजांच्या दर्शनासाठीं करविरीं गेली.

शिंद्यांकडील बाया महाराजांच्या दर्शनास भाल्या व या प्रांताचा दंगा बंद झाला. **महादजीच्या** रारवेची कन्या तिच्या मातोश्री सह तिजबरोबर होती. तिला मुरारराव घोरपडे यांस देण्याचें ठरवून वैशाखमासीं राजापूर व खिद्रापूर नजीक अकीवाट येथें लग्न करण्याचें ठरलें. त्या प्रमाणें दिला लावण्यास शिंद्याकडील मंडळी व बाया सरंजाम घेऊन आल्या. दिवयाच्या समारंभास बायांनीं दागिनें व कापड सुद्धां अजमासें खर्च ५०,६० हजार रुपये पर्यंत केला. लग्न समारंभ आटपल्यावर बायाही पुण्यास माघान्या गेल्या, व मुरारराव्याची करविरीं रवानगी करून दिली.

(शके १७२१ इ.स. १७९९) महाराजांची स्वारी **अकेवाडाहून बोरवाडास** व तेथून **हमिदवाडास** गेली. या प्रमाणें कोल्हापूरकरांचा क्रम कर्नाटक प्रांतीं नानाच्या फुशीवरून सरासर अबाधित चालला होता. कारण **परशुराम भाऊ** निकडे पुण्यास अटकेंत असल्यामुळें त्यांस कोणाचेंच भय नाहींसें झालें. इतक्यांत नाना व भाऊ यांची एकी झाली. कोल्हापूरकरांचें प्रकरण अनावर झालें, त्या विषयीं पुण्याच्या दरबारी धास्ती पडली. जरी टिपुसुलतानावर स्वारी करण्याचें ठरलें होतें, तरी करवीरकर महाराजांचें बंड अगोदर मोडावें असा पुण्याच्या दरबारीं निश्चय झाला, आणि भाऊंस त्या कामगिरीवर नेमिलें. ही गोष्ट त्यांस प्रिय होतीच. त्यांनीं लागलीच जंगी फौज जमवून चिकोडीस येऊन तळ दिला. हें वर्तमान महाराजांस समजतांच हामिदवाड येथें महाराजांनीं आपली सारी फौज जमविली. तेथून **पद्मणकुडीचे** रानांत तळावेस जाऊन दोन अडीच महिने उभय फौजांच्या लढाया होत होत्या. भाऊंस महाराजांच्या फौजेची मुळींच दर्द्वाकत नसे. दोन अडीच महिने ज्या लहान लहान लढाया चालल्या होत्या, त्यांत महाराजांकडील फौजेचाच जास्त नाश होत होता. या प्रमाणें

चोरट्या लढाईनें काल घालवून व्यर्थ बलहीन होण्या पेक्षां एकदम सर्व फौज जमा करून जंगी तयारीनें शाबूच्या फौजेवर चालून जाऊन हल्ला करावा, आणि शाबूस पिटालून लावावें, असा निश्चय करून सर्व फौज व सर्व सरदार एके ठिकाणी जमा करून महाराजांची स्वारी भाद्रपद शु० ४ तारीख ४ सप्टेंबर रोजी हमिद चाडाहून पट्टणकुडीच्या रानांत दाखल झाली. महाराजांकडील एकंदर फौज अजमासें १६००० होती. तिच्या त्यांनीं चार टोळ्या करून चारी दिशांस उभ्या केल्या. दक्षिण बाजूच्या टोळींत **नारायणराव** घोरपडे सेनापति, **विश्वासराव** घाटगे सर्जेराव, **हैबतराव** गायकवाड विश्वासराव यांचे पथकें, आणि सामानगडकरी व मुदरगडकरी येणें प्रमाणें होते. पश्चिमेकडील टोळींत **भीतिराव** चव्हाण हिम्मतबहादर ममलकत मदार, **रायाजीराव** जसवंतसुलूख आणि **महाराजांची** खासास्वारी, **खासबारदार** वगैरे लोकांसह होती. उत्तर बाजूस **रत्नाकर** पंडित राजाज्ञ वगैरे सरदार होते; आणि पूर्व आघाडीस **पांढरे** यांचें पथक, **जोत्याजीराव** कदम यांचें पथक व एकांडे लोक वगैरे होते. या प्रमाणें राज्यांतील निवडक फौज जमवून सदरहू प्रमाणें व्यवस्थेनें पट्टणकुडीच्या रानांतील नाक्याच्या टेंकड्यांवर उभी केली होती. रुप्याचे हौदाचे व निशाणाचे हत्ती प्रत्येक टोळींतील मुख्य सरदारापाशीं उभे होते; सर्व फौजेच्या आघाडीस जेजाला व तोफा लादून शृंगारलेले उंट उभे होते. महाराजाकडील खासबारदार लोकांनीं जोरचंडी चिलखतें व शिरस्त्राणें धारण केलीं होतीं. भाले व तरवारी वाल्या स्वारांच्या टोळ्या पायदळांत मधून मधून जिकडे तिकडे उभ्या केल्या होत्या. या प्रमाणें घोर संग्रामाची तयारी करून शाबूच्या तोंडावर निघाले.

महाराजांची खासास्वारी जंगी फौज घेऊन पट्टणकुडीच्या रानांत दाखल झाल्याची बातमी आली. तेव्हां **परशुरामभाऊ** भोजन करून बुदबळें खेळत बसले होते. त्यांणीं फौज व तोफ-

रवाना लढाई देण्यास पाठवावा, म्हणून सांगून आपण तसेंच बुद्दबढें रवेलत बसले त्याजकडील फौज व तोफखाना लढाईस पुढें आला; व त्यांनीं उत्तर बाजूस राजाज्ञाच्या टोळीवर हल्ला केला. तेव्हां पूर्व बाजूस **पांढरे** यांचे पथक होतें. व तें उत्तर बाजूनें पुढें सरसावलें आणि लढाईस आरंभ केला. पटवर्धनांनीं सपाट्या सरशी तोफांचा भडिमार सुरू केला; या मुळें महाराजांकडील लोकांची एकच धांदल उडून गेली. निशाणाच्या हत्तींवर चढाई करून त्यांस घेरलें. **पांढरे** याजकडील पांच सात सरदार ठार झाले. तेव्हां बाकीच्या लोकांनीं कच खाल्ला. हें वर्तमान महाराजांकडे येतांच **हिम्मतबहादूर** ममलकत मदार यांणीं विनंति केली कीं, "या वेळीं महाराजांनीं खंबीरी करून पुढें व्हावें; समय हाच आहे. **महाराजांनीं** हिम्मत धरली असतांसे कांस दुप्पट दम व वीरश्री येईल. येणें करून महाराजांचा इमेला वर्णन करण्याजोगा लौकीक होऊन शत्रूचा क्षय होईल." हें ऐकून महाराजांस ही वीरश्री चढली व ते सिद्ध झाले. त्यांणीं राजाज्ञाकडेस पहातांच जोहार करून एकदोन पथकें व पागा घेऊन तेही महाराजां बरोबर निघाले. मग काय विचारतां? खासे निघतांच सर्व सरदारही पुढें सरले. फौजेंतील लोकांस स्फुरण चढून आपली हिम्मत व कर्तबगारी दाखविण्याचा हाच प्रसंग आहे असें मनांत आणून शत्रूवर चढाई केली. प्रथम **पांढरे** याजकडील निशाणाचा हत्ती शत्रूंनीं घेरला होता, त्या ठिकाणी झगट करून मोठ्या आवेशानें शत्रूच्या फौजेवर जाऊन पडले. असा हल्ला आल्यास बचाव करण्याची पटवर्धनाची तयारी नव्हती. महाराजांच्या लोकांनीं निशाणाचा हत्ती सोडवून घेऊन शत्रूच्या फौजेचा मोड केला. इतक्यांत दक्षिणेकडील टोळींतील **सेनापति, घाटगे, विठ्ठलराव** वगैरे सरदारांनीं शत्रूच्या गोटावर हल्ला करून गोट लुटला. व शत्रूकडील लोकांची कत्तल करण्यास आरंभ केला. इ-

तकी दुर्दशा एका घटकेंत झाली, असें भाऊस समजतांच बु-
दबळांतील लटकी लढाई टाकून रक्त्या लढाईस डेव्यातून बाहेर आ
ले, आणि आपण ढिलेपणानें लढाई केली त्याचा त्यास पश्चात्ताप
झाला. लगेच घोड्यावर स्वार होऊन गोटांतील फौजेची थावरा-
थावर करून फौज जमविली, आणि लढाई देण्यास निघाले. महा-
राजांकडील नारायणराव घोरपडे सेनापति, हैबतराव
गायकवाड, आणि त्यांचे दोघे बंधु दवलतराव सरखवास व वि-
श्वासराव जवळ तयारच होते, यानीं जलदी केली; आणि आप-
ल्याकडील पागेच्या लोकांस, खासपागेच्या लोकांस, व भलेलो-
कांस तें बेधडक पुढें सरून भाऊच्या तोंडावर चालून गेले. ल-
ढाई मोठ्या निकरानें झाली. भाऊंच्या लोकांकडील लढाईची
शिस्त अगोदर पासूनच बिघडलेली होती, या मुळें त्यांचा जम
बसेना आणि खुद्द महाराज आपल्या सरदारांत व लोकांस हिं-
मत देण्यास समीप असल्यानें जो कोल्हापूरच्या लोकांस आवे-
श आला होता त्या पुढें भाऊंचें कांहीं चालेना. अखेर भाऊंस ल-
ढाईत भारी जखमा लागूनतेघायाळ झाले व त्यांच्या फौजेचा अग-
दीं मोड झाला. वडील जखमी होऊन घायाळ झाल्याचें वर्त-
मान समजतांच भाऊंचे चिरंजीव रामचंद्र राव लष्कर सोडून प-
ळून जमारिंडी-कडे गेले. त्याचे पाठीमागें पाठलाग करीत रा-
जाज्ञे फौजेसुद्धां जमारिंडी नजीक गेले. परंतु रामचंद्र राव ह-
स्तगत न होतां दवडीनें जमरिंडीच्या गाण्यांत जाऊन पोंचले.
सबब राजाज्ञे माघारे चिकोडीस आले. एथें भाऊंचा मूळचा
तळ होता. नेथें तीस चाळीस हजाराचें कापड सांपडलें. तें
घेऊन राजाज्ञ लष्करांत आले. इकडील लोकांनीं भाऊंचा सारा
गोट लुटून व जाळून फस्त केला. भाऊंस फार जखमा लाग-
ल्या असतां जीव वाचविण्या करितां त्यांस तसेंच टाकून त्यांज-
कडील सर्व सरदार व लोक, खुद्द त्यांच्या चिरंजिवा सुद्धां पळून गेले.

ही गोष्ट त्यांनीं मोठ्या शरमेची केली. ज्यानें शेंकडो लढायांत यश संपादून आपली कीर्ति सर्व भरतखंडांत गाजविली, व ज्याणें कोल्हापूरकरांस आज पर्यंत जर्जर केलें होतें, त्याच्याच कडून पराभव पावून त्यांच्या हातीं जरबमी होऊन सांपडावें. मुलगा जवळ असतां त्यानें देखील पळून जावें आणि घायाळ झालेल्या भाऊस पाणी देण्यास किंवा त्याचे प्राणोत्क्रमण झाल्यावर दहन करण्यास सुद्धां कोणी समीप नसावें, असें त्याच्या नशिबीं आलें! यास्तव दैवाची गति फार अगाध व विचित्र आहे !!! जेव्हां कोल्हापूरकरांनीं **अळत्याच्या** लढाईत रामचंद्ररावांस पाडाव करून नेलें, सबहुमानाने परत पाठविलें आणि रामचंद्ररावानें, महाराजावर आपण कधीं तलवार धरणार नाहीं व बडिलांस ही घरूं देणार नाहीं अशी शपथ घेतली होती, तेव्हां मुलगा लढाईत मेला असता नर याहून उत्तम झालें असतें, असें म्हणून त्याची क्रिया शपथ ऐकण्यास त्याची भेट न घेतां व त्याचें मुख न पाहतां तयारी करून ज्या मर्दानें कोल्हापूरकरांची लढाई करून पंधरालक्ष रुपये हबकले व फेडहोई पर्यंत हव्यास्या शेलक्या लोकांस करविराहून मोठ्या विजयानें नेलें व या प्रमाणें आजन्म ज्याणें वीरास योग्य असेंच वर्तन केलें, त्या वीरासजवळ मरण यावें तसेंच रणांत आलें; ही मोठी त्याची सुकीर्ति होय.

असो; लढाईत भाऊस जबर जखमा लागल्या होत्या. तेणें करून जेर होऊन त्यांनीं स्वकरस्व प्राणोत्क्रमण केलें. नंतर त्यांचें शव हमिदवाड्यास नेऊन त्या गावच्या तळ्या नजीक रामचंद्र जोशीराव याजकडून यथाविधि सार्थक महाराजांनीं करविलें.

या प्रमाणें महाराजांकडील लोकांनीं लढाईत शर्थ केली, त्यांच्या पुण्यप्रतापें करून यश ही आलें. एक दोन रोजांनीं विकोडी भांतीनिल वाणीं घेण्यास लोक रवाना करून स्वारीस्वारी कुच करून विजयी होत्साती करविरास परत आली.

भाऊचे चिरंजीव जमखिंडीस पळून गेले होते, ते तेथून थेट पुण्यास गेले, त्यांस "भाऊजरबमांनीं घायाळ झाले असतांही कोल्हापूर

चोरट्या लढाईनें काम घालवून व्यर्थ बलहीन होण्या पेक्षां एकदम सर्व फौज जमा करून जंगी तयारीनें शत्रूच्या फौजेवर चालून जाऊन हल्ला करावा, आणि शत्रूस पिटाळून लावावें, असा निश्चय करून सर्व फौज व सर्व सरदार एके ठिकाणी जमा करून महाराजांची स्वारी भाद्रपद शु० ४ तारीख ४ सप्टेंबर रोजी हमिदवाडाहून पन्हाळकुडीच्या रानांत दाखल झाली. महाराजांकडील एकंदर फौज अजमासें १६००० होती. तिच्या त्यांनीं चार टोळ्या करून चारी दिशांस उभ्या केल्या. दक्षिण बाजूच्या टोळींत **नारायणराव** घोरपडे सेनापति, **विश्वासराव** घाटगे सर्जेराव, **हैबतराव** गायकवाड विश्वासराव यांचीं पथकें, आणि साप्तानगडकरी व मुदरगडकरी येणें प्रमाणें होते. पश्चिमेकडील टोळींत **भोसिराव** चव्हाण हिम्मत बहादर ममलकत मदार, **रायाजीराव** जपत मुलूख आणि **महाराजांची** खासास्वारी, **खासबारदार** वगैरे लोकांसह होती. उत्तर बाजूस **रत्नाकर** पंडित राजाज्ञ वगैरे सरदार होते, आणि पूर्व आघाडीस **पांढरे** यांचें पथक, **जोत्याजीराव** कदम यांचें पथक व एकांडे लोक वगैरे होते या प्रमाणें राज्यांतील निवडक फौज जमवून सदरहू प्रमाणें व्यवस्थेनें पन्हाळकुडीच्या रानांतील नाक्याच्या टेंकड्यांवर उभी केली होती. रुप्याचे हौदाचे व निशाणाचे हत्ती प्रत्येक टोळींतील मुख्य सरदारापाशीं उभे होते; सर्व फौजेच्या आघाडीस जेजाला व तोफा लादून शृंगारलेले उंट उभे होते. महाराजांकडील खासबारदार लोकांनीं खोरवडी चिलखतें व शिरस्त्राणें धारण केलीं होतीं. भाले व तरवारी वाल्या स्वारांच्या टोळ्या पायदळांत मधून मधून जिकडे तिकडे उभ्या केल्या होत्या. या प्रमाणें घोर संग्रामाची तयारी करून शत्रूच्या तोंडावर निघाले.

महाराजांची खासास्वारी जंगी फौज घेऊन पन्हाळकुडीच्या रानांत दाखल झाल्याची वातमी आली. तेव्हां **परशुरामभाऊ** भोजन करून बुद्धबळें खेळत बसले होते. त्यांणीं फौज व तोफ-

करांकडील **विश्वासराव** गायकवाड यानें तुकडे तुकडे करून ठार मारिलें" असा खोटा मजकूर कोणीं कळविला होता, तेणें करून त्यांस अत्यंत त्वेष आला. बडिलांच्या वधाबद्दल सूड घेईन तरच जीव ठेवीन, असा त्यानीं मनांत निश्चय केला; आणि आपण पाडाव झालों तेव्हां कोल्हापूरच्या महाराजांनीं आपणास कसें वागविलें, व त्या वेळीं आपण आणाशपथा काय घेतल्या होत्या, त्यांचा विचार न करितां डोळ्यांत आंसवें आणून पेशवे व शिंदे यांस पित्याच्या क्रूरवधाची जी हकीकत ऐकिली होती, ती मोठ्या करूण स्वराने निवेदन करून उभयतांकडे साह्य मागितलें. रामचंद्र रावानें आणखी सांगितलें कीं, जर मला पित्याच्या वधाचा योग्य रीतीनें सूड घेतां आला तर भूतली जन्मास आल्याचें सार्थक झालें, असें समजेन; आणि तसें न घडलें तर सर्व परित्याग करून संन्यास घेऊन काशीवासास जाईन. पेशव्यांस ही कोल्हापूरचें प्रस्थ दिवसें दिवस माजत चाललें तें इष्ट नसून त्याचें पारडें हलकें करावें असें वाटत होतें. यास्तव रामचंद्र रावाच्या विनंतीस तत्काळ रुकार मिळाला. पंत प्रधानांनीं **बजाबा** शिराळकर यास फौजे सह रामचंद्र रावा बरोबर जाण्यास आज्ञा केली. तसेंच शिंद्यानीहीं आपलीं पलटणें व **व्यंकोजी शिंदे** आणि **गणोबा भिकाजी** मसूरकर या सरदारांस पाठविलें. रामचंद्र रावानेंही तयारी करून आपली फौज जमाविली, आणि पुण्याहून आणलेली व आपली स्वतःची अशी फौज घेऊन ते करविरास निघाले. (सन १७९९ नोवेंबर, शके १७२१ राजश्रीक १२६). आणि कोल्हापूर प्रांतांत शिरून त्यांचा **शिरोळास** पहिला मुक्काम झाला. हे वर्तमान महाराजांस कळतांच **रत्नाकर** पंडित राजाज्ञ, **चतुरशिंगराव** भोंसले व **नाना** पाटणकर सरलष्कर वगैरे सरदार यांस फौजे सुद्धां करविराहून रवाना केलें. ते कसबा कोडोलीस जाऊन राहिले. नंतर पौषमासीं **वोरपाडली** नजीक दोहोंकडील सैन्याची गांठ पडली, आणि वद्य १२ तारीख २३ जानेवारी सन १८०० रोजीं लढाई झाली. ती

अहुतेक बराबरीचीच झाली व दोहों कडील मनुष्येंही जाया जंत्वमी फार झालीं; तरी कोल्हापूरची फौज कचरली. तेथून दाबू निघून फौजे सुद्धां मौजे शिरोली नजीक पंचगंगेच्या किनारी उतरले. नंतर माघ शु० ८ तारीख २ फेब्रूआरी रविवारी फौजेची तयारी करून लढाई देण्यास जयंतीचा (मितीचा) ओढा उतरून चांफाल्याच्या माळावर आले. कोल्हापूरची फौज ही त्यांच्या तोंडावर गेली; व मोठी लढाई झाली. तीन शाब्रूस मोठेंसें यश आलें असें जरी झालें नाहीं तरी त्यांनी कोल्हापूरच्या फौजेस किल्ल्यांत हाकून दाविलें. व नारायणराव घोरपडे सेनापति यास पाडाव करून नेलें. त्यांस घेऊन रामचंद्रराव फौजे सुद्धां मुक्कामास गेले. त्याच दिवशीं रंकाळ्या नजीक गुळें उतरलें होतें, तें इचल करंजीकर यांणीं लुटून गुरें, मेंढरें ही ते घेऊन गेले. त्याच रात्रीं महाराजांनीं राजाज्ञास व दुसऱ्या सरदारांस बोलावून आणून पुढें विचार कसा करावयाचा, या विषयीं सल्ला विचारिली.

महाराज म्हणाले कीं, **पटवर्धन** यांणीं आपली सारी फौज व पेशव्यांकडील फौज आणिली आहे. एवढीच असती तर तिच्याशीं आम्हीं कशीबशी टक्कर मारिली असती. परंतु **शिंद्यांची** इंग्रजी कवाईत शिकलेली मेजर **ब्राउनिंग** यांच्या हातखालची पांच पलटणें व तोफखाना पटवर्धनांनीं आणिला आहे. त्या बरोबर लढाईस आमची फौज कशी टिकते, याचा सिद्धांत मोठा अंदेशा आहे. अशा दुर्घट प्रसंगीं किल्ल्याचा बचाव कसा होतो! तेव्हां **राजाज्ञ** यांणीं विनंति केली, कीं प्रसंग तर दुर्घट खरा, तथापि धैर्य खचूं न देतां धिम्मेपणानें शत्रूशीं टक्कर मारिली पाहिजे. अशा समयीं महाराजांनीं येथें रहाणें ठीक नव्हे, यास्तव **महाराजांची** स्वारी, **रवाशामहाराजांच्या** स्वाऱ्या, व श्री **बाबा** महाराजांची कुटुंब सुद्धां स्वारी पन्हाळ्यास जावी; आम्हीं सर्व येथे राहून शहरचा बंदोबस्त करून लढाई देतों. ही सल्ला महाराजांस व इतरांस पसंत पडली. आणि महाराजांनीं **श्रीबाबा** महाराजांकडे जाऊन सर्व मजकूर कबविला

ला. तेव्हां राजाज्ञांच्या सल्ल्या शिवाय दुसरी सल्ला या प्रसंगीं उपयोगी नाहीं. राजाज्ञ म्हणतात त्या अन्वयें करावें, अशी **श्रीबाबा** महाराज यांणीं आज्ञा केली. नंतर महाराजांनीं विनंति केली कीं, श्रीची स्वारी निघण्याची तयारी व्हावी. तेव्हां श्रीनें सांगितलें, कीं राजाज्ञ येथें रहाणार; सबब आम्हीं ही येथेंच रहातों. आपण **बाबा महाराज, नानामहाराज** व **भाऊमहाराज** यांणीं कुटुंब सुद्धां घेऊन जावें. अशी आज्ञा होतांच स्वारी वाड्यांत येऊन निघण्याची तयारी करण्यास आज्ञा केली. राजाज्ञाजवळ **नांकरराव** शिंदे सेना खासकील तोरगल्कर, **प्रीतिराव** चव्हाण उमदेतुल उमराव बहादर, **निळकंठराव** शिंदे साहेब खुभा, **आबादियारजंग** व **सफदरजंग** पठाण पन्हाळकर, **रामचंद्र** भगवंत बेडकी हाळकर आणि **एकांडे** मानकरी व **खासबारदार** वगैरेंची पथकें, **बाजीराव** कृष्ण रेणावीकर यांचें पथक, **बंदुकबारदार**, **पंतप्रतिनिधि** कडील लोकांचा जमाव, **अमात्या** कडील लोकांचा जमाव व गांवगन्नाचे सनदी प्यादे यांस करविरास ठेविलें. **बळवंतराव** पंडित प्रतिनिधि, **नारायणराव** पटवर्धन सरलष्कर, **चतुरसिंग** राव भोसले, **हैबतराव** गायकवाड विश्वासराव, **दौलतराव** गायकवाड सरखवास, **विश्वासराव** गायकवाड, **रायाजी** जाधव **जप्तनमुल्लख** वगैरे सरदारांस स्वारी बरोबर कुटुंब सुद्धां निघण्याचा हुकूम झाला. नंतर स्वारी निघण्याची तयारी होऊन खाशा महालाच्या स्वाऱ्या, व श्रीबाबामहाराज वगैरे त्रिवर्ग व दुसरे सरदार सुद्धां खासा स्वारी रंकाळ्यावर आली. त्या ठिकाणीं राजाज्ञ व उमदेतुल उमराव यांस महाराजांनीं आज्ञा केली कीं, आपापली मेहनत करून किल्ला रक्षण करावा. शत्रूच्या हातीं जाऊं देऊं नये. तेव्हां उभयतांनीं उत्तर दिलें कीं, आम्ही सेवक जिवंत आहों तों पर्यंत किल्ला शत्रूच्या हातांत जाणार नाहीं, ही प्रतिज्ञा समजावी; असें बोलून हुजूरच्या चरणावर मस्तक ठेविलें. त्या समयीं महाराज बोलले, कीं राजा-

ज व तुम्ही गुरूबंधु आहांत. या परती कोणती आज्ञा होणेंची, असें म्हणून आपल्या मस्तकावरील तिवट काढून उमदेतुल उमराव यास दिल्हें आणि याची शरम राखावी असें सांगितलें. हें सरकारी तिवट प्राणार्दीक आहे. याची मी नित्य पूजा करीन. जी पूर्वी प्रतिज्ञा केली आहे तीत किमपी अंतर करणार नाहीं, हें सरकारांनीं पक्कें समजावें; असें म्हणतांच स्वारी चालती झाली. परंतु दृतक्यांत स्वारी जाते, त्या पेक्षां आम्ही येथें कोणाचे म्हणून उदावें, अशी विनंति करून नायकवडी आडवे आले तेव्हां घोळ पडून त्या दिवशीं स्वारीचें रहाणें झालें. दुसरे दिवशी राजाज्ञ पदर पसरून बोलले कीं, अशा बिकट प्रसंगीं सरकारास येथें रहाणें सुरक्षित नाहीं. यास्तव महाराज आहेत, आणि राजाज्ञ गेले असें मनांत आणून सेवा करावी. अगोदर आमचा प्राण जाईल, मग तुमचें काय होणें तें होईल, ही खात्री बाळगावी. अशी अनेक प्रकारें त्यांची समजूत घालून स्वारीच्या जाण्यास अडथळा करूं नये असें ठरविलें, आणि माघ शु० १० तारीख ५ फेब्रूआरी रोजीं संध्याकाळी स्वारी करविराहू निघून चालती झाली, ती पहाटेच्या तास रात्रीस किल्ल्याच्या चार दरवाजा नजीक येऊन पोंचली. दरवाजे महामूर सबब मंगळवार पेठेंत मुक्काम होऊन दुसरे दिवशीं खाशा महालच्या स्वाऱ्या, श्रीबाबा महाराज, नानामहाराज व भाऊमहाराज यांच्या कुटुंब सुद्धां स्वाऱ्या व जे सरदार समागमे होते त्यांचीं कुटुंबें यांस किल्ल्यावर रहाण्यास रवाना केलें; आणि खासा स्वारी रेडेघाटीच्या चौकींत राहिली. व बरोबरचे लोक, स्वार व पायदल घेऊन बळवंतराव प्रतिनिधि यांस राक्षीच्या वाडीवर जाऊन उतरण्या विषयीं आज्ञा केली, त्या प्रमाणें तेही तिकडे जाऊन राहिले.

स्वारी गेल्यावर दुसरे दिवशीं **राजाज्ञ** यांणीं उमदेतुल उमराव यास दिचारिलें, कीं जर तुम्ही लोकांचे खर्चाचा व किल्ल्याचा बंदोबस्त कराल, तर मग जी देश संभाळण्यास सांगाल ती मी संभाळीन, किंवा जी दुसरी कामगिरी सांगाल ती करीन. तेव्हां त्यांणीं सांगितः

तेंकीं किल्ल्याचा व लोकांचा बंदोबस्त आपणच करावा, आमच्या हातून व्हावयाचा नाहीं; आम्हीं विजापूर (आदितवार) वेशीस पारसनवीस याच्या घरीं राहून आमच्या निसबतीचीं पथकें व पागेचे लोक आहेत त्यांस वेशीच्या बुरजावर व तटांवर चौक्या नेमून देऊन ठेवितों. या प्रमाणें त्यांनीं केल्यावर राजाज्ञ यांणीं साऱ्या वेशींवर सरदार नेमून आपण गंगेच्या वेशीस रहाण्याचा बेत ठरविला; नंतर बुरजांवर व तटांवर खासबारदार लोक व बंदुकबारदार लोक यांस नेमून आपण जातीनिशीं जाऊन जागा पाहून चौक्या बेतिल्या. या प्रमाणें किल्ल्याचा बंदोबस्त करण्यांत अस्तमान झाला. संध्याकाळीं राजाज्ञ घरीं येऊन स्नान करून संध्या आटपल्यावर चिंताक्रांत होऊन पाटावर बसले होते. इतक्यांत वेदमूर्ति राजश्री चिंतामणा भटजी परांडेकर देवघरांत आले. तेव्हां राजाज्ञ यांणीं भटजींस नमस्कार करून बसविलें, आणि प्रसंग तर दुर्घट प्राप्त झाला आहे, किल्ला रक्षण करण्याची मी महाराजांसन्निध प्रतिज्ञा केली आहे, तीं श्री कधी सिद्धिस नेईल या काळजींत आहें; असें भटजींस सांगतांच भटजी म्हणाले, तुम्हीं या विषयीं चिंता करूं नये; किल्ला शत्रूच्या हातीं श्रीभवानी जाऊं देणार नाहीं. हें गंडांतर साडेतीन महिन्याचें आहे. तुमची फौज आलेल्या पलटणाबरोबर लढाई देऊन यश घेणार यांत संशय नाहीं. तुमची प्रतिज्ञा खरी करणार श्री समर्थ आहे. या अन्वयें आम्हांस ह्मी श्रीची आज्ञा झाली आहे. यास्तव खचीं ठेवावी, आणि चित्तांत तिळप्राय अंदेशा न धरितां स्वामी सेवेस तत्पर असावें, व शत्रूंची भीति न धरितां स्वस्थ रहावें. असें सांगून भटजीनीं एक सुपारी राजाज्ञांचे हातीं दिली. दुसरे दिवशीं राजाज्ञ आपल्या वाड्यांतून निघून गंगावेशीच्या चौकींत जाऊन राहिले. देवघराकडील सरवागमपंत कुलकर्णी पिंपळीकर यांचें घर नजीक होतें. त्या घरांत स्नान, पूजा व भोजन करीत.

रामचंद्र रावाचा तळ शिरोली नजीक असतांच माघ शुद्ध १२ रोजीं महाराज पन्हाळ्यावर गेल्याची बातमी कळली. तेव्हां तिकडे जाऊन छा-

पा घालावा, अशी मसलत करून फौजे सुद्धां रामचंद्रराव रेडेघाटी जवळ आले. महाराजांकडील फौज घेऊन दौलतराव व विश्वासराव गायकवाड तलावेस फिरत होते. माघ वद्य १८ रोजीं रात्रीं फौजेची तयारी करून अरुणोदयीं असुरक्याच्या ओढ्या नजीक राक्षीच्या ओढ्यावर महाराजांची फौज उतरली होती तिजवर रामचंद्ररावानें छापा घातला. तलावेस फौज फिरत होती, ती ही येऊन दोहों फौजांची तुंबळ लढाई झाली. दोहों कडील माणसें जायाजखमी बहुत झालीं. **हैबतराव** गायकवाड यास जखमा लागल्या. परंतु आंगात चिलखत होतें, म्हणून जखमा हलक्या लागल्या. **दौलतरावास** वाथ्यांत (वाथेत) भाल्याची जखम जबर लागली. **विश्वासराव** पाडाव झाले. त्यांस धरून असुरले नजीक **रामचंद्ररावा** पाशीं नेलें. तेव्हां त्यांनी लागलाच हुकूम केला कीं, त्यांचा गळा कापावा. पाडाव झालेल्या मनुष्याचा गळा कापणें हें योग्य होणार नाहीं. मर्जी असल्यास त्यांस कैदेंत ठेवावें. असें सर्वांनीं सांगतांच रामचंद्रपंत म्हणाले कीं, विश्वास रावांनीं आमच्या वडिलांस मारलें आहे, सबब यांस ठेवावयाचें नाहीं. असें म्हणून कानांत व नाकांत दारू भरून उडवून मारिलें. गायकवाड यांचे मावळे शिंदे मळणगांवकर शाहूकडे होते. त्यांणी मुडदा मागून घेऊन सायंकाळी पन्हाळ्यास आणिला. दौलतरावही जखमेनें मुडदा येण्या पूर्वीच मृत्यु पावले होते. तेव्हां दोन्ही भावांचें एकदांच सार्थक केलें. गायकवाडास मारल्यावर पटवर्धन फौजे सुद्धा तळास गेले. दुसरे दिवशी गायकवाडांची माता श्री **गोदूबाई** इच्या समाचारासाठीं महाराजांची स्वारी त्यांचे घरीं गेली असतां तिला व हैबतरावास म्हणाले, कीं तुम्ही कष्टी होऊं नका; होणारास उपाय नाहीं. तुमचे चालविण्यास आम्ही कमी करणार नाहीं.

या प्रमाणें महाराजांनीं शांतवन केल्यावर बाईनीं विनंति केली, कीं उभयतां चिरंजिवांनीं सरकार सेवेंत प्राण दिला, आणि गायकवाडांच्या पोटीं जन्म घेतल्याचें सार्थक करून लौकीक मिळविला, या स्तव पुत्रगे-

त्याचा मी शोक करीत नाहीं. त्यांस सद्गति मिळाली आहे. हें ऐकून महाराज सद्गदीत झाले, आणि दोघांच्या कुंटुंबांस मौजे कोथळी तर्फ बोरगांव हा गांव रांडरोडीस देऊन उत्तरकार्यास ही खर्चास दिले.

या प्रमाणें राक्षसीच्या ओढ्या वरील जय संपादून भाऊंस ज्यांनीं साक्षात् मारिलें असें आपणास कळलें होतें न्याचा फडशा केला. पुढें पन्हाळगड फार दुर्धर, त्यावर आपला खप साधणार नाहीं; यास्तव त्यावर छापा घालण्याचा नाद टाकून आपणांनीं करवीरचे कोटास वेढा देण्याचें ठरविलें त्या ठरावा अन्वयें आपा फौजे सुद्धां परत येऊन फाल्गुन शुद्ध ४ तारीख २८ फेब्रूआरी गुरुवारीं करवीरच्या कोटास कडेकोट वेढा देऊन मोर्चे बंदी केली, आणि दररोज पलटणींनीस तोफांची मारगिरी करूं लागले; या मुळें शहरांतील माणसें फार जेरीस आलीं.

शहरची अशी अवस्था झाल्याचें महाराजांस समजलें. तेव्हां गोंवेकर इटाव साहेब महाराज सरकारचे बहुता दिवसांचे स्नेही पलटण सुद्धां गोंवे बंदरीं आहेत; त्यांजकडे वकील पाठवून त्यांचीं पलटणें कुमकेस आणावीं, अशी मसलत ठरवून फाल्गून व॥ १, तारीख १२ मार्च रोजीं नागोजीराव घाटगे झुंजारराव; रघुनाथराव गायकवाड, महिपतराव पारसनवीस, बाळाजी सखाराम निसबत प्रतिनिधि, बाळाजी मल्हार निंबाळकर व फरीदभाई भोरी यांस थैली देऊन गोंव्यास रवाना केलें. तसेंच सखाराम घाटगे सर्जेराव पुण्यास दौलतराव शिंद्यापाशीं होते. त्यांजकडे कोणीं पाठवून गराव करून शह उठवावा असा विचार करून शिंदे अलिजाबहादर यांस आणि मशा र निम्हे घाटगे यांस आज्ञापत्रें देऊन आंकाराम यादव हवलदार यास पुण्यास पाठाविलें.

धोंडोपंत गोरवले कर्नाटकांत होते त्यांस पत्र लिहून रामचंद्ररावांनीं फौजे सुद्धां करविरीं कुमकेस बोलाविलें. नानाफडणवीस यांचे मजकुरीं फाल्गून शु० १३ तारीख ९ मार्च रोजीं वारले, आणि त्याच

दिवशीं पहाटेस चार घटका रात्रीस करवीरीं **धोंडोपंत** गोखले* जमावा सुद्धां येऊन दाखल झाले. नंतर शिबांकडील पलटणें व तोफा घेऊन **रामचंद्रराव** मोजे वडणगें नजीक पंचगंगेच्या किनारीं उतरले, आणि गोखले यांस रंकाळवेशी नजीक ठेविलें. मग शिबांच्या तोफा पंचगंगावेशीच्या सुमारास आणवून दररोज प्रातःकाळीं दोन तास व सायंकाळीं तास दीड तास या प्रमाणें करवीरच्या किल्ल्याच्या तटावर व बुरुजांवर फाल्गून शु० १४ भृगूवार तारीख १० मार्च पासून मारगिरी करूं लागले.

यादव पुण्यास पोंचले, व घाटगे यांस आज्ञापत्रें देऊन मजकूर कळविला. तेव्हां घाटगे यांचें म्हणणें पडलें कीं, कागल तालुका आमच्या घराण्यांतील वडील यशवंतराव घाटगे यांजकडे सरकारातून चालत आहे. यास्तव त्यांची समजूत काढून, जर सदर तालुका आम्हांकडे देणें होईल, तर अलिजाबहादुराकडे सक्त मेहनतीनें रदबदली करून कोल्हापूरचा वाद उठविण्याची कांहीं तरी तोड काढण्यास यत्न करीन. हा मजकूर यादव यांणीं महाराजांकडे लिहून पाठवून तालुका देण्याविषयीं रुकार आणविला. या प्रमाणें कोल्हापुराहून उत्तर येऊन पोंचण्यास १०।१२ दिवस लागले.

या काळांत इकडे करविरीं तटावर मारगिरी चाललीच होती, परंतु किल्ल्याचा तट २० फूट उंच व १० पासून २० फूट पर्यंत रुंद असून मोठमोठ्या दगडांनीं मजबूद बांधलेला होता व जागजागीं ४५ बुरूज होते. आंत तटावर व बुरुजांवर चौक्या असून गोलंदाज व बंदुक बारदार ही मारगिरी करीत होते. शिवाय कोठें तट पडला कीं, तेवढा लागलाच बांधून घेत असत. आंतील लोक उंच जागीं होते, सबब त्यांच्या बंदुकीच्या मारगिरी पुढें बाहेरच्या लोकांस तटा नजीक येण्यास सांपडत नसे. इतक्यांत आकाराम यादव हवलदार पुण्याहून १५ रोजांच्या तहकूब चिठ्या घेऊन फाल्गून वद्य ३० छ २८ सव्वाल, तारीख २५ मार्च सन १८००

---

* रोजनिशींत बापूजी गणेश गोरले असें नांव आढळतें.

इसवी रोजीं करविरीं दारुगड झाले. त्यांतील मजकूर असा होता कीं, " १५ दिवस गाळागोळी बंद असावी. बाहेरच्या लोकांनीं गोळा मारूंनये, व आंतून करवीरच्या कोटावरून गोळा मारूंनये. बोलण्याचा ठराव होईपर्यंत शहरा सभोंवता शाह देऊन असावें; आणि महाराजांनीं वेदशास्त्रसंपन्न भाऊजोग्गिराव, राजश्री रायाजी जाधवजप्तन मुल्हरव आणि विश्वासराव घाटगे सर्जाराव या त्रिवर्गांसि पुण्यास पाठवावें. ते येऊन अखेर ठराव झाल्यावर फौजेचा शाह उठेल. " पुण्याचीं पत्रे व चिठ्या घेऊन शिवाजी अंबाजी व बच्चाजी बल्लाळ व पुण्याहून आलेले जासूद यांजबरोबर परशुराम व शिंद्याकडील कामगार यांजकडे पाठविलीं. परंतु त्यांनीं पत्रांतील मजकूर मनास न आणितां पत्रें घेऊन गेलेल्या उभयतां गृहस्थांस जाबसाल केला कीं, पंधरा दिवस उगीच तहकुबी करून रहावयाची आपणास सवड नाहीं. आम्हीं पत्रें पाठवितों, त्यांचीं उत्तरें येतील त्या प्रमाणें वर्तणूक करूं. या प्रमाणें सांगून उभयतांस लष्करांतून घालवून दिलें; व वेढ्याचें काम पूर्ववत् चाललें. तहकुबी चिठ्या येतांच व त्या अमलांत न आल्यावर महाराजांनीं नागोजीरावास गोव्यांहून जलदी कुमक घेऊन येण्याविषयीं पत्रें पाठविलीं. या प्रमाणें तहकूब चिठ्यांप्रमाणें गोळागोळी बंद न होतां पूर्वक्रम चालला. चेंबरमाळीं नदानजीक मोर्चे बंदी जास्त करून तोफांची मारागिरी अधिक करूं लागले. तेव्हां कांहीं दिवशीं किल्ला कांहीं जेरीस आला आहे, असें दिसल्यावरून किल्ल्यावर एकाएकीं छापा घालून, हल्ला करावा असें ठरवून हल्ल्याच्या दिवशीं अस्तमान पासून तोफांची मारागिरी सुरू केली, आणि चौथे प्रहरीं म्हणजे पहाटेच्या प्रहररात्रीस फुरसुतीचा समय पाहून किल्ल्याच्या कुसवास शिड्या लावून हल्ला करण्यास पलटणचे लोक चढूं लागले. तेव्हां **चणेचोरटीचे** बुरुजावर **बाजीराव कृष्णा रेणावीकर** व बंदुकदारदार लोक होते. त्यांणीं लोकांस चढतांना पहातांच बंदुकीची मारागिरी चालविली. वेढी नजीकच्या बुरुजावरील खासबारदार लोकांनींही बंदुकीची मारागिरी चालविली. येणें करून शिड्यांवर

चढून वर येण्याचें ज्यांणीं साहस केलें होतें ते सर्व ठार झाले. इतक्यांत राजाच्या दरवाजांतून तट्टावर आले; आणि मानकरी एकांडे लोक यांज कडून शिड्या रवाना होऊन देविल्या; एकच इरली करून व सर्वांस हिम्मत देऊन राजूच्या लोकांवर बंदुकांचा, पाषाणांचा व बाणांचा भडीमार करून अशी हुल्लड केली कीं, तेणें करून राजूचा फार नाश झाला. पलटणीचे दोनतीन युरोपियन सरदार ठार पडले. पलटणीचे व इतर लोक मिळून सुमारें २७०० ठार झाले; व हजार दीडहजार लोक जखमी झाले. या प्रमाणें राजूची अवस्था झाल्यावर हल्ला करण्यास आलेले लोक मागें फिरून गोळीचा मार चुकवून रुक्कवार चावडीपलीकडे जाऊन उभे राहिले. इतक्यांत सूर्योदय झाला, तेव्हां श्री अंबिकेनेंच चमत्कार करून दाखविला असें म्हणून **श्रीचाजयजयकारकरीत** तटावर उभे राहून राजूच्या फौजेस पाहूं लागले. नंतर पलटणाच्या लोकांपैकीं दोनचार असामी हत्यारें ठेवून रेणावी कराकडे आले, आणि तटावरील व बुरुजावरील गोळी बंद करण्याविषयीं हुकूम देण्यास राजाज्ञेस विनंति करावी, म्हणजे आम्हीं हत्यारें ठेवून मुडदे घेऊन जाऊं असें म्हणाले. तेव्हां राजाज्ञांनीं गोळी बंद करण्यास हुकूम देऊन मुडदे नेण्यास परवानगी दिली. त्या समयीं पलटणचे लोक हत्यारे ठेवून मुडदे नेण्यास आले. त्यांस इकडील लोक तटावरून व बुरुजावरून पहात होते. त्यांनीं मुडदे नेऊन सार्थकें केलीं. युरोपियन सरदारांची थडगीं शाहरानजीक अद्याप आहेत.

या प्रमाणें किल्ल्यांतील लोकांनीं मोठी मर्दूमकी व शौर्य करून हल्ला फिरविला आणि पलटणच्या लोकांची खराबी केली. येणें करून इकडील लोकांस लढाई देण्याची जास्त हुषारी आली.

कोल्हापुरावर हल्ला झाला होता व तो फिरून पलटणाच्या लोकांचा फार नाश झाला ही वर्तमान शिंद्याकडे गेलें. चाटगे यांची कागल तालुका देण्याविषयीं महाराजांकडील जोशीराव प्रभृति मंडळीनीं खात्री करितांच त्यांनीं शिंद्यांस महाराजांचीं आज्ञापत्रें सादर करून बोलणें सुरू

केलें होतें. इतक्यांत ही बातमी येऊन थडकली. तेव्हां ही संधि चांगली आहे, असें समजून मद्दारनिल्हे घाटगे सर्जाराव यांणीं शिंदे अलिजा बहादूर यांस सांगितलें कीं, आपण मराठे कुळांत प्रतापवंत असतां, अकर्ते शिवाजी महाराजांचे वंशज जे कोल्हापूरचे महाराज त्यांच्या राज्याची अशी खराबी आपण आपल्या हातानें करावी हें आपले कुळास भगदीं योग्य नव्हे. महाराजांच्या राज्याचें कल्याण करून त्यांच्या राज्य वृद्धी विषयीं यत्न करावा, हा सेवक धर्म असून त्यांतच आपल्या दौलतीचें कल्याण आहे, हें पुरें चित्तांत आणावें, आणि कारभारी यांच्या मतलबी सल्लयावर इतबार ठेवूं नये. या प्रमाणें शिंद्यास बोध करून त्याचें मन फिरविलें. ही गोष्ट शिंद्याच्या मनांत ठसली, व त्यांची बाळाभाऊ पागे (प्रसिद्ध बाळोबा तात्या कुंजर). यांजवर गैर मर्जी होऊन त्यांस चैत्र वद्य ४ सन १८०० एप्रिल तारीख १३ रोजीं कैद करविलें; शिंदे यांच्या मनांत **सरवाराम** घाटगे सर्जाराव यांची अत्यंत रूपवति कन्या बायजाबाई इजशीं लग्न करण्याचें फार दिवस मनांत होतें. त्या प्रमाणें बायजाबाईस देण्याचें ही कबूल करून कोल्हापूरचा वेढा उठवावा असें घाटगे यांणीं ठरावांत आणिलें, नंतर **जोरीराव, विश्वासराव** घाटगे सर्जाराव व **जसवन्त भुलुरव** यांचें दौलतरावांच्या विद्यमानें **पंतप्रधानाशीं** सर्व बोलणें ठरलें. **परशुराम भाऊंनीं** शिमाजी आप्पास पेशव्यांच्या गादीवर बसवून आपणास उपद्रव दिला, या वरून बाजीरावाच्या मनांत पटवर्धनांचा नाश करण्याचें होतेंच. त्यांत शिंद्यांकडूनही असें बोलणें येतांच रामचंद्र रावास व इतर पटवर्धनांस कैद करण्याविषयीं पत्र पाठविण्यास त्यांनीं लागलाच रुकार दिला. पत्रपावतांच रामचंद्रावास कैद करावें, आणि किल्ल्याचा मोर्चा उठवून परत निघून यावें, या प्रमाणें शिंद्यांचीं पत्रें पलटणाच्या सरदारांस रवाना झालीं. जासूदानीं पत्रें पलटणाच्या सरदारांस देण्याचीं तीं रामचंद्र रावाच्या हातीं दिलीं. त्यांनीं लखोटे फोडून पाहिले. तेव्हां त्यांस आपल्या विरुद्ध मजकूर आलेला समजला.

तेव्हां त्यांनीं आपल्या फौजेस सूचना करून सर्व पटवर्धन मंडळी सह-
रामचंद्र राव वैशाख शुद्ध २ रोजीं रात्रीचे रात्रीं पळून गेले. ते कोंगनोळी-
मुक्कामीं राहिले. तेथून जलदी करून **तासगांवास** गेले. उजाडल्यावर पटवर्धन सरदार पळून गेले असें कळलें व पुण्याचीं पवेंही पलटणच्या कामगारांस मिळालींस्व-
प्रमाणें करवीरच्या किल्ल्याचा मोर्चा उठवून वैशाख शुद्ध ७ तारीख १
एप्रील गुरुवार छ ६ जिल्हेज रोजीं रुकडी नजीक नदी किनारीं जाऊन ते
उतरले. करविरास सुमारें एक महिना सत्तावीस दिवस शत्रूंचा वेढा हो-
ता, व तो **सरवाराम** घाटगे यांच्या यत्नानें उठला.

हें वर्तमान महाराजांस परभारें समजलें व राजाज्ञांचेंही विनं-
तिपत्र गेलें कीं, वेढा उठला आणि हुजूरची स्वारी यावी, असें पत्र पों-
चलांच महाराज, **रवाशामहालाच्या** स्वाऱ्या, **श्रीबाबामहारा-
ज, श्रीनानामहाराज** व **श्रीभाऊमहाराज** यांच्या स्वाऱ्या व
कुटुंबें आणि सरदार व मानकरी कुटुंब सुद्धां पन्हाळ्याहून निघून क-
रवीरीं वैशाख शुद्ध १ रोजीं दाखल झाले. पंचगंगेवर आल्याचें स-
मजतांच राजाज्ञ, उमदेतुल उमराव, सेनाखासकील वगैरे सरदार व
मानकरी सामोरे गेले व त्यांनीं नजरा केल्या. नंतर स्वारी श्री **शंभु छ-
त्रपतीचें** देवालयीं जाऊन दर्शन घेऊन किल्ल्यांत गेली, आणि **श्रीम-
हालक्ष्मीचें** दर्शन घेतलें, व श्रीनें किल्ला राखिला, यास्तव श्रीच्या सं-
स्थानाकडे मौजे कुरडू हा गांव इनाम करून दिला. मग स्वारी वाडयां-
त जाऊन सदरेस बसली, आणि राजाज्ञ यांणीं किल्ला राखिला, याक-
रितां किल्लेभुदरगडच्या सनदा चिटणीस यांजकडून लिंहवून निशाणमो-
र्तब करून त्या सनदा राजाज्ञांच्या हातीं दिल्या. त्या घेऊन सर्व राज्य-
च सरकारांनीं स्वाधीन केलें आहे, सनदा कशास पाहिजेत, असें म्ह-
णून पुढें येऊन महाराजांच्या चरणावर मस्तक ठेविलें, आणि डोंगरास
श्री जोतीबाच्या दर्शनास जाण्याविषयीं आज्ञा घेतली. जे लोक युद्धांत
जखमी झाले व मेले त्यांच्या बायका मुलांस, कोणास **रांडरोटी**, को-
णास **खुनकाट**, कोणास इनाम, व **बक्षिसें** अशीं इनामें जमि-

नी वगैरे देऊन सर्वांचें समाधान केलें.

राजाच्या नदीपलीकडे जाऊन तेथून नमस्कार घालीत डोंगरास गेले. पांचवे दिवशी डोंगरावर पोंचले. तेथें श्रीचें दर्शन घेऊन श्रीस अभिषेक करविला; आणि वस्त्रें दिलीं व कंठी, बिरपेंच, तुरा वगैरे जवाहीर दिलें. नंतर १०,००० ब्राम्हणांची समाराधना घालून श्रीस चौघडा व हत्ती देऊन त्याचे खर्चास मौजे पोहोळें व मौजे कुर्डिरें हे गांव इनाम दिले. श्रीच्या नैवेद्या कडे दरगांव गन्ना एकदोन रुपये व कित्येक ठिकाणीं मण दोन मण गल्ला करून दिला. यावेत डबी होती ती सोडून दिली. गुरवा कडून दरसाल चार हजार रुपये पट्टी घेत होते त्या पैकीं दोन हजार रुपये सोडून दिले; या प्रमाणें यथासांग दर्शन घेऊन राजाच्या डोंगराहून परत करवीरास आले. करविरीं **आप्पाबावा** तेलंग यांणीं ब्राम्हणाकडून अनुष्ठान करविलें होतें त्याची शांति करून समाप्ति केली. तसेंच श्रीबाबा महाराज यांणीं अनुष्ठान करविलें होतें त्याची ही शांति केली.

पीर बाबूजमाल याच्या दरग्यांत खुबकदरजंग व आबादियारजंग पठाण यांजजवळ दावति म्हणजे प्रयोग कर्ते होते, त्यांजकडून श्रीबाबा महाराज यांणीं प्रयोग करविले, आणि गावांत सैफी म्हणणारे मुसलमान होते त्यांजकडून व पारसनवीस यांजपाशीं पीरसाहेब म्हणून वस्ताद होता त्याजकडून मदार निम्हे बाबा महाराजांनीं सैफी म्हणविण्यास प्रारंभ केला. पंधरा दिवस **सैफी** म्हटल्यावर पीरसाहेब वस्ताद यास पहाटेच्या प्रहररात्रीं स्वप्नांत दृष्टांत झाला. त्या वेळीं एका मलंग फकिराने सांगितलें, कीं सैफी सुरू झाल्या दिवसापासून ४० वे दिवशीं करवीरचा वेदा उठणार. त्या प्रमाणें ४० वे दिवशीं करवीरचा वेदा उठून गेला. तेव्हां बाबा महाराजांनीं आपला गांव वळीवडें येथें **पीरसाहेब वस्ताद** यास सहा बिघे जमीन इनाम करून दिली, व तेंही अनुष्ठान पुरें करविलें.

शिंद्यांचीं पलटणें रुकडी नजीक उतरलीं असतां त्यांवरील सर-

दारांस शिंद्यांचें पत्र आलें कीं, पलटणें व तोफा घेऊन शिंधोजीराव निंबाळकर निपाणकर यांजबरोबर जाऊन नेरलीचें ठाणें घेऊन निपाणकरांच्या हवालीं करावें. त्या प्रमाणें कूच करून पलटणें नेरलीं नजीक गेलीं, व नेरलीच्या ठाण्यास वेढा दिला. आठ पंधरा दिवस झाले तरी ठाणें जेरीस आलें नाहीं. सबब निपाणकर यांणीं महाराजांस विनंती पत्र पाठविलें कीं, राजाज्ञ यांस फौजे सुद्धां कुमकेस पाठवावें म्हणजे नेरलीचें ठाणें घेऊं. त्या समयीं राजाज्ञ यांची फौजे सुद्धां नेरलीचें ठाणें घेण्यास रवानगी झाली. राजाज्ञ नेरलीस पोंचल्यावर सर्व ठाण्यासभोंवतीं फिरून दरवाजाजवळ येतांच पालखींतून उतरले, आणिपाय उतारा लोकांस घेऊन दरवाजांत शिरे नजीक एकदम मोर्चा कायम केला. तेव्हां पलटणच्या सरदारांनीं राजाज्ञांची जमावदी व धारिष्ट पाहून तोंडांत बोटें घातलीं, व मोठी तारीफ केली. दरवाजांतील मोर्चाच्या अडचणी मुळें ठाणें जेरीस आलें, आणि ठाण्यांतील लोक कोलमें ठसरून गेले. तेव्हां ठाणें राजाज्ञयांणीं निपाणकरांच्या स्वाधीन केलें. नंतर पलटणच्या सर्व सरदारांनीं राजाज्ञाकडे भेटीस येतों म्हणून सांगून पाठविलें. त्या वरून त्यांणीं ही तयारी करून येण्या विषयीं सूचना पाठविली. त्या प्रमाणें ते येऊन भेटले. क्षणभर बसून परस्पर बोलणीं झालीं. नंतर पानसुपारी, अत्तरगुलाब, वगैरे देऊन निरोप दिला; व ते आपल्या डेऱ्यास गेले. दुसऱ्या दिवशीं निपाणकरांचा निरोप घेऊन राजान फौजे सुद्धां करविरास गेले.

चतुरशिंग राजे साताऱ्याहून पळून करविरीं आल्यापासून त्यांस दरमहा पंधरा हजार रुपये मोंचत होते. बंदा उठून स्वारी करविरीं आल्यावर ते पन्हाळ्याहून सातारा, पुणें प्रांतीं गेले ते पुन्हा इकडे आले नाहींत.

सरवाराम घाटगे यांणीं दौलतरावास आपली कन्या बायजाबाई इला देण्याचें कबूल केलें होतें. परंतु शिंद्याचे वडील महादजी कमजातीचे, सबब त्यांस मुलगी द्यावयाची नाहीं असा सरवाराम

घाटगे यांचे वडील बंधु विश्वासराव यांणीं आग्रह धरिला; आणि मुलगी नेऊं लागल्यास अपाय करावा असा त्यांणीं निश्चय केला. लग्न झाल्या शिवाय कोल्हापूरचे तहनामे पुरे होईनात. यास्तव मुलगी गुप्त रूपें नेण्यासाठीं पुण्याहून **नरसिंगराव** मल्हार चिटणीस यांस घाटग्यांनीं पाठविलें. तेही विश्वासरावाच्या भयानें चिखलीस न जातां परगांवीं उतरले, आणि **जिनाबाई**च्या विचारें उभयतां मुलास इस्तगत करून पळून गेले. मुलगी पुण्यास पोंचल्यावर मोठ्या समारंभानें लग्न झालें.

लग्न आटपल्यावर शालिवाहन शके १७२२ राजशक १२७ रौद्रनाम संवत्सरे, सूरसन इहिदे मयातैन व अल्लफ इ. स. १८०० सालीं बाजीराव रघुनाथ पंडित प्रधान यांजकडून दौलतराव शिंदे यांणीं आषाढमासीं महाराज सरकारांत दोन तहनामे छ. १९ सफर ऊर्फ आषाढ वद्य ६ रोजीं ठरवून दिले. त्या तहनाम्यांत **चिकोडी** व **मनोळी** व **कटकोळ** तालुके महाराज सरकारांत द्यावे, व आणखी नवीन पावणे तीन लक्षांचा मुलूख महाराजांच्या राज्या नजीक द्यावा; सन १८०१ सालीं या प्रमाणें दौलतराव शिंदे अलिजाबहादर यांच्या विद्यमानें ठरलेले तहनामें दोन घेऊन **सरवाराम** घाटगे सर्जेराव पुण्याहून शके १७२२ चैत्रमासीं निघाले. ते कऱ्हाडा नजीक येऊन उतरले. शके १६९६ राज शक १०१ इसवी सन १७७४ सालीं **भवानराव** प्रतिनिधि यांणीं कसबा वडगांवचें गाणें घेतलें, त्या वेळीं महाराज सरकारचा जरीपटक्याचा हत्ती व दुसरा हत्ती पाडाव करून नेले होते. पैकीं दोनही हत्ती मयत झाले होते. या मुळें पेशवेजींचा जरीपटकापरशुराम पंडित प्रतिनिधि यांजकडून घेऊन तो जरीपटका व दोन तहनामें घेऊन सरवाराम घाटगे सर्जेराव करविरीं आले. त्यास राजाज्ञ यांणीं सामोरें जाऊन बहुमानानें शहरांत आणिलें. मग्गारनिल्हे घाटगे यांणीं महाराजांची भेट घेऊन पद्धति प्रमाणें नजरा केल्या आणि प्रधानाकडील आणलेले तहनामें व जरीपटका गुजरले. नंतर पटवर्धन यांचीं चिकोडी व मनोळी तालुक्यांत ठाणीं होतीं तीं उठवून महाराज सरकारांतून मामलेदार व-

वाना झाले. चिकोडीची मामलत लिंबाजी यादव हवालदार यांस सांगितली. आणि मनोळीची आबाजीराम मामलेदार किल्ले पन्हाळा यांस आणि कटकोळची खंडेराव भोंसले यांस सांगितली. तदनंतर पूर्वी ठरल्या प्रमाणें घाटगे यांजकडे कागल तालुका सरंजामास लावून दिल्या बद्दल महाराजांनीं आज्ञापत्रें दिलीं. तसेंच घाटगे याच्या विनंती वरून गिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई मौजे हुकेरी यांस त्यांजकडे पूर्वीची इनामें चालवून नवीन आज्ञापत्र दिलें. तहनामे व आज्ञापत्रें यांच्या नामिका पुढें पुरवणींत दिल्या आहेत.

शके १७२२सालीं सौभाग्यवती कमळजाबाई राणीसाहेब वाडा १४ फाल्गून शुद्ध २ सन १८०१ फे. ता. १५ छ १ सव्वाल रोजीं मजूत झाल्या. व पुत्र झाला. महाराजांस मोठा आनंद होऊन नामकरणादि बारादिवस समारंभ होऊन नांव राजाराम असें ठेविलें, परंतु पुढें कांहीं दिवसांनीं तो पुत्र निवर्तला. पुढें फाल्गून वद्य ८ रोजीं सौभाग्यवती सुंदराबाई राणीसाहेब वाडा ६ यांस पुत्र झाला (तारीख ८ मार्च) त्यावेळीं समारंभ करून नांव '**शंभुमहाराज**' असें ठेविलें. पुढें शके १७२३ सालीं सन १८०२ तारीख २२ जानेवारी पौष व द्य ३ गुरुवारीं सौभाग्यवती कमळजा वाईसाहेब वाडा १४ मजूत झाल्या व त्यांस पुत्र झाला. त्यावेळीं ही समारंभ करून नांव '**शाहाजीराजे**' असें ठेविलें.

श्री बाबा महाराज नरसिंग पुरास असतांना शिंदे यांजकडील लक्ष्मीबाई वगैरे बाया **दौलतरावाची** खटपट करून फौजेसुद्धां दक्षिणेंत आल्या, व खंडण्याचे फिरत असतां त्यांजकडील पठाणांनीं नरसिंगपुरास श्रीबाबामहाराज यांस खंडणी करितां अटकेंत ठेविलें व तें वर्तमान महाराजांस समजतांच राजाज्ञांस निकडे पाठवून त्यांस सोडवून आणवून करविरी सरकार वाड्यांत पुढील चौकांत ठेविलें होतें वगैरे हकीकत मागें आलीच आहे. पुढें कांहीं दिवसांनीं महाराजांनीं त्यांजपासून उपदेश घेतला व नजर सरंजाम व वाडा देऊन गुरुमहाराजांस मोठ्या इतमानानें ठेविलें. करविरीं असतां शके १७२२ सालीं (सन १८००)

बाबामहाराजांस बेडा मधुरा होऊन वैशाख वद्य ६ स सरकार वाड्यांतच ते मृत्यु पावले. त्यांचें सार्थक रथुद्द रवासा स्वारी जाऊन यथास्थित पणें करविलें. दहावे दिवशीं रवासा स्वारी बनपुरीचे घांटावर. तिळांजळी देण्यास गेली होती. दोन प्रहरपर्यंत पिंडास **काकस्पर्श** झाला नाहीं. कैलासवासी बाबामहाराजांचे पुत्र श्री बाबा महाराज यांणीं अनेक संकल्प मनांत योजून उदक सोडिलें; तरीपि स्पर्श होईना. शेवटीं दर्भाचा काक करून त्याँजकडून पिंडास स्पर्श करविला, व कर्माची समाप्ति केली. अकरावे दिवशीं महाराज सरकारांतून पालखी, घोडा, दासी वगैरे दत्तादानें श्री बाबा महाराजाकडून देवविलीं. दानधर्मास नक्त रुपये देऊन **श्रीमन्महाराज शंभुछत्रपति** यांच्या पंचगंगा तिराच्या देवालयाच्या आवारांत भांतांतील समस्त ब्राह्मणांस दोन रु० प्रमाणें दक्षिणा झाली. नंतर पंचगंगेच्या तिरीं गुरुमहाराजांचे दहन झालें त्या ठिकाणीं देवालय बांधून सन १८०७ साली वैशाख शुद्ध ९ स पादुका स्थापन केल्या आणि अर्चेस व उत्साहास सरंजाम करून दिला.

धोंडजी वाघ याणें जमावनिशीं चिकोडी व मनोळीतालुक्यांत उपद्रव केला. त्याचा पुंडावा दक्षिणेंत चोहोंकडे चालला होता. या करितां त्याचा बंदोबस्त करण्यास **कर्नल वेल्स्ली** साहेबांची नेमणूक झाली होती. त्यांचें पत्र कुमक पाठविण्याविषयीं आल्यावरून महाराजांनीं फौज रवाना केली, आणि अखेर त्याचा बंदोबस्त झाला.

शके १७२६ सालीं चातुर्मास झाल्यावर श्री भवानीच्या दर्शनास जाण्याचा संकेत ठरला. परंतु कित्येक कारणांनीं दिनावधी होऊन माघ शुद्ध ३ सन १८०५ फे. २ स, उभयतां चिरंजीव व महालक्ष्म्या स्वान्या सुद्धा स्वारी करविराहून निघाली. सहावे दिवशीं स्वारी तुळजापुरास दाखल झाली. तेथें पांच मुक्काम होऊन श्रीस अभिषेक करून वस्त्रें व अलंकार दिले. तेथून कुच होऊन निसरे दिवशीं स्वारी श्री पंढरीस आली. तेथें महापूजा व समाराधना करून फाल्गून

वद्य १० तारीस १० मार्च रोजीं स्वारी करविरास परत आली.

शके १७२७ सन १८०६ सालीं फे. २३ फाल्गून वद्य ५ रोजीं **आनंदराव** प्रतिनिधि यांचा काळ झाला. त्यांस पुत्रसंतती नव्हती. सबब त्यांचे कनिष्ठ बंधु भगवंतराव यांस शिरस्त्याप्रमाणें नजराणा व इनामपत्र घेऊन पदाधिकारांचीं वस्त्रें दिलीं.

सन १८०३ (शके १७२५) सालीं सावंतवाडीचे **रवेमसावंत** मृत्यु पावले. त्यांस पुत्रसंतान नव्हतें, यामुळें अंतकाळीं त्यांणीं आपली पत्नी लक्ष्मीबाई इच्या स्वाधीन सर्व कारभार केला. श्रीरामसावंत ऊर्फ राघसाहेब आणि सोमसावंत यांजमध्यें गादी बद्दल खटला लागले. शेवटीं सोमसावंत यांस धरून रामसावंतानें वाडीच्या किल्ल्यांत अटकेंत ठेविलें. तेव्हां आपण शत्रूच्या हातीं सांपडल्यास आपले हालहाल करतील, या धास्तीनें आपले सभोवती दारू पसरून बत्ती लाविली आणि तो व त्याच्या कुटुंबांतील बहुतेक माणसें मरण पावलीं. त्यांचा मुलगा **फोंडसावंत** हा रेडीच्या किल्ल्यावर अटकेंत होता, तो मात्र चांचला. त्याणें करवीर कराकंडील बच्चाजी अनंत मालवणास होते, त्यांजकडे बोलणें लाविलें. त्या वरून महाराजांनीं रत्नाकर आप्पा राजास व शिवराम भोसले सुभेदार यांस फौज देऊन कुमकेस पाठविलें. आप्पा रेडीस गेले आणि किल्ला सरकरून घेऊन फोंडसावंताची समक्ष भेट घेतली. नंतर किल्ल्यावर करवीरचें लोक ठेवून बंदोबस्त केला आणि मालवणाहून त्यांस सामुग्री वगैरे मिळावी अशी तजवीज करून फोंडसावंतास घेऊन मालवणास गेले, व नेथून करविरीं आले. महाराजांनीं सावंतांचा चांगला आदर सत्कार करून पर्जन्य काळ संपतांच कुमक देण्याचें अभिवचन दिलें. वरसात खलास होतांच रत्नाकर आप्पा फौजेसह घाटावलीं वाडीप्रांतांत गेले. स्वारीबरोबर कुडाळचें दाणें घेतलें, आणि तेथून आसपासचा प्रांत उध्वस्त करूं लागले. तेव्हां लक्ष्मीबाईनें फोंडसावंतास वाडीस येण्याविषयीं आणि त्यास त्याच्या बापाचे सर्व हक्क देण्या विषयीं कबूल केलें. तेव्हां आप्पा करविरास परत आले.

इतक्यांत श्रीराम सावंतानें पुनः फौज जमवून फोंडसावंतावर हल्ला केला. त्यांत त्याचा (फोंडसावंताचा) पराभव होऊन तो मोठ्या संकटानें अरवेरीस पळून गेला. तेथून त्याणें कुडाळास जाऊन आश्रय घेतला, तेथें त्यास रांगण्याचा किल्लेदार राणोजी नाईक निंबाळकर याणें कुमक करून अरवेरी पर्यंत ठाणीं घेतलीं. नंतर मालवणाहून कुमक आणवून सिद्दीस ही वेढा घातला, परंतु तो किल्ला हस्तगत झाला नाहीं. इतक्यांत रामसावंत मरण पावला. व वाडींतील बरवेड्याचें पत्र महाराजास पावलें. पत्र पावतांच महाराजांची स्वारी शके १७२७ श्रावण वद्य ५स सन १८०५ आगस्ट १५ करविराहून निघून असिद्धगडास (रांगण्यास) गेली. तेथें पंधरा दिवस राहून भाद्रपद शुद्ध पक्षीं वादारवाडीं गेली. त्यागलीच नेवतीचा किल्ला घेऊन मालवणास गेली. तेथें शारदी नवरात्राचा उत्साह करण्याचा बेत ठरून महालक्ष्म्या व उभयतां चिरंजीव यांस आणण्या करितां राजाज्ञेस करविरास पाठविलें. ते स्वाऱ्या घेऊन भाद्रपद वद्य १४ रोजीं मालवणास दाखल झाले. (तारीख २२ सपटंबर.). नवरात्राचा उत्साह भरून कार्तिकी पौर्णिमा झाल्यावर महालक्ष्म्या वगैरे रवटलें नारायणराव पंडित यांजबरोबर पाठवून स्वासस्वारी भरतगडास गेली. किल्ल्यास मोर्चे लावून किल्ला घेतला. नंतर आंसपासचीं ठाणीं घेऊन स्वारी परत करविरास शके १७२७ सन १८०५ दिसंबर पौषमासीं आली.

राणोजी नाईक निंबाळकर याणें नरसिंग गडही घेतला.

करविरीं स्वारी आल्यावर शंभुछत्रपति ऊर्फ आबासाहेब यांचा विवाह करण्याचा बेत ठरला. नारायणराव रवानवेलकर यांची कन्या वधु योजिली. शके १७२८ फाल्गुन शुद्ध ३ सन १८०७ मार्च १२ रोजीं मुहूर्त योजिला. नंतर तयारी करून सुमुहूर्तावर विवाह मोठ्या समारंभानें झाला.

---

* यास असिद्धगड असें ही म्हणतात.

तिकडे वाडीस फोंडसावंताचा पूर्ण अंमल बसला नाहीं. वाडीच्या लोकांनीं दगा आरंभिला. शके १७२८ सन १८०७ जानेवारी, षो षमाशीं लक्ष्मीबाई कडील लोक जमावानिशीं मालवणास चालून आले. परंतु सिंधुदुर्गावर कताव चालला नाहीं. श्रीरामेश्वराच्या देवाल्या नजीक पेठ आहे त्या पेठेवर हल्ला करून पेठेची खराबी केली. तेथून त्यांणीं मेढ्यावर* हल्ला केला. तेथें त्यांचा मोड झाला, व त्यामुळें त्यांस परत जावें लागलें. पुनः आठरोजांनीं जमावानिशीं येऊन पेठेतील लोकांची घरें जाळिलीं. तेथून जाऊन त्यांणीं भरतगडास वेढा दिला.

हें वर्तमान करविरास समजतांच १००० निवडक लोकांस महाराजांनीं रवाना केलें, व मालवणाहून **शिद्‌राम** भोसले सुभेदार यास तिकडे जाण्यास हुकूम केला. त्याणें जाऊन भरतगडाचा वेढा उठाविला. महाराजांनीं **हेबतराव** गायकवाड सरखवास यांस २०० स्वारानिशीं पुढें पाठवून खासा स्वारी २००० पायदळ घेऊन रत्नाकरपंत आप्पा सहवर्तमान निघाली. ती **हणमंत** घाटानें **महादेव** गडानजीक दाखल झाली. तेथें गडकरी यांणीं खबरदारी कादली. त्यांत गोळागोळी होऊन अखेर गडकरी लोक पळून गेले, व किल्ला स्वाधीन झाला. तेथें बंदोबस्तास लोक देवून फौजेसह स्वारी पुढें निघाली. **चौकुल** (चौकुली) येथें वाडीकरांच्या फौजेशीं मोठी लढाई झाली; सन १८०७. तींत वाडीकरांचा अगदी पराभव झाला. तेथून महाराजांनीं कुच करून वाडीस जाऊन मोर्चे दिले. आतां आपला निभाव लागत नाहीं असें पाहून **लक्ष्मीबाईनें आप्पासाहेब** निपाणकर यांजपाशीं कुमक मागितली. तेव्हां त्यांणीं लागलेच १००० अरब पाठविले; आणि इकडे करवीर करांचे चिकोडी व नोव्ही घात जबरीनें ताब्यांत घेतले. तेव्हां अर्थात महाराजांस चैत्र शुद्ध ११ शके १७२९ तारीख १८ एप्रील रोजीं मोर्चे उठवून आपल्या तांच्या रक्षणार्थ वाडीहून परत यावें लागलें.

---

* मालवणच्या एका भागास मेढा असें नांव आहे.

शके १७२१ सन १८०७ मे १६ वैशाख शुद्ध १ रोजीं सातारकर शाहू छत्रपति यांणीं कैलासवास केला. ह्रे वर्तमान **शिवाजी** महाराजांस समजतांच, आधार होता तो गेला, पुढें मुलांस प्रधानांचा कारागृह होणार, हें मनांत आणून फार श्रमी झाले. त्या समयीं चतुरसिंग राजे भोंसले करविरीं होते, त्यांस पंधराहजार रुपयांचा सरंजाम देत असतां तो न घेतां ते सातान्यास निघून गेले. जाते समयीं त्यांस खर्चास पांच हजार रुपये दिले.

आप्पासाहेब निपाणकर यांणीं करवीर प्रांतास उपद्रव देण्याचें सुरू केलेंच होतें. जी आज पांच सातवर्षे या प्रांतीं स्वस्थता होती ती तेव्हां पासून मोडून पुनः दग्या बरवेड्यास आरंभ झाला. वाडीकर लक्ष्मीबाईनें पेशव्यांकडे व इंग्रजांकडे कुमक मागितली होती. इंग्रजांनीं या कामीं हात घालण्याचें नाकबूल केलें. परंतु पेशव्यांनीं कोल्हापूर कराशीं युद्ध करण्यास निपाणकरांस परवानगी दिली. **आप्पा** साहेब देसाई यांनीं जी गोष्ट पूर्वीच आरंभिली होती, तीस पेशव्यांचा रुकार मिळतांच त्यांनी उघडपणें जंगी तयारी करून फौजेसुद्धां करविरास कुच केलें. टेंबलाईचे माळावर तळ देऊन तेथें आठदिवस मुक्काम केला, आणि तेथून निर्त्य तोफांची मारगिरी शाहूरावर करूं लागले. परंतु उपाय चालेना व पर्जन्यकाळ समीप आला, यास्तव तळ उठवून परत निघून गेले. बरसात खलास होतांच **देसाई** पुनः (शके १७२१ सन १८०७ अक्टंबर) दसऱ्याच्या मुहूर्तानें निघाले. चिकोडी व मनोळी तालुक्यांत त्यांणीं गावणीं घातलीं. कटकोळचें गाणें घेतलें, आणि जिकडे तिकडे प्रांतांत अजेस उपद्रव देऊन अमर्याद पीडा केली. ज्या त्या गांवाकडून जबरीनें खंड घेऊं लागले. या प्रमाणें देसाई यांनीं दंगा आरंभिला. निपाणकरांवर बाजीराव पेशव्यांची प्यार मर्जी होती. त्या वेळच्या योध्यांत ही यांचा पहिला नंबर होता. यांच्या फौजेंत निवडक शूरवीर लोक होते. याज विषयीं कागाळी कोणीं पेशव्यांकडे नेली असतां ते बिलकूल मनावर घेत नसत. यामुळें हे राजरोस लोकांस दंड बांधून लागवील. हे स्वभावतः

किती क्रूर होते या विषयीं सा प्रांतींलोक अद्याप गोष्टी सांगतात. या-
च पुस्तकाच्या* दुसऱ्या एका भागांत निपाणी संस्थानचा इतिहास दि-
ला आहे त्या ठिकाणीं यांचें समग्र चरित्र दिलें आहे, त्या वरून यांचा
करवीर दरबाराचीं मूळचा संबंध, पुढें हे कसे चढले, करवीर करांचीं
यांचा कसा बिघाड आला, व यांचा स्वभाव आणि वर्तन कसें होतें, वगैरे
सर्व हकीकत त्या स्थळीं दिली आहे, यास्तव येथें द्विरुक्ति करीत नाहीं.
अशा क्रूर व बलाढ्य शत्रूचा उपद्रव आपल्या रयतेस होऊं लागला, तेव्हां
महाराजांनीं राजारामांस बंदोबस्तासाठीं करविरीं ठेवून दुसऱ्यासरदारां
सहवर्तमान जंगी फौज व तोफखाना घेऊन स्वारीस निपाणकरांचीं
सामा करण्यास निघाली. महाराजांनीं निपाणकरांनीं घेतलेलीं कांहीं गा-
वीं घेऊन कसबा **सांवगांव** येथें मुक्काम केला. निपाणकरास हें व-
र्तमान समजतांच त्यांनीं महाराजांचीं युद्ध करण्याची तयारी चालवि-
ली. कोल्हापूरचे 'सरलष्कर' हे निपाणकरांचे माऊस बंधु होते. त्यां-
स देसाई यांनीं फितवून त्यांच्या मार्फत करवीरच्या दुसऱ्या कित्येक सरदा-
रांस अंतर्यामीं अनुकूल करून घेतलें. नंतर माघ शुद्ध ७ सन १८०८ फे-
ब्रुवारीस ४ रोजीं दोन प्रहरच्या समयास फौजे सह सांवगांवास येऊन ठे-
पले; आणि एकदम महाराजांच्या फौजेवर हल्ला करून युद्धास आरंभ
केला. निपाणकर येतात ही बातमी लागतांच महाराजांनीही लढाईची
तयारी केली होती. आघाडीस तोफखाना ठेवून बाकी फौज शिस्तीनें
उभी केली होती. निपाणकरांनीं हल्ला करतांच त्यांवर तोफांची मारगि-
री सुरू केली. करवीरच्या तोफांच्या मारापुढें निपाणकरांचा कटाव चाले-
ना. करवीरच्या तोफा मोठ्या व गोलंदाजही निभावलेले व हुषार हो-
ते. परंतु दैववशात् करवीरच्या तोफखान्यावरील कामगार **यशवंत**
राव घाटगे झुंजारराव गोवा उगून पडले. ते पडतांच थोडी धांदल उ-
डाली. इतक्यांत **रघुनाथ** राव माने भीमबहाद्दर हे आपल्या पथ-

---

* दक्षिण महाराष्ट्रांतील जहागिरदारांचा इतिहास पृष्ठें १८८–११५ पहा.

का निशीं पुढें चालून गेले. परंतु तोफांच्या मारगिरींत खळ पडतांच निपाणकरांची फौज पुढें सरसावली होती. या मुळें **भीमवहादर** व **बाबुराव** भोंसले हे उभयतां गोळे लागून पडले. याच संधीस **सरलष्कर** वगैरे फितुरी मंडळी निपाणकरांच्या तोंडावर नजाती बाजूस सरली. हें पाहून करवीरच्या सर्व फौजेनें कच खाल्ला, व लोक हवालदील झाले. पुढें निभाव कसा लागतो याची पंचाईत पडली. याप्रकारची धांदल करवीरच्या फौजेंत उडालेली पाहून निपाणकर एकदम गट करून कोल्हापूरच्या फौजेवर चालून आले, आणि गर्दी करून कत्तल करण्यास आरंभ केला. तेव्हां कोल्हापूरच्या फौजेची लढाईची शिस्त बिघडून गेली, रांगा फुटल्या. रामचंद्रराव सेनापति ही पडले. दुसरे दोन सरदार पाडाव झाले. तेव्हांतर लोकांचा अगदीं धर सुटला, व जिकडे तिकडे ते पळत सुटले. या समयीं जर खुद्द महाराजांनीं पुढें होऊन लोकांस धीर देऊन लगट केली असती, तर इतकी फुटाफूट झाली नसती, व इतका नाश झाला नसता. तसें झालें नाहीं. **नरसिंग मल्हार** अष्टेकर यांस भाल्याची जखम लागली. आवांतर पुष्कळ लोक मेले, व कांहीं जखमी झाले, आणि महाराजांचा अगदीं मोड झाला. खुद्द महाराजांचा बचाव कसा होतो याची लोकांस काळजी पडली. **रायाजी जाधव जप्तन मुखुरव** यांणीं त्यांस आपल्या घोड्यावर पागेशीं घेऊन तेरणांतून निसटले. त्यास निपाणकर यांच्या स्वारांनीं गांठून महाराजांवर भाला टाकला. तो किंचित् लागून जखम झाली व थोडें रक्त वाहूं लागलें. परंतु जप्तन मुखुरव यांणीं घोड्यास टाच मारून घोडा उडविला, आणि महाराजांस सुरक्षीत घेऊन पार झाले. वरकड लष्कर ही चारी दिशांनीं गेलें. जरी पटका, निशाण सहित हत्ती, डंका, **आनंदी** तोफेसहीत सर्व तोफा वगैरे निपाणकरांनीं हिरावून नेल्या. एक हत्ती रणांतच मयत झाला. सुमारें दोन हजार मनुष्यें ठार झालीं. दोन अडीच हजार सुमारें जखमी झालीं. त्या शिवाय सुमारें पांचशें पाडाव झालीं. **मुरारराव भोंसले** सुभेदार, **उदाजीरा-**

राव चव्हाण, हिंमतबहादर, मोतीगिरी गोसावी, लक्ष्मणराव साळोखे वगैरे कित्येक सरदारांस पाडाव करून नेलें. त्यांस मौजे कोन्हनोळी येथें ठेविलें. जप्तनमुळरव महाराजांस घेऊन निसटले ते प्रथम 'तमद्-लग्यास' गेले व तेथून थेट रातोरात करवीरास निघाले.

मोड झाल्याचें वर्तमान करवीरास चार घटिका रात्री राजास यांस समजलें. महाराजांचा ठिकाण नाहीं, असें त्यांस समजल्या वरून ते फारच घाबरले. वाड्यांत व शहरात हलकल्होळ झाला. इतक्यांत मागून दुसरा मनुष्य आला, त्याणें कळविलें कीं, निपाणकरांच्या स्वारानें महाराजांवर वार टाकिला, आणि त्यांस जरबम केली. हें ऐकून राजास फारच गडबडले. परंतु रात्रीचा समय असल्या मुळें उपाय नव्हता. शहराचा व वाड्याचा बंदोबस्त करून महाराजांच्या शोधा करितां स्वार व लोक पाठविले, आणि आपण विजापूर वेशीच्या दरवाजांत जाऊन बसले. तिकडून जरबमी झालेले लोक येत त्यांस आंत घेऊन त्यांच्या जरबमा बांधवीत. या प्रमाणें सूर्योदय पर्यंत चालविलें. सूर्योदयीं 'महाराज सुखरूप आहेत' अशी बातमी येऊन पोंचली. इतक्यांत स्वारी रुकडी नजीक आल्याचें वर्तमान आलें, तेव्हां संतोषाची वार्करा शहरांत सांगून आपण निघून पुढें सामोरे गेले. महाराजांचें दर्शन होतांच चरणीं मस्तक ठेविलें. महाराजांची मुखश्री म्लान पाहून स्वारी क्षेम आली, हा आज मोठा लाभ झाला, आतां अतिसृष्टि करूं; तेथें निपाणकरांची कथा काय आहे. या प्रमाणें शातवन करून स्वारी घेऊन शहरांत आले. श्रीचें दर्शन घेऊन महाराज वाड्यांत दाखल झाले. तिकडे ज्यांचीं माणसें मेलीं होतीं, त्यास ताकीद करून पाठवून मुंडदे आणविले, आणि सार्थकें करविलीं. कोणास रांजणोली, कोणास इनाम, कोणास बक्षीस, अशी जमीन व गांव दिले; आणि सर्वांची समाधानी करविली. या स्वारींत अतिनिधि, अमात्य, सेनाखासकील, कागलकर घाटगे वगैरे जमावानिशीं होते.

या लढाईचें वर्तमान पुण्यास प्रधानास समजतांच निपाणकरांजवर गैरमर्जी झाली. महाराजांचें रक्त भूमीस लागूंनये तें लागलें. या बद्द-

क शांति करविली.

निपाणकरांनीं जय संपादित्यावर चिकोडी व मनोळी ही गांवें हुकेरी परगण्यासहित कबजांत घेतलीं. व ते तोरगळकर व इतर कोल्हापूरचे जहागीरदार यांचा भाग लुटून उध्वस्त करूं लागले. तेव्हां महाराजांनीं निपाणकरांशीं सख्य करण्या विषयीं बोलणें लाविलें. याउभयतां मध्यें सख्य करण्या साठीं पेशव्यांनीं मनावर घेतलें "द्वितीय धोंजिगांव निपाणकर" यानें प्रथमारंभीं जेव्हां करवीर सोडलें, तेव्हांच पण केला होता कीं, खुद्द महाराजांच्या कन्येशीं लग्न करीन तरच नांवचा द्वितीय धोंजी असेन. त्या प्रमाणें महाराजांनीं कन्या दिल्यास सख्य होईल असें सांगितलें. देसाई यांचा हा इरादा समजल्यावर सरलष्कर वगैरे फितूरी मंडळींनीं सुंदराबाई राणी साहेब यांच्या संमतीनें त्यांची कन्या येसुबाई साहेब उपवर होती तिला देण्याचा बेत केला होता. परंतु महाराजांचा रुकार न पडल्यामुळें एवढें प्रकरण वाढून एवढा राग झाला. पेशव्यांसही महाराजांचा तोरा न चालेल ती गोष्ट इष्टच होती. त्या मुळें त्यांनीं ही महाराजांस सल्ला दिली कीं; येसूबाईचें देसाई यांशीं लग्न व्हावें, आणि निपाणकरांनीं महाराजांशीं इतःपर रवडा करूं नये असा ठराव व्हावा. तेव्हा निरूपाय होऊन महाराजांनीं रुकार दिला. नंतर शके १७३० साल्यीं वैशाख शुद्ध पक्षीं लग्नाचा निश्चय करून निपाणकरांस बोलावणें पाठविलें. नेमिल्या मुहूर्ताच्या दिवशीं निपाणकर सर्व फौज व लवाजमा घेऊन करविरास येऊन बाहेर उतरले. मुहूर्ताच्या वेळेस निवडक लोक समागमें घेऊन मोठ्या साशंकित चित्तानें वाड्यांत आले आणि लग्न समारंभ ज्येष्ठ मासीं (सन १८०८ जून) झाला. इतक्यांत त्यास कांहीं दगा असल्याची शंका येऊन भोजन न करितां तेव्हांच घरांत काढून बाहेर आले, आणि दुसरे दिवशीं निपाणीस निघून गेले. निपाणकरांचें सर्व म्हणणें कबूल केल्यावर ही तेसरळपणानें वागले नाहींत, या मुळें महाराजांस वाईट वाटलें; व देसाई

उरल्या प्रमाणें बागतील याची रयांस आशा राहिली नाहीं.

सदर प्रमाणें निपाणकरांच्या लग्नाचा सोहळा आटपून स्वस्थता झाल्यावर वधू पक्षीं आपल्या दासऱ्या दोन मुलींचें लग्नें यथास्थितपणें समारंभ करून केलीं. **चिमाबाईस** नागोजीराव पाटणकर यांस व **आकुबाईस** लक्ष्मणराव शिंदे सेना खासकील यांस देण्याचें ठरवून त्यांस कराविरीं आणविलें, आणि दोनही विवाह यथासांग सुमुहूर्तावर झाले. पाटणकरास करवीरासच ठेवून घेतलें, तोरगलकर ही कांहीं दिवस राहून तोरगलास गेले.

रायाजीराव जाधव सरनोबत आणि **हैबतराव** गायकवाड विश्वास राव हे कोल्हापुरास मोठे कर्ते होते. राजाच्या हातीं सर्व कारभार असल्यानें त्यांचें तेज पडेना, यास्तव राजाला कांडून कारभार कोणत्या रीतीनें निघेल याच्या विचारांत ते होते. त्यांणीं एके दिवशीं महाराजांची गांठ घेऊन कळविलें कीं, आजपर्यंत राजाज्ञांनीं कारभार चालविला, व मोठमोठीं कामें केलीं; परंतु दौलतींत कांहीं विचलक न उरविता दौलत खराबीस आणिली, आणि मनुष्यमात्रास जर्जर केलें. त्यांत आतां तर त्यांचा वृद्धापकाल झाला. जर सरकारची आम्हांस आज्ञा होईल, तर दौलतीचें काम व्यवस्थापूर्वक चालवूं व जेणेंकरून प्रजेस सुख होईल अशी तजवीज करूं. त्या समयीं राजाज्ञांस त्यांची इच्छा नसतां कामावरून दूर करणें महाराजांस परम अवघड वाटलें. **रत्नाकर आप्पा** राजाज्ञ हा मोठा शूर, चतुर व दक्ष असा मुत्सद्दी होता. याणें सतत २६, २७ वर्षें राज्यकारभार केला. तो महाराजांस बिकट प्रसंगीं कसा उपयोगी पडला, त्याणें सरकारची चाकरी कशी केली, दौलतीचें काम कसें चालविलें, आणि बिकट प्रसंगीं त्याणें महाराजांस कशी सल्ला दिली वगैरे गोष्टी जे कोल्हापूरच्या शिवाजी महाराजांचें चरित्र वाचतील त्यांच्या ध्यानांत सहज येतील. व त्यांस (राजाज्ञांस) निष्कारणीं घरीं बसविणें महाराजांस किती अवघड वाटलें असेल याची ही कल्पना सहज

होईल, परंतु तसें न करावें तर हे उभयतां कर्ते असून त्यांची सरशी होती, त्यांचें म्हणणें या प्रसंगीं कबूल न केलें, तर ते नाहीं तीं रवेकरी काढून बरवेडे करतील. यास्तव त्या उभयतांस बरें आहे असें सांगितलें. नंतर राजाज्ञांस बोलावून आपून सांगितलें, कीं आपला आतां वृद्धापकाळ झाला, या मुळें आपणास सतत एवढा राज्याचा गाडा हाकंण्याची तसदी देणें बरोबर होणार नाहीं. शिवाय दुसरे कारभाराचें काम कसें करितात हें पहाणें अवश्य आहे. आपण आजपर्यंत जो दक्षतेनें कारभार केला, लढाया मारल्या, व प्रसंगास योग्य अशा सल्ला मसलती दिल्या त्या बद्दल आम्हांवर मोठे उपकार आहेत. यास्तव आपण आतां कांहीं कामकाज न पाहतां पूर्वीच्या नेमणुकीचा उपभोग घेऊन घरीं स्वस्थ बसावें, अशी आमची इच्छा आहे. पूर्ववत् आपलेकडे तीन मामले चालतील. त्यांतून आपला खर्च भागून जो ऐवज शिल्लक राहील तो सरकारांत जमा करावा. अशी आज्ञा झाल्यावर राजाज्ञ यांणीं काम पहाण्याचें सोडिलें, व सदर सरनोबत व गायकवाड शके १७३१ सन १८०९ सालीं कारभार पाहूं लागले.

पुढें सन १८११ सालीं येसुबाई राणी साहेबांची प्रकृति बिघडून सुंदराबाई साहेबांचें लग्न झाल्यावर एकावर्षानें राणीसाहेब मृत्यु पावल्या. तेव्हां आबाजीराव निंबाळकर वाठारकर यांची कन्या नेमस्त होऊन महाराजांचा त्या कन्येशीं विवाह झाला.

महाराज सरकारच्या घराण्यामधीं कैलेला शरीर संबंध व त्यावेळीं झालेला ठराव मनांत न आणितां दुर्बुद्धीनें कांहीं खरलें काढून निपाणकरांनीं कोल्हापूर प्रांतास उपद्रव देण्यास पुनरपि सुरुवात केली. निपाणकरापाशीं फौज भारी असून पेशवे व इंग्रज यांमध्यें वसईचा तह झाल्यापासून त्यांच्या फौजेस कांहीं काम नाहींसें झालें होतें. त्यास कोल्हापूरचा प्रांत अगदीं लगत होता. या मुळें कांहीं तरी कलागत काढून त्या प्रांतावर आपल्या लोकांस सोडीत. असें तें ल-

ष्कर टोळांप्रमाणें महाराज सरकारच्या मुलखावर येई. निपाणकरांनीं अकेवारचें ठाणें घेऊन सामाबगडास वेढा दिला. नंतर जमावानिशीं पुनः करवीर शहरावर चालून आले. देसाई नजीक आल्याची बातमी कळतांच महाराजांची स्वारी फौजेची तयारी करून बाहेर पडली. दोन्ही फौजांची हेवऱ्याच्या माळावर गांठ पडून लढाई झाली. त्या समयीं ही पूर्वीच्या फितूर मंडळींनीं बाजू धरून तोंड काढिलें. या मुळें करवीरच्या फौजेंत गलबल झाली, व लोक कचरले. तेव्हां निपाणकर एकदम चालून येऊन भिडले. कोल्हापूरकरांचा अगदीं मोड झाला. एक हत्ती गोळा लागून मेला. पांच तोफा पाडाव करून नेल्या. सुमारें चारशें माणसें ठार झालीं, आणि सुमारें बाराशें लोक पाडाव झाले. या प्रमाणेंजय मिळाल्यावर निपाणकर परत गेले; आणि कित्येक ठिकाणीं घांतलीं त्यांनीं नवीं ठाणीं घातलीं (शके १७३३ सन १८११). याच साली सरवाड घाटगे आषाढ शुद्ध १५ रोजीं वारले.

असें वरचेवर निपाणकरांनीं कोल्हापूर करांस जर्जर करून सोडिलें. पुणें दरबारची असें करण्यास देसायांस आंतून फूस असल्यावरून देसाई बरखेडा करितात, असें महाराजांस वाटे. परंतु प्रधानांकडून महाराजांस पत्रें येत कीं, देसाईयांस ही दुष्कर्मे करण्यास प्रवृत्त होण्यायिकयीं आमची बिलकुल सल्ला नाहीं. त्या वेळीं पुण्याचे ब्रिटिश सरकारचे रेसिडेंट **एल्फिंस्टन** साहेब कर्नाटकांतील जहागिरदार व पेशवेयांमधील नकारीचा निकाल लावून व्यवस्था करण्यात गुंतले होते. त्यांजकडे कोल्हापूर करांनीं निपाणकराच्या दुर्वर्तनाविषयीं कळविलें.

सन १७६५ च्या तहानंतर मालवणचा किल्ला कोल्हापूरकरांस परत दिल्यापासून इंग्रजांच्या व्यापारी लोकांच्या जहाजांस हमेष उपद्रव सुरू होता. तो बंद करण्यास मालवण ताब्यांत घेतल्या शिवाय दुसरा उपाय नव्हता, यास्तव निपाणकरांचा उपद्रव बंद केल्यास महाराज मालवणचा किल्ला देऊन तह करतील असें एल्फिंस्टन साहेबांस दिसलें. त्या वरून प्रधानांकडून निपाणकरांस पुण्यास बोलावून नेववून इक-

डील हकीकत पिचारली. आतून **पेशवे** महाराजांस पत्रें लिहीत कीं, रेसिडेंटाचें म्हणणें बिलकूल ऐकूं नये; व मालवणचा किल्ला देऊं नये. तिकडे रेसिडेंटास कळवीत कीं, कोल्हापूरचें राज्य पेशव्यांच्या पुढारपणांत असल्यामुळें कंपनी सरकारास त्यांच्याशीं स्वतंत्र तह करितां यणार नाहीं. असे उपंडाव व दाबादाबी पेशव्यांकडून चालली. तेव्हां पंढरपुरीं फौजेसुद्धां जाऊन कर्नाटकांतील पेशव्यांच्या जहागिरदारांविषयीं उराव केल्यावर, पलटणानिशीं साहेब करवीरास येण्यास निघाले आणि सन १८११ सालीं भाद्रपद वद्यपक्षीं कुरलें मुक्कामी आले. आणि पुढें कोस मोजावयाचें चाक रवाना केलें.

हें वर्तमान महाराजांस समजल्यावर सर्व कामदार व राजास यास वाड्यांत बोलावून आणून त्यांस महाराज म्हणाले कीं, कंपनी सरकारचा व या सरकारचा पूर्वापार स्नेह असून साहेब पलटणा निशीं आले आहेत, त्यांजबरोबर युद्ध करणें बरोबर नाहीं, व युद्ध करून निभाव ही लागणार नाहीं. आपल्या सरहद्दीवरील **निपाणकर** आणि **वाडीकर** यांच्या हंमेषा कटकटी चालल्या आहेत. त्यांचा उलगडा पेशवे दरबारांतून होत नाहीं. पलवर्धनांचा ही शिलंशिला मधून मधून उद्भवतो. पुणें दरबारचा आम्हांशीं अर्थाअर्थीं संबंध नाहीं. कंपनी सरकार दिवसें दिवस बळावत चालले असून अधिकाधिक मुलूख सर करीत आहे, व सर्वांचे उपद्रव बंद करण्यास समर्थ आहे. तर अशा प्रसंगीं कोणता विचार करावा, याजविषयीं आपली सल्ला काय असेल ती सांगावी. असें महाराज बोलल्यानंतर सर्वांनीं विचार केला आणि राजाज्ञा यांणीं सांगितलें कीं, मालवण देऊन कंपनी सरकारा शीं तह करावा, आणि निपाणकर, सावंतवाडीकर वगैरे यांनीं जे किल्ले व मुलूख घेतले आहेत, ते सर्व परत यावे, आणि यांतास कोणाचा उपसर्ग न व्हावा व कटकटी ही उत्पन्न होऊं नयेत, असा बंदोबस्त करून घ्यावा. हें म्हणणें महाराजांसही मान्य होऊन त्याचवरून **नारायणराव** पंडित, **दिनकरराव** गायकवाड, **उदाजीराव** घाटगे

महिपतराव गोपाळ पारसनवीस व त्रिंबक आवाजी हिसाळकर यांजबरोबर सरंजाम वगैरे देऊन अश्वीन शुद्ध ३ चे दिवशीं कुरलेच्या मुक्कामास साहेबांकडे पाठविले. ते दुसरे दिवशीं तिसऱ्या प्रहरीं जाऊन पोंचले, आणि साहेबांची भेट घेऊन कळविले कीं, मालवण घेऊन तह करून पूर्वापार स्नेह चालत आल्या प्रमाणें पुढें चालवावा; सावंतवाडीच्या लढाई नंतर निपाणकर यांणीं जे गांव व हक्क, व चिकोडी आणि मनोळी तालुके व प्रांत घेतले आहेत, ते व वाडीकर सावंत यांणीं जे किल्ले घेतले आहेत ते परत यावे, व दुसऱ्या कोणापासून उपसर्ग होऊ नये. त्या विषयीं बंदोबस्त व्हावा, अशी महाराजांची आज्ञा आहे. असें बोलणें पडतांच महाराजांच्या मनोद्यानुरूप सर्व बंदोबस्त करून देतों. मात्र चिकोडी व मनोळी हे दोन तालुके प्रधानाकडे आहेत, त्यांची तजवीज पुढें होईल. त्या बद्दल कूर्त बोलणें काढूं नये व त्या बद्दल हक्क कूर्त सोडावा लागेल. बाकी सर्व बंदोबस्त येथून पुण्यास जाऊन च करून देतों. तह होऊन मालवण स्वाधीन करावें. या प्रमाणें साहेबांनीं सांगितल्यावर महाराजांस कळवून त्यांचा रुकार आणविला, आणि मालवण मोकळें करून देण्यास दोन महिनें अवकाश पाहिजे असें सांगितलें. नंतर उभयतांकडील बोलणीं चालणीं नेमांत येऊन करारिरी ठरल्या प्रमाणें खालीं लिहिलेला इकरारनामा तारीख १३ अक्टोबर सन १८१२ इसवी रोजीं झाला, आणि साहेब पलटणासह परत पुण्यास गेले.

यादि करारनामा फिमाबैन सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बहादूर, व सरकार श्रीमन्महाराज शिव छत्रपति करवीर कर

१ कलम पहिलें:— फिमाबैन सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बहादूर व सरकार राव पंडितप्रधान बहादूर एक तर्फ व महाराज छत्रपति करवीर कर दुसरे तर्फ यांमध्यें कायम सलोख व दोस्ती चालेल.

२ कलम दुसरें:— महाराज छत्रपति अजतर्फ खुद व फर्जंदा-

नरबुद्द वारसानखुद्द करार करीत आहेत कीं, चिकोडी व मनोळीवर व-
दोन्हीही माहालचे तालुक्यांत आजपावेतों दरवल आहे त्यांवर नमामहक्क व
दावा हर्कीसमाचा सोडून देतों व सोडून दिला आहे, व दोन्ही महाल मज-
कुर आजपासून रावपंडित प्रधान पेशवे बहादूर यांचे तसरुफांत व फ-
र्जदान व वारसान यांचे तसरुफांत पुरतेपणी हुकमतीनें
राहतील.

३ कलम तिसरें:— कीर्तमाना मुलूख व किल्ले गेल्याचा वर्षा-
त महाराजांपासून इस्तकबील माहे सपटंबर सन १८०८ इसवी तागाईत
आज पावेतों पेशवे बहादूर व त्यांचे सरदार चिकोडी मनोळीचे लढाई स-
बबेनें घेतगेले व हल्ली पेशवे बहादूर यांचे फौजेचे तसरुफांत आहे तो
मुलूख व किल्ले फिले फौर महाराजांस माघारा दिलाजाईल.

४ कलम चवथें:— महाराज छत्रपति ऐसा करार करीत आ-
हेत कीं, आणखी नमामदावा हरएक तऱ्हेचा कीं, राव पंडित प्रधान व-
हादूर यांजवर व यांचे तसरुफांत जितका मुलूख आहे त्या नमाममू-
लुकावर तसरुफ करचा मुलूख जो तिसरे कलमांत लिहिला आहे तो खे-
रीज करून, तमामदावा सोडून द्यावा व सोडून दिला, व महाराज छ-
त्रपति निपाणीचाही दावा सोडून देत आहेत, व महाराज आणखी करार
करीत आहेत कीं, पेशवे बहादूर यांचे सरदारान, व वस्तगान, व रयत
वगैरे हर दरज्याचा व हर तऱ्हेचा त्यांजवर तमाम दावा हरकिसमाचा
सोडून द्यावा व सोडून दिल्हा.

५ कलम पांचवें:— नजर यांजवर कीं, महाराज छत्रपतियां-
चे जिल्ह्यांत लोकां कडून इंग्रजी जहाजांची मारानी जहाला तीं बद क-
रावया करितां महाराज छत्रपति अजतर्फ खुद्द व फरजदान खुद्द व वार-
सान खुद्द कायम मुकरर करार करीत आहेत कीं, मालवणचें बंदर,
कीं जितकी जमीन किल्ल्याचे गिर्दागिरद आहे त्याचा तपशील.

१ किल्ला व जंजिरा सिंधुदुर्ग ऊर्फ मालवण.
१ किल्ला राजकोट.
१ किल्ला पद्मगड.
१ किल्ला सरजेकोट.

या चौकिल्यास जितकी जमीन खर्चाची सुकर असेल ती अखंड रहाण्या करितां व पुर्तेपणें हुकमती करितां सरकार इंग्रज बहादूर यांस दिली आहे, तर ज्या वेळेस इंग्रजी फौज येईल त्या वेळेस किल्ला व जमीन वगैरे सुद्धां त्यांचे शीघ्रूर्द केली जाईल.

६ कलम सहावें:— महाराज छत्रपति अजतर्फ खुद्द व अजतर्फ फरजदान व वारसान खुद्द करार करीत आहेत कीं, कोठे ही आरमार अथवा जंगी जहाज हरगीजठेवणार नाहीं व मालवण वगैरे दिल्या नंतर महाराजांचे मुलखांत जितकी बंदरें रहातील अथवा महाराजांचे कबजांत कोणीं बंदरें येतील त्या बंदरांत जंगी जहाजें अथवा आरमारें तयार होऊं देणार नाहीं अथवा त्या बंदरांकडे जाऊं देणार नाहीं. आणि महाराज असा करार करीत आहेत कीं, कंपनीच्या जहाजास ऐसा हक्क होईल कीं, कोणीं जहाज बंदर मजरांत येईल अथवा बंदर मजरातून बाहेर निघेल, त्याचा झाडा घेत जावा, अगर त्याजमध्यें सामान जंगी निघाले तर इंग्रज सरकारांत जप्त करावें; आणखी महाराज करार करीत आहेत कीं, हल्लीं जीं बंदरें महाराजांचीं आहेत, व ऐदा तसरुफांत होतील त्या तमाम बंदरांवर सरकार इंग्रजांचे तर्फेनें दरोगा राहील, कारणकीं तेथील जहाजांचे वर्तमान दर्याप्त करण्यासाठीं, व ऐसाही करार करीत आहेत कीं, दरोगे मजकुरास सदरहू जहाजाचा झाडा घेऊंदेत जातील.

७ कलम सातवें:— कोणी जहाज कीं, ज्यावर इंग्रजांचें निशाण अथवा इंग्रजी दस्तक असेल किंवा त्यांचे दोस्ताचें जहाज महाराजांचे बंदरांत येईल अथवा आफद असमानीन किंवा दुसऱ्या सबबेनें महाराजांचे किनाऱ्यास जाऊन लागतें जहालें तर त्याज विषयीं महाराज अजतर्फ खुद्द व फरजदान व वारसान खुद्द करार करीत आहेत कीं, सदरहू जहाजाची जितकी कुमक होऊं शकेल तितकी करीत जावी. आणखी महाराज करार करीत आहेत कीं, कोणत्याही मुलखाचें जहाज आफत असमानीनें किंवा कोणत्याही प्रकारें महाराजांचे मुलखाचे किनाऱ्यास येऊन लागल्यास किंवा शिकस्त जहाल्यास महाराजांनी व रयतेनीं

त्या जहाजावर कांहीं दावा न करावा.

८ कलम आठवें:— महाराज छत्रपति जर मालवणचें बंदर देतील व जहाजांच्या लुटी महकूब करवितील, तरी या दोनीही प्रतीवर इंग्रजसरकार कौल करार करीत आहेत कीं, जितका मुलूख मालवण दिल्यावर महाराजांचे तसरुफांत राहील त्याजवर कोणीही बाहेरील दौलतदार अथवा सरदार येऊन खलदा करील तर त्याजला दस्त अंदाज करूं देणार नाहीं.

९ कलम नववें:— वरील आठ कलमांच्या शर्ता अपलांत याव्या म्हणून, महाराज छत्रपति अजतर्फ खुद्द व अजतर्फ फरजदान व वारसान खुद्द करार करीत आहेत कीं, इंग्रजसरकारचा इतलाु व मसलत घेतल्याशिवाय कोणत्याही परकी दौलतवाल्याशीं कांहीं लढाई झगडा करणार नाहीं. जर करितां महाराजांशीं किंवा त्यांचे फरजदान व वारसान यांशी व परकी दौलतवाल्याशीं तकरारीचा मुकदमा इतिभाक पडला, तरी इंग्रज सरकारास इतलाु केली जाईल. आणि सरकार इंग्रज त्याची चौकशी करून त्या तकरारी इनसाफानें मुनासबेनें फैसलु करतील; व जोकांहीं इनसाफ सरकार इंग्रज करतील त्याजला महाराज छत्रपति बेउजूर कबूल करतील, व महाराज छत्रपति अजतर्फ खुद्द व फरजदान व वारसान खुद्द असा करार करीत आहेत कीं, या नहनाम्यत्या प्रतीं जो दावा इरकोणतेही पर दौलतदाराबरोबर असेल तो दरपेश होणार नाहीं; व नववे कलमाच्या शर्ता महाराज छत्रपति बजाबून न आणतील, तर आठवें कलम रद्द असें समजलें जाईल.

१० कलम दहावें:— महाराज छत्रपतीवर कंपनी सरकारचे जहाजाचे तारानगीचा दावा हिशेब बहुत आहे. परंतु मालूम होतें कीं, महाराजास मुलकाचे खराबीमुळें हिशेब आदा करावयास तरवर्फी फार गुजरेल आणि हे ही कळोन येतें कीं, महाराजांचे चित्तांत असें खास आहे कीं, पुढे गारदगिरी न व्हावी, याजकरितां सरकार दौलतदार कंपनी इंग्रज बहादूर महाराज छत्रपतीचे सरकारावर

जो दावा पैशाचा ठेवीत होते, तो दावा तमाम दरोबस्त इंमेशाकरितां सोडून देत आहे.

एकूण कलमें सुमारें दहा लिहित्या प्रमाणें व्यार तारिख छ २४ माहे रमजान, मुक्काम करवीर रुजू महाराजांचें मोर्तब, सदर- हु कलम बमोजीब करार, तारीख ८ माहे अक्टोबर सन १८१२ इसवी. निशाण इंग्रजी मोहोर.

नंतर माऊवण मोकले करून देण्याचा विचार चालला. इतक्यांत महाराजास वळ होऊन वारवा फारच अतिअवस्थेचा झाला, सबब परिणाम नीट नाहीं म्हणून सर्व गडबडले. परंतु थोडयाच दिवसांत उतार पडून महाराजांस आरोग्य झालें. तेव्हां माऊवण मोकले करून देण्या साठीं राजाज्ञांस आज्ञा करून करविराहून रवाना केलें. ते कार्तिक वद्य ७ रोजीं जाऊन माऊवणास पोंचले. तेथें गेल्यावर किल्ला मोकळा करून कंपनीकडून आलेल्या कामगारांच्या हवालीं करून देण्याचाचे- त करूं लागले. त्या समयीं किल्लयावरील लोकांनीं राजाज्ञांस विचारिलें कीं, आपण किल्ला मोकळा करून कंपनी सरकारांत देणार सर आमची वाट काय? तेव्हां त्यांच्या रोजमुऱ्याचा महाराजांच्या मंजुरीनें बंदोबस्त करून कांहीं लोकांस मसिद्ध गडास (रांगणा) आणि कांहीं लोकांस भुदरगडास नेमून पाठविलें. किल्लयांतील शक कर्ते शिवाजी याच्या संस्थानांतील माणसें व खर्च, आणि इकडील चौथाई अंमल कायम उठविला. किल्लयांतील तोफा, जरबीरा वगैरे जंगी सामान बाहेर काढून नेलें, आणि कंपनी कडून आलेल्या लोकांच्या हवालीं किल्ला करून पाचव्या घेतल्या, आणि करविरास निघून गेले.

किल्ला स्वाधीन झाल्याचें समजल्यावर एल्फिस्टन साहेबांनीं अचिसन साहेब यांस पत्रें देऊन वाडी शांतांत पाठविलें, आणि त्यांणीं घेतलेले किल्ले परत घेऊन महाराज सरकारास दिले.*

---

* याचा उल्लेख तहामध्यें नाहीं, यास्व कारण समजत नाहीं.

महाराजांच्या पदरीं पुष्कळ पठाणलोक होते. त्यांचा पुरव्य सादुल्लाखान ह्म होता. त्याची तलब फार चढली होती, सबब तो आपली महाराज सरकारांत बाकी येणें आहे, ती याबी म्हणून कारभारी यांजकडे जाऊन नित्य मागणें करूं लागला. तेव्हां नवीन कारभारी गायकवाड च जाधव त्यांस सांगत कीं, हा जाबसाल मागील वहिवाटीनला आहे, यास्तव या विषयीं मागील कारभारी यांस विचारावें. या प्रमाणें कांहीं दिवस गेले; तत्रापि उलगडा होईना. या सुळें पठाण याणें विचार केला कीं, खटला केल्या शिवाय सुरलीत जाबसाल उलगडत नाहीं. सबब पठाणांनीं राजाज्ञा व आणखी चारदोन असामी यांस आणून वाड्यांत बसविलें, तरी कांहींच निकाल होईना. तेव्हां वाड्याच्या उत्तरेकडील सज्याचरील मजल्यांत त्यांस ठेवून खुद्द सादुल्लाखान कांहीं पठाणांस घेऊन खालच्या मजल्यांत राहिला, व बाकीच्या पठाणांस तयारीनें बाहेर उभें केलें, आणि उपोषणें काढीत राहिलें. दोन तीन उपोषणें झाल्यावर वरच्या लोकांस खालीं आणवून भोजनास घालावें, आपण भोजन करावें. या खटल्याच्या कारणानें महालाच्या खाऱ्यांसहीत महाराजांची स्वारी राजाज्ञांच्या घरीं जाऊन राहिली. या प्रमाणें दीड दोन महिने गेले. नवे कारभारी यांणीं मनांत आणिलें कीं, वाड्यांस तोफा लावून पठाणांचा नाश करावा. त्या उद्देशानें तोफा आणून ठेविल्या. हें पठाणांनीं पाहून आतां आपण वांचत नाहीं, आपला नाश होतो असें त्यांच्या मनांत आलें. नंतर वाड्यांतील जाजमें तेलांत भिजवून खांबास गुंडाळलीं, आणखी त्यांवर तेल ओतून आगलाविली. ती जास्त पेटली तेव्हां राजाज्ञ वगैरेस घेऊन पठाण हुजूर पागेंत जाऊन राहिले. तेव्हां शहर लुटलात किंवा गर्दी करून खराबी करितात कीं काय याची भीति लोकांच्या मनांत उत्पन्न होऊन शहरांत निकडे तिकडे गडबड झाली. परंतु शहरास उपद्रव न देतां ते स्वस्थ होते. या खरास गोष्ट आली तेव्हां आतां काय नुकसान होईल हें समजत नाहीं, आणि अग्नी पसरून प्रलय झाल्यानंतर दुर्गा किकास कारण हो-

ईल यास्तव यांची कांहीं तोड कारणें भाग आहे. केवळ नव्यां कारभाऱ्यां-च्या नादास लागून उपयोगी नाहीं, असें मनांत आणून कंपनी सरकारचे वकील कृष्णराव होते त्यांस बोलावून त्यांच्या विद्यमानें पठाणांच्या चाकीची तोड ठरविली, आणि ठरल्या ऐवजाची खात्री श्रीस्वामी जगद्गु-रु यांची देऊन पठाणांस वारणे पार घालवून दिलें. आणि रत्नाकरपंत राजास्तांसमोकळे करून आणिलें. महाराजांचें दर्शन घेऊन डोंगरास जा-ण्याचा निरोप मागितला व तो घेऊन ते डोंगरावर जाऊन राहिले. वा-ऊ एटविला होता तो लागलाच विझविला. तत्राप कांहीं भाग जळून खा-क झाला, व बरेच कागदपत्र ही अग्नीच्या भक्ष्य स्थानीं पडले, व ते-णें करून मोठी नुकसानी झाली.

या प्रमाणें जिकडे तिकडे थावराथावर झाल्यावर लहानाम्या-च्या वेळीं जे जाबसाल ठरले होते त्या पैकीं कित्येकांचा उलगडा होणें राहिला होता; ते उलगडून घेण्यासाठीं एलफिस्टन साहेबाकडे श्री भाऊमहाराज व दिनकरराव गायकवाड यांस पुण्यास पाठ-विलें. त्यांनीं पुण्यास जाऊन साहेबांची भेट घेतली, आणि करारां-तील कांहीं जाबसाल उलगडणें राहिले आहेत ते उलगडून द्यावे, अशी विनंति केली. तेव्हां साहेबांनीं प्रधानांकडे सांशून पाठवून ए-क द्वेंदीड गांव सोडून देण्या विषयीं ताकिदी आणून दिल्या. त्या करावीर पाठविल्या व त्या प्रमाणें गांव स्वाधीन करून घेतले.

सर्वांस उदक विपूल व्हावें या हेतूनें पद्मालेंतलाव बांधून वि-स्तीर्ण करावा, म्हणजे त्यांत पाणी जास्त साठून सर्वांस सुख होईल, असा विचार करून तलाव वांदविण्याचें काम आरंभिलें; व काम पहा-ण्या करितां स्वारी वरचेवर जात असे. काम पाहून आल्यावर एके दि-वशीं महाराजांस अतिशय ज्वर आला. मागें वळाचें दुखणें झालें हो-तें त्या वेळीं अपथ्य न करण्याविषयीं वैद्यांनीं सांगितलें होतें, पण क-र्मयोगात् जे जिन्नस वर्ज होते तेच खाण्याची इच्छा होऊन महाराजा-नीं ज्वर असतां खाल्ले. तेणें करून प्रकृति दिवसें दिवस अधिकच वि-

घडूं लागली. पुढें उतार न पडतां यांतच परिणाम होणार असें म-
हाराजांसही वाटलें. जवळजे नवशिके कारभारी होते, त्यांची
योग्यता महाराजांस समजत होती, व त्यांवर तिनका त्यांचा विश्वास न-
व्हता. यास्तव महाराजांनीं राजास्तांस बोलावणें पाठवून डोंगराहून
आणविलें. ते येतांच महाराजांच्या दर्शनास गेले. राजास्त येतांच
सर्वांस बाहेर काढून त्यांस जवळ बसवून घेतलें, आणि बोलले कीं,
पुढें विचार नीट दिसत नाहीं; या दुखण्यांतच आमचा परिणाम हो-
णार; उभयतां चिरंजीव बयानें लहान आहेत, चिकोडी व म-
नोळी तालुके निपाणकरांनीं घेतले असून ते शत्रु सन्निध आ-
हेत. यास्तव कोणत्या समयीं काय अपाय होईल याचा नेम नाहीं.
या करितां तुम्हांस आणविलें आहे. तर किल्लेकोटाचा बंदोबस्त क-
रून सरंजामी व शिलेदार यांस करविरीं आणवून हुषारीनें बंदोबस्त
ठेवावा. स्वारी तुळजापुरास श्रीच्यादर्शनास जाणार. राजास्त बाहे-
र जाण्या पूर्वी सुंदराबाई राणीसाहेबांस बोलावून आणून सांगितलें
कीं, राजास्तांस सर्व मजकूर सांगितला आहे. उभयतां चिरंजीव ल-
हान आहेत, यास्तव पदरच्या जुन्या माणसांस अंतर न देतां व को-
णाच्याही सांगण्यावर त्याजविषयीं विकल्प न आणितां त्यांचा सांभा-
ळ करावा. आबासाहेबां पेक्षां बाबासाहेबावर सापत्नभाव मनीं
न आणितां विशेष लोभ करावा. त्या वरून बाईनीं आज्ञेप्रमाणें क-
रीन म्हणून सांगितलें. नंतर राजास्त बाहेर आले आणि बापूवैद्य
बहिरेश्वरकर यांस, महाराज यांतून पार पडतील कीं, नाहीं? म्हणू-
न विचारिलें. तेव्हा त्यांणी ही सांगितलें कीं, महाराज यांतून पार पड-
ण्याचे नाहींत. असें वैद्याचें मत पडल्यावर राजास्त यांणीं किल्ले-
कोटाचा बंदोबस्त ठेवून हुषारीनें रहाण्याविषयीं आज्ञापत्रें पाठवि-
लीं, तसेंच प्रतिनिधि अमात्य वगैरे सरदारांस करविरीं जलद निघू-
न येण्या विषयीं आज्ञापत्रें रवाना केलीं. त्या प्रमाणें जवळची कांहीं
मंडळी आली. कांहीं लांबीच्या पल्ल्यावरील येणेची होती. चैत्रवद्य

अष्टमी भृगुवारीं (तारीख २४ माहे एप्रील सन १८१२) सायंकाळीं वैद्यांनीं वाड्यांत येऊन महाराजांची प्रकृति पाहून राजास वगैरे सर्वांस सांगितलें, कीं आजचा दिवस कठीण आहे. सबब सर्वांनीं भोजन करून वाड्यांत येऊन हजर असावें. त्या प्रमाणें सर्व आपल्या घरीं जाऊन भोजनें आटपून वाड्यांत आले. तिसरे प्रहरीं महाराजांनीं राजास्तांस जवळ बोलावून सांगितलें, कीं आसन घालून त्यावर आपणास निजवावें, आणि भागिरथी व तुळशी मुखांत घालाव्या. त्या अन्वयें राजास यांणीं करविलें, आणि प्रायश्चित्तादि दानधर्म झाला, व गोप्रदानें देवविली, व ब्राम्हणांचे चरणाचीं तीर्थें ही दिलीं, व नाम स्मरण चालले. इतक्यांत श्री बाबा महाराज व हैबतराव गाईकवाड यांणीं दुर्बुद्धीनें अशा समयांत एल्फिस्टन साहेबांकडे थैली पाठविण्याचा मसुदा करविला; त्यांतील मतलब असा कीं, महाराज सरकारची कदीम दोस्ती, यास्तव कंपनी सरकारच्या मांडीवरुनसें ठेविलें आहे, तर सर्वोपरी चिरंजिवांस मदत करून राज्यच्छि करावी. या प्रमाणें थैली तयार करवून त्या क्षणीं रवाना केली. नंतर महाराजांनीं सायंकाळीं तीन घटका दिवसास " श्रीराम शब्दोच्चारसा श्रीच्या देवघरानजीक " कैलास वास केला. त्या समयीं वाड्यांत बहुतांत एकच गर्दी होऊन हाहा कार झाला.

महाराजांनीं देह ठेवित्यावर राजास यांणीं लोक पाठवून शहरचे दरवाजे बंद करविले, आणि शहरचा व पेठांचा बंदोबस्त करविला. तसेंच वाड्यांतील जामदार रवाना व इतर कारखानें यांचा बंदोबस्त आपले चिरंजीव व पुतणे यांस देवून केला, व सर्व कुलपांच्या किल्ल्या आणवून आपल्याजवळ घेतल्या. नंतर उभयतां महाराज व महालच्या स्त्रिया प्रेता सन्निध असल्यानें फार आकांत होतो असें पाहून स्त्रियांस दुसऱ्या चौकांत पाठवित्या केल्या. नंतर महाराजाच्या प्रेतास पोषाख घालून सदरेवर बसविलें आणि चाली प्रमाणें पुढें नाच उभा केला. इतक्यात बाबा महाराज व हैबतराव गाई-

कवाड यांणीं पुण्यास साहेबांकडे दुसरी थैली पाठविण्याचा मसुदा तयार केला. त्यांतील मतलब कीं, शिवाजी महाराज कैलासवासी झाले, पुढें राज्यवृद्धिविषयीं मदत व्हावी. तेथें वकिलीच्या कामावर श्रीभाऊ महाराज व दिनकरराव गाईकवाड आहेत, येथें कारभाराचे कामावर श्रीबाबा महाराज व हैबतराव गाईकवाड आहेत. या प्रमाणें मजकुराची थैली तयार करवून सांडणी स्वाराबरोबर रवाना केली. या दोनही थैल्या उभयतांनीं राजाज्ञास न विचारितां व त्या प्रकरणीं त्यांस न कळवितां पाठविल्या. तत्राप त्या विषयीं त्यांणीं मनांत कांहीं विषम न आणितां कैलासवासी महाराजांनीं अंतकाळीं आज्ञा केली त्या प्रमाणें काम बजावून महाराजांचें सार्थक करण्यांत ते मग्न होते. या वरून त्या पुरुषाचें मन किती थोर व पोक्त होतें याची कल्पना सहज होईल.

श्रीबाबा महाराजांनीं राजाज्ञांस सांगून पाठविलें कीं, छत्रपति महाराजांचें सार्थक श्रीबावामहाराजांचे देवालया नजीक पश्चिमेस करावें. यांतील मतलब असा कीं, येणें करून सरकारी खर्चांतून आपलाही खर्च चालेल. परंतु राजाज्ञ यांनीं विचार केला कीं, तिकडे सार्थक केलें असता पृथक खर्च देवणें प्राप्त येईल. कैलासवासी शंभु छत्रपति यांच्या देवालयाच्या दक्षिणेस जागा आहे, त्या ठिकाणीं सार्थक केलें असतां तेथें चौघडा वगैरे खर्च पूर्वीचा आहेच. थोडा जास्त खर्च होईल म्हणजे दोहीं कडील खर्च एकंदरीतून भागेल. असें मनांत आणून दोनही प्रकार आईसाहेबांस कळविले. त्यांच्याही विचारास राजाज्ञांचें म्हणणें पसत पडलें, आणि शंभू छत्रपतीच्या देवालयाजवळ सार्थक करण्याची तयारी करविली. दुसऱ्यादिवशीं सकाळीं (मंदवारीं) शाहरांत आबासाहेब महाराजांची दुराई फिरविली. नंतर विजापूर दरवाजा उघडून स्वार, शिबंदी, हत्ती, घोडे, लोक वगैरे आंत घेऊन स्वारी नेण्याची सिद्धता केली. नंतर महाराजांस स्नान घालून पोषाख घातला. नंतर महालच्या स्वाऱ्या

आणून दर्शन करवून आंत पावत्या केल्या. मग महाराजांस शिबिकेंत बसवून सर्व अवाजम्यासह स्वारी निघाली. त्या वेळीं तोफा उडविल्या. उभयतां महाराज हुजऱ्याच्या कडेवर बरावर होते. मागें पुढें सरदार, कामदार, मानकरी वगैरे राजास्तांच्या तालिदी प्रमाणें लफावत्तीनें चालले होते. कोणी जवळ येऊन महाराजांचें दर्शन घेण्याची अपेक्षा दर्शविल्यास त्यास शिबिकेजवळ येण्यास देत. या प्रमाणें स्वारी गंगादरवाजाच्या बाहेर गेली. तेथी बाहेर जातांच पुनः तोफा झाल्या. दोहोंबाजूंस सर्व शहरचीं माणसें तटस्थ पहात उभी होतीं. महाराजांनीं पुष्कळवर्षे राज्य केलें असल्यानें व महाराजांचा स्वभाव मोठा उदार, दयाळू व ममताळू असल्यामुळें सर्व लहान थोरांस त्यांची माहिती होती. यास्तव सर्व दुःखी होऊन शोक करीत होते, अशा प्रकारें स्वारी गंगेवर पोंचल्यावर श्रीशंकराचार्य व श्रीबाबा महाराज यांच्या समाधीस सव्य प्रदक्षिणा घालून तारकेश्वरानजीक गंगेत शिबिका उतरली. तेथें प्रेतास गंगेंत स्नान घालून कर्मास आरंभ झाला.

हा विधि गंगेवर चालला आहे त्या समयीं कंपनी सरकारचे अरबबरनवीस स्वामीच्या मठांत असत ते झाल्या मजकुराची अरबबर लिहीत होते. त्यांच्या मार्फत नवीन कारभाऱ्यांनीं थैल्या पाठविल्या नव्हत्या व त्यांस ही कळविलें नव्हतें. यास्तव त्यांनीं अरबबरनवीसांकडे पारसनवीसें यांस पाठवून थैल्या पाठविल्याचा मजकूर कळविला. आणि हा मजकूर थैल्या पोंचण्या पूर्वी साहेबांस कळावया विषयीं जी तजवीज करणें ती करावी अशी विनंति केली, तेव्हां त्यांणीं तेथें इकडील वर्किलांपाशीं **सरुपजी क्षीरसागर** हुजरे होते त्यांच्या नांवें कारभारी यांचे साहेबांस थैल्या पाठविल्याचा मजकूर कळविण्या विषयीं पत्र घेऊन तें आपल्या डाकेंतून रवाना केलें.

गंगेवरील कर्म आटपून महाराजांचें प्रेत चितेवर घेवते वेळीं राजास यांणीं महाराजयांचें शेवटचें दर्शन घेऊन चरणावर मस्तक ठेविलें, आणि फार श्रमी होऊन नेत्रांतून घळाळां अश्रु टाकिले. नंतर अग्नि दि-

ला, त्या बरोबर आपरवीं तोफांचें बार झालें. दहन आटपल्यावर तिसऱ्या प्रहरीं उभयतां महाराजांच्या स्वाऱ्यांसह सर्व लोक शहरांत आले. तिसरे दिवशीं श्रीकृष्णेस पाठविण्या साठीं रक्षा* भरविली व रवाना केली.

पुण्यास येऊन पोंचण्याच्या पूर्वी डांक जाऊन पोंचली. क्षीरसागर यांस खरोटा पावलांच साहेबांकडे जाऊन झालेला मजकूर कळविला. अरबबरनवीसां कडून यथा तथ्य हकीकतीची अरबबर अलाहिदा गेलीच होती. डांके नंतर दोन दिवसांनीं येऊन पोंचल्या त्या भाऊ महाराज व दिनकरराव गाईकवाड यांणीं साहेबांकडे गुजरल्या आणि महाराजांनीं कैलासवास केल्याचा मजकूर विदीत केला. त्या वरून साहेबांस ही वार्ता वाटली. परंतु उभयतांनीं कांहीं भाषण केलें नाहीं. दुःख प्रदर्शक पत्र चारी नांवें गाळून पाठविलें, व दुखोट्यास दोन शालजोड्या ही पाठविल्या; त्या अरबबरनवीसांकडे अकरावे दिवशीं आल्या, व त्यांणीं रीतीप्रमाणें शालजोड्या वाड्यांत उभयतां महाराज व राणी साहेब यांजकडे राजाज्ञांच्या मार्फत गुजरल्या.

इकडे महाराजांची नित्यक्रिया चालली होती. नऊ दिवस विधि झाल्यावर दहावे दिवशीं तिलांजळी देण्यास सर्व गंगेवर गेले. तिलांजळी देऊन पिंड ठेवितांच काक स्पर्श झाला. अकरावे दिवशीं गज, अश्व, रथ, शय्या वगैरे दानें यथा सांग दिलीं. बाराव्या दिवशीं सांपंडी झाली. तेराव्या दिवशीं मासिक निवृत्ति झाली. हा वेळ पर्यंत कैलासवासी महाराजांच्या आज्ञे प्रमाणें सर्व बंदोबस्त ठेवून राजाज्ञ यांणीं कारभार चालविला. सापत्न विचारांत कंठहास आरंभ होणार, सबब कामांत असणें चांगलें नाहीं, असा विचार करून तेरावे दिवशीं सायंकाळीं राजाज्ञ आईसाहेबां पाशीं गेले, आणि जामदारखाना व इतर का-

---

* "रक्षा भरतांना महाराजांच्या आंगावरील शालजोडीचा पोटावरील सबंद तुकडा अग्निस्पर्श न होतां निघाला; त्यावरून सर्वांनी आश्चर्य करून महाराज पुण्यवंत असें मानिलें" असा लेख आहे.

रखानें यांच्या किल्ल्या पुढें ठेवून पायांवर मस्तक ठेविलें, आणि महाराजांचे आज्ञेप्रमाणें सार्थक झालें, आतां आम्ही घरीं जातों म्हणून विनंती करून निरोप घेऊन गेले, चवदाव्या दिवशीं यथा पद्धति प्रमाणें अभ्यंगस्नान झालें.

राजाज्ञ यांणीं कारभारांतून हात काढतांच पहिल्याच दिवशीं नवीन कारभाऱ्यांनीं कळहाचें बीज पेरिलें. शिवाजी महाराजांनीं उभयतां महाराजांस जवळ घेऊन त्यांजकडून सर्वांस विडे देवविण्याची चाल तेविली होती. **श्रीबाबामहाराज** व **हैबतराव** गायकवाड यांणीं सापत्नपणाचा भाव मनांत आणून बाबासाहेब महाराजांस सुरवं झाल्यावर त्यांस न कळविता, रात्रौ कचेरी करून **आबासाहेब** महाराजांकडून सर्वांस विडे देववावे अशी मसलत केली, आणि आईसाहेबांस कळवून त्यांचा ही रुकार घेतला. त्या अन्वयें रात्रौ कचेरीची तयारी करवून सांप्रदायाप्रमाणें नजरा व सलके होऊन विडे देवविले व किल्लेकोटास आज्ञापत्रेंही पाठविलीं. दुसऱ्या दिवशीं **बाबा** साहेब महाराजांची मातोश्री **कमळजा** वाईसाहेब यांस रात्रौ झालेला प्रकार समजतांच देवघरांत येऊन त्यांणीं आकांत मांडिला. नंतर राजाज्ञास बोलावून आणून सांगितलें, कीं रात्रौ झालेला मजकूर आपणास कळलाच असेल, तुम्हीं तर पहिल्यापासून माहितगार आहां, झाली ती गोष्ट विपरीत झाली, अभागीपुढें ही होणार त्यास तुमचा उपाय नाहीं. आतां आपण आईसाहेबांकडे जाऊन त्यांस चार बुद्धिवादाच्या गोष्टी सांगून खर्चाचा बंदोबस्त करून चिरंजिवांस ह्मआमची मंडायाचेस रवानगी करून द्यावी. येथें गाईकवाड वगैरेच्या आकसांत रहाणें योग्य नाहीं कोणत्यावेळीं काय अपाय करतील आणि कांहीं नसी दुर्निमित्त ठेवून काय बद्दल करतील याचा नेम नाहीं. यास्तव हें तुमच्या हातून होत असल्यास करावें. नाहीं पेक्षां पुण्यास साहेबांकडे पत्र पाठवावें. त्यांच्या स्वाधीन चिरंजिवांस केलें आहे. ते सांगतील तसें करतां येईल. अशी आज्ञा झाल्यावर राजाज्ञ आईसाहेबांकडे गेले आणि सांगितलें, कीं, एखाद्या अल्पबुद्धीच्या माणसाची गोष्ट ऐकून दौलतीस अपाय करून घेणें अप्रशस्त

आहे. महाराजांनीं जशी आज्ञा केली, आणि ज्यांचें जसें चालविलें तसेंच चालवावें, हें योग्य असें आम्हांस वाटतें. याउपर साहेबांची मर्जी म्हणून विनंति केली. तेव्हां आईसाहेबांनीं झाली ती गोष्ट गैर झाली, असें कबूल करून उभयतां चिरंजिवांस देवघरात कमळजाबाई साहेबांपाशीं घेऊन गेल्या आणि झालें त्यांत आमची चूक झाली, इतःपर असें होणार नाहीं; महाराजांनीं जसें चालविलें त्यांहून अधिक चालवूं. यांत किंमपि अंतर करणार नाहीं, असें सांगून श्रीची शपथ केली; तथापि बाईची समजूत पडली नाहीं, त्या बोलल्याकीं झालें तें झालें. आपण आग्रह करूं नये. आपल्याकडे झाल्याचा दोष कांहीं नाहीं. आपल्याजवळची मंडळी आमच्या नाशास उद्युक्त आहेत. तेव्हां त्यांच्या सांगण्यावरून आपल्या मनांत काय येईल यांचा नेम नाहीं. वरचेवर कटकटी उत्पन्न होणार. यास्तव येथें रहाणें ठीक नाहीं. माईसी चिरंजिवासह रवानगी करून द्यावी. हें बडिलांसही विहीत व निर्वेध होणार आहे. हें बोलणें ऐकून आईसाहेब अत्यंत खिन्न झाल्या. बाहेरहीं गडबड झाली. भोजनें नाहींत. तेव्हां आबासाहेबांनीं आईसाहेबांचे चहूपाय धरून पायांवर मस्तक ठेविलें आणि बोलले कीं, आपण ज्या अन्वयें सांगाल त्या प्रमाणें करीन. झालें तें गैर समजुतीनें झालें, ती चूक झाली. इतःपर असें व्हावयाचें नाहीं, असें सांगून श्रीची, महाराजांची व आईसाहेबांची शपथ दिली. तरी मर्जी शांत होईना. त्या समयीं राजाराम यांनीं बहुतप्रकारें बोध केला, आणि क्षमा करून सर्व राग शांत करावा, आणि आईसाहेब व महाराज सांगतात तें ऐकावें, पुढें आपण सांगाल तसें तें ऐकतील, अमान्य करणार नाहींत अशी विनंति केली. तेव्हां मर्जी किंचित् शांत झाली. नंतर आबासाहेबांनीं त्यांस हातीं धरून बाजूंत नेलें. मग सर्वांचीं एकेठिकाणीं तारे झालीं. आणि बरकड मंडळीहि आपापल्या घरीं भोजनास गेली. दुसऱ्या दिवशीं राजारामही निरोप घेऊन श्रीच्या दर्शनास डोंगरास गेले.

पुरंवणी.

पत्रें यादी वगैरे

नंबर १.

कलचुरीबला राज्याभिषेक शके १ आनंद नाम संवत्सरे, ज्येष्ठ वद्य १३ भौमवासरे.

(१) **मुख्यप्रधान** यांणीं सर्व राज्यकार्य करावें. राजपत्रावरी शिक्का करणें. सेना घेऊन युद्धप्रसंग स्वारी करावी, व ताबुका ताबिनाम स्वाधान होईल त्याचा तो, रक्षून बंदोबस्त करून आज्ञेंत वर्तावें. सर्व सरदार व सेना यांणीं याजबरोबर जावें त्यांणीं सर्वां समतें चालावें येणें प्रमाणें कलम १.

(२) **सेनापति** यांनीं सर्वसैन्य रक्षणकरून युद्धप्रसंग स्वारी करावी. ताबुका स्वाधीन होईल तो रक्षून हिंडाव करून आज्ञेनें वर्तावें. फौजेच्या लोकांचें बोलणें बोलावें; सर्व फौजेचे सरदार यांणीं त्याजबरोबर चालावें कलम १.

(३) **अमात्य** यांणीं सर्व राज्यांतील जमाखर्च चोकशी करून दफ्तरदार फडणीस यांचे स्वाधीन असावें. लिहिणें चोकशीनें आकारावें. फडणिशी, चिटणिशी, पत्रांवर निशाण करावें. युद्धप्रसंग करावें, ताबुका जतन करून आज्ञेंत चालावें. कलम १.

(४) **पंडितराव** यांणीं सर्व धर्माधिकार धर्म अधर्म पाहून शिक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चित्त एवं होतील त्याजवर समत- चिन्ह करावें. दान, प्रसंगशांति, अनुष्ठान तात्काळ करावें. कलम १

(५) **सचीव** यांणीं राजपत्रें बोधकरून अधिक उणें अक्षर, मजकूर शुद्ध करावा. युद्धप्रसंग करून ताबुका स्वाधीन होईल तो रक्षून आज्ञेत वर्तावें, राजपत्रावर चिन्ह संमत करावें. कलम १.

(६) न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय अन्याय मनास आणून बहुत धर्मे करून न्याय करावे. न्यायाची निवाडे पत्रें यांजवर समत चिन्ह करावें. कलम १.

(७). मंत्री यांणीं सर्व मंत्र विचार, राजकारणें, यांतील सावधतेनें विचार करावे. आमंत्रण, वाकनिशी, त्यांचे स्वाधीन. तालुका जतन करून युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर समत चिन्ह करावें.

कलम. १.

(८). सुमंत यांणीं परराज्यांतील विचार करावा; त्यांचे वकील येतील त्यांचे सत्कार करावे, युद्धादि प्रसंग करावे, राजपत्रांवर समत चिन्हकरावें. कलम १.

(९). चिटणीस यांणीं सर्वराज्यांतील राजपत्रें लिहावीं, राजकारण पत्रें व उत्तरें लिहावीं. आणखी दानपत्रें वगैरे माहली हुकमी यांचा जाबता, फडणिशी अलाहिदा, त्या प्रमाणें लिहावीं. खासरोसंबंध नाजुक पत्रें यांजवर मोर्तब, अथवा खास दस्तक मात्र वरकडांचा दारवला चिन्ह नाहीं, चिटणीसानीं च करावें. कलम १.

(१०). फौजेचे मवनीस बक्षी यांणीं सर्व फौजेची हजेरी चौकशी करावी. यादी करून समजवावें, रोजमुरा वांटावा, सत्कार करावा, युद्धादि प्रसंग करावे. कलम १.

(११). किल्ले, कोट, गणी, जंजिरे येथील कायदे करून दिले त्या प्रमाणें हवालदार, सुभेदार, कारखानीस, सबनीस, सरनोबत, तट सरनोबत लोक यांचे जाबते करून दिले, त्या प्रमाणें चालून सावधतेनें म्यानें रक्षावीत. तगीरीवहाली हुजुरून व्हावी. बेजमी मेमणूक तालुकेदार यांजकडे, दरवाजा किल्ला हवालदार यांचा हुकूम. शिक्के त्यांचे नांवचे कारखाननिशी, सबनिशी जाबता अलाहिदा असे. कलम १.

(१२). सेनाधुरंधर यांणीं बिनी करावी, आघाडीस जावें, फडफर्मास जमा करावी, लूट करणें, मना करणें, चौकशी ताकीद त्यांजकडे. पुढें असून सेना रक्षण करावी. कलम १.

(१३). सुभे, मामले, तालुकेदार यांस, ज्यांजकडे नेमले, त्यांणीं जाबते प्रमाणें चालावें. हुजूरचे दरखदार चिटणीस, फडणीस, मुजूमदार यांचे इतल्यानें चालून हिशेब गुजरावे. कलम १.

(१४). बारा महालचे अधिकारी यांणीं आपापलें काम दुरुस्त राखून हिशेब आकारून दफ्तरांत गुजरावें. कलम १.

(१५). अठरा कारखान्याचे अधिकारी यांणीं खासगीचे अधिकारी यांचे इलल्यांत चालून दफ्तरी हिशेब गुजरावे: कलम १.

(१६). दरुणी महालचें कामकाज दिवाण नेमून दिले त्यांणीं सर्व पाहून करावें. चिटणीस, फडणीस, यांणीं आपापले दरखदाचे कागद पत्र लिहितजावे. त्याजवर निशाणचिन्ह दिवाणानीं करून त्यास समजून मोर्तब समक्ष करावें. कलम १.

(१७). पोतनीस यांणीं पोतें जमाखर्च लिहिणें करावें. नजर दशाकडी जमा करावी. पोतदार यांणीं पारखे करावी कलम १.

(१८) अबदारखाना चिटणीस यांजकडे, सरफखानासुद्धां अधिकार सांगितला. मजालसी विडे, अत्तरगुलाब व हारतुरे, फळफळावळ खुषवाई खेरदी जमाखर्च यांणीं करून हिशेब दफ्तरी गुजरावा. कलम १.

(१९) पांगा जुमेलदार, सरदार यांणीं केद करून दिली, त्याप्रमाणें चालून, सेनापति व प्रधान यास्या समागमें कामकाजें करावीं कलम १.

अष्टप्रधान यांजकडे पेटें व तालुके, व स्वारीस जाणें, यास दरखदार सर्व हुजूरचे नांवें त्यांचे दारवन्यांनीं व्यवहार करावा. स्वारीस जावें, त्यास मुतालीक करून दिले त्यांणीं सर्व व्यवहार चालवावा. हुजूर रहावें. कलम १

एकूण कलमें वीस

मोर्तब.

नंबर २

* यादि युवराज अष्टप्रधान पद द्यावयाच्या समयीं वस्त्रें वगैरे, शके राज्याभिषेक ४५ विलंबी नाम संवत्सरे. सुरुसन तिस्सा अठार मध्याव अलफ

१ युवराज यांस.

१ वस्त्रें पांच भरगच्ची.

१ मंदील, १ चादर, १ परटका, १ किनखापपान, १ महंमुदीपान. ७ ६.

१ दागिनें.

१ शिरपेंच, १ कंठी मोत्यांची, १ चौकडा, १ मोत्यांचा तुरा, १ जगा. ७ ६.

१ किल्ला.

१ शिक्के कटार, १ चौघडा, १ हत्ती, १ चवरी सोन्याच्या दांडीची, १ दाल तरबार, १ जरिपटका, १ घोडा, १ चोपदार. ७ ८

२

७ कलम.

१ पंत प्रधान यांस युवराज अन्वयें.

१ सेनापति यांस सदरहू अन्वये.

१ पंत अमात्य यांस.

१ वस्त्रें.

१ मंदील, १ चादर, १ किनखापपान, १ महंमुदीपान.

१ दागिनें. ७ ६ सनगें

१ चौकडा, १ तुरामोत्यांचा, १ कंठी मोत्यांची १ शिरपेंच. ७ ६ दागिने.

---

* पूर्वीची वस्त्रिवार समजावी यास्तव ही यादि दिली आहे.

१ किल्ला.

१ शिक्के कटार, १ चवरी सोन्याच्या दांडींची, १ ढाल-
तरवार, १ हत्ती, १ घोडा, १ रुप्याच्या दांडीचें क-
लमदान ७६ कलम.

१ पंत सचीव यांस पंत अमात्या प्रमाणें.
१ पंत सुमंत यांस सदरहू अन्वयें.
१ पंत मंत्री यांस सदरहू प्रमाणें.
१ पंडितराव यांस सदरहू अन्वयें ढालतरवार खेरीज करून.
१ पंत न्यायाधीश यांस पंतसुमंत मंत्री अन्वयें.
१ पंत राजाज्ञा यांस सदरहू अन्वयें.

१०

१ उपप्रधान यांस वस्त्रें साडेतीन. ३॥.
१ तिवट, १ दुपेटा. ॥. किनखाप, १ मद्यभुदीपान.
७ सदरहू प्रमाणें अष्टउपप्रधान यांस वस्त्रें द्या-
वयाचीं.

१ चिटणवीस यांस वस्त्रें.
१ मंदील, १ झगा, १ बिजार-दुपेटाकुमजन. एकूण.
१ दागिनें.
१ कंठी मोत्यांची, १ चोकेडा, १ शिरपेंच. एकूण.
१ किल्ला.
१ कलमदान रुप्याच्या पेटीचें, १ चवरी रुप्याच्या
दांडीची, १ घोडा.

२ कलम.

१ फडणीस यांस वस्त्रें साडेतीन- कलमदान १ रुप्याच्यादांडीचें.
१ पोद्दार यास वस्त्रें साडेतीन- कलमदान १ रुप्याच्यादांडीचें.

१४

येणें प्रमाणें राज्याभिषेक समयीं राकदर्ते महाराज यांणीं वस्त्रें वगैरे सन्मा-

न दिला असे. छ २९ साबान.

नंबर ३

॥ तहनामा राजश्री खेमसावंत व उरवमसावंत देसाई बहादूर प्रांत कुडाळ याजकडील पिलांबर रोणेवी कारभारी येऊन उराव करून दिल्हा. सुरुसन तिस्सा सलसैन अलुफ. इसवी १६५८ फसली १०६८.

प्रांतमजकूरचे महाल वगैरेचा ऐवज निम्मा हुजूर पावता करारा, निम्मा आकार राहिला त्यांत तीनहजार लोक पायदळ हेटकरी ठेवावे. व ज्या समयी हुजूर चाकरीस बोलाविले जाईल तेव्हां तीन हजार लोकां निशीं सेवा करावी. खासा जातीनें येण्याचें प्रयोजन पडेल तेव्हां बोलावणें होईल तेव्हां येत असावें. कलम १

किल्ले फोंडे प्रांत तालुका घेऊन हुजूर ठेविला त्यास हरएक प्रसंगास कुमक सरदेसाई जावी. बिदनूर वगैरे संस्थानच्या खंडण्या घेण्यास चारी होईल त्याच्या कुमकेस जात असावें. कलम १.

स्वराज्य साधनाच्या ठायीं वकिलपाली मध्य राहून तुरुक लोकांचें साधन करावें. कलम १.

प्रांतीलच जमाबंदीच्या चोकेशीस हुजुरून कारकून व लोक रहातील ते ठेवून त्यांच्या नेमणुकी बद्दल हुजूर अमलापैकी पावते करावें. कलम १.

प्रांत मजकूरचे देशकत वतन तुमचें व बहादूर किताब अजरामत चालेल. त्यांतील किल्ले कोट व ठाणीं तुमच्या स्वाधीन केलीं आहेत तेथें दारूगोळा कडत जतन करावी. तेथें हुजूरचे कारकून व लोक येतील ते ठेवावे. कलम १.

॥ हा तहनामा थोरले शिवाजी महाराज यांच्या कारकीर्दीतील आहे. यावेळीं विजापूरचा अंमल असतां त्यांच्या पदरचे वाडीकर शिवाजीशीं सख्य करण्याविषयीं किती उत्सुक झाले होते हें स्पष्टपणें दिसून येतें.

इ॰ १५८० विलंबी नाम संवत्सरे फाल्गून वद्य ७, एकूण पांच कलमें करार करून तहनामा दिला असे. इ॰ स॰ १६५८.

"मोर्तब"

तहनामा चिरंजीव राजश्री संभाजी राजे यांस प्रति राजश्री शाहूराजे यांणी लिहून दिला. सुरुसन सीत अशरीन मय्याव अलफ रु॰ ५ माहे रबिलाखर ऊर्फ पौष शुद्ध ७ गुरुवार निधावसु नाम संवत्सरे. बितपशिल. (इ॰ स॰ १७२५).

अहद श्रीकृष्णा धोमे महाबळेश्वर पासून दक्षिण तीर तहद् निवृत्ति संगम पर्यंत कुल दुनफी मुलूख दरोबस्त गणीं व किल्ले तुम्हांस दिले असत. कलम १.

श्री सावित्री नदी उगमा पासून तहद् समुद्र गामिनी पर्यंत दक्षिण तीर जंजिरा कोट किल्ले सुद्धां व गणीं दरोबस्त महाल अकोलें पर्यंत तुम्हांस दिले असत. कलम १.

मिरजप्रांत व विजापूर प्रांतींचीं गणीं दर्वाल्ल अथणी, तासगांव वगैरे तुम्ही आमच्या स्वाधीन करावे. कलम १.

इकडील चाकर तुम्हीं ठेवूं नये, व तुम्हांकडील चाकर आम्ही ठेवूं नयेत. कलम १.

तुंगभद्रा दक्षिणतिरापासून श्रीकृष्णासमुद्रगामिनी न श्रीरामेश्वर देवालय संस्थानें निम्मी आम्हांकडे व निम्मी तुम्हांकडे करार करून न दिली असत. कलम १.

मोंगलाईतील वगैरे उत्तरेकडील मुलूख सुद्धां त्यांतील निम्मा प्रांत तुम्हांस देऊं व तुम्हांकडून सुद्धां असता निम्मा प्रांत आम्हांस द्यावा. कलम १.

तुम्हांशी जे वैरे करतील त्यांचें पारिपत्य आम्ही करावें न आम्हांशी जे वैरे करतील त्यांचें पारिपत्य तुम्ही करावें तुम्ही आम्ही याअभिधूद्दि एक विचारें करावी कलम १.

एकूण सात कलमें करार करून लेहनामा लिहून दिला असे. सदरहू प्रमाणें आम्ही चालूं. यांत अंतराय येणार नाहीं.

नंबर ४.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५५ किलक नाम संवत्सरे आषाढ वद्य १० सोम्य वासरे. क्षत्रिय कुलावतंस राजश्री राजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री कृष्णाजी पंडित प्रतिनिधि यांस आज्ञा केली ऐसीजे. स्वामिनीं स्वामिकार्या विषयीं तुम्हांस आज्ञा केली पाहिजे.

हुजूरचा कारभार पूर्वी ज्या पद्धतीनें राजश्री परशराम पंडित करीत होते त्या प्रमाणें करावा. आलेल्यास जाबसाल देणें, न्यास स्वामीचे मुख्यत्व तुम्हीं आहां कलम १.

खासगी पागा व पीलखाना, अठरा कारखानें वगैरेकांच्या रोजमुऱ्याचा हिशेब मनास आणून भोईन जाबते करून द्यावे. स्वामी त्या प्रमाणें चालवितील. कलम १.

सरकारकून व सरदार जिल्ह्याचें हिशेब व हुजरीयांची बोली चाली तुम्हीं मनास आणून स्वामीस मदत करीत जावी. कलम १.

राजश्री यशवंतराव गोपाळ व शिवाजी शंकर, चिंतो महादेव व जिवाजी रघोजी याजकडील हिशेब कितव तुम्हीं मनास आणावे हें स्वामीनीं तुमच्या स्वाधीन केलें आहेत. कलम १.

सोंधे विदूर येथील हिशेब कितब मनास आणावे, तेथील खर्चाची बंदोबस्ती करून पेजे मनास आणावा. कलम १.

पन्हाळा, पावनगड येथील हिशेब मनास आणून बंदोबस्ती करावा, वगैरे प्रमाणें सिंधुदुर्गची ही करावी. कलम १.

येणें प्रमाणें महाकलमी स्वामीनीं धंदा तुम्हांस सांगितला असे. तुम्हीं बऱ्या चोकशीनें मनास आणून कारभार करावा. स्वामीनीं दोन प्रतिदिनीं तुमचें उर्जीत करून चालवावें, यास अन्यथा नाहीं.

तुमची जिल्हे भुदरगड, सामानगडची राज्यकार्यी निमित्त स्वामींनीं घेतली असे. हे एकावर्षानें तुमची तुम्हांस करार करून द्यावी. बहुत काय लिहिणें तरी तुम्ही सूज्ञ असा.

नंबर ५.

श्री.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५१२ विरोधिकृत नामसंवत्सरे चैत्र शुद्ध षष्ठि भृगुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजाराज्ञ छत्रपति स्वामी यांणीं राजश्री सुभानगवे मोरे यांस आज्ञा केली ऐशीजे. स्वामींची व चिरंजीव राजेश्री संभाजी राजे यांची भेट जाली. कारणे पाहून तुंगभद्रेपावेतों मुलूख दरोबस्त गड, कोट, ठाणीं त्यांजकडे दिलीं. किल्ले कोदन चिरंजीव राजश्री यांकडे देविले असे. तरी त्यांचा पंचं घेऊन येतील त्यांच्या स्वाधीन कोदन किल्ला करणें जाणिजे. बहुत काय लिहिणें.

'मोर्तब'

श्री.

सन ११४५ फ सन १७३५ इ.

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ६२ अनलनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १ भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपति स्वामी यांणीं वालदेज यास करून दिला तहनामा ऐशीजे. वालदेज कुडी दोर जुलियोस फालतेज फन खालें नेस बंदर कोची यांणीं जंजिरे सिंधुदुर्गाच्या बंदरास आपणाकडील जाहजावरून तुबल दर्याल व पिंचलेनजाईल या दोघांजणा बराबर कोल्हापूरच्या मुक्कामीं पत्र पाठविले असतां जहाजा करार बितपशील.

१. वालदेज बहादर कोची यांचे बावदर्दीचे कोंपानीं महाराजां सन्निध बसून बोली केली कीं, स्वामींचा व वालदेजाची गोडी

व खुलासा बळकट झाला आहे तो यावत् चंद्रसूर्यवर करार चालावा. यामध्यें अंतर होऊंनये. कलम १.

१ महाराजांनीं आपणास मालवणच्या बंदरीं वखार बांधावयास जागा दिली आहे; तो वेंगुर्ल्यास वखार होती त्यास त्यांणी आपला खर्च लावून बांधून द्यावी, वेंगुर्ल्यास पहिले आपलें चालवीत होते तसें चालवावें म्हणून विनंति केल्या प्रमाणें करार असे. कलम १.

१ जहाज बंदरांत येतांना वादळानें शिकस्त झालें तर आपले लोक लावून जिन्नस निघेल तो आपला आपणास काढून द्यावा. त्यास खर्च लागेल तो वरकड बंदराच्या शिरस्त्या प्रमाणें चालदेजांनीं आपणा कडून घ्यावा. कलम १.

१. पूर्वी वेंगुर्ल्यास फटोरी म्हणजे वखार होती तीस्तुटून नेली. त्या गोष्टी बद्दल आपल्या मनामध्यें कांहीं नाहीं. कलम १.

१ आणखी सोईकर वखारीस जागा मागतील त्यास तेथें जागा द्यावी. जहाजावरून जिन्नस उतरेल त्याची व येथील जिन्नस भरती करतील त्याची जकात घेऊं नये. वेंगुर्ल्यास चालत होतें त्या प्रमाणें चालवावें. कलम १.

१ वखारींत कोणी चोरी केली तर त्याचें पारिपत्य करावें. कोणी वखारीवर चढाई केली तर त्यास मारून काढावें, नेलेली मत्ता आणून द्यावी. कलम. १.

१ आपणाकडील माल उदमी नेतील त्याचा पैका न देतां दगाबाजी करतील त्याचें पारिपत्य करून पैका घेऊन आपणास द्यावा व आपले चाकर लोक कोणी पळून जातील ते कबजी मुलखांत उमगतील त्यास धरून आणून द्यावे. कलम १.

१ आतां या बोली खेरीज कांहीं बोली भसली तर पुढें होईल. कलम १.

एकूण कलमें ८ शालिवाहन शके १६५८ चैत्र शुद्ध १ निशाचम

चनी गास्त अय्यद मोर्तब, तारीख २९ माहे सव्वाल सुरूसन सीत स-
सारीन मय्याव अलफ, फसली ११४५, इ.सः १७३६ तारीख १४ मार्च.

नंबर ६.

श्री.

श्रीमन्महाराज छत्रपति स्वामीचे सेवेसी.

बाळाजी बाजीराव व सदाशिव चिमणाजी चांणीं लिहून दि-
ल्हा करार नामा ऐसाजे, सन इहिदे अर्बैन, रौद्र नाम संवत्सरे (स-
न १७४० इ०).

१ सातारीयास तीर्थस्वरूप शाहू महाराज राज्य करीत हो-
ते, त्याजमुळें वारणेचा तह झाला होता; त्या सी तीर्थस्वरूप शाहू
महाराज चांणीं कैलास वास केला, त्यांचे पोटीं संतान नाहीं. तेव्हां ते
राज्य स्वामींचें आणि एकछत्री शिक्का महाराजांचा चालावा.

२ शाहू महाराज असते समयीं किल्ले सातारेचे मुक्कामी से-
वकांनीं विनंति केली होती. जे शाहू महाराज यांचा जिवात्मा आहे
तो वास्तवीकारें त्यांचे सेवक, अंतर्यामी स्वामीचे. शाहुमहाराज या-
णीं कैलासवास केल्यावर दोन्ही राज्यावर आज्ञा स्वामींची आणि आ-
म्ही सेवक स्वामीचे. स्वामींचे आज्ञे प्रमाणें वर्तणूक करूं अशी
विनंति केली होती त्या प्रमाणें दोन्ही राज्यें एक करून एकछत्री स्वा-
मीचा शिक्का चालावा. आणि आम्ही शाहू महाराज यांचे कारकीर्दी
प्रमाणें सेवा करून असावें हें उचित. यासी अंतर करणार नाहीं.

३ वारणेचे आलीकडील तुंगभद्रा पावेतों खासगी घालून क-
रून महाराजांस द्यावा. वारणे पासून तुंगभद्रे पावेतों गड, कोट कि-
ल्ले, ठाणीं दरोबस्त खासगीस करून देऊं.

४ सालान्यास राजधानीचा खर्च व खासगी खर्चास सरंजाम
महाराजांकडे द्यावा. शाहू महाराज यांचे कारकीर्दी प्रमाणें दे-
ऊन वर्तणूक करूं.

५ स्वामीसन्निध उद्दान मीठे सेवक सेवा करून होते त्यां-
स त्यांचे योग्यते प्रमाणें चालवावें. योग्यतेनरूप स्वामीचे आज्ञे-
प्रमाणें चालवूं.

६ हुजूरचे सनदेनें लोकांस गांव इनाम व वतनें दिलीं तीं
चालवावीं. अंतर करूं नये.

स्वामींनीं कृपालू होऊन ज्यांस गांव इनाम व वतनें जीं
दिलीं असतील तीं आजे प्रमाणें चालवूं.

७ संस्थान बिदनूर व सौंधे, व अंतरूज, व सावनूर येथी-
ल चौथाई व तोफेचा ऐवज सरकारांत यावा.

पावत आल्या प्रमाणें ऐवज पावता होईल. आणि स्वामी-
चे आजे प्रमाणें निर्वेध पणें देईनसें करूं.

८ स्वामींत व तुम्हांत किमपि पडदा नसावा. स्वामीनीं जें
केलें तें तुम्ही परिणामास नेऊन स्वामीचे लक्षानुरूप चालून मोंजरी-
तीनें स्वामीचे सेवेंत सादर असावें.

स्वामीची सेवा एकनिष्ठेनें करून स्वामी आज्ञा करतील त-
दनुरूप आजे प्रमाणें मनोदयानुरूप वर्तणूक करूं. स्वामी चरणीं द्वैत-
भाव किमपि न धरूं

९ शिंदे, नरगुंदे व पतकें, पूर्वी हुजूर पागेचे सरदार सरंजा-
म सुद्धां पूर्ववत् प्रमाणें स्वामीचे हुजुरासि सेवा त्यांणीं करावी. त्यां-
चे सरंजामाचा व पागेचा फडशा हुजूर होणें तो होत असावा.

स्वामीच्या आजे प्रमाणें त्यांचे हातून वर्तणूक होय अ-
शी करून देऊं. आजेप्रमाणें त्यांचे हातून वर्तणूक न होय तरी त्यांज-
कडून सरंजाम, गड, कोट, किल्ले, ठाणी सरकारांत घेऊन देऊं

१० सरदेशमुखी व बाजे वतनें जीं सरकार तालुक्यास आ-
हेत तीं सरकारांत असावीं

शाहुमहाराजांचें कारकीर्दी प्रमाणें सरकारांत चाल-
वूं.

११ सरदेसा कुलकर्णाचे व इनामगांव चालवावे.

आलेप्रमाणें चालणें.

१२ आंगरे कडील किल्ले, व जंजिरे, व भुईकोट, व पंचमहाल, जयगड पर्यंत सरकारांत यावे.

आलेप्रमाणें आंग्रेकडील किल्ले व जंजिरे व भुईकोट व पंचमहाल जयगड पर्यंत दरोबस्त मुलूख घेऊन स्वामीकडे देणें.

एकूण कलमें बारा असत.

गुजारत दादाजी यादव निशाणी इनशा.

नंबर ७.

" सन खमसमय्याव अलफ शालिवाहन शके १६७६ राज्याभिषेक शके ८१ भाव नाम संवत्सरे. श्रीमन्महाराज शंभुछत्रपति महाराज यांचे दर्शन करून सावनूरकर नबाब साहेब यांचे मोसांत जाऊन लढाई करावी असा बेत पुणें मुक्कामीं ठरून, श्रीमंत बाजीराव बाजीराव ऊर्फ नानासाहेब व रघुनाथराव पंडित पेशवे यांचे बंधु सदाशिवराव चिमणाजी पंडित ऊर्फ भाऊसाहेब हे फौजे सुद्धां पुण्याहून दरकूच निघाल्यावर पंडित प्रधान यांहीं महाराज सरकारांत विनंति पत्रें देऊन वकील पाठविले. नंतर किल्ले पन्हाळे कडून महाराज सरकारची स्वारी व खाशा मंडलांच्या स्वाऱ्या करविरीं येऊन दाखल झाल्या. नंतर पंडित प्रधान यांची स्वारी फौजे सुद्धां कन्हाडा नजीक येऊन पोंचली. तेथून कूच दरकूच पंडित प्रधान यांची स्वारी फौजे सुद्धां निघोन बावडें तर्फ हवेली नजीक पंचगंगा तिरास मुक्काम झाला. दुसरेदिवशी महाराज सरकारची खासा स्वारी हत्तीच्या अंबारींत होऊन सामोरें कोस दीड कोस गेली. तेथें डेऱ्यांत सदर होऊन पंडित प्रधान यांस सरदारलोक व मानकरी लोक यांचे मुजरे पडून नजर झाले वर महाराज सरकारची खासा स्वारी हत्तीचे अंबारींत झाली. नंतर पंडित प्रधान यांची स्वारी खवास खान्यांत वस्त्र सो-

न्ही हातांत मोर्चेल घेऊन महाराजांवर उडवू लागले. महाराजांचीस्वारी चालती होतांच पंडित प्रधान यांचे फौजेने दोन्ही बाजूस फेर धरून पछुती अन्वये हुजरे केले. महाराजाची स्वारी शहरांत येऊन पोंचल्यावर पंडित प्रधान यांही महाराजांचे भेटीस जाण्या विषयी आज्ञा घेऊन भेटी दर्शन करून पंडित प्रधान याची स्वारी ऐश्यास आली. पंडित प्रधान यांचे डेरे रंकाल्या नजीक बागेत शेतवडीत दिले होते; व सरदार लोक व मानकरी लोक यांचे डेरे पद्धति प्रमाणें फौजे सुद्धां पंचगंगा किनारेनें झालेले होते. पंडित प्रधान यांचा फौजे सुद्धा करविरी मुक्काम वीस पंचवीस दिवस झाला होता. ते समयीं महाराज सरकारांत पंडित प्रधान यांणीं विनंति करून सदाशिवराव चिमणाजी पंडित यांस प्रधानपद देऊन वस्त्रे दिली. त्याचेठीं महाराजां सरकारांतून किल्ले पारगड, भवानगड, वल्लभगड, भिंवगड व सामानगड दिल्हे. यां पैकीं चार किल्ले पंडित प्रधान यांच्या हुकुमांत लागले. किल्ले सामानगडकरी हे पंडित प्रधान यांचे हुकुमांत लागले नाहींत. कर्नाटक प्रांतांतील संस्थानीक दौलतदार यांजकडून चौथाईचा ऐवज दरसाल महाराज सरकारांत यावयाचा तो ऐवज पंडित प्रधान यांही संस्थानिक यांजकडून घेऊन महाराज सरकारांत दरसाल देत जावा असा करार झाला. नंतर दरसाल चौथाईचा ऐवज महाराज सरकारांत येणेचा तो पंडित प्रधान यांजकडे देत जावा, म्हणजे पंडित प्रधान चौथाईचा ऐवज महाराज सरकारांत पावता करतील म्हणून महाराज सरकारांतून संस्थानवाले यांचे नांवें ताकीद पत्रें लिहून पंडित प्रधान यांजजवळ दिलीं. महाराज सरकारची आज्ञा घेऊन पंडित प्रधान निघून बाबासाहेब सावनूरकर यांचे प्रांतांत पोंचल्यावर नबाबसाहेबांच्या फौजेची व पंडित प्रधान यांच्या फौजेची लढाई होऊन पंडित प्रधानयांणींफौजेसुद्धां सावनुरास जाऊन राहिले. तेव्हां नबाब साहेबांकडून सुलाचे बोलणें झाले. ते समयीं संडणीचें बोलणें करून संडणी

न बादसि महाल्यापेकीं नबाब साहेबांनीं अकरा मद्दाल पंडित प्रधान यांचीं रवानगीत देऊन दिले.

१ बागलकोट.	१ हुनगुंद.	१ बदामी.
१ गदग.	१ डंबळ.	१ अणगीगिरी.
१ नवलगुंद.	१ गोकाक.	१ सत्तावन नूर.
१ बाळगीनजीक कृष्णातीर.	१ [illegible]	

नंतर पंडित प्रधान यांचें फौजे सुद्धां सावनूर मुक्कामाहून कुच होऊन पुण्यास जाण्यास दरकूच स्वारी परत फिरून महाराज सरकारचे सरहद्दीस येऊन पोंचल्यावर पंडित प्रधान यांची सडी स्वारी करविरास येऊन महाराज सरकारांत विनंती करून श्रीमन्महाराज सकल सौभाग्यादि संपन्न (जिजाबाई). यांची खासास्वारी सरंजाम सुद्धां करविराहून निघाली. तेव्हां पंडित प्रधान यांची स्वारीही दरकूच जात होती. ते समयीं कऱ्हाड नजीक श्रीकृष्णातिरी उतरल्यावर पुढें एकदोन मुक्कामावर वळघाचा पर्जन्य अकाळीं फार पडला. त्या मुक्कामास श्रीमन्महाराज सकल सौभाग्यादि संपन्न जिजाबाई साहेब यांच्या खासास्वारीच्या डेऱ्या पुर्ती जमिनीतील भिजलेली माती कामाठी यांजकडून पंडित प्रधान यांही काढवून कोरडी जमीन करवून डेरे दिले. आणि स्वारीचे तयारी होईपर्यंत पंडित प्रधान डेऱ्यांत राहून आज्ञा घेऊन आपल्या डेऱ्यास गेले. पुढें दरकूच होऊन स्वारी पुणे मुक्कामी दाखल झाल्यावर दररोज स्वारीचे दर्शनास पंडित प्रधान यांची स्वारी येत होती, आणि पंडित प्रधान यांच्या कुटुंबाच्या स्त्रिया दररोज स्वारीचे दर्शनास येऊन खाशी तासें होई पर्यंत राहून स्वारीचें सुख झाल्यावर आपल्या हातांनीं स्वारीच्या पायांची सेवा करून आज्ञा घेऊन आपल्या वाड्यास जावें असा नेम स्वारी पुणे मुक्कामी होती तो पर्यंत चालविला होता. पुणे मुक्कामी स्वारीस पंडित प्रधान यांणीं आपल्या दौलतीचें ऐश्वर्य सर्व दाखवून स्वारीची मर्जी संतोषीत केली. नंतर पुणे मुक्कामाहून [illegible]

मन्महाराज सकल सौभाग्यादि संपन्न जिजा आई साहेब यांची स्वारी करविरास येण्यास निघाली. ते समयीं पंडित प्रधान यांणीं आपले कडील सरदार फौजे सुद्धां स्वारी समागमें दिल्यावर स्वारीचें कुच होऊन मजल दरमजल स्वारी करविरास येऊन दाखल झाल्यावर पंडित प्रधान यांजकडील सरदारांस महाराज सरकारांतून वस्त्रें देऊन परत जाण्यास आज्ञा झाली.

नंबर ८.

श्री.

राजेश्री लोलदी बसवप नाईक बिदनूर गोसांवियांशीं.

छ सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य अति राजेश्री राजा शंभु छत्रपति उपरी आवृत्य कुशल जाणून स्वकुशल लिहिणे विशेष — सस्थान मजकूरचा मामला राजेश्री बाबाजी पंडित प्रधान यांजकडे दिला आहे. त्या प्रमाणें करार असे, तरी तुम्हीं पंडित प्रधार लिल्हे कडे रुजू होऊन सस्थानचा ऐवज बाकी व सालमजकूरचा झाडयानिशी देणें. त्या प्रमाणें पत प्रधान हुजूर पावि-ष्ट करतील, जाणिजे, बहुतकाय लिहिणें शिक्कयाचें मोर्तब असे.

नंबर ९.

श्री.

राजेश्री सवाई इब्बू सदाशिव नाईक सोंधे गोसांवि यांशी —

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य अति राजेश्री —— उपरी सस्थान मजकूरचा मामला हुजुरून राजेश्री बाबाजी पंडित प्रधान यांजकडे दिला आहे, त्या प्रमाणें करार असे. तरी तुम्हीं पंडित प्रधार लिल्हे कडे रुजू होऊन सस्थानम-जकूरचे बाकीचा व सालमजकूरचा सुरक्षित पणें देत-

जाणें. उजूर न करणें. संस्थानचा ऐवज पंतप्रधान हुजूर पावता करतील. तुम्ही ऐवज देत जाणें. जाणिजे. बहुत काय लिहिणें शिक्क्याचें मोर्तब असे.

श्री.

नंबर १७

सन ११७१ फसली.

पुण्यश्लोक अनुबाई यांसी.

श्रीमन्महाराज मातोश्री जिजाबाई साहेब यांणीं आज्ञा केली ऐसीजे, तुम्ही विनंती पत्र पाठविलेंतें अविष्टं होऊन लेखनार्थ अवगा झाला. तेथें लिहिलें जें शांतवन किती करावें, काय संतोष आहे, जें साहेबांस लिहावें, हें तरी प्रमाणच आहे. भवितव्यास तुम्ही काय कराल. करविरास जाणे विषीं राजश्री रघुनाथ पंडित सांगतात; आपण येतों म्हणून विनंती सांगून पाठविली. अद्यास चिरंजीव कुसाबाईस गर्भ असते समयीं तुम्हास येणें विषीं वरचेवर पत्रें पाठविलीं; कांकीं, तुम्हीं वयानीत बायका आणि पुरातन सेवक राबत्यांतील, साहेब दुःखांत निमग्न, समीप राहून मुलीची उठाठेव करावया करितां बोलविलें होतें, व राजश्री प्रधानपंतांस ही लिहिलें होतें. अद्यास त्यांच्या व तुमच्या ध्यानांत आलें, जे परीक्षे साठीं बोलाविलात. पुढें राजकुवर जहालाच तर संदेह पडणेस जागा रहात नाहीं. हा अर्थ प्रधानपंतांनी चित्तांत आणून तुम्हांस निरोप न दिला. तुम्ही न आला. साहेबांचे चित्तांत अद्या कुष्ट कल्पना या मागें झाल्या नाहींत व पुढें ही होणें नाहींत. सर्व जनांशीं शिक्षा करणेंचें अगर बुद्धिवाद सांगणेचें स्थल हें. या स्थळीं असें वर्तण्यास जनास मोकळीकच जहाली. जे आजपर्यंत मार्गरहित वर्तले यांचें बरें देवानें काय केलें आहे कीं त्या मार्गे अन्यवानीं जावें. असो परिणामी सत्य तें सत्य श्री भवानी शंकर करणार. परंतु ज्ये पूर्व भाषणें करणारांचें स्मरण साहेबांसही

असेल हें अपूर्व नाहीं. भोसल्यांचें वंशाचारेंगेनें स्मरण राहील. सर्वत्रांनीं आयुष्य सारखेंच आहे आठवण मात्र अक्षयी राहील, साधन तुम्हीं येऊन परीक्षा पाहून सांगणारांनीं सांगोन त्याचें मुखें होय म्हटल्यानें हा राजा होतो. नाहीं तर अम्हदेवाचें लिहिणें लटकें पडलें असें नाहीं. अनत सेवक पदरीं आहेत, कोणी तांब्याभर पाणी देईल. जो भोंसला म्हणवील तो कांहीं पूर्वजाचें स्मरण धरील. चिंताकाय आहे. आमच्या वडिलांनीं या वरी कृपा या प्रमाणें सेवा करावी म्हणून केली होती ? त्या प्रमाणें करितील. परंतु सोयरीकीचें नातेंही यांचें आमचें होईलसें नाहीं. तुम्ही येणेंचा प्रकार काय हा समजला नाहीं. उघड लिहिणें. जाणिजे. छ २७ जिल्हेज बहुतकाय लिहिणें.

मोर्तब. पैवस्ती छ ८ मोहरम सन इसमे सीतेन मयाव अल्फ. श्रावणमास.

नंबर ११.

श्री.

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री विसाजी कृष्ण गोसावी यांस.

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार. सुद्दसन आर्बा सितेन मयाव अल्फ कसबा बेलगांव वगैरे येथील मुकासा बाबेचा ऐवज मनोळीकडे पावत असतो त्यास हल्ली तालुके मजकूर श्रीं मन्महाराज मातोश्री आईसाहेब यांच्या खासगीस दिला. तरी कसबा मजकूर येथील मुकास बाबेचा ऐवज सालदरसाल चालत आल्या प्रमाणें मनोळीकडे चालविणें. जाणिजे. छ १५ जिल्हेज बहुत काय लिहिणें " मोर्तब "

नंबर १२.

राजश्री याविराजीत राजमान्य राजश्री आनंदराव भिकाजी गायकवाड यांस

पोष्य माधवराव बल्लाळ सधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशाल जाणून स्वकीय कुशाल लिहीत जावें विशेष. परगणें बागलकोट व बदामी येथील मुकास बाबेचा ऐवज मनोजी कडेपावत असली व्यास सालमजकुरीं नालुके मजकूर श्रीमन्महाराज मालोश्री आईसाहेब यांच्या खासगीस दिला आहे. तरी तुम्ही आपल्या नर्फेच्या कमाविसदारांस ताकीद करून हरदू परगणें यांच्या मुकास बाबेचा ऐवज सालदरसाल पावत आल्या प्रमाणें देणें. जाणिजें. छ १५ जिल्काद सुरुसन अर्बासिन्तेन मय्याव अल्फ बहुतकाय लिहिणें ही विनंति.

नंबर १३.

श्री.

श्रीमन्महाराज मालोश्री आईसाहेब.

साहेबांचें रोवेश्शीं.

विनंति सेवक रघुनाथ बाजीराव कृतानेक विज्ञापना— सेवकाचे वर्तमान तागायत चं. ५ रबिलाखर पावेतों यथास्थित असों विशेष. या नंतर शाहाजी भोसले खानवटकर हे साहेबांचे वंशांतील यांचा पुत्र दत्तक घेऊन राज्यासनीं स्थापना कराची. एतद्विषयीं सेवकांनीं पेशजी विनंतिपत्र पाठविलेंच होतें, त्यास साहेबीं मशारनिल्हेच्या पुत्रास विधियुक्त घेऊन विजयादशमीचे मुहूर्तें सिंहासनारूढ केलें, हें वर्तमान परस्परें कळोन संतोषावासी जहालीं. साहेबीं जो प्रकार केला तो सर्वांस मान्य आहे. सेवकाचें ही लक्ष दुसरें नाहीं. राजश्री कारणें वस्त्रें, भूषणें राजश्री बाबूराव बाबाजी याजबरोबर पाठविलीं असत, घेऊन अत्युत्तरीं आज्ञा करावी, रोवेश्शी श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती छ. १५ माहे रविलाखर सूरसन सल्लास
शितैन मय्याव अल्लफ ऊर्फ कार्तिकमास.

नंबर १४.

श्री.

श्रीमंत राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी.

विनंति शेवक रघुनाथ बाजीराव कृतानेक विज्ञापना सेवकाचें वर्तमान सागायत छ. ५ रबिलाखर पावेतों यथास्थित असे. या नंतर विजया दशमीचे मुहूर्तें स्वामी सिंहासनारूढ जहाले हें वर्तमान परस्परें श्रवण होऊन बहुत संतोष झाला. स्वामीचे सेवेशीं वस्त्रें व जवाहीर पाठविलें आहे. त्याची यादि आलाहिदा आहे. त्या प्रमाणें राजश्री बाबूरावजी प्रविष्ट करतील. घेऊन उत्तर पाठविण्याची आज्ञा केली पाहिजे. सेवेशी श्रुतहोय हे विज्ञापना. पैवेस्ती छ. ५ रबिलाखर सु. सल्लास शितैन मयाव अल्लफ ऊर्फ कार्तिकमास.

नंबर १५.

श्रीलक्ष्मीकांत.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेशी.

विनंति शेवक जानोजी भोसले सेनासाहेब सुभा कृतानेक विज्ञापना सागायत छ. १५ रबिलावल पर्यंत महाराजांचे कृपाकटाक्षें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे या नंतर महाराजांनीं कृपाळू होऊन आज्ञापत्र सादर केलेतें मस्तकीं वंदून सनाथ झालों. श्रीमंत महाराज भातोश्री आईसाहेब यांणीं सेवकास पोषाख हुजरे यांजबरोबर पाठविला तो आजे समाणें घेऊन बहुत संतोष झाला. येथून सेवकानें महाराजांचे सेवेशीं पोषाख

राजश्री कोन्हेरगणेश यांजसमागमे पाठविला त्याचा यादि अलाहिदा असे त्याजप्रमाणे महाराज कृपावंत होऊन अंगीकार करणार घणी समर्थ आहेत. येविशी श्रुतहोय हे विज्ञापना. (शिक्का).

पैवस्ती छ. १५ रबिलावल सु. अर्बा श्रीतैन मय्याव अल्फ.

नंबर १६

राजश्री याचिराजित राजमान्य राजश्री श्रीधोंनारायण गोंसावियांसीं

श्रीवेक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणें विशेष. राजश्री राणोजी घाटगे सर्जाराव कागलकर हे घराणदाज लोक, यांवर धन्याची गैर मर्जी, यास्तव तुमचे विद्यमानें करार करून राजश्री विठ्ठलराव शिवदेव यांस कागलास रवाना केलें. ते दरम्यान होऊन त्यांचे इनामगांव सार्वडे सुद्धां सात व परगणे मजकुरी गांवगन्ना इनाम जमिनी व हक्क कानू कायदे देशमुखी व नाडगोंडीचे नेमून देऊन सुदामत चालवावे असा करार करून गणेश सरकारांत दिल्हें व ऐवजाच्या बोलण्यांत तुम्ही व भगवंत आप्पाजी असतां मद्दार निल्हेची चलनदारी व सार्वडे बुद्रुक इनामगांव घाटगे मद्दार निल्हेकडे चालत नाहीं, म्हणून मद्दारनिल्हे सरकारांत आले. त्यावरून हें पत्र तुम्हांस सादर करणें असे. तरी तुम्हीं धन्यास विनंति करून याचे इनामगांव करारा प्रमाणें व गांवगन्ना इनामजमिनी व कानू कायदे नेमून देऊन सुदामत चालते करावे, जाणिजे. छं २९ रजान मुद्दा अल्बा सितैन मय्याव अल्फ बहुत काय लिहिणे. मोर्तब असे.

नंबर १७.

श्री आई आदिपुरुष.

श्रीमन्महाराज मातोश्री जिजाऊ साहेब.

साहेबांचे सेवेशीं.

विनंति सेवक आबाजीराव कृष्ण अनिमिषं कृतानेक दिनापना तागायत फ. १५ मोहोरम पावेतों साहेबांचे कृपादृष्टी करून सेवकाचें वृत्त यथास्थित असें विशेष, सेवेशीं विज्ञापना, साहेबीं सन्निधे मुक्कामी सेवकास इनाम पत्राविषीं आज्ञा केली. त्यास सेवकानें आपले आत्मसंतोषें लिहून दिले इनामपत्र ऐशीजे— साहेबाचे चरणाविरिक्त सेवकास अन्य दैवत नाहीं. कोणीं किती एक सांगतील ते न ऐकतां कोणाचे निरूपणांत न मिळतां साहेबांचे लक्षांत राहून वडिलांही आपली सेवा ज्या अन्वयें केली त्या प्रमाणें साहेब आज्ञा करतील त्या रीतीनें वर्तणूक करून सेवकास फौजे मुद्दां येण्याची आज्ञा होईल ते क्षणी फौजे मुद्दां सेवेशीं हजर होऊं. धनी आज्ञा करतील तेव्हां आज्ञा घेऊन जाऊं जमाव सेवेशीं पाठविण्याची आज्ञा जाहलीयास तेच क्षणीं जमाव सेवेशीं पाठवूं. साहेबांचे हुकूम प्रमाणें सेवा करणे विशीं किल्ले मजकूरचे मुक्कामीं अंबेचे देऊं, नुकरी, पुष्प, शपथपूर्वक काढून घेण्याचे चरणासंनिध प्रमाण केलें. ते समयीं मातोश्री, उपाध्येबावा व रामजी नीत्याजी नाधव व राजश्री यशवंतराव शिंदे सुभेदार सेवेशीं सन्निध होते, यांचे विद्यमानें ज्येष्ठ वद्य २ गुरुवासरीं हा कथ केला. त्या प्रमाणें सेवक वर्तेल आणि सेवा निदर्शनास आणून देईल, यास अंतर करील तर आपण परद्वारा-पणाचे वर्ताने नक्के. सेवकानें इमान प्रमाण दिल्हे त्या प्रमाणें सेवेचे निभावणीस राजश्री हणमंतराव माणकेश्वर दरम्यान देऊन सेवेशीं जो करार केला आहे त्यास अंतर होणार नाहीं. सेवेशीं रुजू होय हे विज्ञापना.

पैजेस्ती फ. १८ माहे मोहोरम सुमाल्सम्मान सितैनमय्या व अल्लफ.

नंबर १८.

श्री.

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेबांचे शेवेशी.

विनंति शेवक हणमंतराव माणकेश्वर कृतानेक विज्ञापना-
गायत छ. १५ मोहोरम पावेतों साहेबांचे कृपावलोकनें करून शे-
वकाचें सुख यथास्थित असे. विशेष आज्ञा केली ती आपणास मा-
न्य होऊन शेवेशीं विनंती पत्र लिहून दिल्हें जे.— राजश्री भगवंत-
राव त्र्यंबक मुतालिक व राजश्री आबाजीराव कृष्ण प्रतिनिधि या उ-
भयतांनीं व आम्हीं शेवा एक निष्ठपणें इमानें इतबारें करावी. साहे-
बांचे लक्षांत राहून तोतयाकडील पक्षपात धरून खोटे कामांत
मिळणार नाहीं. अन्यत्र कोणीं कांहीं सांगतील तें न ऐकूं. पे-
शवे इतर कल्पना चित्तांत आणतील त्यास हीं सांगूं, तुम्हीं असें क-
र्म न करावें. महाराज मातोश्री आईसाहेबांचे पायांपाशीं अंतर
न करावें, तेच धनी मानावे. इतर कल्पना करूं नये. म्हणून परि-
छिन्न सांगून हीं गोष्ट स्वामीस्वाम न घडे असेंच करूं. पेशवे म-
नस्वी कर्म करूं लागले, साहेबां विशीं दुष्टबुद्धि हरएक विशीं धरूं
लागले, तरी त्यांचे मिळणींत न मिळतां साहेबांचे लक्षांत राहून सा-
हेबांचे आज्ञे प्रमाणें मनोदय सिद्धीस नेऊं किंवा सेवेकाचे हा-
तून अंतर सहसा पडणार नाहीं. जे जे समयीं साहेब आज्ञापन
करून पाठवितील ते क्षणीं दहाहजार पांचहजार फौजे निशीं साहे-
बांचे शेवेशीं हजर होऊं; कोणी विक्षेप करूं लागलीयास न ऐकूं.
हुकूम होईल ते क्षणीं फौजे सुद्धां शेवा येऊन करूं. साहेब जेव्हां
निरोप देतील तेव्हां जाऊं. त्यास अंतर करूं तर आमचे कुलस्वामि-
णीची शपथ असे. मनोधी मात न हुकेरी मात व फुटगांव पे-
शवे यांणीं साहेबांस नजर केले आहेत. त्यांतील एक रुपया अ-
गर एक बिघा जमीन सोडून न देतां साहेबांचे मनोदया प्रमाणें घ-
डूं. फिरोन उपद्रव या विशीं व हरएक विशीं त्यांकडून अंतरत

पडे असा घरबंद करून देऊं. हे राजकारण आम्हांकडे लागलें. कुडाळ प्रांत घेऊन साहेबांस नजर करूं. त्यांतील कांहीं एक आस्ता न धरितां यथास्थित करून देऊं. या खिवाय साहेबांचे मनोद्यानुरूप सेवा अधिकोत्तर करून दाखवूं. त्यासी अंतर न करूं. सदरहू लिहिल्या प्रमाणें इमानपत्र साहेबांचे स्वहस्तें लिहून दिलें आहे. त्या प्रमाणें सहसा अंतर होणार नाहीं. हे खिवाचा ग्वरें. यास लिहिले प्रमाणें अंतर करूं तर आपले कुलस्वामिणीची व साहेबांचे पायांची व मातापित्याची शपथ असे. ज्येष्ठ वद्य २ गुरुवासरीं किल्ले पन्हाळचे मुक्कामी श्रीअंबेचे सन्निध साहेबांचे चरणापाशीं शपथ केली व बेल, तुळशी, पुष्पें दिलीं आहेत, जे इमान इतबारें सेवा करूं म्हणून दिल्हे आहेत, ते समर्थी विद्यमान गंगा भागिरथी समान मातोश्री आई, उपाध्ये व राजेश्री यशवंत राव शिंदे सुभेदार व राजेश्री जोत्याजी राव हवलदार व राजेश्री भगवंत मल्हार, साहेबां सन्निध होते. उपरांतिक राजेश्री भावाजीराव कृष्ण प्रतिनिधि यांणीं साहेबांचे चरणापाशीं एक निष्ठेचा सेवा करून दाखवावी. आज्ञे खिवाय वर्तूं नये. श्री अंबेचीं पुष्पें व तुळशी व बेल शपथपूर्वक दिलीं आहेत. उभयतांकडील निभावणी आम्हांकडे लागली. उभयतांतून ज्याकडून अंतर पडेल त्याची निभावणी आपण करून देऊं सेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती छ. १६ माहे मोहोरमें सुमा सबैन खिस्तेन मय्याव अल्फ.

नंबर १९ (पृ. ६८ पहा).

श्री.

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेबांचे सेवेसी.

विनंति शेवक बाळाजी जनार्दन शंवेरी कृतानेक विज्ञापना तागायत छ. ३ साबान पावेतों साहेबांचे कृपें करून वर्तमान यथास्थित असे. विशेष:-- तालुके चिकोडी व मनोळी येथील राजश्री पंत प्रधान यांणीं फडशा करून करार मदाराचे कागद साहेबांकडे राजश्री जिवाजी भोंसले व आपाजी रामराव व आकोजी नंवरे च वेदमूर्ति महादेव शास्त्री यांजबरोबर पाठविले आहेत, प्राप्त होतील. इकडील अर्थ सविस्तर मजकूर लिहिले शेवेशीं निवेदन करतील. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती छ. १४ रमजान सन अर्बासिअैन मय्याव अलुफ

"या तहनाम्या वरून पेशव्यांकडील कामदारांनी वगैरे शफरुतीनें घेतलेले गांव परत आले त्याचा तपशील.

३०००, भगवंत आपाजी यांनीं मौजे शिदनुरली येथील राजपत्रांत शाक संवत्सर मागाहून घातला, सबब हागांव साहेबीं द्यावा. देह एक, आकार अदमासें रुपये.

२०००, गोपो नारायण यांणीं मौजे भिवशी येथील राजपत्रांत शाक संवत्सर मागाहून घातला. सबब साहेबीं हागांव आपले सरकारांत द्यावा. देह एक, आकार अदमासे रुपये.

२०००, दादाजी त्रिंबक यांजकडे मौजे निडगुंदी प्रांत रायबाग सन अर्बा मिअैन साली घेतला आहे. त्याचें वृत्त मनास आणितां रायबागकर देसाई यांचा गांव खालसा झाल्याने हेबीं सरकारांत द्यावा.

४०००, मौजे हेरवाड प्रांत रायबाग हागांव येसाजी राम व रामचंद्र नारायण यांणीं वडगांवचे साळी गांवास दाणें घातलेले, तो गांव सरकारांत यावा, म्हणून आज्ञा, त्यास येसाजी चौकशी येसाजीराम यास आणून केली. त्यांणीं सांगितलें जें इनामपत्र वडगांवचे पूर्वी घेऊन गांव शिवाजी माने यांजकडे चा-

करीं घेऊन चालवीत होते. त्याजवरून जिवाजी माने यांचे भाऊ शिदोजी माने यांस रुबरू आणोन माथां तुळशी ठेवून पुरशीश केली. त्याजवरून त्यांणीं सत्योत्तर लिहून दिल्हें, जे जिवाजी माने व आपण एकवट असतां गांव आपणाकडे पेशजीं पासून चालत आला; त्याची इनामपत्रें आपणाजवळ आहेत. हरीराम व विसाजी नारायण यांनीं चाकरी गांव संबंधीं केली नाहीं. वडगांवचे साळीं जबरदस्तीने गांव घेऊन गणें बसविले. त्याजवरून साहेबांचे गांव साहेबांकडे द्यावयाचा करार केला असे. त्या प्रमाणें माहेबीं द्यावा. बाकी तीन दहाहजार आकाराचे अजमासें चिंतो हरी व आबाजी विश्वनाथ यांजकडे चालवावे; येणें प्रमाणें हुजूर मौजे हेरवाड येथील मजारनिल्हेनीं इमारत बांधिली आहे. यास्तव तो गांव त्यांजकडे ठेवावा. त्याचे मोबदला मौजे रामपूर रुपये ३००० तीनहजार व मौजे चावदें आंत कागल रुपये १००० एकूण रुपये ४००० चार हजाराचे गांव दोन्ही साहेबीं सरकारांत आपले द्यावे.

४०००, शिवाजी घोरपडे यांजकडे मौजे दतवाड परगणे मिरज, देह सुमारें एक, सन अर्बा शितैनचे साली साहेबांकडे दिल्हे असतां, तिगस्तां मजार निल्हेचे स्वाधीन केले आहेत; सदरहू गांव घोरपडे यांजकडून दूर करून साहेबांकडे दिल्हा असे; साहेबीं आपले सरकारांत द्यावा.

१००००, आनूबाई घोरपडे यांजकडे तिगस्तां हुजूरची ३ ठाणीं उठों न दिल्हीं, लूट व रांगोडी देह दोनगांव दहाहजार अजमासें आकाराचे, आनूबाईकडे होते; ते हल्लीं साहेबांकडे देविले असे. आपले सरकारांत साहेबीं द्यावे.

२५१००, रामचंद्र महादेव व बाबाजी केशव वगैरे यांणीं तिगस्तां मध्यस्तीत इनामगांव म्हणोन घतले. देह १०:-

१००० मौजे मस्कर मजरे सुद्धां देह २.

१२०० मौजे करजगें प्रांत हुकेरी.
३००० मौजे गदलगें प्रांत मजकूर.
३५०० मौजे कमलें प्रांत मजकूर.
२००० मौजे आडी प्रांत मजकूर.
३००० मौजे जनवाड परगणे मजकूर.
३००० मौजे कुडपूर परगणे मजकूर.
१५०० मौजे नसलापूर प्रांत मजकूर.
५०० मौजे आकीवाट परगणे मजकूर.

२४७००

एकूण दहा गांव चवीस हजार सातशें अजमासें आकाराचे रामचंद्र महादेव व बाळाजी केशव वगैरे यांणीं पेशजीं मध्यस्ती संबंधें घेतले होते, ते हल्लीं आईसाहेबांकडे माघारे घ्यावे.

२०००, विसाजी कृष्ण यांजकडे मौजे कापवाडी प्रांत हुक्केरी जबरदस्तीनें काढकाचे अमलांत घेतला आहे देह १ व वडगांवचे सालीं एक गांव दोन हजार रुपये आकाराचा विसाजी कृष्ण यांणीं घेऊन पागेकडे जमा धरला आहे, तो हल्लीं साहेबीं आपले सरकारांत घ्यावा.

२४५००, तालुके निपाणी प्रांत हुकेरी निंबाळकर देसाई पाटील मजकूर यांजकडे होती. ती सन आर्बाचे सालीं साहेबांकडे दोन्हीही तालुके नजर केले, ते समयीं निपाणी तालुका सरकारचे अमलांत आला असतां हल्ली गैरवाका लुम्हांस समजावून गांव घेतले आहेत ते:—

४५०० मौजे निपाणी १.
३५०० मौजे जत्राट. १.
४००० मौजे काडणी. १.
५००० मौजे कणंगले १.

१००० मौजे शिरगुपी. १
५००० मौजे कोगनुळी. १
१००० मौजे मतिवडें. १
५०० मौजे सुडगाव. १

२४५००

एकूण गांव आठ आदा चोवीस हजार पांचशे रुपये आकाराचे द्यावे. याचा आलाहिदा तपशीलवार करार केला आहे त्या प्रमाणें साहेबीं गांव सरकारांत द्यावे.

१५०० रामचंद्र सखोजी यांजकडे मौजे मोरबे प्रांत रायबाग हा गांव आहे, तो सरकारांत द्यावा. मशार निल्हेस पांचशें रुपये सालीना वेतन देऊन चाकरी द्यावी. सदरहू दीडहजार रुपयाचा गांव साहेबीं आपले सरकारांत द्यावा. मौजे तुपे वाडी व येडगांव प्रांत रायबाग हे दोन गांव दिनकर महादेव यांजकडे होते ते सरकारांत सन तिस्सा सितैन चे सालीं आलेच आहेत, त्या प्रमाणें असावेत. सन तिस्सा सितैन चे सालीं साहेबीं घेतले, त्यास साहेबीं स्वसंतोषें करून चालवावयाचे इसलेतर चालवावे. मौजे माणगांव शेषो नारायण यांजकडे असतां त्यांजकडून अप्पल द्वर झाला, त्या समयीं सरकारांत न देतां किल्लूरकरांचे म्हणून सांगून, व्यंकाप्पा नाईक कुलेकरी यांजकडून किल्लूरचें पत्र आणून त्या पत्राचरून तुम्ही पत्राचें साधन करून गांव मध्येंच व्यंकाप्पा नाईक खातात, तो सरकारांत द्यावा. भागिर्थीबाई सावंतीण यांसी आईसाहेबां कडील सरंजाम आहे त्या पैकीं हा गांव किल्लूरकरांनीं दाबिला होता, तो शेषो नारायण यांणीं घेतला. तुह्मीं सन तिस्सा सितैनांत साहेबां कडे यावा, त्यासी शेषो नारायण यांणीं सांगितलेंकीं किल्लूरकरांचा गांव किल्लूरकरांनीं घेतला. त्या उपरी व्यंकाजी नाईक यांणीं कि-

सूरकरांचीं पत्रे करून घेतलीं तीं आणून राखविलीं ; त्या प्रमाणें आम्हां कडील पत्रें करून घेतलीं ; म्हणून साहेबीं सांगून पाठविलें. त्यास पहातां अर्थी पांच वर्षे होषो नारायण यांणीं अम्मलकेला त्या अन्वयें म्हटलें तरी साहेबां कडील गांव असा होतो, तो साहेबीं आपले सरकारांत घ्यावा.

श्री.

श्रीमन्महाराज मातोश्री दुर्गा आई साहेब यांणीं राजश्री जिवाजी भोंसले यांसी आज्ञाकेली ऐशीजे :- सूरसन भार्वासबेन मल्याव असुफ, तुम्ही विनंति पत्र पाठविलेंत. त्यावरि ष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जहालें. राजश्री गोविंद दासो या पाशी किती एक विवेकार्थ विनंती सांगून पाठविली तीं सविस्तर निवेदन जहाली. तदनंतर मागाहून राजश्री आबाजी नोघरे यांशीं विनंति करणें विशीं त्वरेने पाठविले प्रमाणें त्यांणीं येऊन तुम्ही सांगितल्या अन्वयें साकल्य विनंति केली. त्यास इतके दिवस धीर धरला. निश्चय एक रीतीचा आणि ह्ळी प्रकार या अन्वयें करावा असा सुचविला, त्यास इष्ट तुम्हांस बोलल्या प्रमाणें निभावले, व सध्यां करारकरात त्यांत पुढें भागें काजकाम फार घेणार नाहींत असें पुर्ते दिसून आलें, तर यादी पाठविली आहे तिचा फडशा एक कलम दिगर न होतां सरकार उपयोगी रीतीनें करून घेऊन राजश्री प्रधानपंतांची कुळस्वामीची शपथ पूर्वक समजून क्रियापत्र प्रधान पंतीं करार केल्या प्रमाणें आपण निभावून द्यें. असा राजश्री सखाराम भगवंत याचा बात्द्यात् कार निभावणी अर्थ रुदीस आला पाहिजे. यास्तव राजश्री बाळाजी जनार्दन वगैरे मुत्सद्दी यांचीं पत्रें करारा प्रमाणें लिहून द्यें, यासी पाठवून द्यावी म्हणजे तीर्थस्वरूप कैलासवासी मातोश्री आई साहेब यांणीं सखाराम भगवंत यांशी बंधू म्हणविलेली सार्थकता

ती हीच. ये विन्नी पत्रांजी आज्ञापत्रे सादर आहेत, तेव्हां आ-
ज्ञाकरून विरोष सुचविणें तें काय. सदरहू प्रमाणें निक्षून
बंदोबस्त करून पत्रे सुद्धां विनंति पत्र अंतर्गत सरवाराम भ-
गवंत यांचें येतांच वेदमूर्ति व आकोजी नोघरे यांची रवानगी
होईल. सारांश यादिप्रमाणें सूत्रयुक्त फडशा व्हावा. गेली
वस्तू माघारे साहेबांचे साहेबांपाशीं यावी. पुढील निभावणी
ती पक्की चळकट करावी, हा काल पावेतों वरदी राकदर्ते म-
हाराज यांचे वचनास या मंडळांत भोवानी द्यांकर आणिलें नाहीं.
ते या समयीं देशकाल पाहून घडणें तें मन्नार निल्हेचे भिस्ती-
वर करावे. परंतु ज्यांत मन्नार निल्हेच्या करपयास दाद लौकि-
कांत न लागे व सरकारचा बद लौकिक न घडे व काल काला उप-
योगीं पडेल तेंचं मन्नारनिल्हे करतील. परंतु सूचनार्थ आ-
ज्ञा असे, मन्नार निल्हेसांचे पदरचिंचे; तेव्हां एकादी गोष्ट
बोलतां येईल किंवा न येईल. असें साहेबीं चित्तांत आणून
त्रिवर्ग शास्त्र्यांस आज्ञापत्रें सादर केलीं आहेत. तरी वरदी
राकदर्ते महाराजांचे चरणस्मरण पुरःसर त्यांचीं पत्रें प्रधान
पंतापाशीं आणोन त्या करवीं लौकिक अगत्य करवावा. कां-
तरी क्रियापूर्वक पद पिंगळ्याचे प्रसंगोपात समय पाहोन
अविवेकें करून घेतले असावें. वरकड सविस्तर आले प्रमा-
णें गोविंद दासो सांगतील ते भाव चित्तांत आणून निश्चय
जो करणें तो करावा. एवंच ममतेच्या सांगण्यांतील व आज्ञा-
पत्रांतील अर्थ सर्व आहे, तो साहेबी सरवाराम भगवंत याचे
विश्वासावर मन्नारनिल्हेच्या सिधराव रीतीनें दरम्यान मन्नार-
निल्हेचे खातर जमे करितां आज्ञा केली आहे. तरी सर्व गोष्टी
लिहिल्या प्रमाणें तुमच्या हातीं येऊन शपथ पुरःसर विनंतीपत्र
आलेवर उभयतां तुम्हांपाशीं आलेप्रमाणें येतील तें समयीं
या तीन बोलणें जाहाले वरी मग प्रगट करणें तें करावें. तीर्थ-

स्वरूप कैलासचा मातोश्री आईसाहेबांचे वेळेस यादी पाठविल्या, त्या कलमाची झाड पिछाडी करून पाठविली, त्या आलीकडे नवीनच यांणीं हें निर्माण केलें. याज करितां हाली यादि पाठविली आहे. त्यांत एक कलम न राहतां झाड पिछाडी करून देणें. या मागें त्यांणीं बोलणेंतें निष्ठा दारवबून सरबो जनार्दन या पासून डोळे भरोन घेतले, आणि कार्याची सुरत नाहीं. तेव्हां माघारे आणावयाची मदत सकट मात्र झालें. त्यावेळीं तुम्हीं गेले पासून ते म्हणत आले त्याच प्रमाणें आज्ञापत्रें घेऊन गेलों. परंतु त्याचा दस्तेवज एकही नाहीं. या करितां पुर्ते आगापिछा पाहून जें करणें तें करावें. तुम्ही जानिवंत मराठे व आप्त या करितां तीर्थस्वरूप कैलासवासी मातोश्री अाईसाहेबांहीं तुमची रवानगी केली, तरी तुम्हांस राज्याचा डाग न लागे असे खचित ध्यानांत आणून इतःपर जी कर्तव्यता ती करणें. या उपर साहेबीं आज्ञापत्रें पाठवावीं किंवा तुम्हीं विनंतीपत्रें लिहावीं असें नाहीं. तरी एकवेळ लिहितां, ते जह्नवेरी तें घेवून दुसरेंच कलम नवेंच निर्माण होलें असें जाहलीयास स्पष्ट कार्यास येणार नाहीं. वरकड चिरंजीव राजश्री यशवंतराव भोंदे सुभेदार व महादेव शास्त्री लिहिती- ल, त्याच अन्वये गोविंद दासो यांसी आज्ञा केली आहे. आपले प्रमाणें सांगतां कळेल. तुम्ही राजश्री सुभेदार यांसी लिहिलें जे राज्याची बंदलामी तुम्हांवरी येईल तरी शिघ्रतेनें कर्तव्यते करावें असें लिहिलें; तरी तुम्हांस आज्ञापत्रें निरवाल- स सादर आहेत त्या प्रमाणें खचित करून घेणें. इतःपर बदलामी तुम्हांकडे, हे समजून कार्य करून यशास पात्र होणें, जाणिजे. रवाना छ ४ माहे रबिलाखर खेरवन सिमा मोर्तब असे.

श्री.

नंबर २० (पृ. ६५).

श्रीमन्महाराज मातोश्री दुर्गा आईसाहेब यांणीं राजमान्य राजश्री आबाजी महादेव यांचे आज्ञा केली ऐसी जे :— राजश्री रघुनाथराव पंडित प्रधान यांची आज्ञा पत्र सादर आहे, तरी आपणें शिरोळ येथील बहूलच आज्ञा करून बायका व हुजरे व पागे यांचीं घोडीं व शिलेदारांचीं घोडीं व चीजवस्त नेली. बायका थोरात कडे आहेत, त्यांस ताकीद करून बायका व घोडीं चीजवस्त हुजूर पाठवून देणें. तसेंच चिकोडी व मनोळी तालुके जुने नवे गांव फूटगांव हुजूर नजर केले म्हणून प्रधानपंत यांची इमान पुरस्सर शापथ पूर्वक विनंती पत्रें व करार मदाराच्या यादी हुजूर पाठविल्या. त्यांतील निभावणी कशी झाली याची माहितगिरी तुम्हांस आहेच. तरी त्या प्रमाणें प्रधानपंत यांसी सांगून दोन्ही ही तालुके व जुने नवे गांव व फूटगांव करारा प्रमाणें हुजूर येत नें करणें व शिरोळचे ठाणेदार यांजपासून कागद करवा घेतले आहेत ते हुजूर पाठवून देणें, जाणिजे. सुरूसन आर्बासबैन मय्याव अल्फ. रवाना छ. १६ माहे मोहोरम. बहुलकाय लिहिणें. मोर्तब असे.

श्री.

नंबर २१. (पृ. ६५).

स्वस्तिश्री राज्याभिषेक शाके १०० जयनाम संवत्सरे चैत्र शुद्ध ८ रविवासरे. क्षत्रियकुलावतंस राजश्री राजा शिवछत्रपति स्वामी यांणीं समस्तराजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजश्री रघुनाथराव पंडित प्रधान यांसीं आज्ञा केली ऐसीजे:- बहुत दिवस तुम्हांकडून विनंती पत्र ये-

ऊन वर्तमान श्रवण होत नाहीं. निरंतर विनंतीपत्र लिहून पाठवीत असावें. लुसचा मुक्काम कृष्णातिरीं जाहला म्हणून हुजूर स्वामीचे शेवेशीं निवेदन जाहलें. एशियास कृष्णे आडीकडे हुजूरचे प्रांतांत, कांहीं येऊन उपसर्ग जाहला. उल्करांत ताकीद होऊन प्रांतांत उपद्रव न होंच तें करावें. हुजरोन कितेकार्थ आज्ञा करणें ते वाकेली जाबसालास राजश्री नागो शामजी यांशीं भाकरून आपणाकडे पाठविले असतां कोणीं गैरवाका तुम्हांस जमजाविला यामुळें मजार निल्हेस तसदी तुम्हांकडोन जाहली, म्हणून स्वामीचे शेवेशीं हुजूर निवेदन जहालें. तुमचें वाडिलांची वर्तणूक कोणते प्रकारची होती, हलीं तुम्हीं करार मदारांत्या यादी शपथ पूर्वक बेदमूर्ति राजश्री महादेव शास्त्री फोंडेकर याजबरोबर पाठवित्या असतां अमर्यादा वर्तणूक स्वामीचे चरणा पाशीं होऊं नये. वरकड मजकूर राजश्री यशवंतराव शिंदे सरसुभेदार यांणी आज्ञा केली आहे. आलेप्रमाणें राजश्री चिंतोविठ्ठल व आबाजी महादेव यांशीं लिहितील. उभयतां मजारनिल्हे तुम्हांस सांगतील त्याजवरून करून येईल, जाणिजें. बहुत लिहिणें तरी सुज असा. (यापुढें लिहिण्याचें मोर्लब असे).

नंबर २२ (पृ. ६८)

महाराज बुलंदद्रजे शिवाजीराजे छत्रपति हाप-

वारे खुषवक्त व कामयाब बाद्दाद

उबाहत व शोकत पन्हाहा एकबाल व इजलाल दस्त-

गाह कुदवय राजहाय समूआल मकान

वाआदज इजहार इखियाक फिरावा मद्दाहूद आंकी,

शेथील खुषी जाणोन आपली बादमानी हमेषा कायमी करीत यावें. दरिदिलावरखां मसरत नमत पाठविले ते पोहोंचून मजमून मालूम

खाना. अजून बहिरजी नाईक गाईकवाड व बाबाजी विठ्ठल यांस पाठविलें आहे, फौजेच्या खर्चा बद्दल ऐवज पाठवावा, आम्हीहि कुच करून त्या जिल्हेस यावें, असें करणें केलें होतें, तरी पेशजी येथून भारी फौज बंकापुर जिल्ह्यास रवाना करून पाठविले असतां बाराभाई यांजकडील पांडुरंग षेकी वगैरे फौजे सुद्धां साबनूर येऊन मुक्काम झाले. या करितां नव्हाई होऊन बाराभाई यांची फौज गारत होऊन पांडुरंग षेकी वगैरे सरदार पाडाव आले. (हा) मजकूर आपणासही माहीम झाला असेल. हल्ली येथून भारी फौज रवानाकरून पाठविली असे. आम्ही ही निघावयाची तयारी करविली होती. मोहरमच्या आधुरा नजदीक पोंचलो. याजकरितां लहकूद झाली. इनशाह अल्ला हुना अगर बाः आदज आधुरा कुच करून अनकरीब त्या जिल्हेस येत असों. आपणाकडून आले बहिरजी गाईकवाड व बाबाजी विठ्ठल बंकापुरास बाजीराव बरवे कडे येऊन पोंचले. येथून ऐवज आपणाकडे पाठवावा, तर ऐवज घेऊन जाण्या बद्दल येथून इतबारी मजल दाटावांत जाणार दोनतीनशें स्वारांसि बंकापुरास पाठवून द्यावें. म्हणजे स्वार स्वारां बरोबर ऐवज देऊन आपणाकडे पाठवील असो. आपण येथें भारी फौजेचा जमाव करून तिकडे बाराभाई यांचे पारिपत्य खुब तंबीह करीत जावें. आणि तिकडील मुलूख हस्तगत करीत जावें. इनसंयांत आम्ही ही भारी फौजेनें भारी तोफखाना सुद्धां अनकरीब येत असों. इसवी सनाची बारामाही कलमी करीत यावें. ज्यादा लिहिणें काय असे. हे विनंति.

पेशजी इ. २७ माहे मोहरम सुरसन मया व अलफ सन ११८६ फसली. रु. पाठविला.

नंबर २३ (पृ. ६८)

राव अज्जम यशवंतराव शिंदे सरसुभेदार

दाम मोहं बत्तीस

० मोहानिल व मुवदत पन्हाहा रघुनत व मयकलू द-

स्तगाहा.०

बा-अारज इष्टियाक फिरावा मराहूद आंकी, ये-

थील रघुषी जाणोन आपली यादमानी कलमी करीत अ-

लां पाहिजे. दर्गविलारवत पाठविले ले पोहोंचून मजमून

मालूम जहाला. अज्जम वहिरजी नाईक गायकवाड व बा-

बाजी त्रिंबक यांस पाठविलें आहे. फौजेच्या खर्चा बद्दल ऐ-

वज पावावा, व आम्हांही कुच करून त्या जिल्हेस यावें अ-

से कलमी केले होते. तरी पेशजी येथून भारी फौज बंकापूर

जिल्हेस रवाना करून पाठविले असतां बाराभाई यांजकडील

पांडुरंग खेकी वगैरे फौजेसुद्धां सावनीवर येऊन नमूद साले

बाकी मजकूर नंबर २२ प्रमाणें.

नंबर २४ (पृ. ६९)

महाराजश्री राणी दुर्गा आऊ साहेब दाम षजाकतहूं.

अस्सलत पन्हाहा ईफत दस्तगाहा मुवाफिक मेहेरबान

करम फर्माय जीव्हान बुलंद मकान.

बाअादजू इजहार मरातीब नियाज मषन्हूद आं-

कि, येथील रघुषी जाणोनें आपली यादमानी कलमी करवून

दिल अराम करवीत असावें. दिगर तेथें भारी फौजेचा जथ

करविल्याचा मजकूर, व ऐवजा करितां स्वार पाठविले आहेत,

ऐवज रवाना करून पाठवावा, म्हणून अज्जम यशवंतराव शिंदे

सरसुभेदार यांणीं लिहिलें होतें, आणि राव अज्जम बाजीराव

बरवे यांणीं पैलम कलमी केल्यावरून ऐवज रवाना करून पान-

लिणें जरूर जाणून हाल्लीं एक लख रुपयेस, दर सावनुरीस साडेतीन रुपये प्रमाणें अठ्ठाबीस हजार पांचशेहें सत्तर होन स्वारांबरोबर पाठविले आहेत. पोहोंचल्याचे मजकुरास निगारिष केलें पाहिजे. भारी फौज जथवा विना लाऊड तोब करून मातबर काम करावें. दिरंगाईवर घालतीयास मनसबा तूल दराजावर जात आहे. भारी फौज जथली असतां रामचंद्र गणेश जूज फौजे निशीं नजीक असून त्यांस गारत करणेची पैयरवी कां सबब केली नाहीं त्याचा सबब मालूम न झाला. आतांही रामचंद्र गणेश वगैरे फौज आटोक्यांत येत असेल तर सरसुभेदार यांस सांगून ते फौज गारत जलद होयसें करवावें. अगर ते फौज आटोक्यांत येत नसेल तर दरोबस्त जथले फौजे सुद्धां सरसुभेदार यांस धारवाडचे सुमारास पाठविणें म्हणजे धारवाड नजीक येथील फौज आहे. हरदू फौजा सामील होऊन मरवाडीयास गारत करतील. आम्ही ही छ. २५ मोहोरम पहाणाहून कुचकरून पेंढारवानेस दाखल झालों. अनकरीब मजल दरमजल धारवाड जिल्हेस येत असों. सरसुभेदार यांची आमची मुलाकात होऊन तर्फनचे मसलतीनें मरवाडीयांस जरब द्यावयाची पैरवी केली जाईल. हरदो फौजा मिलाल्याखेरीज रवा नररवा मनसुबा हुजरात येईल. इतक्यावरी दिरंग करणें हरगीज मसलत नाहीं. अलीकडे सदरहू लिहिल्या प्रमाणें रामचंद्र गणेशास तंबीह होऊं राहेल, तर ते काम करवावें. तो मजकूर अलीकडे येत नसेल तर सरसुभेदार यांची रवानगी जलद केली पाहिजे. ये बाबे सरसुभेदार यास लिहिलें असे बाकी मुतालिब वकील आनंदराव याचें जबानी मालूम होईल. राव अज्जम बाजीराव यांणीं ही लिहिलें आहे, त्यांजकडून आलें होईल. हमेषा आपणाकडील खुष-

खबर निगारीस लावून दिलशाद करील असावें. आपण काय लिहिणें हे किलाबत.

पैवस्ती छ. २२ सफर सूरसन सब्बा सबैन मय्या-
व अल्फ. मुकाम किल्ले पन्हाळा.

नंबर २५. (पृ. ६९).

राव अज्जम यशवंतराव शिंदे सरसुभेदार
दाम मोहोबत इ.

मोहोदत व मुवदत पन्हाळा खुलत व मवाफक दस्त
गाहा.

वा आदज इष्तियात मुलाकात मषफ्फद आंकी, येथा.
खुषीजाणोन अपली शादमानी हमेषा कलमी करीत यावें. दरी
विलायत पाठविले तें पोहोंचून व आनंदराव वकिलाचे अर्जी वरू-
न मुफःसील मजषून मालूम झाला. तेथें भारी फौज जमा झा-
ली आहे, खर्चासही ऐवज पाठवून द्यावा, आम्ही ही कुच करून
यावें, म्हणून मुफसील कलमी केले होतें, तरी तेथील फौजेचा
खर्च धंकापुराहून एक लाख रुपयाचा ऐवज तेथून आले स्वारा ब-
रोबर पाठविला असे. ता हाल पोंचला असेल आम्ही ही भा-
री फौज व भारी तोफखाना सुद्धां पदणाहून कुच करून वीस
कोशांवर येऊन पोंचलों कूच दरकूच अनकरीब त्या जित्हेस ये-
ऊन पोहोंचत असों. खुबबातीत सरकारची फौज ठेविली होती.
फौजवाले परशुराम षेकी उंगरगोला पाशी उतरले असतां
त्यावरी चालूंन जाऊन शबखून केले. सरकारचे फौजेतून आरबा-
चा मारझाला. याजकरितां ठरूंन सकतां परशुराम षेकीची फौ-
ज दाणादाण होऊन फरारी झाली सरकारचे फौजेचे लोकांनी
षेकी मजकूर उतरले स्थळ लुटोन तीनचार शेहे घोडे, वीसतीं-
स उंट व बाहेरचे बैलवगैरे दोनतीन हजार मवाषी सह लुटोन घे-

घेऊन परतोन हुबलीस येऊन पोंचले. हुबलीस सरकारची फौज जुजबी आहे. त्याचे मुकाबिलेस परशुराम पेकी करत नाही. तिकडे फरारा होऊन आला आहे. असास तेथें भारी फौज जमा केल्या बादज शिबंदी चढत जाते. फौजेचे लोकांस खाली बसावेल्याने काम नाही फौजेचे लोकांस खर्च वेचांस देऊन जाबंदी करून तिकडे रामचद्र गणेशाची तंबीह तुम्हांकडोन होईल अगदिया त्यावरी चालोन जाऊन तंबीह पोहोंचून त्याचा पाय तेथून उखंडे असे करविणें. अगर रामचंद्र गणेशाची फिकिरी तूर्त होत नसलिया इकडोन परशुराम पेकी फरारी होऊन मुनचली वगैरे कडे आला आहे. त्याची हामराही फौज ही दहशत खावोन दाणादाण झाली आहे. वक्त काबूचा आहे. परशुराम पेकीची तरी तंबीह होत असे करवावें. इतक्यात अनकरीब खासा स्वारीही येऊन पोहोंचत आहे. बा आदज मुनासीब तजवीज करणे ती केली जाईल. तवल्लग जमा झालेल्या फौजेस खाली न बसावितां इकडे रामचंद्र गणेशाची तंबी करी, अगर इकडे परशुराम पेकीची फिकीर तरी करीत जाकडें पाहिजे. हमेषा आपली षाद्मानी कलमी करावे. ज्यादा लिहिणे काय? रवाना छ. ८ सफर.

पेवस्ती छ. १० रबिलावल रूरसन मुव्वा सबैन मया अलफ. मुकाम पन्हाळा.

नंबर २६ (पृ. ५९).

जी शान बुलंद पकान नवाब बहादुर रोज भाफ अुबाद.

छ दौलत व एकबाल पन्हाळा इजलास दस्तगाह. अजाजानी बसादी कुल ए खवास खावंदराव शिंदे सरसुभेदार बा आदज इखराज मराठीब ए खवास मवाजूर जमीरुद्

एक तरवमीर गर्दानीद मे आयदके दरीविला आयक नालपनद्य-
नी खन खुष नमल मरसूल्ं केले ते नेकनकी पोहोंचून कल-
मी केला मजमून बथावार मालूम होऊन विषयार खुषवक्ती
हांसील झाली आ एक बाल पनाहांचे येणें या जिल्हेस अ-
नकरीब भारी फौज व तोफखाना सुद्धां व्हावें फौजेचे खर्चा-
बद्दल ऐवज येऊन पोहोंचावा. बर्ई सबब पेंद्रपे तीर्थस्वरूप
महाराज मातुश्री धणी साहेबांनीं व महाराजांनीं कलमी करून
पालवीत अमलां जवाब बासवाब निश्चित बूदके येथून भारी
फौज रवाना करून पाठविली असे. व आ एक बालपनाहांची
तयारी करावेली असतां पोहोरमचा आषुराजदीक पोहोंचला.
बर्ई सबब लहकूब झाली. इनशाह अल्ला इना अलाबाद आ
पुरा कुच करून अनकरीब त्या जिल्हेस येत असों. ऐवज घेऊ-
न जावया बद्दल येथून इनबारी मजा मराहजात जाणारे दोनशे
स्वार बंकापुरास पाठवून द्यावे म्हणून कलमी केल्यावरून श्रीम-
न्महाराज धणी साहेब खुवाविंद खुवाजी रुएदाद जाहली. अ-
शास आषुरांखलम होतांच आ एकबाल पनाहांनीं भारी फौज व तो-
पखाना सुद्धां खुद कूच दरकूच जलदीनें बंकापुरास यावयाचें क-
रावें. अजमस बानीराव बरवे यांजकडे किल्ये पौंणीया मसल-
नीचे भेजमुनाफाखले अजम राघो चिंतुयांस फिरस्तादं केले अ-
मत. त्या हुषरात दोनशें स्वार देऊन पाठविले असत. तरी तेथें ये-
ऊन पोहोंचलांच जुददर खर्चाची मदत इमदाद पोक्त ऐवज देऊन
रवाना करून पाठवावे असरतीचा वक्त कूच आहे. अशास आं-
एकबाल पनाहांनीं बा फौज येऊन पोहोंचावें. हुजूरचे फौजेचा ज-
थ आहे. हरदू इतिफाक पडून फितुरीयांस तंबीह पोहोंचून दिव-
स खबाह मसलत हांसील होनीस बारीषचे रोज नजदीक न पोहों-
चले तों आएक बालपनाहाचें येणें होऊन मसलत हांसील होईल
सो अर्थ करावा. हरएक बाबें आपला खातर जमा बरकरार राखो-

न चाबया विषयींचा अंतेखा घातरेत न आणितां जूद आएक आल पनाहानी या जिल्हेस तसरीफ फरमवादी. जियादय बजूज रोकेचे निगास्त आयद आयाम कामरानी मुदाम बाद.

नंबर २७. (पृ. ३९).

(७ फयुजात इलाही व तबज्यहात नामत

न्हाडी ग्रामित हाल फरबुंद म आल.

खान अजी सुग्रान. नबाब हैदर अल्लीखां बाहादूर

रोज आफजुबाद.

अर्जीसोबत महाराजगीराणी दुर्गाआऊ साहेब बा आलज दुवा आंकी, दूरिचिला छ १८ शाबानचे खतपत्री त्या जिल्हेची काजकामें फैसल जहाली याचा मजमून कलमी केल्याबरहल व अज्जम बाजीराव गोविंद व आबाजी महादेव यांणी मुफसील इरकाम केला मनाल्लीब जाहिरीन पोचून रघुपत्तीराव यदाद जाहली, सिकडील मुकदमा फैसल होऊन या जिल्हेस रवाना जाहली. आ दौलतमंद भारी फौज व भारी तोपखाना सुद्धां अनकरीब कूच दरकूच येत असों. अशावक्ती हुजूरची फौज येऊन सामील व्हावी, व खर्चासही येऊन पोहोंचेल म्हणून बयावार कलमी केले होते. पेशजी बंदोबस्त इरकामे केल्या मजकूर फिक सेच वक्ती मातबर फौजेचे सरदारास आज्ञापत्रें सादर करून नालबंदीकरिता कारकून आम्हीविले, मजकूर पै दरपै येऊन दरवल झाले आहेत. नालबंदी होवोन भारी फौजेचा गाडा होत आहे. पुरंधराकडून महादजी शिंदे बाफौज या तर्फेच्या मसलतीस करितां जावणीचा इरादा घरून रहिमतपुरानजीक उतरले आहेत, बाजादज दसरा दरपेश येणार, त्याचे पारपत्यास हुजूर भारी फौजेचा जथ्था राखिला पाहिजे. संथोष बंदोबस्ती मुस्तकीम राहून अज्जम मदतीजी भोंसले या हमराह

फौज देऊन आदौलतमंदाकडे फिरिस्ताद करणेची सरतूद झा-
ली आहे. अलकरीम व फौजे [illegible] येऊन दाखल होत आ-
हेत. त्याम अर्से मालूम भारी खर्चे वेचे लागतो, हा
अर्थ आंदेशिन मदास मालूम आहेच. [illegible] येऊन राहिद
असता अलता तरी इनके गोज दिगर्गी पदुल्यापुर्के. [illegible] व-
रसाल वक्त अरबेरीस पोहोचला. फाजचा गाहा भारी होत आहे
अगा वक्ती पान खर्चाची मदत इमदाद येऊन पोहोचाली. बंदा-
जीबा हैलखाह कामलगीं हांवील होऊन येतील. मकदुरास फौज-
ची इमदाद न पोहोंचली तो गाठ घालीन दरोबदर केलियान
अवस्मान [illegible] नाहीं. [illegible] राम रघुनाथराव पंडित यांची
स्थापना दौलतीवर व्हावी, हा [illegible] ओरंगेत मदांचा आहे. त्या-
पेक्षां जियादतर महाराजांचा [illegible] आहे. बंदाजीब हांवील
होऊन नामनाशोष जाहिरीस पोंचलें करावें. बाजे किलेकमु-
फसील मवाफिक हुकूमकपकुलमरहपक्ष रावंतराव शिंदे सर सुभेदार
कलमी करतील त्या वरून मालूम होईल.

नंबर २८ (पृ. ६१).

जीवान खुलंद मकान नवाब बहादुर रोज
अफजुबाद.

(छ) दौलत व एकबाल पनाहा इजलास दस्तगाह.
अजी ज्यानीब सादी कुल एकलास यशवंतराव शिंदे स-
रसुभेदार बाअारज इबराज मरातिब एकलास मराहूद जमीर
दुरुस्त तरबमीर गर्दानिद ने भाषतले आ एकबाल पनाहानीं पे
राजाचें खतपत्री वीस पचवीस हजार फौजेची कुमक जलदीनें या
जिल्हेस रवाना करून फिरिस्ताद करतों, बर्इ सबब कलमी करून
पाठविल्यास अजी एक माहे पर्यंत गुजरत आला असोन लाहाल या
तर्फेस कुमक रसीद न जाहली. बावजूद ये बाबेमी हातेजारी अ-

महंद आफजूं जाणोन आएक बाल पनाहानीं कुमकी केल्या ब-
दोलत पिंदे मजकुराची मनसबी सलू राखा पैगाम आबून अं-
जीलग रोज कांदील आणिले आहेत. महाद्जी शिंद्याची फिक-
ड भारी आणि मोर्चे नजीक पोहोंचले असून दोंट करविरांतील स-
रदारानीं व रामघोर बहादुरांनीं हिम्मत बुलंदीम धरून दररो-
ज चढाई चेपनर कीन आहेत. आणि कोट मजकुराची उत्त-
वारी मजबुदीने करून खबरदारीने राखीत आणिले आहे.
आएक बाल पनाहा कडील फौजेची कुमक जलदीनें येऊन र-
सीद होते हा खातरजमा मुस्तकीम धरून आज तागायत आ-
ह राखीत आलो असोन हनोज ये बाबेची पैरवी खातरेत
आणोन मसलहातीची पैरवीची तरतूद अनकरीब जाहिरीस
न पोहोंचली. बावजूद अज्जम बाजीराव यांणीं इजतिम-
बास खलपत्री आएक बालपनाहा कडील पुरतप नाहाचा मु-
फसील मजमून इरकाम केला तो जाहिरीस पोहोंचोन बेषतर
खुषवक्ती हासील जाहली. अजीतीन बरसलग आएक
बालपनाहाचा तमाम खर्चे हेय अतिबार धरिला असोन अ-
मचा मुशिल चक्र श्रीमन्महाराज धणी साहेब याच्या राज्या-
वरी गुजरला आहे. हा दिल निशी जाणून आजीदल बज्या-
नरोषीव करून इमदाद केली पाहिजे. फिलहाल पांच हजार
स्वार व दहा हजार पायाच्या लोफा सामानगड आंत बिल-
क आत एक दो गेजांत अज्जम दिप्पुनिया या हमराव देऊ-
न बाजीराव इनवील या जिन्हेम रवाना होणार, वर्ई सबब म-
वार लिहिनीं कलमी केले त्यास अजी चार दहा रोज झाले.
इनके रोजांत जलदीनें दरमजल रवाना होऊन आलो असेल.
न इलिजारी वेषतर जाणोन कलमी केले असे, तरी या उप-
र गुलाम खवाही हरगीज न करितां निलाहजूर फौजेची कुम-
क रवाना करून फिरस्तार केली पाहिजे, जियादये बजूज

गोकर्ण निगाल्या आयाम कामरानी मुदामबाद रूबरू सम्मान सब्बेन मख्याव अल्फ.

नंबर २९ (पृ. ७२).

श्री.

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे श्रीचरणीं

विनंति श्रीवेंकट परशुराम रामचंद्र कृतानेक विज्ञापना. तागायत छ. २२ माहे जमादिलावल मुक्काम नजीक गोकाक येथें स्वामीच्या कृपावलोकने करून श्रीवेंकटचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:- स्वामीनी कृपाळू होऊन आज्ञापत्र सादर केलेंतें प्रविष्ट होऊन समाय जाहालों. तेथें आज्ञा जे, नोरगल तालुका व कडकोळ तालुका व वरकड सरकार तालुके लिकडे आहेत त्यास उपद्रव न होय असे विन्नी फौजेंत ताकीद करणें म्हणोन आज्ञा. ऐशीयाश्री आज्ञे प्रमाणें फौजेंत ताकीद करून उपद्रव लागूं दिला नाहीं. बन्नूर व कडकोळ येथील कारकून बहूत अमर्यादा करीत आले. राजश्री लक्ष्मणराव शिंदे यांचें ही ऐकूंन गेले. याजकरितां कारकाचें पारिपत्य केलें. राजश्री लक्ष्मणराव शिंदे याजकडून राजश्री मुरारजी भोंसले आले तेव्हां बन्नूरचें गणें मचार निल्हेच्या हवाली केलें. कडकोळच्या गण्याचा बंदोबस्त केला आहे. वरकड आज्ञेप्रमाणें सरकार तालुक्यास उपसर्ग तिळमात्र लागला नाहीं. मनोळी तालुका सावकारास लावून दिल्हा. त्याणीं स्वामीच्या आज्ञेवरून ऐवजाचा भरणा करून दिला असता राजश्री सरवोजी भोंसले यांणीं हैदर खानाच्या गडबडीच्या संधीत गणें घेतलें आहे. त्यास ताकीद होऊन सावकाराचे स्वाधीन होय असें जहालें पाहिजे. नसेंच हुकेरीचें ठाणें मचारनिल्हेनीं घेतलें आहे. ऐशीयास त्यास ताकीद

द होऊन सावकारांचे हाणे सावकाराकडे देवावितले पाहिजे. शेवेरी शुभ हुंशि हे पत्रलेखन. " सेवेस्ती रु० २९ माहे जमादिलावल सन सभानेन मध्याच अलफ.

नंबर ३० (इ. ७२)

श्री.

श्रीमन्महाराज श्री छत्रपति स्वामीचे

सेवेसी.

विनंति सेवक परशराम रामचंद्र कृतानेक विनंती लागायत छ. ६ जमादिलाखर मुक्काम आर्कीवाट कृष्णा दक्षिण तीर येथें स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे. विशेष:- स्वामीनीं कृपाळू होऊन आलाप व सादर केले तेथें आज्ञा जे, हुक्केरी व मनोळी घात व फुटगांव हुज्जर यावे, या अर्थी सर्कार पाठविले आहेत, विवेकाचें बोलणें लागले आहे, तरी तालुक्यास उपसर्ग न लागेसें करावें, म्हणोन आज्ञा; ऐशीयास मनोळी व हुक्केरी वगैरे गांव खंडी साधकाराकडीन स्वामीनीं व सावकाराकडे देविली असतां, दरम्यान यशी राजश्री सरखोजी भोसले वगैरे यांणी घेतली होती. सावकारांची उगवणी झाली पाहिजे. यास्तव हुक्केरी, शेंडूर वगैरे गांव सावकाराकडे घेऊन दिले. गडहिंग्लज वगैरे गांव घोरपडे सर्जेकडीन पुरातन पासून होते. ते आलीकडे सामानगड करांनी घेतले होते. ते स्वामीस घेऊन दिल्हे, आणि आकिवाटास आलां, तेथें यावयाचें कारण स्वामी म्हणोन आलां, ऐशीयास वर्णी वाटा फार मारिल्या, वाणी, उदमी यांचे बंद वलवून आणावे, कुरुंदवाड वगैरे स्वामीच्या गावांस बहुतच उपद्रव दिल्हा, उपद्रवाभुले घरा पडल्या; स्वामीची आज्ञा या अन्वयें कदापि होणार नाहीं. दरम्यान आज्ञे

शिवाय उपद्रव करितात असें लिहून आलें. त्या करितां याँ मुक्काम आलों आहों पुण्यात ॐकारा कडील येजाऱ्यें वतालु-के सोडविण्याचें बोलणें लागलें; उत्तम आहे. तेथें ठगान होईल त्या भन्वयें ॐसायकार वर्तणूक करतील. बोवजी विदीत होय हे विज्ञापना. पैवस्ती छ. ९ माहे जमादिलाखर सन् सम्मानीन मय्याव अल्लफ. मुक्काम पन्हाळा.

नंबर ३१. (पृ. ७७).

श्रीमन्महाराज राजासाहेब शिवाजी छत्रपति एक बालपन्हाळें.

(छ) शाहामल व एकवाल पनाहा बिसालत व रजा-स दस्तगाहा:--

येहेर की बजर गाबर्ड इनाया दस्कायर सलखिमान व कुर्रानवाहत वा आदज वौक मवाहूद आंकी, शाहामत पन्हाहा साहेबीं मेहेरबानगी करून किताबत फर्माविल्ह नीरसीद होऊन खुषीहासल जाहली. बिवायार रोज गुजर जाले अमतां इमान-बे किसावत कलम करून जाम्बुरा समागम फिरिस्ताद केले, तीउ-जूर रसीद झाल्याच असेल. फिलहाल एक बाल पन्हाहाचे खना-मध्यें फर्माविले जे भोसले (राजाबाकर) चांगरे खरदार महाराज राज्याचे शोवक करीम निजमन करत अमतां झाली मेहेरबानी क-रून महाराजायाची अभयँ देस अवर्तते आहेत. त्यास तसीह करणें हें जरूर असें शाहामत पन्हाहाचे मनास्कल नाहीं झा-लें. हजरत महाराज राजा साहेबांचे पुरातन स्वस्थान, याबद्दी हर कोणीं बे दिल करून इमान चुकले. यात यरा कधीं फोडे-चणार नाहीं; या खातर निशा अमाना ने विद्दी आलां राजा-ने खास जरूर होऊन सावंत भोसले यास खलकम करा वाडी-स जासूद रवाना केले ने विद्दीचा मजकूर अवाब साक कलम

करावा, तो सर्व ऐवजासमंद यशवंतराव शिंदे सेनासाहेब सुभा सरसुभेदार यांचे किताबती संबंधें कलम करून ते मुफसील अर्ज करितां मालूम होईल. बाकी इजानिबाचें हातीं होणें. हजरत महाराज साहेबांचें काजकाम होणें त्यास हर्जार आहे. रवाना छ. ७ माहे सन ११८२ सन १७८२ हिजरी किलाबत पैवस्ती छ. ४ माहे सफर इसने र. मानीन मयाव अल्फ. मुकाम करवीर.

नंबर ३२ (इ. ७७).

अज्जम यशवंतराव शिंदे सेनासाहेब सरसुभेदार सलम उल्ला उनात्मा.

७ शाहामत व एक बालपनाहा बिसाबत व इजलाल दस्तगाहा:—

बुलंद मकान राबर्ट इनग्रा इस्कायर बा आदज शौक मइरद आंकी, येथील नेकी जाणून एवजास मदार्ई आपणाकडील इमादमानी कलमनबिस्ता करीत गेलें पाहिजे. दिगर एवजास मदार्ई खत जासुदा समागमे फिरस्तादं केले, तें रसीद होऊन कलमी केलेला मजकूर बयानवार मालूम झाला. पेशजी इंजानेब कोल्हापूर मुकामीं असतां किताबत करून एवजास मदार्ई माधवथळी यांची सुरतेमीं रवाना केला. त्यास अद्याप वर इजानिबाचें खत वकिलापाशीं पाउविलें तें दिल्हें नाहीं. एकदम करार केला तो कार्यासी आला नाहीं. येणें करून काय म्हणावें. हाल्लीं एवजास मदार्ई कलम केलें जे खुद्दायवर ज्या हामत आनराबल कंपनीचें वेणें गेवजाच्या निशा करून देतों म्हणून खत फिरिस्तार केलें. पुणेचे सावकार गुजारथीनें इजानिबाचे सरकारचे ऐवजाचा निशा करितां यांची मुकरर सावकार यांचीं नायनिशी

कलम करून पाठविली. त्यांत मवाफीक इंग्रजानिचाचे खातर जमेची चिठी आणून दतों म्हणून लिहिलें, ते विशीचा मजकूर समशाहुसल दादाजी यादव यांचें किताबती मध्यें कलम केला असे; सर्व एरवलास मंदास जाहीर करील. किल्ले रांगणे विशीं अजम सावंत भोंसले यांचीं जे रीती कलमे करावें नें रीतीनें लिहून खल जासुदा समागमें वाडीस रवाना केलें आहे. तेथें नजीद खतान्ची नक्कल हाती मवादुरल दादाजी यादव याचे खतांतजास असे. सावंत मजकुराकडून जबाब येतांच एरवलास मंदाकडे रवाना करून देतों. सुरतेहून आनंदी बाईचा निरोप एरवलास मंदाशीं आला. सवाई बाजीराव यांशीं पेशवाईचीं वस्त्रें द्यावीं. त्याशीं एकबाल पन्हाहा महाराज धणी साहेबांचे चित्तीं इंजानिबाचे गुजारतीनें देणें म्हणून लिहिलें त्या वरून आम्हीं बहुत खुषी झालों. जे इजरत महाराज राजा साहेबांचे रीती रिवाज आहेत त्यास आम्ही राजी आहों. आमचे हातीं होणार त्यास अंतर करणार नाहीं. घोडेचे मजकुरा विशीं लिहिलें ते विशीं याद असले. कांहीं अगाध नाहीं. थोडेकाच गोष्ट आहे. मजा मवाफी वस्त्र पाहिजे, खातर निशा असावी. दिगर एरवलास मंदाकडून हुजूर गोखेत इजरत इस्ताद फिरंगी यांजकडे कामाबद्दल आले होते. तेही इंजानिबाचे भेटीस एकदोन दफा ती आले, त्यांची भेट झाली. से चीदुसरे दिवशीं फिरंगीयांस सरबस्त झाले. जे इंजानिबाचे भेटीशी हुजूर येतात जातात, म्हणून कांहीं मनामध्यें असरव्याती अशल हकीकत इंजानेबांस परस्परें मालूम झाली. ते नंतर हुजरे यांशीं आज्ञा केली जे. यानीशे येऊन भेटून जावें म्हणून काजे इंजानिबास ते गोष्टीचें कांही नाहीं. परंतु एरवलासमंदाचे कामकाजाबद्दल त्याकडे आसतें इंजानेबांस भेटलां पुढें संग्या धरून एरवलासमंदाचे कामास खोटी होईल, यास्तव फार करून त्या कडे बोलीचाली कांहीच

नजर आणिली. हुजूर जाते समयी इंजानिवास दरखत इलाले नाही, कांजे आम्हीं ते दिवशी जबाजावरी कांहीं कामाकरितां गेलों होतों. ते मुद्दाकल नसतां जाउनी गेले. त्यावर तो गुन्हा नाही. एवलास मंदास जाहीर होणें वाजला कलमी केला. ज्यादा काय कलमी करावें, त्यार मोहोबत असो देणें. रवाना छ. ७ जमरे सन १७८२ इजरी विरूद्धी हे किताबत.

नंबर २३ (पृ. ७७).

नबाब हैदर अल्ली खां बहादर गादकाम
व मलाजी आत्मराम बाबद.

(७) अमारत व अयालत मर्तबत वकील व इशमत मजीलत खान अजी मुकाम:—

बाअदज इत्तीयाक फिरावा गवाहूद आंकी, येथील खैरे अफीयत जाणोन आ अमारत पनाहा कडील खैरियत कलमी करून शादमानी रुयदाद होय ते कळे पाहिजे. दरिबिला आ अमारत पनाहाकडून अज्जम परशराम बक्षाल व आनंदराव व्यंकटेश व राघोविठ्ठल व बालाजी विठ्ठल या हमगाह खत रघुपतमल वमय एकजंजीरफिल व जवाहीर वर्वाल आत पारचे बरहुकूम यादराश्त इरसाल केले, ते इलिजार समयी पोंहोचून कलमी केला मतालीब मुफसील नाहीरीत पोंचला, व जबानी हूलरू एजार निल्हे खासीं राजकारणाचा मजमून मुफसील पोचिदा अर्ज केल्या वरून बेदियार रघुपतजी हांगीत जाहली. इनवा अल्ला हुला आला दरसरा होतांच आ अमारत पनाहा बमे भारी फौजे निशीं त्या जिल्हेस येत असों. इस्वरीत खवाहा मतालीब इंग्रीत होनीत, म्हणून वयांवार कलमी केले तें मालूम जाहलें. पेशा-

अजीं आ अमारत पनाहाचे येणें बेमे तोफखाना भारी फौजेनिशीं बुगदा पार होतांच, मजल दरमजल कूच करून दरयेत्ता आलें असतां म्हणजे दिलरखवाहा मलाऊल कार सुरत पजीर होऊन उमदा काजकामें सांगोपांग जाहली असतां, वरसातचे बारिशीच्या जोरामुळें माघारे कूच करून गेलें फिलहाल मसलतीचे रोज अनकरीब येऊन पोंचतील. दरी नजदीकचीं आ अमारत पनाहानीं दसऱ्याचे मुहूर्तें कूच करून दरमजल तुंगभद्रापार होऊन जलदीनें धारविल्हेरा येऊन पोहोंचावें हेंच इतिजारी आजहद्द आफजूं जाणून जूद अमलन काफिस्त. अज्जम रघुनाथराव पंडित यांची स्थापना स्वस्थानास करावी. हा इरादा हरदृ तर्फेनें बेरातर आहे. वई सबब आ अमारत पनाहाचें येणें या तर्फेस भारी फौजं व तोफखाना सुद्धां जाहलीयानें महाराजांचा व आ अमारत पनाहाचा इत्तिफाक होतांच बारभाईस तंबीह पोहोंचून पंडितम यांस्तर इसे यांची स्थापना केली जाईल; व बेरातर मसलतीचीं काजकामें घडून येतील. ये बाबेचा कित्येक मुफस्सल हुकूम फर्मावणें तो कयकुद मरहमत यशवंतराव शिंदे सरफखेदार यांस फर्माविला आहे. मताबीक हुकूम कलमी करतील, त्या वरून मालूम होईल. त्या मवाफीक कार सुरत पजीर होऊन आ अमारत पनाहाचे आमदन या जिन्हेस जलदीनें दोय तें करावें जियादयेचे निगारष आयद अय्याम बक्काम शादमानीमुकामबाद. रवाना छ. १९ शाबान. सन आर्बा सब्बैन मयाव अल्फ.

नंबर ३४ (पृ. ७७).

श्रीमन्महाराजबुलंद दरजे शिवाजी राजे छत्रपति इमवार रघुषवक्त व कामयाब बाशाद.

उबहन व शौकत पन्हा एकबाल व दौलतमाब दस्त-

शाहू कुदवय राजहाय समूअस मकान:-

बा आदज इजहार इतिबाक फिराया मराहूद आं
की; येथील खुषी जाणून आपली शादमानी कलमी करीत यावें
दीरविला आपण रवत पाठविलें तें पोहोचून मजेमून माहूम ज
हाला. आपल्या कुमकेस फौज ही रवाना करावी, रवचीस ही
पाठवावें असें लिहिले होते. ती पेशजी कोल्हापुरांत फौजजमा झाली तावकीसरकाने
फौजेसहीत बाजीरावही हुबळीचे रोखेस होते. सरकारचे फौजेस आ-
पली फौज येऊन सामील झाली असतीया बहुतात कामाची
सरबराई होत होती. त्या प्रमाणें इतेफाक झाले नाहीं. अगतां-
ही आपणापाशीं फौज आहे ती आहे आणखी फौजेचा जमा-
व करणेचा करावा. येथून भारी फौज व भारी नोफरदाना बन्दू-
कचे रोखेस रवाना करून पाठविले असतां. आपणाकडील भें-
जे सुद्धां यशवंतराव घिंदे वकाडूरचे रोखेस येऊन सरकारचे
फौजेस सामील जाहली यास आपले फौजेस खर्चासही पोंचेल
आणि सरकारची व आपली फौज इतिफाक जहाल्या बादज हरे
पंत फडके घिरहद्दी कडे आला आहे, त्याचे तंबीद सहजात
होईल या प्रमाणें कोणिया मरवातिफाचे तंबीही होत आहे.
अगर नाहीं तर दिलफेक तेथें जमाव झाला आहे ते फोडे पेंढा
एक हजार स्वार तेथें ठेवून येऊन बाकी फौजेस वकापुराकडे
सरकारचे फौजेस शोरोक होत, असे पाठविली याही, बेहेतर
असे. येथून ऐवजाचा सरंजाम करून कोल्हापुरास पाठवून दे-
ऊं. तेथें आपणची फौजेचा जमाव करावा. खुद्दस जे की
शिवजन बाराभाई यांची तंबीद व्हावी. आणि रावसाहेब मे-
हेरबान रघुनाथरावजी यांची स्थापना व्हावी. हेंच आमचेंही
खुषीचें काम आहे. आपणास ही हें काम जरूर आहे. हें
काम इनसराम झाल्या बादज आपलें ही काम बहुत घडोन ये-
ईल. या वास्ते कोणावजे नरखुद करावी; त्या प्रमाणें भारी फौजे

चा जमाव करून पोक्त मसलत ठरवून त्या मजकुरास लिहून पाठविणें. लेखी जमा झाल्या फौजेस इकडोन खर्चास पोहोंचविणें जाईल. कोणे बातेचा अंदेशा न करीतां खातर जमे करोन शाहाभाई यांची तंजीह व रावमोसूफ यांची स्थापना होय अशी पैरवी करीत जावें. बाकी मजकूर बाजीराव व आबाजी महादेव लिहिले आहेत त्यावरून मालूम होईल. आपणाकडील वहीरजी गायकवाड व बाळाजी विश्वास आहेत त्यांसही जे काय मसलत सांगणेचा सांगितला आहे. त्याणीं लिहिलें त्या वरून मालूम होईल. हमेषा आपली खातरजमा करीत जावें. ज्यारा लिहिणें काय असे हे किताबत.

पेवेस्ती छ. १५ माहे शाबान सु॥ समान सबैन मया व अल्फ. मु. करवीर.

नंबर ३५ (पृ. ७७).

श्री.

श्रीमंत महाराज राजश्री छत्रपति साहेबांचे सेवेसीं.

विनंती सेवक रघुनाथ बाजीराव कुलानेक विज्ञापनात्तागायत छ. ७ पोहोरपे पावेतों साहेबांचे कृपेंकरून वर्तमान यथास्थित असे. विशेष :-- महाराजांनी बरखे नजवाहीर राजश्री परशराम लष्कर व हुजरे व दफूरकून चाले बराबर पाठविली ती खाली अमाणें पावली. बहुत संतोष झाला. किलीएक मसलतीचें मजकूर व मुंबईकर जनरल आजकडील कामकाजाचे जाबसाल करून छावणीविशीची साहेबांची आज्ञा झाल्याचा अर्थ त्याणीं दिल्हा केला. अद्यास मुंबईहून कारकून आणविले आहेत, ते आल्यानंतर जनराल याजकडील जाबसाल होईल तसा करून घेऊन करावें. मसलतीच्या बगैरे यादीचा बंदोब-

स्त. करणें तसा करून मागाहून परशराम बल्लाळ, कुजरे व का-
रकून यांची रवानगी होईल. इकडील मजकूर तरी लढाईचा
मनसबा जारी केला. राजश्री बाजीराव गोविंद यांस नबाब हैद्
र अल्लीखान बाहादूर यांचे फौजे सुद्धां त्या प्रांतीं आणिले अ
सत. त्रीवर्गी श्रुत होय हे विज्ञापना.

पैवस्ती छ. २८ मोहोरम. सु. पन्हाव्वा. सु॥
संमंग्नीन मय्याब अल्लुफ.

नंबर २६ (पृ. ७७).

महाराज बुलंद दरजे शिवाजी राजे छत्रपति
हुमवार रघुवक्त व कामयाब बादाद.
उबहत व शौकत पनाह व एकबाल व इजलाल
रुस्तगाहा कुरवय राजहाय समूअत्त मकान :-
बाअदज इजहार इखियाक फिरावा मखमूद

आंकी, यर्थाथ रघुपी जाणून आपली इतमानी हंमेषा कल-
मी करीत आलां पाहिजे. दिगर आपला व आमचा एकत्रास मु-
दत पासोन चालत आहे. या करितां पेशजी पुणे वाले बारा-
भाई यांचा व आमचा बिघड होता. करितां इकडोन ही त्यांचे
मुलखास तोहीस पोहोंचत होती; आणि आपणा कडोन ही
हरज पोहोंचत होता, दरमिला बारभाई यांचा व आमचा
सलूकाचा पैगाम जाला आहे. या करितां इकडोन ही त्याचे
मुलकास इजा न पोहोंचे अशी ताकीद करविली आहे. ते-
थें सदवोजी भोंसले व मानाजी शिंदे यांणीं जमखेंडी, लेदा-
ल वगैरे बाराभाई यांचे मुलखास तोहीस देऊन लूटलाई करि-
तात, असें ऐकण्यांत आलें. तिकडून सलूकाचा पैगाम अस-
तां त्यांचे मुलुखास तोहीस देणें लाजीम नाहीं. या करितांमा-
नाजी शिंदे तेथें असतील तर, त्यास राबसाहेब मेहेरबान रघु-

नाथ गवजी कडे जात से रवा देऊन पाठवावे. सटवोजी भोसले यांसही बाराभाई यांचे सलुकेत स्वारी न करी नसे ताकीद करून करारा प्रमाणें सटवोजी भोसलेस राजमियत सुद्धां येथें रवाना करून पाठवावें. बिलफैल पुणेहून सलुकाचा जबाबसवाल करितां मातबर येथें आले आहेत. इकडील सलुकाचा जबाब सवाल होते वक्ती आपणा कडील तहाचा जबाब सवाल ही कैसेच व्हावयास गतो काजे तर्फेनें जुदाई नाही. या करिता आपणा-कडील मातबरास जबाब सवालाची अकूत्यारी देऊन पाठवीले पाहिजे. अगर आपली मर्जी बाराभाई यांसी सलूका करणे असलीयास त्या मजकुरास लिहून पाठवावें. सटवोजी भोसले यां सही जलद रवाना करून पाठविले पाहिजे. बाकी मजकूर राघो विठ्ठल व अवधूतराव लिहिल्या वरून मालूम होईल. हमेशा आपली यादमानी सकलमी करवित आला पाहिजे. ज्यादा लिहिणें काय असे हे किताबत.

सदरहू रवत नबाब अली खा बहादर यांचें.

पेशवस्ती छ. २१ माहे मोहोरम सूरसन् समानैन मय्याव अलफ. मुकाम किले पन्हाला.

नंबर ३७ (पृ. १०२).

श्री.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसीं.

विनंति सेवक बाळाजी जनार्दन. कुलानेक विज्ञापना. लागाईत छ. १२ जमादिलावल पर्यंत स्वामीचे कृपावलोकनें करून वर्तमान यथास्थित असें विशेष:- खासा स्वारी कोले सुद्धां वाईचे मुकारें यावें म्हणून महाडचे मुकामाहून विनंति पत्र लिहिलें होतें. आलकिडील महाल्या मजकुराची विनंती पत्रें स्वामीस लिहिली आहेत. त्या बमूम विदीत जहालें असेल. आम्हीं ये-

थील मसलतीचे अन्वयें नव्हाडाहून कूच करून वाईस आलों. पुढें दरमजल पुण्याकडे जातों. यास्तव रवाना स्वारी इकडे याबद्दयाची न करून फौज ही येऊं नये. सरकार नाशुक्याचे माहाल राजश्री गंगाधरराव व राजश्री रघुनाथराव यांजकडे सरंजामास वगैरे आहेत, त्यांस उपद्रव होऊं नये या समाणें पेशजीचे करारांत आहे. त्या पक्षीं उपद्रव जहालव नसेल राजश्री परशराम रामचंद्र यांजकडे सरंजामास वगैरे माहाल आहेत त्यांस मात्र उपद्रव व्हावा असें बोलण्यांत आहे. परंतु परशराम रामचंद्र हस्तगत जहाले, मसलत खोटे घडांत आली. त्याजकरितां राजश्री गंगाधरराव व राजश्री रघुनाथराव व राजश्री परशरामपंत यांजकडे सरंजामास वगैरे माहाल आहेत त्यांस कोणेविशीं उपद्रव होऊं नये येविशीं सरदारांस निक्षून ताकीद व्हावयाची आज्ञा जाहली पाहिजे. राजश्री बाजीराव यांचा मुक्काम कोरेगांव येथें आहे व राजश्री त्रिमाजी आप्पा यांचा मुक्काम मौजे मोसी नजीक पुणें येथें आहे. स्वामीस कळावें म्हणून विनंती लिहिली आहे. श्रुतहोय हे विज्ञापना.

पेशजी छ माहे जमादिलावल सूर सनू सबा तिसैन मय्याव अल्फ.

नंबर ३८ (पृ. १०७).

श्री.

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेशीं.

विनंती सेवक मल्हारराम घाटगे सर्जेराव विज्ञापना सा. आषाढ शुद्ध ४ पर्यंत स्वामीचे कृपावलोकनें करून सेवकाचें सर्वमान यथास्थित असें विशेष. स्वामीनी कृपालू होऊन पत्र पाठविलें तें मस्तकी वंदून सनाथ झालों. तेथें निरोपिलें, जे

राजश्री दौलतराव बाबा यांचे पदावरून फौज रवाना केली आहे. व मागाहून ही रवाना करितों असें निरोपिलें. त्यावरून यजमानास बहुत संतोष झाला. इकडोनही स्वामीस शेवेशीं अंतर झाले यास्तव नाही. राजश्री गोपाळ मोहिते व सखाराम हिरसाट या उभयतांची लिहिल्या अन्वये रवानगीची आज्ञा व्हावी. फौजेचें सामान निवडक त्वरें येऊन पोहोंचे ती आज्ञा निरोपावी. इकडील लक्ष दुसरें नाही. स्वामीचे कृपें करून आतां कांही मसलत अवघड नाही. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

पैवेस्ती छ. ६ मोहोरम सुम्मा तिस्सा तिसैन मय्याव अल्फ मुकाम कामेरी.

नंबर ३९ (पृ. १०७)

श्री.

श्रीमन्महाराज श्री छत्रपति स्वामीचे शेवेशीं.

विनंती शेवक दौलतराव शिंदे. कृतानेक विज्ञापना, ता छ. ५ मोहोरम पावेतो स्वामीचे कृपें करून सुरवरूप असे. विशेष, स्वामीनीं दोन आज्ञापत्रें पाठविलीं तीं प्राप्त होऊन संतोष झाला. पत्रीं आकाराम यादव हवलदार हुजूर आले, यांणीं विनंती केल्यावरून निवेदनांत येऊन हुजुरून राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति व त्रिरंबीव राजश्री रायाजी जाधव जसवंत मुकुरब असे फौजे सुद्धां पुढे रवाना केले असत. कर्नाटकची फौज आणावयास असे, तीही सत्वरच येईल. आल्यानंतर त्याची रवानगी होईल. आपणाकडील सखाराम हिरसाट व गोपाळजी मोहिते हुजूर येऊन पोहोंचले नाहींत, ते हुजूर आल्यानंतर आपण विनंति लिहिल्या अन्वयें शपथ व स्वरस्तुरचे आज्ञापत्र असें आकाराम यादव हवलदार या समागमें देऊन व सदरहू उभयतां मागाहून आज्ञा-

होऊन सत्वरच येऊन पोहोंचतील म्हणोन आज्ञा लिहिली त्यास उत्तम आहे. पेशजीं शेवेशीं विनंतिपत्र पाठविलें आहे त्या प्रमाणें फौजेची रवानगी सत्वर झाली पाहिजे व सरखाराम शिरसाट व गोपाळजी मोहिते येथून शेवेशीं रवाना केलेले होऊन पोहोंचले असतील. पेशजीं विनंती लिहिल्या अन्वयें बाफत्त व स्वदस्तुरचें आज्ञापत्र अकागम यादव हवलदार याजबरोबर पाठविलें पाहिजे. स्वामींनीं कृपा करून हवलदार मजकूर या समागमें वस्त्रें पाठविलीं तीं यादी प्रमाणें पावलीं. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना.

नंबर ४० (पृ. १०८).

श्री.

श्रीमन्महाराज श्री छत्रपति स्वामीचे शेवेशीं.

विनंती शेवक दौलतराव शिंदे कृतानेक विज्ञापना ता. छ. २० रमजान पावेतों यथास्थित असे. विशेष ता-तोश्री बायांचें खुल चौघे जवाड सिरंज याचिले. हर्ली कूच करून करचिरांकडे जाणार म्हणून ऐकण्यांत येतें. त्याजवरून स्वामींस विनंति लिहिली आहे. नवाब आदीकरून पत्रें गेलीं त्याणीं अश्वासन दिलें. इकडील फौज पलटणें ही मागें आहेत. त्यास स्वामींनीं अश्वासन दिलें पाहिजें. सूचनार्थ विनंति लिहिली आहे. शेवेशीं श्रुत होय हे विज्ञापना. पैवस्ती छ. ४ माहे शव्वाल सनू निम्मा निस्सैन मया व अल्फ. मुक्काम डुब्कर.

नंबर ४१ (पृ. १२०).

श्री.

राजमान्य राजश्री नागोजीराव घारगे हुजूरकर
यांसीं.

आज्ञा केली ऐसीजे:- तुम्हीं विनंतीपत्र छ. २६ रा बालु-
वें पाठविलें तें हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जहालें. तर-
फड सविस्तर जें लिहिणें तें आज्ञापत्रीं लिहिलें आहे. त्याजवरून
कळेल. शत्रुकडील प्रकार कसाकाय बोलणेचा ठराव येतो तो मा-
गाहून सविस्तर आज्ञापत्रीं लिहून पाठविणेची आज्ञा होईल. रा-
जश्री मोरो सखदेव यांसी रूबरू कितेक कार्यभागाचीं आज्ञा
केली आहे. त्या आज्ञेप्रमाणें साद्यंत अर्थ चित्तांत आणून तदनु-
रूप तुम्हीं आविलंब गोंवेस जाऊन अज्जम जासूलायुदाफ यांची
भेट घेऊन त्याजकडील बोलण्याचा प्रकार स्वचित्त करून घेऊन
आविलंब त्याजकडील पत्रोत्तर सरंजाम सुद्धां जल्दीनें हुजूर ये-
ऊन पोहोंचतें करावें. ये विषयींचा सर्व अर्थ तुमच्या चित्तीं अ-
सला आज्ञापत्रीं आज्ञा करून कळवावें असें कार्य आहे. पुण्या-
चें पत्राची नालीक लिहून पाठविली आहे. त्याजवरून कळेल. जा-
णिजे सूर सन्मू मय्यातैन व अलुफ छ. २ माहे जिलकाद. सरका-
रचें निशाण मोर्तब जालें. पैकारली छ. ८ माहे जिलकाद स-
न मय्यातैन व अलुफ. मुकाम बंदर गोवें.

नंबर ४२ (पृ. १२१).

श्री.

राजमान्यराजश्री नागोजीराव घारगे अर्जीराव हुं-
नाम राव यांसी

आज्ञाकेली ऐसीजे:- राजश्री आकाराम याद्य हव-
लदार छ. २८ गोवानें येऊन पोहोंचले तिकडून लहकूब चित्या
पंधरा दिवसाच्या येऊन जाले आहेत. "जे गोवा गोष्ट नव असावी.
त्याहेरचे सरकारीं ही गोवा मारूं नये, व आपण ही गोवा मारूं नये.

मभौवला; गाव देऊन बसावें. आणि वेदशास्त्र संपन्न राजश्री भाऊ जांबोराव व राजश्री रायाजीआधव जप्तन मुद्दुक व राजश्री विश्वासराव चाटगे सर्जेराव या त्रिवर्गास पुण्यास पाठवावें. तेथें बोलण्याचा ठराव करून फौजे उतरावी." या प्रमाणें त्याजकडील वकिलें घेऊन मजकूर निल्हे आले आहेत. त्या प्रमाणें त्या त्रिवर्गाची रवानगी करून पाठविण्यांत येत आहे. तेथें बोलण्याचा ठराव पक्केपणें घडोन कसा काय उलगडण्यांत येतो तो मजकूर मनास आणून तुम्हांस आज्ञापत्री आलीच होईल. तिकडील मतलबी प्रकार हा सबे तुम्हांस द्र बिल आहेच. परंतु आलेलें बोलणें मनास आणावें, या करितां त्रिवर्ग मजकूर निल्हेची रवानगी होत आहे. साराश ये विषयाचा मजकूर तुमचे चित्तांत आलाच आहे. त्या प्रमाणें तुम्ही गत्या कार्य भागाचें बोलणें खचीत करून मजमत जोखूबा युदाफ यासी खाफत पुरस्सर करार दाद करून घेऊन त्यांची खातरदास्त करून देऊन त्याजकडील पलटण सरंजामसुद्धां जलदीनें येऊन पोहोंचे तें जरूर करावें. येविशीची तुम्हांस आज्ञा करून कळवावें असें नाहीं. तरकूड आहे. या प्रमाणें राजश्री हबतराव गायकवाड विश्वासराव तुम्हांस लिहिलें त्याजवरून कळेल जाणिजे. सूरसन मय्यातैन व अलूफ. छ. २ माहे जिलकाद निशाण मोर्तब असे.

पोवस्ती छ. ८ जिलकाद सूरसन मय्यातैन व अलूफ मुकाम बंदर गोवें.

नंबर ४३. (पृ. १२२).

श्री.

राजमान्य राजश्री नागोजीराव घारगे इसुजार राव यांसी

आज्ञा ऊर्फा पेशजि. पुण्यास्तून राजश्री भाकारा-

म यादव इबाउदार रांजनुरोवर राजश्री दीक्षित राव शिंदे व बाबा-
जी अनंत पागनीस यांचीं पत्रें त्यांजकडून राजश्री गणपत भि-
काजी व रामचंद्र परशुराम यांसी व कंपूचीं पत्रें बरडेउ इंग्रज यां-
स आणी. जे करवार ची उढाई बद करून पंधरादिवस स्वस्थ रहा-
वें आणि हुजुरून मर्तसार गृहस्थ आणविले आहेत ते पुण्याहून
घेऊन तहाचे बोलण्याचा ठराव करून तुम्हास पत्रे पाठवून देऊं. त्या-
प्रमाणें वर्तणूक करणें या प्रमाणें पत्रें आलीं तीं देऊन राजश्री शि-
वाजी अंबाजी व बचाजी बल्लाळ व तिकडील अलकारी रवाना करून
न दिल्हे. त्यानपरी त्यांणीं जाबसाल केला जे पंधरा दिवस उगाच
तडकुवी करून रहावयाचें आपणास अनुकूल पडत नाहीं. आ-
पण पत्रें पाठवितों. त्यांचें उत्तर येईल त्या प्रमाणें आम्ही वर्तणूक
करूं, तुम्ही आले मार्गे जाणें. या प्रमाणें सांगून उभयतांमध्य-
रांस होऊन न घेतां निरोप देऊन पाठवून दिल्हे. हें कज्जे वर्तमा-
न तुम्हास कळावें म्हणून आज्ञापत्री तपशिलें आज्ञा झाली असे.
परभारें तुम्हास पुण्याहून पत्रे येऊन तह झाला ही आवई जाईल.
याकरितां तपशिलें आज्ञा झाली असे. तरी तुम्ही त्वरेनें निकडीस
सिद्धता करून समक्ष आला जहाले अन्वयें यावयाचें करणें. मु-
ख्य गोष्ट तुम्ही पत्ररूपें सरंजाम सुद्धां अज्जम जोसूबा युदाफ या
ची घेऊन भगत्यरूप यावयाचें करावें. म्हणजे बहुतेक मसल-
तीचे कार्यभाग उभय पक्षांचे दृष्टीस पडोन येतील. यंणे-
चा समय हाच आहे. हें जाणोन त्वरेनें यावयाचें करावें. जा-
णिजे. सूरसन सलासैन व अलफ. छ. १७ माहे जिल्हेज व-
द्दुत काय लिहिणें. शिक्का.

नंबर ४४ (पृ. १२८).

श्रीमन्महाराज श्री छत्रपति स्वामी यांनी [illegible] नि
यांचे कारभारी कलमें राजश्री पंत प्रधान यांजकडून उल्लंघन करा

बयाबां विद्यमान राजश्री दौलतराव शिंदे भासिजा बहादूर सूरसन इहिदे पय्यातैन व अल्फ.

१ परगणें, चिकोडी व मनोळी येथील फुरगांव इनामदार व सरंजामी सुद्धां रामचंद्र परशराम यांसी पत्र द्यावें. सदरहू अन्वयें माहाल व फूट गांव दरोबस्त यांचे यांजकडे चालून द्यावे. चिकोडी व मनोळी व फूट गांव पूर्वी स्वामीकडे चालतले ते त्याप्रमाणें चालतील येणें प्रमाणें करार.

२ पेशजी प्रमाणें कागदोपत्री शिलशिला उभयपक्षीं, चालत असावा. संस्थानचें कल्याण दिवसें दिवस वृद्धि होत असावी. पूर्वी पासून कागदोपत्री शिलशिला चालत आला आहे.

या प्रमाणें चालेल, स्वामीचे राज्याचें कल्याण ते सेवका कडून घडेल, येणें प्रमाणें करार.

३ परशराम पंत यांचा देण्याचा तंटा एकंदर न गणावा.

सदरहू प्रमाणें करार.

४. निकडून वकिलीस येतील व पुण्यांत राहतील त्यांची योग्यता पाहून खर्च चालवावा.

सुदामत पेशजी चालत आल्याप्रमाणें शिरस्ता पाहून चालविलें जाईल, येणें प्रमाणें करार.

५ परस्परें फिर्याद इकडे कोणी आल्यास जिकडील तिकडे पाठवून द्यावे. कलम.

स्वामीकडील कोणी फिर्याद आल्यास स्वामीकडे पाठवूं, सेवकाकडील कोणी स्वामीकडे आल्यास सेवकाकडे पाठवावयाची आज्ञा असावी, येणें प्रमाणें करार.

६ इकडील कामें पडल्यास निकडून पुस्त पन्हा व्हावा. तिकडील कामें पडल्यास उभयतां परस्पर साहित्य

व्हावें. कलम. १.

सदरहू प्रमाणें करार.

७ इंग्रजांचे रुपये मुद्दल वाजवी हिरोबी रुजुवात मुं-
बईच्या रुजुवातीनें फडशा करून हास्तेबंदी प्रमाणें उलगडून
देऊं. यांस इंग्रजांचें बोलणें जरबेंचे पडल्यास सदरहू प्रमा-
णें आपण तोड काढावी. कलम. १

इंग्रजांचा ऐवज स्वामीकडे येणें त्याचा फडशाचाठ-
राव स्वामीकडून दोन महिन्याच्या मुदतीत क्षेप निक्षेप व्हावा.
तो पावेतो स्वामीकडील जाबसाल्यास मानबर आले आहेत,
त्यांनीं येथें असावें. इंग्रजाकडील जाबसाल्याच्या ठरावा वि-
षयीं सेवकाकडून अंतर होणार नाहीं. येणें प्रमाणें करार.
छ. १९. माहे सफर. आषाद, इहिदे मय्यातैन व अल्फ.

नंबर ४५ (पृ. १२८).

यादि राजश्री श्रीमन्महाराज श्री छत्रपति स्वामी
साहेबकडील राज्य फौजेचे खर्चासुळें आतरीस आलें, सबब
जाजती सरंजाम श्रीमंत पंतप्रधान यांजकडून कोल देण्याचा सू-
रसन इहिदे मय्यातैन व अल्फ. सरंजाम वसुल राज्याचे ल-
स्करास.

२,५१,००० महाराजांस सरंजाम
२५००० सौभाग्यवती बाईस सरंजाम.

२७५००

स्वामीनीं ज्याजती खर्चाबद्दल सरंजामा सहू महा-
ल व्हावून द्यावे, म्हणोन भाषा केली, त्यास सेवकास अनेक
प्रकारच्या दौलती प्रकरणीं मसलती पडतात. त्यास फौजे वि-
षयीं सेवकें विनंति पत्र लिहिलें, त्या प्रमाणें स्वामी कडून
फौजेची रवानगी हरवक्त होत असावी. सदरहू पावणेतीन

लक्षाचे कमाल बेरजेचे महाल नेमून देवूं. येणें प्रमाणें करार

१ राजांतील इनामदार व जहागीरदार व देशमूख व देशाधिकारी व जमेदार व सरंजामी श्रीमंता कडील मक्तीचा उभर दारबदून सरकार हुकुमा प्रमाणें अनुभवीत होते. ते कडी एकदर त्याची सरंजाम गिरी बडतली हुजुरास व्हावी ये विशीं तुम्हांकडे आत्र्यास किर्याद मनास आणू नये. सदरहू प्रमाणें करार. कलम.

नंबर ४६ (पृ. १२९).

चिरंजीव राजमान्य राजश्री सरवाराम व्हावगे सजैगत यासी आज्ञा केली ऐसाजे, तुम्ही करवीरचे मुक्कामीं स्वामी सन्निध विनंति केली की, प्रांत कागल देहाय सुद्धा आम्हांकडे पुरातन पासोन इनाम चालत असता मागील दंग्यामुळें काहीं देशाग चालत नाहीं. याजकरितां नूतन सनदी भोगवटीयासी देऊन चालविले पाहिजे, म्हणोन विदीत केलें. त्यावरून मनास आणिलां तुम्ही स्वामीचे राजाचे उपयोगी रहावें रामचंद्र परशराम यांणीं पंतप्रधान व शिंदे यांजकडून व आपलीकडून आणून राज्य आतरीस आणिलें. करविरास राहू देऊन राज्याचा उच्छेद करावा, हें लक्ष धरून राज्याचा नाश केला. ते समयीं तुम्ही राज्य उपयोगी स्वामी सेवा रवानर जमा युक्त करून दारवांचली. त्याजवरून स्वामी तुम्हांवर कृपालू होऊन पुरातन तुमच्या वंशपरंपरागत पादशाही सनदा पाहित. त्याबरहुकुम साडे एकूणपन्नास देहाय सुद्धा दरोबस्त इनाम कुलबाब कुलकानू हाल्ली पट्टी व पेस्तरपट्टी जल, तरू, पाषाण, निधि, निक्षेप सहित खेरीज ठक्कदार व इनामदार करून दिल्हे असता. गांव खिलपट्टीचा.

२३ प्रांत कागलगांव.	१२ प्रांत वाळवेगांव.
१४ कसबा मुरगूडगांव.	१२ कसबा चिरवतीगांव.

७॥ कसबा मोजरी गांव. ९ कसबा डिगरज गांव.
२ मौजे आंबेसिंग, व मुलखाडी.

२६॥ ९ ४२

एकूण देहाय साडे एकुण हात्तर इनाम करार करून दिल्हे असे. तरी तुम्हीं च तुमचे पुत्र पौत्रादि वंश परंपरेनें चिरकाल पुरातन भोगवटे प्रमाणें अनुभवून राज्यास एकनिष्ठपणें असोन सुरवरूप रहाणें. आपिजे, सूरसन इहिदे मयातैन व अलफ. रबी १९ माहे जिलकाद. बहुत काय लिहिणें. मोर्तब शिक्क्याचें असे.

नंबर ४७ (पृ. १२९).

राजमान्य राजश्री शिवोजी नाईक निंबाळकर देसाई यांनी नाईक मार्फत हुजूरी जाणें आज्ञा केली एसीजे. तुम्हांवरी चिरंजीव राजश्री सरजाराव घाटगे सर्जाराव यांणी करवीरचे मुक्कामीं विनंती केली जे मजकूर निरे धोंजकडे प्रांत मजकूर यांतील खेडीं इनाम पुरातन चालत असतां दर्म्यान मुंढे चालत नाहींत. याजकरितां नूतन सनदा देऊन चालविले पाहिजे. मजकूर निरे राज्याच्या उपयोगीं, एकनिष्ठपणें शेवा चाकरी केलीयाचे निमित्यार्जित सनदा आहेत, त्या बरहुकूम कर्यांनी तीन देहाय सुद्धां इनाम जगेवरुन करून द्यावें, म्हणून विदीत केलें. यावरून स्वामी कृपाळू होऊन पुरातन सनदा आहेत त्या प्रमाणें कुलबाब कुलकानू हद्दी पट्टी व पेरूसर पट्टी जल, तरू, पाषाण, निधी, निक्षेप, सहीत खेरीज हक्कदार व इनामदार करून दिल्हे असत. बिनपत्रीत.

५ कसबा कटगाव
१ मौजे जत्रवर.
१ मौजे निपाणी.
१ मौजे कोरजी.

१ मौजे शिरगोंदी १ मौजे कुरळी.

३ २

५

२ मौजे कणंगले कसबा सोलापूर, मौजे कुणूर कसबानेज.
४ कसबा सावगांव.

१ मौजे कोगनुळी. १ मौजे संवदलगें.
१ मौजे मतिवडें. १ मौजे सुळगांव.

२ २

४

११.

१ कसबा मजकूर कसबा सांव गांव व कसबा सोलापूर, कसबा लार या तिन्ही कर्यातींत पाटिलक्या व नाईक्या व देशमुखीचा कमत व इकरा सुद्धां.

१ मौजे हामीद वाडा येथील देसकत व पाटिलकी व नायकी व इकरा सुद्धां.

१ मौजे सिंदनाळ येथें निमसावर जमीन सनु सब्बा साली जमाबंदीवर लगाईत बारगीर पडला सबब साल्पर्वसीची सनद करून दिल्ही आहे.

त्या प्रमाणें चालावें. कलम.

एकूण देह रास ११ एकरा ४ कलम ४ पुरातन भोगवटे प्रमाणें करार करून दिल्हे असे, तरी सदरहू प्रमाणें कलम तुह्मीं व तुमचे पुत्र पौत्रादि वंश परंपरेनें चिरकाल अनुभवून २ स्थायी एकनिष्ठपणें असोन सुखरूप राहणें, जाणिजे. सुरसन इहेद मयानैन व अलफ. रवाना छ. १९ जिल्काद बहुत काय लिहिणें. सोलेव चालले.